ग्रंथाली

मी 'नाना' बोलतोय...! | सुहास रामनाथ पाठारे | शब्दांकन : प्रा. प्रतिभा सराफ

ग्रंथाली

मी 'नाना' बोलतोय...!

सुहास रामनाथ पाठारे



मी 'नाना' बोलतोय...!

सुहास रामनाथ पाठारे
(महाराष्ट्राचे जिम्नॅस्टिक्स प्रणेते)

शब्दांकन : प्रा. प्रतिभा सराफ

ग्रंथाली

ग्रंथाली प्रकाशन क्रमांक १४६६

मी 'नाना' बोलतोय...!
Mi 'Nana' Boltoy...!

आत्मचरित्र
श्री. सुहास रामनाथ पाठारे
Biography
Shri Suhas Ramnath Pathare

शब्दांकन
प्रा. प्रतिभा सराफ
Wording
Prof. Pratibha Saraph

पहिली आवृत्ती : २३ जानेवारी २०२६

© श्री. सुहास रामनाथ पाठारे
७००-ए, यशोदीप को-ऑप सोसायटी,
नेहरूनगर, कुर्ला (पूर्व),
मुंबई ४०००२४
भ्रमणध्वनी : ९९८७४१६०६७

प्रकाशन
ग्रंथाली
१०१, १/बी विंग 'द नेस्ट',
पिंपळेश्वर को-ऑप. सोसायटी,
टायकलवाडी, स्टार सिटीसमोर,
मनोरमा नगरकर मार्ग,
माहीम (प.), मुंबई ४०००१६
दूरध्वनी : (०२२) २४२१६०५०
granthalibooks2@gmail.com

मुखपृष्ठ : प्रदीप म्हापसेकर
अक्षरजुळणी : ग्रंथाली संगणक विभाग

मुद्रण
क्विक प्रिंट सोल्युशन्स
इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी.डी. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई ४०००३१
design.quickprint1@gmail.com

मूल्य : ३५० रुपये

या पुस्तकातील कोणताही मजकूर, पाने किंवा चित्र यांचे फोटो काढून, स्कॅनिंग करून, टाईप करून, फोटोकॉपी करून किंवा कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनःप्रकाशित अथवा प्रसारित करणे हा दंडनीय गुन्हा आहे. असा गुन्हा करणारे कायदेशीर कारवाईस पात्र ठरतील.
कोणत्याही माध्यमातून, पुस्तकाचा कोणताही भाग प्रसारित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक आणि प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वसंमती घेणे बंधनकारक आहे.

Shree Pawanputra Vyayam Mandir

।। श्री स्वामी समर्थ ।।
।। जगत्गुरू श्री कुमार स्वामी ।।
।। एकम ।।

आयुष्यातील प्रत्येक अडथळा हा
यशाच्या मार्गावरील पायरीसारखा असतो.
थोडेसे थांबून, विचार करून, श्वास घेऊन
प्रयत्नपूर्वक विश्वासाने वर चढत राहा. यशाची शिखरे गाठत राहा.
पदकांपेक्षा माथ्याला लागलेली माती महत्त्वाची असते.
आयुष्य छोटे आहे पण मोठा आनंद देणारे आहे!
खेळासाठी अवघे आयुष्य समर्पित...

– सुहास रामनाथ पाठारे

मनोगत

नमस्कार, मी सुहास रामनाथ पाठारे उर्फ नाना. मला तुमच्याशी बोलावेसे वाटतेय. याचे कारण जवळजवळ सात तपं मी या पृथ्वीवर काढली आहेत!

मला स्वतःला असे वाटतेय की माझ्याकडे काहीतरी वेगळे सांगण्यासारखं आहे, जे सांगणे मला अत्यावशक वाटत आहे कारण माझ्या पुढच्या पिढीला त्या इतिहासाची गरज भासणार आहे!

इतिहास म्हणजे काय हो? भूतकाळात घडलेल्या घटनांचा पद्धतशीरपणे झालेला अभ्यास. बरोबर ना? त्यांचे कालक्रमानुसार केलेले विश्लेषण करण्याचा या पुस्तकाद्वारे मी प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. यामध्ये आत्तापर्यंत भेटलेल्या व्यक्ती, भवतालचा समाज, मी पादाक्रांत केलेली क्रीडा क्षेत्रातील ठिकाणे आणि सत्याऐंशी वर्षाचा दीर्घ काळातील घटना इथे उद्धृत करायचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. भूतकाळातील घटना कशा घडल्या आणि त्यांचे तुमच्या भविष्यावर काय परिणाम होऊ शकतील याची शक्यता गृहीत धरून तुम्ही वाटचाल करावी, असे मला वाटते! माझी खडतर वाटचाल तुम्ही पूर्णत्वाने समजून घेतली तर तुमची वाटचाल निश्चितपणे सुलभ झाल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री आहे!

ऋणनिर्देश

१. क्रीडा क्षेत्रातील गुरुवर्य श्री. भगवंत माधव पंत.
२. माझे वडील स्वातंत्र्यसैनिक श्री. रामनाथ हरिराम पाठारे.
३. मोहन गोखले, श्री. कुमार केतकर आणि श्रीम. शारदा साठे, श्री. सुरेश लोटलीकर तसेच चेंबूर हायस्कूल माजी विद्यार्थी संघाचे सर्व सदस्य.
४. समाजसेवक श्री. भाऊ फाटक, कारेकर.
५. जिम्नॅस्टिक्सचे प्रचार आणि प्रसारक श्री. रामदास कल्याणपूरकर, श्री. एस.सी. व्यास, श्री. लाळे, श्री. धोत्रे, श्री. पुरुषोत्तम सावंत (रिक्रिएशन व्यायाम शाळा, कल्याण).
६. जिम्नॅस्टिक्स संगणीकरण सहाय्य नीलम भोसले-बाबर, देसाई.
७. लोकमान्य सेवा संघ - विलेपारले, भोईर जिमखाना - डोंबिवली, समर्थ व्यायाम मंदिर - दादर, भारत व्यायाम शाळा - माझगाव, सोशल सर्व्हिस लीग - परळ, यशवंत व्यायाम शाळा - नाशिक, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ - अमरावती, महाराष्ट्र मंडळ - औरंगाबाद, महाराष्ट्रीय मंडळ- पुणे, भानू तालीम संघ - मिरज, सांगली-सातारा - सुजित शेडगे इ.
८. मुंबई महानगरपालिका, शिक्षण व क्रीडा संचनालय, महाराष्ट्र राज्य सरकार, बृहन्मुंबई जिल्हा, जिम्नॅस्टिक्स संघटना, अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स (बीएमसी) इ.
९. आत्मचरित्र शब्दांकन प्रा. प्रतिभा सराफ.
१०. ग्रंथाली प्रकाशन आणि त्यांची संपूर्ण टीम.

अनुक्रमणिका

१. मी 'नाना' बोलतोय...! / १
२. आयुष्याची सुरुवात / ८
३. स्वातंत्र्यसैनिक - रामनाथ हरिराम पाठारे (प्राथमिक गुरू, मल्लखांब, स्विमिंग इ.) / ११
४. श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराची स्थापना (१९६३) / २३
५. विविध स्पर्धांमध्ये श्री पवनपुत्रची कामगिरी / २७
६. पहिला बाळंभट दादा देवधर पुरस्कार / ३३
७. मल्लखांब - एक प्राचीन भारतीय खेळ / ३५
८. आसने, जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स, मल्लखांब / ३८
९. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये माझा सहभाग / ४२
१०. गुलाब इंजीनिअरिंग वर्क्स / ४६
११. आईवडिलांचे निधन / ४९
१२. रेवती नारायण महंत यांचे योगदान / ५२
१३. विविध क्रीडा संघटनांमधील पदाधिकार / ५४
१४. देशासाठीचे समर्पण / ५८
१५. अर्धांगिनी : विजया / ६०
१६. कुर्ला, तुर्भे, माहुल, मानखुर्द आणि चेंबूर क्षेत्र, डोंबिवली, विलेपारले / ६५
१७. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील आमचे खेळाडू / ७३
१८. वयोमानाधारीत शिक्षणासाठी मुलांची क्रीडा उपकरणे / ८९
१९. बाभळीच्या झाडाला आंबे कसे लागतील? / ९१

२०. शहाजी राजे भोसले क्रीडा संकुल
(अंधेरी क्रीडा संकुल) / ९६
२१. कालाय तस्मै नमः / १०४
२२. डी-८० चेंबूर गावठाण अर्थात श्री मल्हार निवास / १०८
२३. आपल्या स्वतःच्या घराचे स्वप्न साकार / ११६
२४. देशविदेशातील प्रवास / १२०
२५. कोविड-१९ ची दहशत / १३२
२६. अध्यात्माकडे वाटचाल / १३५
२७. शरीर, मन आणि जीवनसंवाद / १३८
२८. इच्छापत्र / १४१
२९. बदल... / १४३
३०. भारताचे २०३६ चे ऑलिंपिक आयोजन (प्रस्तावित) / १४७
३१. मुलांचे वय आणि खेळांची ओळख / १५५
३२. खेळांबद्दल पालक आणि खेळाडूंची मानसिकता! / १६०
३३. आठवणींच्या झुल्यावर...
१. आदर्श गुरुकुल - श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर -
श्री. प्रदीप अनंत चेंबूरकर / १६८
२. तस्मै श्री गुरुवे नमः - डॉ. प्रदीप पाटकर / १७२
३. गुरुवर्य श्री. सुहास रामनाथ पाठारे -
श्रीमती प्रतिभा चेंबूरकर-पाठारे / १७५
४. गुरुदक्षिणा - श्री. चंद्रशेखर पाटील / १७७
५. आरोग्यदायी संस्काराची गुरुकिल्ली -
प्रा. प्रतिभा सराफ / १८०
६. दादा आणि नाना (जन्मशताब्दी - रा. ह. पाठारेंची) -
ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर / १८४
७. श्री पवनपुत्र : पुढील वाटचाल -
ॲड. शरद कृष्णा भोसले / १८७
८. नानांचा शेजारी नव्हे सहकारी -
ॲड. प्रा. प्रमोद सावंत / १९०

१. मी 'नाना' बोलतोय...!

माझा जन्म २७ नोव्हेंबर १९३९ ला मुंबई लगतच्या चेंबूर (उपनगर) या छोट्याशा खेडेगावात झाला. आम्ही, म्हणजे आमचे पूर्वज सोमवंशी क्षत्रिय पाठारे (SKP) पाचकळशी समाजाचे आहोत. इतिहास साक्षी आहे की १२व्या शतकापासून रामदेवराव यादव (दौलताबाद किल्ला) आणि माहीम किल्ला प्रशासनाशी आमच्या पूर्वजांचा संबंध आहे. आमच्या समाजातील अनेक सदस्यांनी रामदेवराव यादव महाराजांच्या दरबारात आणि सैन्यात विविध पदांवर काम केलेले आहे. काहींनी सेनापती-प्रमुख अशी महत्त्वाची पदे भूषवली आहेत. जुलमी मुघलांच्या आक्रमणानंतर, जेव्हा रामदेवराव यादव यांचे साम्राज्य आणि त्यांची सेना विस्थापित झाली, तेव्हा लष्कर आणि प्रशासनात काम करणारे आमच्या समाजाचे सदस्य मुंबई, ठाणे आणि महाराष्ट्राच्या इतर भागात स्थायिक झाले. येथूनच आमचा वंश पुढे चालू राहिला. आमच्या अनेक पिढ्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य मुंबईत घालवले, म्हणून आता आम्ही पूर्णपणे मुंबईकर आहोत त्यातही आम्हाला चेंबूरकर म्हणूनही ओळखले जाते. दादरला आमच्या समाजाच्या सदस्यांनी समाजाच्या प्रगतीसाठी गिरगाव येथे आणि दादरला वनमाळी हॉल बांधला होता आणि तो आजही कार्यरत आहे. आमचे

पूर्वज खूप पूर्वी चेंबूरमध्ये स्थायिक झाले, जिथे आमचेही कुटुंब वाढले. चेंबूरच्या प्रत्येक गल्ल्याबोळातून मी हिंडलेलो आहे. त्याच चेंबूरचा विस्तार होऊन आता ते मुंबईला जोडणारे सर्व सोयींनी उपयुक्त असे उपनगर आहे. पण माझा जन्म चेंबूर नावाच्या गावात झाला, हे मला आवर्जून सांगायला आवडेल!

चेंबूर हे पूर्णतः खाडी आणि वाड्यांनी वेढलेले होते. लोक शेती, पशुपालन, मीठ उत्पादन आणि चेंबूरच्या जवळच असलेल्या तुर्भे आणि माहुल या भागात मासेमारी करत होते. माझे वडील रामनाथ पाठारे हे शिक्षणासोबतच क्रीडाप्रेमी होते. ते संस्कार मला आपसुकच मिळाले. माझी कथा तुम्हाला कदाचित बालिश वाटू शकेल! माझे संपूर्ण आयुष्य शिक्षण, व्यायाम, आसन (योग), मल्लखांब, बास्केटबॉल, पोहणे, जिम्नॅस्टिक्स आणि ॲथलेटिक्समध्ये या खेळांनी व्यापले आणि मी त्यातच रमायचो. खेळांचा उल्लेख मला व्यायामाशी संबंधित एका श्लोकाची आठवण करून देतो:

व्यायामात् लभ्यते स्वस्थं दीर्घायुष्यम् बलम् सुखम् ।
आरोग्यम् परमम् भाग्यम् स्वस्थं सर्वार्थसाधनम् ।।

अर्थ : व्यायामामुळे आरोग्य, दीर्घायुष्य, शक्ती आणि आनंद मिळतो. निरोगी असणे हे शेवटी महत्त्वाचे आहे आणि चांगल्या आरोग्यामुळेच ते साध्य होते.

हा छोटासा श्लोक जीवनातील व्यायामाचे महत्त्व अचूकपणे स्पष्ट करतो. मी या चरित्राद्वारे तेच अधोरेखित करण्याचा प्रयत्न आहे. आज मला जाणवतेय की माझ्यासारख्या खेळाडू, क्रीडाप्रेमी आणि क्रीडा शिक्षकासाठी आत्मचरित्र लिहिणे किती कठीण होते, कारण मी लेखक नाही. मी फक्त एक सामान्य खेळाडू आणि क्रीडा कार्यकर्ता आहे. मला माझ्या वडिलांकडून हे ज्ञान पिढीजात मिळाले आहे. माझे हे चरित्र समकालीन काळ, समाज, परंपरा आणि इतर गोष्टींचा उहापोह करायचा छोटासा प्रयत्न आहे. आत्मचरित्र लिहिण्याचे कधीच माझ्या मनात नव्हते. चरित्र लिहिण्याइतके माझे समाजाप्रती योगदान आहे, असेही मला वाटत नाही. परंतु मला लाभलेले दीर्घ आयुष्य मी संपूर्णतः आसने मल्लखांब आणि

जिम्नॅस्टिक्स या खेळासाठी पूर्णपणे समर्पित केले आहे. हाच माझा जीवनाचा प्रवास आहे. म्हणूनच ऐंशी वर्षापासूनचा आजपर्यंतचा क्रीडाक्षेत्राशी माझा आलेला संबंध आणि अनुभव निश्चितपणे आजच्या कालच्या तरुण पिढीपर्यंत पोहोचू इच्छितोय. काळाचा एक दीर्घ पट तुम्हाला उलगडून दाखवताना मीही तो अनुभवत आहे! याच अर्थपूर्ण उद्देशाने मी तुम्हाला अप्रत्यक्षपणे भेटण्याचा प्रयत्न करत आहे. मला इथे नमूद करायला आवडेल की इतर देशांच्या मानाने भारताला ऑलिंपिकमधील मिळालेली मेडल्स सर्वश्रुत आहेत. म्हणूनच मी माझ्या आयुष्याच्या उत्तरार्धात हे चरित्र लिहिण्याचे धाडस करत आहे. भारत सरकारने २०३६ मध्ये ऑलिंपिकचे आयोजन करणार असल्याची इच्छा व्यक्त केली आहे, म्हणून या पार्श्वभूमीवर मी माझे अनुभवाचे बोल सर्वदूर पोहोचवायचा प्रयत्न करत आहे. सहाजिकच भावनाविवश होत आहे. माझे संपूर्ण आयुष्य अत्यंत साधेपणाने मी व्यतीत केले आहे. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटीचा अनुभवही घेतला आहे. अनेक गोष्टी मला सांगावाश्या वाटतात पण त्या पूर्णपणे मला सांगता येतीलच, असे नाही. Healthy mind in healthy body असे म्हटले जाते त्यामुळे माझ्यासारख्या निरोगी शरीरात एक निरोगी मन वास करत आहे, हे या वयात मला निश्चितपणे जाणवत आहे! माझी स्मरणशक्ती तल्लख आहे त्यामुळे मी आज काही सांगू शकत आहे!

भारतात व्यायाम आणि विविध प्रकारच्या शारीरिक क्रीडाप्रकारांना खूप प्राचीन इतिहास आहे. या परंपरेत आसने (योग), कुस्ती, मल्लखांब, नृत्य, खेळ, मार्शल आर्ट्स आणि इतर शारीरिक क्रीडाप्रकारांचा समावेश केलेला आढळतो. भारतीय संस्कृतीच्या इतिहासात योगाचे (आसनांचे) स्थान अढळ आहे त्याचा पुनरूच्चार करण्याची गरज नाही. आपले प्राचीन वेद आणि स्तोत्रे यात अत्यंत स्पष्टपणे याचे उल्लेख आढळतात. तालमीचे/ व्यायामाचे अनेक प्रकार आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये आहेतच. व्यायाम आणि आसने म्हणजे शरीराच्या पद्धतशीर हालचाली म्हणता येईल. याला शारीरिक सराव असेही म्हणता येईल. निरोगी आरोग्य हेच खरे तर व्यायामाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या ऋषीमुनींनी, साधूसंतांनी विविध माध्यमांद्वारे समाजाच्या मनात व्यायामाचे महत्त्व ठसवायचा प्रयत्न केलेला आहे.

आत्मचरित्र लेखनामागचा माझा उद्देश म्हणजे माझ्याविषयी फार मला काही सांगायचे नाही परंतु व्यायामाचे महत्त्व मात्र मला निश्चितपणे अधोरेखित करायचे आहे. आसने, मल्लखांब, जिम्नॅस्टिक्स, बास्केटबॉल, पोहणे आणि ॲथलेटिक्स यासारखे खेळ म्हणजेच सर्वांगसुंदर व्यायाम होय! मी आयुष्यभर या क्रीडा प्रकारांचा स्वतःही सराव केला आहे आणि हजारो विद्यार्थ्यांकडून करवून घेतला आहे. म्हणून माझे हे आत्मकथन त्या दृष्टीने महत्त्वाचे आहे! जेव्हा माझे मित्र आणि शुभचिंतक हे मला माझे आत्मचरित्र लिहिण्याचा आग्रह करू लागले, तेव्हा मी माझ्या भूतकाळाचा विचार केला. अनेक समृद्ध आठवणी दाटून आल्या तसेच काही आजही विसरता न येण्याजोगे आठवणींचे काळे ढगही आसपास गर्दी करू लागले आहेत. शेवटी मी माझ्या अनुभवांबद्दल लिहिण्याचा संकल्प केला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सामाजिक प्रबोधन आणि क्रीडाविषयक जनजागृती या उद्देशाने हे पुस्तक हे लिहिण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. माझ्यासारख्या क्रीडाप्रेमीसाठी हे काम सोपे नव्हते. जेव्हा माझ्याकडे ताकद होती, तेव्हा अनेक कारणांमुळे हे काम शक्य झाले नाही. तेव्हा विद्यार्थी घडवणे आणि क्रीडा क्षेत्रातील अनेक कार्यक्रमाचा भाग होणे यात कदाचित व्यस्त राहिलो असेन.

२०२५ या वर्षात मी ८६ वर्षांचा झालो आहे. मी स्वतःसाठी, स्वतःहून काहीही करू शकत नाही, याची दुखःद जाणीव आहे कारण मलाच अनेक गोष्टींसाठी कोणाचातरी आधार घ्यावा लागतोय. माझी इच्छाशक्ती आणि स्मरणशक्ती अजूनही तल्लख आहे, या एकाच कारणामुळे हे पुस्तक संपन्न होत आहे. माझे मित्र प्रा. प्रमोद सावंत, जे माझ्या आयुष्याच्या या टप्प्यावर सारथी म्हणून माझ्या पाठीशी उभे राहिले आहेत आणि तारणहार म्हणून, त्यांच्या क्षमतेनुसार विविध समस्या सोडवत आहेत. प्रमोद सावंत हे क्रीडाप्रेमी व्यक्ती आहेत. त्यांच्या मनाचा मोठेपणा म्हणजे त्यांनी 'क्रीडा महर्षी' ही पदवी देऊन माझा सन्मान केला, ही माझ्यासाठी आनंददायी गोष्ट आहे. मला तर पद्म पुरस्कार मिळाल्यासारखे वाटतेय! प्रमोद सावंत यांचे मनापासून आभार मानतो. या पुस्तकासाठी आत्मीयतेने कोण लिहू शकतो याचा जेव्हा मी विचार केला तेव्हा लक्षात आले की

प्रतिभा सराफ ही माझी चेंबूर हायस्कूलची विद्यार्थिनी आता लेखिका झाली आहे तर तिलाच विचारून पाहूया, असे मनात आले. शिवाय सात-आठ वर्ष ती पवनपुत्र मध्ये जिम्नॅस्टिक्स शिकायला माझ्याकडे यायची त्यामुळे जिम्नॅस्टिक्स या खेळाविषयी तिला माहिती तर आहेच परंतु तिला या खेळाविषयी आत्मीयताही आहेच! त्यात तिने हे काम आनंदाने स्वीकारले त्यामुळे मी केलेल्या संकल्पाच्या पूर्ततेकडे माझी आता वाटचाल सुरू झाली आहे. मी प्रतिभाचे आभार मानणार नाही परंतु तिला आशीर्वाद मात्र देऊ शकतो!

माझी स्मरणशक्ती चांगली असली तरी आत्मचरित्र लिहिण्यासाठी आवश्यक असलेल्या क्रमवार नोंदी माझ्याकडे नव्हत्या. परमेश्वर कृपेने या वयातही, मी घरभर फिरू शकतो हे जरी खरे असले तरी मला घराबाहेर पडण्यासाठी आधार लागतो. माझ्या मनात अजूनही अनेक गोष्टी करण्याची तळमळ आहे, परंतु माझे शरीर आता तितकीशी साथ देत नाही ही वस्तुस्थिती आहे. माझ्या नसांमध्ये आता पूर्वीसारखी ताकद राहिलेली नाही. वेळ निसटून चालली असेलही, परंतु माझे मनोबल बळकट आहे. प्रत्येक व्यक्तीप्रमाणे, माझ्या आयुष्यातही अनेक चढउतार आलेत. इतक्या वर्षांत वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांना भेटल्यामुळे त्यांचे चांगले- वाईट अनुभव माझ्या पाठीशी आहेत. जीवनाच्या शाळेत मी विद्यार्थ्यांना शिकवण्यासोबतच खूप काही शिकलो आहे. हे अनुभव तुम्हा सर्वांसोबत शेअर करण्याची इच्छा माझ्या मनात दाटून येत होती, या पुस्तकाच्या निमित्याने अनेक आठवणींना मी उजाळा देत गेलो आणि ते सहज शक्य झाले याचे कारण मी त्या त्या वेळेस माझ्या डायरीत त्या त्या काळच्या नोंदी करून ठेवलेल्या मला आढळल्या. आज ती डायरी मला आत्मचरित्र लिहिण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. म्हणूनच या टप्प्यावर मी आप्तस्वकीय आणि हितचिंतकांना विनंती करतो की शक्य असल्यास, प्रत्येकाने एक डायरी ठेवावी! माझ्या आयुष्याच्या या संधिप्रकाशात, काही धूसर झालेले क्षण ठळकपणे उजळून निघालेत याचे कारणच मी वेळोवेळी डायरीतील पांढऱ्या कागदावर कोरलेली काळी अक्षरे! मी माझ्या डायरीमुळेच माझे आत्मचरित्र लिहिण्याचे धाडस करत आहे. खरेतर चांगले काम

करण्यासाठी मुहूर्त कशाला पाहायला हवा? म्हणून सुरुवात तर केली आहे.

आत्मचरित्र म्हणजे लेखकाने स्वतःच्या जीवनातील अनुभवांचे स्वतःच्या शब्दांत केलेले वर्णन यानुसार अनुभव तर माझे आहे परंतु त्याचे शब्दांकन लेखिका आणि माझी जिम्नॅस्टिक्सची विद्यार्थिनी प्रतिभा सराफ करत आहे ही माझ्यासाठी खूपच आनंदाची गोष्ट आहे.

माझे हे आत्मचरित्र लेखन संकल्प पूर्ण करण्याचा माझा प्रयत्न आहे. प्रयत्न हा शब्द मी खूप विचारपूर्वक मांडला आहे, असे मी प्रामाणिकपणे नमूद करतो. प्रयत्न माझे आहेतच परंतु कोणतीतरी अदृश्य शक्ती हे माझ्याकडून करवून घेत आहे, अशी ही माझी तीव्र भावना आहे. माझ्या वडिलांचे आशीर्वाद माझ्यासोबत आहेतच, यात शंका नाही. मला तारीख, दिवस, वेळ, वर्ष इत्यादी तपशील आठवत नसतीलही, परंतु काही प्रमुख तपशील आणि घटना अजूनही माझ्या डोळ्यांसमोर जशाच्या तशा तरळतात त्यात तुमच्यापर्यंत वळवण्याचा हा एक प्रयत्न आहे.

आयुष्याचा दीर्घ पट मांडण्याचा, या लेखनाचा क्रम कदाचित उलटासुलटा असू शकतो, किंवा बरेच काही माझ्याकडून विस्मृतीत गेलेले असू शकते. एखाद-दुसरा संदर्भ चुकीचाही असू शकतो कारण तो मी माझ्या दृष्टिकोनातून मांडलेला आहे किंवा त्याची पुनरावृत्तीही झालेली आपल्याला आढळून येवू शकते कारण आठवणीसुद्धा पूरक कोनासारख्या संलग्न असतात! एका आठवणीला धरून अनेक आठवणी एकाच वेळेस मनात घर करतात. हा माझाच नव्हे तर सर्वाधिक अनुभव आहे! परंतु या लिखाणामागच्या ज्या प्रामाणिक भावना आहे त्या तुम्ही समजून घेऊन या पुस्तकाकडे पाहावे. तो. मी माझ्या सुज्ञ वाचकांना नम्रपणे विनंती करतो की या आत्मचरित्रपर पुस्तकात जे काही उपयुक्त आणि अर्थपूर्ण आहे ते निश्चितपणे अमलात आणा आणि जे अनावश्यक आहे ते सोडून द्या.

सुप्रसिद्ध हिंदी कवी दुष्यंतकुमार यांच्या एका शायरीचा शब्दार्थ लक्षात घ्या-

''सिर्फ हंगामा खड़ा करना मेरा मकसद नहीं
मेरी कोशिश है कि ये सूरत बदलनी चाहिए

मेरे सीने में नहीं तो तेरे सीने में सही,
हो कहीं भी आग, लेकिन आग जलनी चाहिए''

म्हणजेच माझे उद्दिष्ट केवळ गोंधळ निर्माण करणे नाही. ही परिस्थिती बदलण्याचा माझा प्रयत्न आहे. जर माझ्या हृदयात नसेल तर तुझ्या हृदयात, आग कुठेही असो, पण ती जळली पाहिजे!

या ओळी माझ्या आणि माझ्या वडिलांच्या जीवनाशी खूप प्रमाणात जुळतात, असे मला वाटते! केवळ माझ्या आयुष्यातच नाही तर माझ्यासारख्या अनेकांच्या आयुष्यात, वेदना-संवेदना तसेच सुखदुःखाच्या आठवणी अधूनमधून डोकावत असतात. त्यांना सहन करणे, पचवणे खूप कठीण आहे. असे असूनही, काहीजण दृढनिश्चय आणि ध्येयाने प्रेरित होऊन, जीवनात प्रत्येक अडचणीला तोंड देत पुढे जात राहतात. मीसुद्धा माझ्या दृढनिश्चय आणि मूल्यांच्या मार्गदर्शनामुळे कर्तव्याच्या मार्गावर पुढे जात राहिलो. आज मी अशा स्थितीत उभा आहे ज्याची मी कधीही कल्पना केली नव्हती. आयुष्यात अनेक अडथळे आणि अडचणींचा सामना करावा लागला होता. कोणत्याही अपेक्षा न ठेवता, निःस्वार्थपणे मी कर्तव्याच्या मार्गावर पुढे जात राहिलो. सामाजिक कार्य व्रतस्थपणे करत राहिलो.

सामाजिक कार्य म्हणजे स्वतःच्या घरचे खाऊन लष्करच्या भाकऱ्या भाजणे! याचा मी पूर्णपणे अनुभव घेतला आहे. अनुभव हा शिक्षकांसारखा असतो, तो आधी परीक्षा घेतो आणि मग धडा शिकवतो. माझ्या जीवनप्रवासातून तुम्हालाही काही चांगले धडे मिळू शकतील, अशी अपेक्षा आहे!

■

२. आयुष्याची सुरुवात

भारताच्या पारतंत्र्यात म्हणजे १९३९ मध्ये माझा जन्म झाला. स्वातंत्र्यानंतर, देशाची एका नवीन सुरुवात झाली होती. देशाला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक सुधारणांची गरज भासू लागली होती. देशासमोर अनेक नवीन आव्हाने होती, ज्यात गरिबी, बेरोजगारी आणि पायाभूत सुविधांचा अभाव होता. असे असूनही, सर्व भारतवासी देशभक्ती, संस्कृती आणि समाजसेवा याविषयी जागृत होते. त्या काळात, आजच्याइतके मनोरंजनाचे पर्याय नव्हते. सुदृढ शरीर हा जीवनाचा एक महत्त्वाचा घटक मानला जायचा. विविध खेळाबरोबरच शारीरिक बळ वाढवण्याचे अनेक पर्याय तेव्हाही उपलब्ध होते. त्या काळच्या माणसांमध्ये सामाजिकतेची तीव्र भावना होती. माझे वडील, रामनाथ पाठारे, एक स्वातंत्र्यसैनिक आणि सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांना व्यायाम, आसने आणि इतर खेळांचीही आवड होती. माझ्या वडिलांनी क्रीडा प्रकारांचे महत्त्व मला आणि अनिल म्हणजेच माझ्या लहान भावापर्यंत पोहोचवले. लहानपणापासूनच मला आसने आणि शारीरिक व्यायामाची प्रचंड आवड निर्माण झाली आणि मी त्याच मार्गावर मार्गक्रमणा केली. माझ्या सभोवतालचे वातावरणही या क्रीडा प्रकारास पूरक होते. सामाजिक उपक्रम, व्यायाम, आसन (योग) आणि मल्लखांबाचे

सुरुवातीचे धडे मला माझ्या वडिलांकडून लाभले. ते माझे पहिले गुरु होते. माझ्या वडिलांना चार भावंडे होती. सुरुवातीला एकत्रित कुटुंब होते परंतु कालांतराने त्यात काही बदल होत गेले.

पहिली ते सातवीपर्यंतचे माझे प्राथमिक शिक्षण चेंबूर नाका येथील लोकल बोर्ड बिगारी (पूर्व-प्राथमिक) दगडी शाळा, या शाळेत झाले. ही शाळा त्यावेळी ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत होती. त्यावेळी ब्रिटिशांनी बांधलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा या मराठी किंवा इतर भाषांच्या माध्यमाच्या शाळांपेक्षा जास्त होत्या. मला अस्पष्टपणे आठवतेय की सहावी इयत्तेसाठी माझे शुल्क दीड रुपये आणि सातवीसाठी अडीच रुपये होते. माझे आठवी आणि नववी या इयत्तेतील माध्यमिक शिक्षण, सायनमधील डी.एस. हायस्कूलमध्ये झाले. मी नववीत नापास झालो, म्हणून माझे पुढील शिक्षण म्हणजेच नववी, दहावी आणि अकरावी (१९५५ ते १९५८ - जुने एसएससी) चेंबूर नाका येथील चेंबूर हायस्कूल या स्थानिक शाळेत झाले. या हायस्कूलच्या स्थापनेत चेंबूरमधील सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि रामनाथ पाठारे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्या वेळी इतर विषयांसोबत, शिवकाळातील म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील मोडी भाषा आणि मोडी लिपीसुद्धा बोरू वापरून शाळांमध्ये शिकवली जात होती. ही भाषा आणि लिपी जवळजवळ लुप्त होऊ पाहत आहे परंतु तिचे महत्त्व अबाधित आहे. आजही ग्रामीण महाराष्ट्रात घर आणि शेतीसंबंधित जुनी सरकारी कागदपत्रे ही मोडी या लिपीमध्येच आहेत. नवीन पिढीला या भाषेचे ज्ञान अवगत नसल्यामुळे आज समाजासमोर अनेक आव्हाने आहेत. माझ्याही पिढीतील फार कमी माणसांना ही लिपी थोडीफार अवगत होती. याचाच अर्थ शाळांमध्ये मोडी लिपी शिकवणे बंद झाले असले तरी, त्याची गरज मात्र काही कागदोपत्री अजूनही जाणवते!

चेंबूरमध्ये मोडी शिकवणारी काही माणसे अजूनही आहेत आहेत, ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. श्रीयुत सुभाष लाड, दीपक नागवेकर, विजय हटकर आपापल्या पद्धतीने मोडीचा प्रचार आणि प्रसार करत आहेत. मोडीदर्पण नावाचा दिवाळी अंकही ते काढतात.

मोडीविषयी मध्येच लिहून मी विषयांतर तर करत नाही ना?, असा

प्रश्न स्वभाविकपणे तुमच्या मनात आला असण्याची शक्यता आहे. तर तसे अजिबात नाही कारण मुघल राजवट, ब्रिटिश राजवट आणि पुरातन काळातही मोडीचा वापर व्हायचा त्याच काळात मल्लखांब हा खेळाचा प्रकार लोकप्रिय होता याची साक्ष इतिहासाने नोंदवलेली आहे! शिवाजी महाराजांच्या काळात मोडीतच व्यवहार व्हायचे. त्याप्रमाणे मल्लखांबाची काही माहिती मोडी लिपीत उपलब्ध आहे. हा विषय संपवताना आठवणीतली एक गोष्ट सांगणार आहे ती म्हणजे आमच्या लहानपणी शालेय अभ्यासक्रमात शिवाजी महाराजांनी मोडी लिपीत त्यांच्या मावळ्यांसाठी लिहिलेली पत्रं समाविष्ट होती.

मोठा झाल्यावर मी मुंबई विद्यापीठाकडून जिम्नॅस्टिक्स, आसने, मल्लखांब, ॲथलेटिक्स, पोहणे या खेळामध्ये सहभागी होऊ लागलो. आपल्या प्राचीन आणि पारंपारिक स्थानिक क्रीडा प्रकारात मल्लखांब समाविष्ट होता. याशिवाय कुस्ती, भालाफेक, गोळा फेक, खो-खो, कबड्डी, धावण्याची शर्यत आणि मार्शल आर्ट्सदेखील खूप लोकप्रिय होते. मागे वळून पाहिल्यास इतिहासानेही याच्या नोंदी करून ठेवलेल्या आहेत यावरून या क्रीडा प्रकारांचे महत्त्व लक्षात येते. मल्लखांब हा एक लोकप्रिय स्थानिक क्रीडा प्रकार होता, जो माझ्या भागात खेळला जायचा म्हणून मी केवळ स्वाभाविकपणे याकडे वळलो. हा खेळ आपल्या संस्कृतीचे प्रतीक आहे, असे माझ्या वाचनात आलेले आहे. पेशव्यांच्या काळात मल्लखांबला कुस्तीसाठी आवश्यक व्यायाम म्हणून विशेष मान्यता मिळाली. त्याची उत्पत्ती बाराव्या शतकात झाली असे मानले जाते. आपण मल्लखांबाबद्दल नंतर सविस्तर माहिती पुढील एका प्रकरणात आहेच! इथे थोडे थांबून मला माझ्या वडिलांबद्दल आधी काही सांगायचे आहे. माझ्या वडिलांचे आयुष्य सर्वसामान्य माणसांसारखे नक्कीच नव्हते त्यांचे वेगळेपण म्हणजे ते एक सामाजिक कार्यकर्ते होतेच परंतु मला अभिमान आहे की ते एक स्वातंत्र्यसैनिक होते!

■

३. स्वातंत्र्यसैनिक – रामनाथ हरिराम पाठारे (प्राथमिक गुरू, मल्लखांब, स्विमिंग इ.)

माझे वडील रामनाथ हरिराम पाठारे हे एक स्वातंत्र्यसैनिक आणि एक प्रसिद्ध समाजसेवक होते. ते त्यांच्या सामाजिक कार्यासाठी चेंबूर आणि आसपासच्या परिसरात प्रसिद्ध होते. समाजात त्यांना आदराचे स्थान होते. ते केवळ माझ्यासाठीच नाही तर अनेकांसाठी आदर्शवत होते. ते माझे पहिले गुरु आणि मार्गदर्शक होते आणि म्हणूनच माझ्या हृदयात आदरयुक्त प्रेमाच्या भावना आहेत.

गुरुर्ब्रह्मा ग्रुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः
गुरुः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ।।

आत्ताच्या पिढीला फक्त स्वातंत्रसैनिक हा शब्द माहीत आहे. समाज माध्यमातून याच्याविषयी थोडीफार माहितीही आहे. परंतु आमच्याच घरात स्वातंत्र्यसैनिक असल्यामुळे मी त्याचा खूप जवळून अनुभव घेतलेला आहे. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी कोणती भूमिका बजावली? देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांना काय मिळाले? आज त्यांच्या कुटुंबांची स्थिती काय आहे? असे अनेक प्रश्न तुमच्या मनात स्वाभाविकपणे येत असतील आणि त्या सर्व प्रश्नांची उत्तर द्यायचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न करतो आहे. स्वातंत्र्यसैनिकाची व्याख्या करणे तसे सोपे नाही. त्याला थोडेसे सोपे करून

सांगायचे म्हणजे, ज्यांनी ब्रिटिशांच्या लाठीचा सामना केला, घोषणा दिल्या, निषेध केला, रक्त सांडले, निदर्शकांसह झेंडा फडकावला, तुरुंगात गेले आणि स्वातंत्र्यलढ्यात खंदे कार्यकर्ते म्हणून जीवाची पर्वा केली नाही. ज्या स्वातंत्र्यसैनिकांमुळे आज आपल्याला स्वातंत्र्य मिळालेले आहे त्यांची आदरपूर्वक आठवण ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणूनच मला माझ्या वडिलांचे स्मरण करून त्यांच्या विषयीचा आदर व्यक्त करायचा आहे.

स्वातंत्र्यसैनिकांच्या श्रेणीत अनेक प्रकारचे लोक येतात, मग ते देशभक्तीने भारावलेले स्वयंसेवक असोत किंवा देशासाठी शहीद झालेले असोत. माझे वडील स्वातंत्र्यसैनिक होते, ज्याचा आम्हा समस्त चेंबूरकरांना तेव्हाही अभिमान होता आणि आजही आहे. माझ्या वडिलांचा जन्म १० मे १९११ रोजी मुंबईतील चेंबूर येथे झाला. माझ्या वडिलांनी त्यांचे माध्यमिक शिक्षण दादरमधील राजा शिवाजी विद्यालयात (King George Highrbhool) आठवीपर्यंत येथे पूर्ण केले. याचे कारण म्हणजे तेव्हा चेंबूरला शाळा नव्हत्या. चेंबूरवासीयांना प्रत्येक महत्त्वाच्या कामासाठी कुर्ला, सायन (पूर्वीचे नाव शीव) वा दादर येथे जावे लागायचे. १९५४ पर्यंत चेंबूरहून कुर्ला किंवा दादरला जाण्यासाठी आजच्यासारख्या लोकल ट्रेन नव्हत्या. चेंबूरहून कुर्ला येथे जाणारी माणसे रेल्वे ट्रॅकमधून चालत जायची. कुर्ल्याला पोहोचल्यानंतर तेथून पुढे ट्रेन उपलब्ध होत्या. लोकलचा प्रवास कुर्ल्यापासून सुरू व्हायचा. मला आठवतेय की गणेशोत्सवादरम्यान, गणपतीची मूर्ती आणण्यासाठी आम्हाला दादरपर्यंत जाण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याकाळात महिन्याचा किराणा आणण्यासाठी काकांच्या गिरणीत किंवा लालबागमध्ये जावे लागायचे. चेंबूरमध्ये एकही मराठी माध्यमाची शाळा नसल्यामुळे छबीलदास हायस्कूल, दादर येथे शिकण्यासाठी जाण्यावाचून कोणताही पर्याय नव्हता. चेंबूरकरांचे विशेषत: विद्यार्थ्यांचे शिक्षणासाठी असा लांबचा प्रवास करावा लागल्यामुळे फारच हाल व्हायचे. म्हणूनच अगदी प्रयत्नपूर्वक माझे वडील आणि त्यांच्या सहकार्यांनी या भागातील सामाजिक कार्यकर्त्यांसोबत सरकारी पातळीवर सतत पाठपुरावा केला त्याचा परिणाम म्हणजे १९५४ मध्ये चेंबूर हायस्कूलची स्थापना झाली. वडिलांसारख्या अनेकांच्या प्रयत्नांमुळे, स्वप्नामुळे वास्तवात शाळेची निर्मिती झाली.

त्यावेळच्या प्रचलित परिस्थितीनुसार, आमचे आजोबा हरिराम पाठारे यांना अठरा मुले होती, त्यापैकी फक्त पाचच जिवंत राहिली. तीन भाऊ आणि दोन बहिणी एवढीच. उर्वरित अल्पायुषी ठरले. त्या काळी एकत्र कुटुंबपद्धती होती. म्हणजे एका कुटुंबात साधारणपणे किमान दहा ते पंधरा सदस्य असायचे. आमचेही एक संयुक्त कुटुंब होते - आईवडील, काका-काकू, त्यांची मुले इत्यादी सर्वजण चेंबूरमधील गावठाण या भागात राहत होतो. आमचे श्री मल्हार निवास हे एक उत्तर कोकणातील एक मजली, चुना वापरून शाकारलेले कौलारू घर होते. सुरुवातीला त्यात एकूण तेरा खोल्या होत्या. आजोबांनी १९३५ मध्ये आणि माझ्या वडिलांनी १९५४ मध्ये त्याचे नूतनीकरण केले. त्यामुळे खोल्यांची संख्या वाढून बावीस खोल्या असलेले प्रशस्त निवासस्थान निर्माण झाले. या घराची रचना पाहून कोणालाही कोकणातल्या घराची आठवण यावी, असेच ते होते.

घरासमोर एक मोठे अंगण होते आणि मागे तुळशी वृंदावन होते. आजूबाजूला बरीच झाडेझुडपे होती, त्यामुळे हिरवेगार वातावरण निर्माण झाले होते. घरात सुबत्ता होती. घरात नेहमीच शिगोशिग भरलेले दूधदुभते आणि वर्षभर पुरतील एवढ्या अन्नधान्याच्या कणग्या असायच्या.

खूप खोल्या असल्यामुळे सगळ्यांना जेवढा हवा तेवढा एकांत (Privaby) मिळायचा आणि शिवाय सगळेच नातलग शेजारीच असल्यासारखेही वाटायचे. एकमेकांच्या अडीअडचणीला क्षणात धावून यायचे. चेंबूरला रोजच्या उपयोगाच्या वस्तू मिळायच्या परंतु अगदी साड्यांपासून मुलांच्या सायकलीपर्यंतच्या वस्तूंच्या खरेदीसाठी दादरला जावे लागायचे. तीच सर्वात जवळची बाजारपेठ होती. चेंबूरमध्ये फारशी गजबज नसल्यामुळे ते अगदी शांत आणि रम्य ठिकाण होते. एकंदरीतच चेंबूर काय त्याकाळी सर्वच माणसांचे जीवन आजच्यासारखे तणावग्रस्त नव्हते. माझ्या वडिलांनी त्यांचे प्राथमिक शिक्षण केल्यानंतर, स्वत:ला पूर्णपणे सामाजिक कार्यात वाहून घेतले. त्यांचे मुख्य लक्ष येथल्या परिसराचा विकास होता. ते स्वदेशीचे कट्टर समर्थकदेखील होते. वडिलांना भेटण्यासाठी आणि त्यांचे मार्गदर्शन घेण्यासाठी दूरदूरून यायची. १९३६ पासून वडिलांनी चेंबूरमध्ये परस्पर सहाय्यक संघ नावाची व्यायामशाळा स्थापन करून ती व्यवस्थित चालवली, ज्याचे

ते संस्थापक- सदस्य होते. स्वातंत्र्यानंतर १९४६ च्या सुमारास जेव्हा काही कारणास्तव ही संस्था बंद पडली तेव्हा माझ्या वडिलांनी १९६३ मध्ये श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराची स्थापना केली.

माझ्या वडिलांचे व्यक्तिमत्व खूप आकर्षक (Attrabtive) होते. ते गोरे होते. त्यांचा चेहरा गोल होता त्यावर त्यांनी मिशा ठेवलेल्या होत्या. त्यांची उंची साधारण सहा फूट होती तर शरीरयष्टी रुंद आणि सशक्त होती. एकंदरीत काय तर ते धष्टपुष्ट होते कारण त्यांनी त्यांचे शरीर व्यायामाने कमावलेले होते. ते नेहमी पूर्ण बाह्यांचे पांढरे खादीचे बुश शर्ट आणि पँट घालायचे. त्यांचे वक्तृत्व प्रभावी होते. त्यामुळे त्यांचे भाषण ऐकणाऱ्यांवर छाप सोडणारे होते. संपूर्ण परिसरात त्यांचे खूप सारे अनुयायी होते. स्वातंत्र्यसैनिक आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणून लोक त्यांना आदराने दादा म्हणून संबोधत. म्हणूनच कदाचित कुटुंबातील माणसे आणि शेजारीपाजारी त्यांना याच नावाने ओळखायचे. माझी आई जिचे नाव गुलाब रामनाथ पाठारे. तिचे राहणीमान अत्यंत साधे होते आणि दीर्घकाळ कुटुंबाला एकत्र ठेवण्यात तिचा मोठा वाटा होता.ती खूप सहनशील होती. कधी कधी मला असे वाटते जाणवते की तिची सोशिकता माझ्यात उतरली आहे! पूर्वीच्या काळच्या बहुतांश स्त्रियांसारखी, आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करणारी वृत्ती तिच्या ठायी होती. ती अतिशय सुज्ञ आणि हुशार गृहिणी होती. सातव्या इयत्तेपर्यंतचे (Vernacul Final) तिचे शिक्षण झालेले होते. त्या काळात सातवीपर्यंत शिक्षण झालेल्यांना शिक्षकांची नोकरी मिळायची इतकेच नव्हे तर वयोपरत्वे त्यांना शाळेचे मुख्याध्यापकही होता यायचे! परंतु माझ्या आईने कधी नोकरी केली नाही. तिचे माहेर दादरमधील खांडके बिल्डिंगमध्ये होते. त्यामुळे चेंबूर -दादर हे घरअंगण असल्यासारखे आमचा प्रवास व्हायचा!

१९४२ मध्ये माझ्या वडिलांनी शेकडो कार्यकर्त्यांसह मुंबईत गांधीजींनी सुरू केलेल्या चले जाव! चळवळीत भाग घेतला, ज्यामुळे ब्रिटिशांचा मोठा रोष ओढवला. परिणामी, पोलिसांनी त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना त्रास दिला. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांचा सहभाग असल्याने, ब्रिटिश प्रशासनाचे पोलिस वारंवार माझ्या वडिलांना शोधण्यासाठी आमच्या घरी यायचे. सरकारी सेवेत असलेले आमचे आजोबा हरिराम पाठारे पोलिसांना

बेधडकपणे सांगायचे, ''रामनाथ आता येथे राहत नाहीत, आम्ही त्यांना घराबाहेर हाकलून दिले आहे.'' हे ऐकून पोलिस तेव्हा तरी निघून जायचे. माझ्या वडिलांना त्यांच्या सामाजिक कार्यासाठी आणि कट्टर गांधीवादी नेते म्हणून या परिसरात एक वेगळी आणि खास प्रतिष्ठा होती. बाहेरून ते जितके कठोर दिसत होते तितकेच ते आतून सौम्य आणि दयाळू होते. ते त्यांच्या तत्त्वांवर ठाम असायचे. त्यांच्यासोबत विठ्ठल नारायण पुरव; नारायणराव आचार्य, केशवराव करंबेळकर, नारायण लक्ष्मण लाड आणि म्हात्रे यांच्यासह इतर अनेक कार्यकर्तेही स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले होते. यापैकी काही जणांनी तुरुंगवास भोगला. माझे वडील रामनाथ पाठारे हे सुद्धा विसापूरला सुमारे दोन वर्षे तुरुंगात होते. ते स्वदेशीचे प्रचारक होते इतकेच नव्हे तर स्वदेशीचे दुकान चालवायचे. ते गांधी, नेहरू आणि इतर स्वातंत्र्यसैनिकांची पत्रे आणि संदेश आंदोलनकर्त्यांना गुप्तपणे पोहोचवत असत. त्यासाठी ते अनेकदा सायकलने बोरिवलीला जायचे. एकदा रस्त्यातच त्यांच्या सायकलचा टायर पंक्चर झाला तरी ते सायकलच्या टायरमध्ये गवताच्या पेंढी भरून पुढे गेले आणि निष्ठेने त्यांनी आपल्याला दिलेली जबाबदारी पार पाडली.

डॉ. राजेंद्र प्रसाद एकदा चेंबूरला आले होते. काँग्रेस सेवा दलाचे कार्यकर्ते डॉ. हर्डीकर यांच्यासह माझ्या वडिलांनी त्यांचे स्वागत केले होते. खरे तर या प्रसंगांना पुष्टी देणारी छायाचित्रे माझ्याकडे नाहीत परंतु वडिलांसोबतच्या अनेक संवादातून या गोष्टी माझ्यापर्यंत पोहोचलेल्या आहेत! त्यांच्यासोबत स्वातंत्र्यलढ्यात सहभागी असलेले अनेक कार्यकर्ते होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आमच्या श्री मल्हार निवासस्थानी उत्सवाचे वातावरण होते. आम्ही अंगणात जवळजवळ दोनशे पणत्या लावून स्वातंत्र्यदिन साजरा केला होता. याउलट, गांधीजींच्या मृत्युची बातमी आली तेव्हा आमच्या घरासहित दिवाळी साजरी केली गेली नाही. माझे वडील सत्याच्या मार्गावर चालणारे कट्टर गांधीवादी कार्यकर्ते होते. व्यायामशाळा आणि राष्ट्रीय शाळेशी संबंधित माणसे त्यांना मास्तर असे संबोधायचे. त्यावेळी बहुतेक शाळा ब्रिटिशांनी बांधलेल्या होत्या. सहाजिकच त्या शाळा इंग्रजी माध्यमांच्या होत्या. सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य माणसांची इच्छा होती की विद्यार्थ्यांनी इंग्रजी शाळा टाळून त्याऐवजी मराठी

शाळांमध्ये शिक्षण घ्यावे. पण तसे शक्य नव्हते कारण त्यावेळी मराठी माध्यमाच्या शाळा अगदीच नगण्य होत्या.

आपल्या भारतीय राज्यकर्त्यांनी सुरू केलेल्या कुणाच्यातरी घराबाहेरच्या ओट्यावर शाळा चालत होत्या. या शाळांना राष्ट्रीय शाळा असे म्हटले जायचे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर, विकासाची लाट हळूहळू उंचावत गेली. मुंबईत रस्त्यांचे जाळे विस्तारत होते. सायन ते तुर्भे बेट या सर्वात लांब रस्त्याचे नाव देण्याची चर्चा सुरू झाली तेव्हा सामाजिक कार्यकर्ते व्ही.एन. पुरव यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब झाले. चेंबूर नाका हा भाग या महत्त्वाच्या रस्त्याला लागून असलेला एक अविकसित तसेच राखीव भूखंड होता. लोकांचा असा विश्वास होता की या ठिकाणी मराठी शाळा बांधली गेली पाहिजे. याच विचाराने प्रेरित होऊन परिसरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाशी व्यापक पत्रव्यवहार केला आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. या भागातील निष्ठावंत माणसांच्या भावना आणि प्रयत्नांना यश मिळाले. प्रशासनाने शाळेला मान्यता दिली. या खडकाळ भागात शाळा बांधणे सोपे काम नव्हते. आर्थिक समस्याही होत्या. असे असूनही त्या काळातील सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह आणि प्रचंड आत्मविश्वास होता. त्यामुळेच शाळा बांधण्याची प्रक्रिया सुरू झाली. चेंबूर हा मराठी भाषिक समुदायाचा एक मोठा भाग होता. सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव इथल्या रहिवाशांकडे होती. कोल्हापूरच्या राजघराण्यातील विशाल गडकर उर्फ भ.मा. पंत सर, माझे वडील रामनाथ पाठारे, भाऊ फाटक, पुरव, जसवंत बागेचे मालक भाऊराव चेंबूरकर, नारायण गजानन आचार्य, के.ए. करंबेळकर आणि नारायण लक्ष्मण लाड यांसारख्या कार्यकर्त्यांनी शाळेच्या उभारणीत प्रमुख भूमिका बजावली. १९४६ मध्ये चेंबर एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. १९५४ पासून एक-दोन वर्ष सांडू यांच्या कार्यालयात आणि पक्क्या गोठ्यात शाळा सुरू झाली होती. १९५४ मध्ये चेंबूर हायस्कूलचे बांधकाम सुरू झाले. सामाजिक कार्यकर्ते व्ही.एन. पुरव यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले शाळेचे बांधकाम १९५४ साली पूर्ण होऊन मध्ये चेंबूरमधील पहिली मराठी माध्यमाची शाळा, चेंबूर हायस्कूल ही इमारत दिमाखात उभी राहिली. माझे वडीलही या शाळेचे संस्थापक सदस्य होते.

त्यानंतर शाळेच्या परिसरात खेळ आणि व्यायामासाठी एक मोठे क्रीडांगण तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली. क्रीडा आणि व्यायाम उपक्रम सुरू करण्यात गावकऱ्यांसोबतच माझ्या वडिलांनी पंत आणि फाटक यांच्यासहित महत्त्वाची भूमिका बजावली. चेंबूर हायस्कूलला लागून एक टेकडी होती. चेंबूर हायस्कूलच टेकडीवर बांधले गेले. लहानपणी आम्ही सहजतेने खेळण्यासाठी त्यावर चढायचो. टेकडीवर उभे राहून मानखुर्द-तुर्भे खाडीवरून जाणारी जहाजे पाहायचो. खाडीचे दृश्य मनमोहक होते, त्या खाडीभोवती हिरवळीचे जंगल होते. शाळेच्या परिसरात क्रीडांगण तयार करण्यासाठी, टेकडी खोदून जमीन सपाट करणे आवश्यक होते. जेव्हा खेळाच्या मैदानाची योजना आखण्यात आली तेव्हा विद्यार्थी, शिक्षक आणि स्थानिक रहिवाशांनी अनेक दिवस अथक परिश्रम केले. या कठोर परिश्रमामुळे शाळेच्या परिसरात एक मोठे क्रीडांगण तयार झाले. कालांतराने हेच क्रीडांगण चेंबूरचे वैभव बनले. याच मैदानात नावाजलेले खेळाडू, सिने -नाट्यकलाकार, साहित्य क्षेत्रातील दिग्गजांचे कार्यक्रम संपन्न झाले आहेत. हे साध्य करण्यासाठी, माझ्या वडिलांनी पंत, फाटक आणि इतर अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी खूप मेहनत आणि परिश्रम घेतले होते. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून, त्या काळात कठोर परिश्रम आणि समर्पणाने सामाजिक कार्यकर्त्यांद्वारे चेंबूरचा कायापालट होत होता, याचा मी साक्षीदार आहे!

जेव्हा चेंबूर हायस्कूलचे बांधकाम सुरू होते, तेव्हा त्या जागेवर काम करणाऱ्या अभियंत्याने काही कारणास्तव प्रकल्प अर्ध्यावर सोडला. परंतु, न डगमगता, माझ्या वडिलांनी वास्तुविशारद (Architect) या भूमिकेतून शाळेची इमारत पूर्ण केली. त्यावेळी घाणेकर सर मुख्याध्यापक होते. भ. मा. पंत आणि भाऊ फाटक सहाय्यक होते. घाणेकर सरांच्या अनुपस्थितीत, पंत सर शाळेचे प्रशासकीय काम हाताळायचे. माझे वडील अनेकदा तरुणांना नोकरीच्या मागे धावण्याऐवजी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा सल्ला द्यायचे इतकेच नव्हे तर शक्य असेल तर त्यांना व्यवसाय सुरू करण्याच्या कामात मदत करायचे! चेंबूर हायस्कूलची स्थापना झाल्यानंतर, पंत सरांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक शिक्षणासोबतच बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी आणि खो-खो यासारखे अनेक मैदानी खेळ सुरू झाले. माझ्या वडिलांप्रमाणेच पंत सर

अत्यंत क्रीडाप्रेमी होते. सुरुवातीला क्रीडा प्रकारांकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी चेंबूरमध्ये अनेक वर्षे क्रीडा महोत्सवाचे आयोजित केले जायचे. यामुळे चेंबूरची कीर्ती संपूर्ण मुंबई आणि त्या अनुषंगाने महाराष्ट्राभर पसरली. काही वर्षांतच, चेंबूर क्रीडा महोत्सवाने लोकप्रियतेचा कळस गाठला. इतर जिल्ह्यांमधूनही मोठ्या संख्येने क्रीडाप्रेमी आणि खेळाडू सहभागी होण्यासाठी येत होते. क्रीडाप्रेमींसाठी हा महोत्सव जितका महत्त्वाचा कार्यक्रम होता तितकाच प्रेक्षकांसाठीही! या महोत्सवाच्या फायदा असा झाला की विविध ठिकाणी इतर अनेक संस्थांकडूनही असेच महोत्सव आयोजित केले जाऊ लागले. स्थानिक स्तरावर शाळा आणि महाविद्यालयांनीही असेच क्रीडा महोत्सव आयोजित करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या महोत्सवामुळे महिला खेळाडूंची संख्या वाढू लागली ही अत्यंत आनंददायी आणि सकारात्मक बाब होती.

ब्रिटिश राजवटीत, देशात कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांची भरभराट झाली होती. चेंबूरमध्ये काही वेगळी परिस्थिती नव्हती. या संदर्भात, माझे वडील आणि नारायण लक्ष्मण लाड म्हणजेच एन.एल. लाडसारखे अनेक कार्यकर्ते तसेच लाड मास्तर स्वदेशी शाळा आणि खादी ग्रामोद्योगांना चालना देण्यासाठी काम करत होते. त्या वेळी स्वदेशी शाळा चालवणे ही एक गरज होती! लाड मास्तर आमच्या वर्गातील एक नेते होते. स्वदेशी चळवळीदरम्यान लाड मास्तरांना तुरुंगवास भोगावा लागला तेव्हा माझ्या वडिलांनी त्यांचा स्वदेशी शाळा आणि खादी ग्रामोद्योगाचा वारसा पुढे चालवला. चेंबूर हायस्कूलच्या यशानंतर माझे वडील, करंबेळकर आणि भाऊराव भाऊराव चेंबूरकर यांच्यासारख्या इतर अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी चेंबूर जिमखान्याच्या स्थापनेस महत्त्वाची भूमिका बजावली. माझे वडील जिमखान्याचे आजीवन सदस्य होते. लोकमान्य टिळकांचे १९२० मध्ये निधन झाले. त्यांच्या सन्मानार्थ, चेंबूर नाका येथे लोकमान्य टिळक ग्रंथालयची स्थापना करण्यात आली, ज्यामध्ये चेंबूरकर, आचार्य इत्यादी अनेकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या ग्रंथालयाने चेंबूरकरांची वाचनाची भूक अनेक वर्ष निगुतीने भागवली आहे इतकेच नव्हे तर आजही हे

ग्रंथालय टिकून आहे. कला-क्रीडा याचबरोबर वाचनाची गोडी निर्माण करून ज्ञानसंवर्धनाचे महत्त्वाचे कार्याचा शुभारंभ करण्यास वडिलांचा हातभार लागला होता, या गोष्टीचा अभिमान वाटतो.

माझे वडील व्यवसायाने वास्तुविशारद नव्हते, परंतु त्यांनी त्याचा सखोल अभ्यास केला होताच शिवाय अनुभवाद्वारे अनेक कामे पार पाडली. अनेक वर्षांपूर्वी त्यांनी फोर्टमधील शेख नावाच्या व्यक्तीच्या कंपनीत ड्राफ्ट्समन म्हणून काम केले होते. या अनुभवाच्या आधारे त्यांना परवानाधारक वास्तुविशारद आणि प्लंबर बनता आले. त्याचा फायदा घेत त्यांनी या क्षेत्रात वास्तुविशारद म्हणून काम करण्यास सुरुवात केली. माझ्या वडिलांनी आमच्या श्रीमल्हार निवासाच्या पुनर्बांधणीचा आराखडाही तयार केला. त्यांच्याकडे असलेला संपूर्ण चेंबूर आणि गावठाणचा नकाशाही मी अनेकदा पाहिला होता जिथे आमच्या घराची वास्तू ठसठशीतपणे दिसत होती जी आता चेंबूरच्या नकाशावर बिंदूपेक्षाही लहान झालेली आहे!

चेंबूरच्या विकासातील एक घटक म्हणजे आमचे श्रीमल्हार निवास हे वडिलोपार्जित घर. चेंबूर हायस्कूल माजी विद्यार्थी संघटना आणि पवनपुत्र यासारख्या अनेक महत्त्वाच्या संस्थांच्या बैठका आणि चर्चांचे ते माहेरघर होते. या काळात प्रत्येक माणसाने आपल्या समाजासाठी, शहरासाठी आणि देशासाठी, काहीतरी करण्याचा आतूनच ध्यास घेतलेला होता. स्वातंत्र्यसैनिकांपासून प्रेरित होऊन, त्या काळात माणसांच्या मनात समाजसेवेची तसेच राष्ट्रसेवेची भावना ओसंडून वाहत होती. प्रत्येक रस्त्योगल्ली, आसपासच्या परिसरात व्यायामशाळा, बँड पथकं, लेझीम पथकं, क्रीडा संघटना, नाट्य संघटना इत्यादींचे बॅनर नजरेस पडत होते. तरुणांना काठी चालवणे, व्यायाम करणे आणि शरीरसौष्ठवाची आवड होती. वरळी, दादर आणि नायगावसारख्या ठिकाणी कुस्तीचे सामने रंगायचे. मुंबईतील कामगार वस्तीत मराठी लोककला आणि तमाशाचे कार्यक्रम नेहमीच होत होते. तमाशासोबतच, शाहिरी उत्सवांमध्ये वीर पोवाडे सादर व्हायचे. पोवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमांचे, बुद्धिमत्तेचे तसेच एखाद्याच्या सामर्थ्य, गुण, कौशल्ये इ. गुणांचे काव्यात्मक वर्णन असायचे ज्यामुळे उत्साह संचारायचा आणि त्यातून लोकांना प्रेरणा मिळायची. त्या काळात शाहिरी कला पथके, सामाजिक- ऐतिहासिक नाटके

आणि लोकनाट्य सादरीकरणाच्या संस्था मोठ्या प्रमाणात कार्यरत होत्या. गोंधळ, नमन, भारूड, भजन, जत्रा इत्यादी कार्यक्रमांची रेलचेल होती.

शालेय शिक्षणाव्यतिरिक्त, माझ्या वडिलांनी व्यायामशाळा, ग्रंथालये, गणेशोत्सव कार्यक्रम आणि भुलिंगेश्वर देवालय मंदिर ट्रस्ट सारख्या उपक्रमांमध्येही महत्त्वाचा सहभाग नोंदवला आहे. उत्सवादरम्यान, ते सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात सक्रिय सहभागी व्हायचे. दारूबंदीसाठी केलेल्या धरणे आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग होता. स्वतःकडे व्यायामशाळेची पुस्तके जमा केली होती ज्यांचा मला उपयोग झाला. या सोबतच त्यांनी मल्लखांब, रोमन रिंग्ज, आसने आणि इतर उपक्रमांचे अनेकांना शास्त्रशुद्ध पद्धतीने प्रशिक्षणदेखील दिले. त्या वेळी मुली आणि महिला आजच्यासारख्या स्पष्टवक्त्या नव्हत्या, म्हणून ते त्यांना सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करायचे. उत्सवादरम्यान मुली विविध आसने आणि व्यायामाचे सादरीकरण करायच्या. माझ्या वडिलांनी स्थापन केलेल्या परस्पर सहाय्यक संघचा स्वतःचा बँड पथक होते, ज्याचे पर्यवेक्षण दिवंगत मनोहर भोजने मास्तर करायचे. त्यांनी बँड पथकासाठी आवश्यक सामग्री वाडवली या चेंबूरमधील छोट्याशा भागातून मिळाली होती. उदरनिर्वाहासाठी, माझ्या वडिलांनी सुरुवातीला विविध प्रकारची कामे केली. ते चेंबूरच्या अत्यंत प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या रोटरी क्लबचे संस्थापक सदस्य झाले. रोटरी क्लबच्या माध्यमातून, त्यांनी प्रौढांसाठी प्रौढ शिक्षण वर्ग चालवले. सामाजिक कार्यासाठी कित्येक वेळा त्यांना स्वतःच्या खिशातून पैशाची व्यवस्था करावी लागायची. स्वातंत्र्यसैनिक असूनही, केंद्र किंवा राज्य सरकारच्या अनेक प्रयत्नांनंतरही व्यायामशाळेसाठी मोकळी जागा मिळवू शकले नाही याची खंत त्यांना शेवटपर्यंत राहिली. शेवटी कोणाच्याही मदतीशिवाय स्वतःच्या हिमतीने त्यांनी १९६३ मध्ये स्वतःच्या मालकीच्या वास्तूत श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराची स्थापना केली जी माझ्याही आयुष्यातील महत्त्वाची अशी गोष्ट आहे. माझे वडील कट्टर गांधी भक्त होते, म्हणून ते दररोज एक किंवा दीड तास चरख्यावर सूत कातण्यात घालवायचे. त्यांना पाहून आणि त्यांच्या प्रेरणेने इतर माणसेही सूत कातायचे.

माझे आजोबा हरिराम पाठारे हे जुन्या काळचे मॅट्रिक पास होते. ते

घाटकोपरमधील सरकारी ट्रेजरीत काम करायचे. दररोज रात्री साधारण दोनच्या सुमारास ते घरी परतायचे. सरकारी तिजोरीतील रोख रक्कम सांभाळून घरी आणणे हा त्यांचा कामाचा भाग होता. अत्यंत जबाबदारीने १९२५ साली सुमारे दोन हजार रुपये असलेली बॅग घेऊन ते घाटकोपर ते चेंबूर गावठाणपर्यंत चालत यायचे. आता टिळकनगर म्हणून ओळखला जाणारा भाग जेथे एकेकाळी आजोबांच्या स्वतःच्या मालकीची एक खाडी होती, ही गोष्ट मी आई-वडिलांकडून अनेकदा ऐकलेली आहे. आजोबा असे रात्री उशिरा गावठाणपर्यंत चालत यायचे, तेही एवढी मोठी रक्कम घेऊन जे जोखमीचे (Rirky) काम होते. या परिसरातील ग्रामदैवत घाटोबा एका हातात काठी आणि दुसऱ्या हातात कंदील घेऊन लोकांना सुरक्षिततेसाठी चेंबूर सीमेवर उभा राहून राखण करायचा, असा अनुभव होता. तेव्हाही चोर खिसेकापू आणि चोर-लुटारू भरपूर होते. पण सुरक्षिततेसाठी आजोबांना पैसे घरी आणावे लागायचे. ते त्यांच्या जबाबदाऱ्यांबद्दल जागरूक होते आणि निर्भय होते. त्यावेळी लोक आजच्यासारखे आर्थिकदृष्ट्या समृद्ध आणि सुखी नव्हते. आजोबा शिडाच्या बोटीतून गवत ने आण करण्याचा अडत्याचा व्यवसायही करत होते. त्याआधी ते आखातात सात जहाजे चालवत होते. परंतु एकाच संकटाने त्यांची सातही जहाजे एका रात्रीत बुडाली आणि कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट झाली. आजोबांना त्यांचे वडिलोपार्जित घर एका मारवाड्याकडे गहाण ठेवावे लागले. बऱ्याच काळानंतर, १९४६ मध्ये वडिलांनी घर ते परत मिळवले, तो आमच्या कुटुंबासाठी खूप आनंदक्षण होता!

मला आठवतेय की स्वातंत्र्यपूर्व काळात, अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाने बोरिवलीमध्ये नियमितपणे व्यायाम शिबिरे आयोजित केली होती, ज्यामध्ये माझे वडील सातत्याने सहभागी व्हायचे. प्रशिक्षणादरम्यान याच शिबिराचा त्यांना फायदा झाला. सुरुवातीला, श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरात व्यायाम आणि आसनांचे (मल्लखांब) प्रशिक्षण दिले जात असे. कालांतराने, १९६७ नंतर पवनपुत्र व्यायाम मंदिरात वेट ट्रेनिंग, वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग आणि रोमन रिंग्ज आणि पॅरलल बारसारख्या जिम्नॅस्टिक्समध्ये प्रशिक्षणदेखील सुरू केले. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये ज्या

क्रीडाप्रकारांना मान्यता होती ते सुरू करण्याची आवश्यकता होती. मल्लखांब राष्ट्रीय स्पर्धा आगरताळा-मध्ये झाल्या. तेथे जिमनॅस्टिक्स/मल्लखांबाच्या एकत्रित स्पर्धा घेतल्या गेल्या. तेव्हा जिमनॅस्टिकची तोंड ओळख झाली. ऑलिंपिक दृष्टिकोनातून, मुलांसाठी सहा आणि मुलींसाठी चार जिम्नॅस्टिक्सचे प्रकार आहेत. यासाठी श्री पवनपुत्र येथे रोमन रिंग्ज आणि पॅरलल बारच्या अभ्यासासाठी Gymnastics Federation of India (GFI) कडून आंतरराष्ट्रीय फेडरेशन (FIG) ची नियमावली संबधीत पुस्तके आम्ही खास मागवली होती.

■

४. श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराची स्थापना (१९६३)

१४ नोव्हेंबर १९६३ रोजी श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराची स्थापना माझ्या वडिलांनी केली. ते त्याचे संस्थापक अध्यक्ष होते. माझ्या वडिलांच्या दूरदृष्टीमुळे चेंबूर आणि आसपासच्या परिसरातील रहिवाशांसाठी व्यायाम आणि नियमित सराव करण्यासाठीची ती उत्तम व्यवस्था होती. सामान्य माणसांबरोबर अनेक मान्यवरांनीही त्यांच्या या महत्त्वाच्या योगदानाचे कौतुक केले. ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट होती. खरे तर, माझे वडील स्वातंत्र्यसैनिक असल्यामुळे सरकारने पवनपुत्रसाठी स्वतंत्र जागा मिळवण्यासाठी दिल्लीपर्यंत पत्रे पाठवली परंतु त्याला यश मिळाले नाही आणि शेवटी त्यांनी स्वतःच्या मालकीच्या हक्काच्या जागेवर हे व्यायाम मंदिर स्थापन केले, हा त्यांचा फार मोठा आणि चांगला निर्णय होता. थोडे स्थिरावल्यावर, १९७२ मध्ये पवनपुत्रच्या विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच अनइव्हन बार (Uneven Bar) हा मुलींसाठी आणि आधुनिक बॅलन्स बीम स्टँड (Balance Beam Stand) हे नवीन जिम्नॅस्टिक्स या खेळाची साधनांची भारतात, चेंबूरमध्ये निर्मिती केली. याचे संपूर्ण श्रेय अनिल रा. पाठारे यांना जाते. नंतर, पवनपुत्रातील दोन खेळाडूंनी १९८२ च्या आशियाई खेळांमध्ये सहभाग नोंदवला, जी आमच्यासाठी एक मोठी कामगिरी होती. भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी आणि

स्वातंत्र्यानंतरही, माझ्या वडिलांनी विविध माध्यमातून लोकांची सेवा केली आहे. लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी न्यायालयातही हजेरी लावली. गावठाण भागातील माणसांना मदत करण्यासाठी ते पुढाकार घ्यायचे म्हणूनही काही माणसांचा राग त्यांना पत्करावा लागला. १९८५ मध्ये माझ्या वडिलांना अर्धांगवायू झाला. शो मस्ट गो ऑन या भूमिकेतून मी म्हणजेच सुहास पाठारे यांनी संस्थेची जबाबदारी उचलली. श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराची स्थापना व्यावसायिक दृष्टिकोनातून नव्हे तर सामाजिक दायित्वाच्या आधारे करण्यात आली. कोणताही खेळ चालू राहिला पाहिजे हे एकमेव उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले. हे एक सामाजिक कार्य आहे असे मी मानतो. म्हणूनच श्री पवनपुत्र ही एक सामाजिक संघटना भरभराटीला येत आहे. आता तिच्या आणखी दोन शाखा आहेत.

श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराच्या ट्रस्टची नोंदणी १९७४ मध्ये झाली. गरीब- श्रीमंत, मुले- मुली, तरुण- वृद्ध असा कोणताही भेदभाव न ठेवता अगदी सर्व गरजवंतांसाठी या व्यायाम मंदिराची दरवाजे कायम उघडे ठेवले, याचे मूळ कारण म्हणजे या व्यायाम मंदिराला आम्ही कायमच एक सामाजिक संघटना मानले आहे. संस्थेचे प्रशासकीय कामकाज सुरळीत चालावे यासाठीही अगदी अल्पशी फी आकारण्यात आली होती. माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर, संस्थेची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर आली. ही नोंदणीकृत सामाजिक संस्था असल्याने, एक कार्यकारी समितीदेखील स्थापन करण्यात आली होती. या प्रक्रियेद्वारे, मला वेळोवेळी सेवा करण्याची संधी मिळाली. संस्थापक सदस्य म्हणून आयुष्यभर तिच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची माझी प्रतिज्ञा होती. परिणामी, वयाच्या श्याऐंशीव्या वर्षीही मी माझ्या जबाबदाऱ्या पार पाडत आहे. दिवसरात्र काम करून, मी, माझ्या सहकाऱ्यांसह, संस्थेच्या प्रगतीसाठी कठोर तपश्चर्या करत आहे आणि माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत करत राहीन. माझे कुटुंब, सहकारी, पालक आणि विद्यार्थ्यांनी या प्रयत्नात मला सातत्याने पाठिंबा दिलेला आहे त्यांच्या ऋणातच राहायला मला आवडेल. संस्थेचे कार्य प्रगतीपथावर आहे, याचा अभिमान वाटतो. बदलत्या काळानुसार, व्यायाम, मल्लखांब आणि आसनांसहीत ऑलिंपिक शैलीतील इतर खेळांचाही समावेश करण्यात आलेला आहे. यामुळेच तरुणांमध्ये पवनपुत्राची लोकप्रियता

वाढली. हळूहळू मुंबई आणि महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये अशा संघटनांचा विस्तार होऊ लागला. या संघटनांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणावे जेणेकरून विविध योजना आणि क्रीडा-संबंधित मागण्या एकत्रितपणे सरकारसमोर मांडता येतील अशी चर्चा वारंवार घडवून आणल्या गेल्यात. म्हणूनच भगवंत माधव पंत सरांच्या अध्यक्षतेखाली बृहन्मुंबई जिल्हा जिम्नॅस्टिक्स असोसिएशन (माटुंगा-दादर) ची स्थापना करण्यात आली. चेंबूर स्कूल असोसिएशन कर्नाटक हायस्कूल, अफॅक इंग्लिश स्कूल, महात्मा एज्युकेशन सोसायटी, पिल्ले ग्रुप ऑफ इंस्टिट्युशन या संस्था यांच्या अंतर्गत कार्य करीत होत्या. पवनपुत्र दोन्ही संघटनांचे सदस्य बनले, ज्यामुळे मला मुंबई जिल्हा आणि राज्यस्तरीय संघटनांमध्ये काम करण्याची संधी मिळाली.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर, चेंबूर आणि आसपासच्या परिसरात एकच मराठी शाळा पुरेशी नव्हती हे लक्षात घेऊन कालांतराने, चेंबूर हायस्कूलनंतर काही वर्षांतच जवाहर विद्या भवन, आमची शाळा, जनरल एज्युकेशन ॲकॅडमी आणि मुक्तानंद हायस्कूलसारख्या शाळा स्थापन झाल्या. या शाळा आणि इतर सामाजिक संस्थांच्या माध्यमातून, भ.मा. पंत सर, सुहास पाठारे, किसन कदम, आचार्य पिल्ले आणि महेंद्र चेंबूरकर यांनी चेंबूर आणि त्याच्या आसपासच्या परिसरात विविध खेळांना प्रोत्साहन देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली, हजारो खेळाडू घडले. अनेक खेळाडूंनी त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीने चेंबूरला केवळ गौरव मिळवून दिला नाही तर राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर मुंबई आणि महाराष्ट्राची प्रतिष्ठादेखील उंचावली. यामुळे चेंबूरला क्रीडा शहर म्हणून प्रतिष्ठा मिळाली, ही अभिमानाची बाब आहे!

१९६७ पासून, श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराच्या खेळाडूंनी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये भाग घेऊन सातत्याने यश मिळवले आहे. १९७६ मध्ये झाशी येथे झालेल्या जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराला पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. यामुळे श्री पवनपुत्रांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत होती. सहभागी होणाऱ्या मुलींची संख्याही लक्षणीयरीत्या वाढली. पवनपुत्रचे खेळाडू विविध स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करत होते. १९७६ मध्ये झाशी येथे झालेल्या राष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत,

पवनपुत्राचे महेंद्र आणि विनय यांनी पहिली राष्ट्रीय स्तरावरील पदके जिंकून संस्थेला मानसन्मान मिळवून दिला. हा पवनपुत्रासाठी निश्चितपणे अभिमानाचा क्षण होता. त्यानंतर १९८२ मध्ये श्री पवनपुत्र खेळाडूंनी दिल्ली येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत प्रथमच भाग घेऊन राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला. त्यावेळी माननीय पंत सर MAGA चे अध्यक्ष होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या संघाने प्रगती केली. या स्पर्धेदरम्यान त्यांच्यासोबत रामदास कल्याणपूरकर, एस. सी. व्यास आणि अमरावतीचे डॉ. सुरेश देशपांडे हे देखील उपस्थित होते. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी अपवादात्मक कामगिरी केली. पुण्याच्या सन्मित्र संघाच्या एम. डी. गुर्जर यांच्या नेतृत्वाखालील एकात्मिक संघातील पाच मुलीनी उत्साहाने सहभाग घेतला आणि सर्वोत्तम खेळाचे सादरीकरण केले. यामुळे मुलींना प्रोत्साहन मिळाले. ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

■

५. विविध स्पर्धांमध्ये श्री पवनपुत्रची कामगिरी

पंत सर हे कम्युनिस्ट विचारसरणीचे समर्थक होते. त्यांच्या माध्यमातून प्रदीप, महेंद्र चेंबूरकर, प्रतिभा, स्मिता वढावकर आणि कल्पना चेंबूरकर दूतावासात (House of Soviet Culture) १६ मिमी जर्मन आणि अमेरिकन क्रीडा चित्रपट पाहून इतके प्रभावित झाले की त्यांना खेळात उज्ज्वल भविष्य दिसू लागले. त्याचे सकारात्मक परिणाम मिळाले. अशा सगळ्या घटना चालू असताना काही वर्षांनंतर पंत सर आणि चेंबूर हायस्कूलच्या वरिष्ठांमध्ये मतभेद निर्माण झाले. म्हणून, व्यवस्थापनाच्या निमंत्रणावरून भ. मा. पंत सर चेंबूर हायस्कूल सोडून राष्ट्रीय केमिकल फर्टिलायझर्स (RCF) मध्ये गेले. त्यांच्या नेतृत्वाखाली, लोकमान्य शिक्षण संस्थेच्या अंतर्गत १९७० मध्ये आरसीएफ कॅम्पसमध्ये जवाहर विद्या भवनची स्थापना झाली. किसन कदम आणि काळे मॅडम यांनी पंत सरांच्या खांद्याला खांदा लावून काम करून जवाहर विद्या भवनाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावली. किसन कदम हे चेंबूर हायस्कूलचे विद्यार्थी होते. पंत सर सुरुवातीपासूनच चेंबूर हायस्कूलशी जोडले गेले होते. जवाहर विद्या भवनमध्ये त्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा उपक्रमांना प्रोत्साहन दिले. खेळ त्यांच्या अस्तित्वाचाच भाग होता. त्यांच्याकडे चेंबूर हायस्कूलचा मोठा अनुभव पाठीशी होता. त्यांनी जवाहर

विद्या भवनातील खेळाडूंवर अथक परिश्रम घेतले. त्यांच्या या मेहनतीचे फळ म्हणून त्यांच्या अनेक खेळाडूंना मोठे यश मिळाले. या खेळाडूंनी जवाहर विद्या भवनचे नाव सार्थक केले पण त्याचबरोबर चेंबूर, मुंबई आणि महाराष्ट्राचेही नाव उंचावले. एक मार्गदर्शक आणि प्रशिक्षक म्हणून मी अनेकदा जवाहर विद्या भवनला शिकविले आहे. हिंदी, मराठी आणि इंग्रजी माध्यमातूनही येथे शिक्षण दिले जायचे. क्रीडा प्रशिक्षणासाठी, एक मोठे क्रीडा मैदान आणि इतर अनेक उत्कृष्ट सुविधाही तेथे उपलब्ध होत्या.

विद्यार्थी असतानाही पंत सरांचा माझ्यावर खूप प्रभाव होता. ते केवळ माझेच नव्हे तर माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांचे आणि खेळाडूंचे आदर्श होते. पंत सर एक आदर्श शिक्षक आणि क्रीडा प्रशिक्षक होते. स्वभावाने काहीसे कडक आणि शिस्तप्रिय होते. बाहेरून ते जितके कडक दिसायचे तितकेच ते आतून सौम्यभाषी आणि मृदू स्वभावाचे होते. ते मूळतः कोल्हापूरच्या राजघराण्यातील एक महनीय व्यक्ती होते. तरीही त्यांची सगळ्यांशी जी वागणूक होती ती सहृदयतेची होती. पंत सर एक स्वातंत्र्यसैनिक (पत्री सरकार) असूनही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात तो अभिमान किंवा रुबाब नसायचा. एक साधा शिक्षक, एक क्रीडा प्रशिक्षक या नात्याने ते सगळ्यांशी नम्रतेने वागायचे. शिक्षक म्हणून मला त्यांचा दीर्घकालीन सहवास लाभला याबद्दल मी आनंद व्यक्त करतो. त्यांच्यामुळेच माझे व्यक्तिमत्त्व बहरले, प्रगतीपथावर माझी वाटचाल सुरू झाली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून मी माझ्या जीवनाची ध्येयदेखील निश्चित करू शकलो. पुढे पवनपुत्राच्या व्यवस्थापनात मला याचा निश्चितपणे फायदा झाला.

पंत सरांचे विद्यार्थी आणि जवाहर विद्या भवनचे विद्यार्थी मोहन मानमोडे यांनी त्यांच्या आठवणींमध्ये लिहून ठेवले आहे की- १९९३ मध्ये, मी (पटियाळा) राष्ट्रीय शाळेत आयोजित महाराष्ट्र जिम्नॅस्टिक्स संघाचे नेतृत्व केले. बारावी पूर्ण केल्यानंतर मी नियमितपणे मल्लखांब आणि जिम्नॅस्टिक्सचा सराव करण्यासाठी चेंबूर गावठाणातील पवनपुत्र व्यायाम मंदिरात प्रवेश घेतला होता. तिथे मी आदरणीय नाना (सुहास पाठारे) यांच्या मार्गदर्शनाखाली खूप काही शिकलो आणि बंगळुरू येथे झालेल्या दोन वरिष्ठ राष्ट्रीय आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. त्या स्पर्धेत आमच्या संघाने

तिसरे पारितोषिक पटकावले. ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट होती, पण याचे श्रेय नानांसारख्या निष्ठावान शिक्षकाला जाते. (संदर्भ: जिम्नॅस्टिक्सचे शिलेदार) मोहन मानमोडे हे नंतर भारतीय नौदलात सामील झाले. तिथे, त्यांना नौदलाच्या अंतर्गत क्रीडा स्पर्धांमध्ये अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. त्यांनी अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये नौदलाचे नेतृत्वही केले.

भगवंत पंत सरांच्या आणखी एका चाहत्या ताराबाई सांडू लिहितात की चेंबूर हायस्कूलमुळे पंत सर आणि सुहास पाठारे सरांशी माझी ओळख झाली. या दोघांच्याही व्यक्तिमत्त्वाचा माझ्यावर खोलवर प्रभाव पडला आहे. दोघेही ध्येयवादी आणि आपल्या कार्याशी एकनिष्ठ होते. त्यांत अत्यंत महत्त्वाचे वाक्य त्यांनी म्हटले आहे ते म्हणजे पंत सर आणि सुहास पाठारे चेंबूरचे अभिमान होते. (संदर्भ - जिम्नॅस्टिक्स शिलेदार) पंत सर आणि कदम सर यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली शिक्षक आणि विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रात, क्रीडा जगात यश मिळवत असताना, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक खेळाडू विविध खेळांमध्ये यश मिळवत होते. ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट होती.

१९६३ मध्ये आम्ही पवनपुत्र येथे आसने आणि व्यायामांसह मातीत पुरलेला मल्लखांब हा भारतीय खेळ सादर केला गेला. त्यानंतर १९६७ मध्ये आम्ही जिम्नॅस्टिक्सकडे वळलो आणि १९७६ मध्ये जिम्नॅस्टिक्स फेडरेशन ऑफ इंडियामध्ये यशस्वीरित्या प्रवेश केला. आम्ही आमचे पहिले राष्ट्रीय पदक जिंकले. १९७९ ते२०२५ या कालावधीत एकूण अठरा शिवछत्रपती पुरस्कार आमच्या खेळाडूंना मिळाले. महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्रात हा सर्वोच्च पुरस्कार आहे! तरीही आम्हाला वाटले की आम्ही जिम्नॅस्टिक्समध्ये ज्या उंचीची अपेक्षा केली होती ती उंची अजूनही गाठायची आहे. याच आशावादावर त्या उंचीवर पोहोचण्यासाठी आम्ही अनेक वर्षे कठोर परिश्रम करत राहिलो. विविध स्तरांवर स्पर्धा आयोजित करणे आणि त्यात सहभागी होणे, उपकरणे सुधारणे, चांगले इनडोअर हॉल, नवीन कोचिंग कल्पना आणि आर्थिक नियोजन यासारख्या उपक्रमांवर आम्ही गांभीर्याने काम केले. यामुळे केवळ पालक आणि प्रेक्षकच नव्हे तर माध्यमे, सरकारी संस्था, जाहिरातदार आणि प्रायोजकांकडूनही महत्त्वपूर्ण योगदान मिळाले. यामुळे

१९७० आणि १९८० च्या दशकात संपूर्ण महाराष्ट्रात मल्लखांब आणि जिम्नॅस्टिक्स क्षेत्रात पवनपुत्र व्यायाम मंदिर एक आघाडीची संस्था बनण्याचा पाया मजबूत झाला. वेळोवेळी आम्ही राज्यस्तरीय मल्लखांब आणि जिम्नॅस्टिक्स स्पर्धा आयोजित केल्या. या स्पर्धांमुळे आम्हाला महत्त्वपूर्ण संघटनात्मक अनुभव मिळाला. त्यावेळी, अशा स्पर्धा आयोजित करणारी आम्ही महाराष्ट्रातील एकमेव संस्था होतो. लोकसहभाग सहकार्याने आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित करून आम्ही ऑलिंपिकसारख्या स्पर्धांसाठी तयारी करू शकतो, असा आत्मविश्वास आम्हाला मिळाला. आम्हाला त्या काळात योग्य संधी मिळाली नाही परंतु आज ती स्थिती राहिली नाही. कालांतराने भारत सरकारच्या बदलत्या धोरणांमुळे खेळांचा दर्जा बदलला आहे. जगाबरोबर भारत देशाने ही योग्य दिशेने लक्षणीय प्रगती केली आहे. उदाहरणार्थ, जगबरोबरच भारतात विविध क्रीडा वाहिन्यांचे लाँचिंग आणि ऑलिंपिक आणि जागतिक क्रीडा स्पर्धांमध्ये खेळाडूंसाठी सुधारित आणि आकर्षक व्यवस्था होऊन असे विविध खेळ हळूहळू एका उद्योगात रूपांतरित होत आहे. खरंतर ही आनंदाची गोष्ट आहे.

कोणत्याही माणसाच्या आयुष्यातील आणि संस्थेच्याही कारभारातील परिस्थिती बदलत राहते. बदल हाच निसर्गाचा नियम आहे. पवनपुत्रच्या कामगिरीबद्दलही हेच मला सांगायचे आहे. ऐंशी आणि नव्वदचे दशक आमच्यासाठी कामगिरीने भरलेले दशक होते. महिला खेळाडूच्या बाबतीत ही दोन दशके आमच्यासाठी विशेषतः खास होते. आमच्या तीन महिला खेळाडू - पल्लवी, जस्मिता आणि राजेश्वरी - त्यांच्या संबंधित क्षेत्रातील अव्वल खेळाडू बनल्या. त्यांनी राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये सर्वच सुवर्णपदके देखील जिंकली. पल्लवीला चार जस्मिताला चार आणि राजेश्वरी ला दोन सुवर्णपदके मिळाली. हा आमच्यासाठी आनंदाचा अच्युत आनंदाचा क्षण होता. राजेश्वरी आणि कोमल यांना राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पंच (Judge) म्हणून उत्कृष्ट सेवा देणारे अनेक खेळाडू देखील उदयास आले. या उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांमध्ये महेंद्र चेंबूरकर, दिवंगत मंजुश्री चिवटे, आशुतोष पोतनीस, कोमल पाटील, मिनल म्हात्रे आणि चंद्रशेखर पोटील यांचा समावेश

आहे. आमच्यासाठी आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे पवनपुत्राचे श्री सजीवन भास्करन, जे डेडलिफ्ट प्रकारात जागतिक विक्रम मोडणारे एकमेव भारतीय पॉवरलिफ्टर बनले आणि त्यांना राष्ट्रीय स्तरावरील अर्जुन पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. याचाच अर्थ खेळाडूंची कामगिरीचा चढ-उतार दर्शवणारा आलेख (chart) पाहता एकंदरीत संस्थेची परिस्थिती आनंददायी होती.

श्री पवनपुत्राचे खेळाडू महेंद्र चेंबूरकर आणि विनय वेसावकर यांना ९० व्या जयंती वर्षाने सन्मानित करण्यात आले. १९८० च्या दशकात पहिल्यांदाच महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती पुरस्कार देण्यात आला. या पुरस्काराने आमच्या आनंदाला पारावार उरला नाही आमच्यासाठी ही खूपच अभिमानाची गोष्ट होती. या पुरस्कारामुळे आम्हाला राजभवनला भेट देण्याची संधी मिळाली. आमच्या खेळाडूंना मिळालेल्या पुरस्कारांमुळे आमचा उत्साह वाढला. वर्षानुवर्षे केलेल्या कठोर परिश्रम आणि समर्पणाचे फळ मिळत असल्याचा आनंद तर होताच पण त्यामुळे आमच्या जबाबदाऱ्याही वाढत होत्या. श्री पवनपुत्र संघटना इतक्या लवकर कधी वाढली हे आम्हाला कळले नाही. लोक फ्रँचायझी साठी आमच्याशी संपर्क साधत होते, परंतु आम्हाला त्यावेळी फ्रँचायझी या शब्दाचा अर्थ माहीत नव्हता आणि आजही आम्हाला त्याबद्दल फारशी माहिती नाही. त्या काळात, फ्रँचायझी हा शब्द मोठ्या प्रमाणात वापरला जात नव्हता. आम्ही साधे, साधे लोक होतो जे आघाडीचे अनुसरण करायचे. म्हणून, आम्हाला आमच्या कामावर आणि आमच्या ध्येयावर खूप विश्वास होता. काहीही असो, आमची संस्था पैसे कमविण्यावर लक्ष केंद्रित करत नव्हती. जेव्हा काही खाजगी संस्थांनी फ्रँचायझींबद्दल विचारले तेव्हा आम्ही तपशीलवार माहितीच्या अभावामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. काही वर्षांनंतर, आम्हाला जाणवले की आमची संस्था इतर फ्रँचायझी देणाऱ्या संस्थांच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाली नाही. तरीही आम्ही नंतर आणखी दोन शाखा उघडल्या. आमची संघटना नेहमीच आधुनिक काळातील चमक आणि व्यापारीकरणापासून दूर राहिली आहे. ती कधीही व्यावसायिक संघटना बनली नाही, उलट ती एक सामाजिक संघटना आहे. गेल्या पासष्ठ वर्षांपासून खेळाडू आणि क्रीडा क्षेत्राची सेवा केल्याचा आम्हाला

अभिमान आहे. संघटना जसजशी वाढत गेली तसतसे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्याही वाढत गेल्या. तन-मन-धन अर्पून सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यींही दिवसरात्र अथक मेहनत घेत होते!

■

६. पहिला बाळंभट दादा देवधर पुरस्कार

महाराष्ट्र हौशी मलखांब संघटनेने वार्षिक बाळंभट दादा देवधर पुरस्काराची घोषणा केली. बाळंभट दादा देवधर पुरस्काराचे पहिला मानकरी मी ठरलो. ते १९९२ हे साल होते. बाळंभट दादा देवधर हा पहिला पुरस्कार मुंबईच्या सुहास पाठारे यांना प्रदान करण्यात येणार आहे अशी बातमी त्या काळात सर्व वर्तमानपत्रांनी आणि आकाशवाणीने दिली. तेव्हा मला आकाश ठेंगणे झाल्याचे जाणवले. माझ्यासाठी ही खऱ्या आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट होती. पहिला सन्मान किंवा पुरस्कार मिळाल्याचा आनंद शब्दात मांडणे कठीण आहे. तुमच्यापैकी जे जाणकार आहेत ते हे चांगल्या प्रकारे समजू शकतात. हा पुरस्कार सोहळा पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. राज्य मल्लखांब स्पर्धेचा ही १२ वा कार्यक्रम होता. या प्रतिष्ठित व्यासपीठावरून मला सांगली शहर अध्यक्ष डी.के. पाटील यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि १,१११ रुपयांचे रोख रकमेचे पारितोषिक देण्यात आले. ते अभिमानास्पद क्षण इतक्या वर्षांनंतरही माझ्या डोळ्यांसमोर आजही तरळतात तेव्हा तो क्षण परत जागल्याचा भास होतो. व्यासपीठावरून घोषणा करण्यात आली की हा पुरस्कार दरवर्षी मलखांब खेळासाठी दीर्घकाळ सेवा करणाऱ्या खेळाडू आणि प्रशिक्षकांना देण्यात

येईल. मी तेव्हा चेंबूर हायस्कूलमध्ये प्रशिक्षक म्हणून काम करत होतो. श्री. पाठारे यांनी शेकडो राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंना घडवले आहे. त्यांनी १९८२ च्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धा, १९९२ च्या आशियाई ज्युनियर अजिंक्यपद स्पर्धा आणि असंख्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धांमध्ये यशस्वी प्रशिक्षक म्हणून काम केले आहे. अशा तऱ्हेने निवेदकाने माझी ओळख करून दिली. हीच ओळख राज्य आणि राष्ट्रीय वृत्तपत्रांनी नोंद करून घेतली आणि वर्तमानपत्राचे रकाने भरून ती प्रसिद्ध झाली. अशा कितीतरी आनंददायी आणि आत्मविश्वास वाढणाऱ्या अनेक बातम्या वाढत्या वयाच्या टप्प्यावर अजूनही नवीन काही करण्याची ऊर्जा देत होते. खूप काही करून ठेवले आहे या जाणीवेपेक्षा मला जर हे करता आले तर आणखीही काही करता येईल हा आत्मविश्वास मिळवून देत होते. प्रत्यक्ष मैदानात उतरून आता काम करणे जरी शक्य नाही तरी अनुभवाचीपुंजी इतकी मोठी आहे की यथायोग्य सल्ले देण्याचे भान आणि ज्ञान टिकून आहे, याचे मला स्वतःलाही आश्चर्य वाटते आणि त्याचा आनंदही आहे!

■

७. मल्लखांब – एक प्राचीन भारतीय खेळ

जगभरात मलखांब, मल्लखांब, मलखम्ब अशी वेगवेगळी नावे वाचनात आलीत परंतु आपल्या देशात मात्र विविध राज्यांमध्ये दोरी योग, दक्षिणेत शिवस्तंभ योग, रज्जु योग, कुंडलिनी रज्जु योग (स्वामी नित्यानंद) इत्यादी म्हणूनही मल्लखांब हा खेळ ओळखला जातो. हा भारतातील सर्वात जुना आणि पारंपारिक खेळ आहे, जो मल्ल आणि खांब या शब्दांपासून आला आहे. मल्लचा शब्दशः अर्थ कुस्ती असाही आहे. या खेळात, खेळाडू उभ्या लाकडी खांबाच्या किंवा दोरीच्या मदतीने विविध पराक्रम (व्यायाम, योग आणि आसन) करतात. यासाठी बराच सराव आणि समर्पण आवश्यक आहे. प्राचीन काळात, कुस्तीगीर आणि योद्धे या खेळाचा वापर लष्करी प्रशिक्षणासाठी करायचे. काहींचा असा विश्वास आहे की त्याची उत्पत्ती महाराष्ट्रात झाली आहे. काही ग्रंथांमध्ये त्याचा इतिहास बाराव्या शतकात आढळतो. बाळंभट्ट दादा देवधर यांना या खेळाचे प्रणेते गुरू आणि संस्थापक मानले जातात. रामायण आणि महाभारतातही या खेळाचे संदर्भ आढळतात. असे मानले जाते की महाबली हनुमानजी हे त्याचे जनक होते. ओरिसामध्ये जगन्नाथ वल्लभम मलखांब आखाडा आहे, जो जगन्नाथ मंदिराच्या स्थापनेपासून कार्यरत आहे. बाजीराव दुसरे पेशवे यांच्या दरबारात, बाळंभट दादा देवधर

यांनी महाराष्ट्रात या खेळाचे पुनरुज्जीवन केले आणि केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातही त्याचा प्रचार केला. हा खेळ सुरुवातीला मार्शल आर्ट म्हणून सुरू झाला असे मानले जाते. मल्लखांब आणि जिम्नॅस्टिक्स हे पूर्णपणे वेगळे खेळ आहेत. जिम्नॅस्टिक्स हा एक महागडा आणि परदेशी खेळ असला तरी, मल्लखांब हा एक स्थानिक आणि स्वस्त खेळ आहे. जिम्नॅस्टिक्ससाठी भरपूर जागा आणि उपकरणे आवश्यक असतात आणि त्यात अनेक प्रकार आहेत. मल्लखांबमध्ये प्रामुख्याने तीन प्रकार आहेत: पुरलेला मल्लखांब, टांगता मल्लखांब आणि दोरी मल्लखांब. खांब (Pole) हा शब्द त्याच्या नावात आहे, म्हणजेच तो खांबावर केला जाणारा ॲक्रोबॅटिक व्यायामाचा एक प्रकार आहे. मल्लखांबाचा खांब २.६ मीटर उंच, ५५ सेमी परिघाचा आहे आणि त्याचा वरचा खांब ३५ सेमी आहे. दोरी मल्लखांब दोरीचा वापर करतो, ज्यामुळे हवाई योग आणि जिम्नॅस्टिक्स आसने करता येतात. विविध प्रकारे प्रात्यक्षिकेदेखील केली जातात, जसे की चालत्या सायकलच्या मागील बाजूस खांब जोडून व्यायाम करणे.

सुरुवातीच्या काळात, सामाजिक कारणांमुळे मुलींना सहभागी होण्याची परवानगी नव्हती. पण सामाजिक विचारसरणी बदलू लागल्याने १९८४ नंतर मोठ्या प्रमाणात मुली यात भाग घेऊ लागल्या. २०१३ मध्ये मध्य प्रदेश सरकारने मल्लखांबला राज्य खेळ म्हणून घोषित केले.

कालांतराने या खेळाचे स्वरूप बदलत गेले. १९९० पासून या खेळाला सरकारी मान्यता मिळवून देण्यासाठी अनेक संघटना अथक प्रयत्न करत होत्या. १९९२-९३ मध्ये संसदेतही हा मुद्दा मांडण्यात आला. अखेर १९९६ मध्ये या खेळाला सरकारी मान्यता मिळाली आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये त्याचा समावेश झाला. यामुळे खेळाडूंना अनेक फायदे झाले, ज्यात स्पर्धांसाठी सवलतीचे रेल्वे भाडे आणि सरकारी मान्यताप्राप्त खेळाचा दर्जा यांचा समावेश आहे. अलीकडेच समर्थ व्यायाम मंदिरचे (दादर, मुंबई) गुरू उदय देशपांडे यांना मल्लखांब या खेळासाठी भारत सरकारने पहिल्यांदाच २०२४ मध्ये क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या प्रयत्नांसाठी पद्मश्री, भारतातील चौथा-सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. या खेळाला लोकप्रिय करण्याच्या त्यांच्या

नेतृत्व गुणासाठी त्यांना अनेकदा मल्लखांब पितामह म्हणून संबोधले जाते!

आपल्या सर्वांसाठी ही एक मोठी कामगिरी असली तरी इतक्या वर्षांनी अखेर मल्लखांबला त्याची योग्य मान्यता मिळाल्याचा आनंद त्याहूनही मोठा आहे. उशिरा का होईना आपण सर्वजण या योग्य निर्णयाचे स्वागत करायला काहीच हरकत नाही. यापूर्वी कधीही मल्लखांबच्या खेळाडूला किंवा हा खेळ शिकवणाऱ्या गुरूला पद्मश्री पुरस्कार मिळालेला नव्हता. या खेळाला राष्ट्रीय मान्यता मिळवून देण्यासाठी संबंधितांनी वर्षानुवर्षे संघर्ष केला होता. स्वातंत्र्यानंतर इतक्या वर्षांनी, मल्लखांबासारख्या स्थानिक खेळाला न्याय मिळाला आहे का? त्याला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळेल का? भारतात येणाऱ्या ऑलिंपिकमध्ये मल्लखांबाचा समावेश होईल का? असे झाल्यास माझ्यासारख्या क्रीडाप्रेमींसाठी हा एक मौलिक अनुभवाचा क्षण असेल! मल्लखांब हा केवळ एक खेळ नाही, तर आपली प्राचीन संस्कृती आहे. एक राष्ट्रीय ओळख लाभावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. व्यायाम, मल्लखांब आणि आसन (योग) यासारखे खेळ लहानपणापासूनच माझ्या रक्तात भिनलेले आहेत, हा वारसा मला माझ्या वडिलांकडून मिळाला आहे ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. माझ्या वडिलांनी व्यायाम आणि सामाजिक कार्याची आवड स्वतःपुरती मर्यादित ठेवली नाही, तर आयुष्यभर आसपासच्या माणसांमध्ये त्याचा मोठ्या प्रमाणात प्रचार आणि प्रसार केला. याद्वारे त्यांनी चेंबूर आणि आसपासच्या परिसरातील हजारो तरुणांना जोडले. अशा उपक्रमांना त्यावेळी खूप महत्त्व होते आणि आजही खरंतर ते तसेच आहे. आज आपण अभिमानाने आणि विश्वासाने म्हणू शकतो की खेळात करिअर करता येते! अभ्यासात मागे राहणारी मुले खेळाच्या माध्यमातून आपले भविष्य निश्चितपणे घडवू शकतात.

■

८. आसने, जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स, मल्लखांब

ॲथलेटिक्स आणि जिम्नॅस्टिक्स हे मुळात परदेशी खेळ आहेत. त्यांचा पाया देखील आसन (योग) आहे. आमच्या आदरणीय विद्वानांनी हे जगासमोर दाखवून दिले आहे. ॲथलेटिक्स आणि जिम्नॅस्टिक्सबद्दल अनेक पालकांमध्ये गोंधळ आहे हे मी अनुभवले आहे. मी स्पष्ट करतो की ॲथलेटिक्स आणि जिम्नॅस्टिक्स हे दोन्ही शारीरिक खेळ आहेत. तथापि, त्यांच्यातील मुख्य फरक असा आहे की ॲथलेटिक्स म्हणजे धावणे, उडी मारणे, भाला फेकणे, गोळा फेक, डिस्कस फेकणे आणि मॅरेथॉन चालणे यासारख्या बाह्य क्रियाकलापांचा समावेश आहे. या खेळात, खेळाडूंना वेग, ताकद आणि सहनशक्तीची परीक्षा द्यावी लागते. याला सामान्यतः ट्रॅक अँड फील्ड म्हणून ओळखले जाते. जिम्नॅस्टिक्स हा एक इनडोअर खेळ म्हणून ओळखला जातो. त्यात कलात्मक, लयबद्ध, ट्रॅपेझिलाइनिंग, टंबलिंग, एरोबिक, ॲक्रोबॅटिक आणि इतर जिम्नॅस्टिक्स समाविष्ट आहेत. या कृती संतुलन, ताकद, लवचिकता, चपळता, सादरीकरण आणि समन्वय यावर भर देतात. या उद्देशासाठी विशेष उपकरणे वापरली जातात. ते शारीरिक कलात्मकता आणि सहनशक्तीची चाचणी करते. त्यात बॅलन्स बीम, असमान बार, व्हॉल्ट आणि फ्लोअर व्यायाम यासारख्या क्रियाकलापांचा देखील समावेश

आहे. पुरुष प्रामुख्याने फ्लोअर एक्सरसाइज, पोमेल हॉर्स, रिंग्ज, व्हॉल्ट, पॅरलल बार आणि हॉरिझॉन्टल बार करतात तर दुसरीकडे, महिला व्हॉल्ट, बॅलन्सिग बीम, अनइव्हन बार्स करतात.

खेळाडू व्हॉल्ट, अनइव्हन बार, बॅलन्स बीम आणि फ्लोअर एक्सरसाइज करतात. ॲथलेटिक्स हा देखील एक प्राचीन खेळ आहे आणि तो भारताबाहेर खेळला जातो. याला ट्रॅक अँड फील्ड म्हणून ओळखले जाते. ट्रॅक इव्हेंटमध्ये धावणे, चालणे आणि अडथळ्यांची शर्यत यांचा समावेश आहे, तर फील्ड इव्हेंटमध्ये उंच उडी, लांब उडी आणि गोळा फेक, भाला फेक, थाळी फेक अशांचा समावेश आहे. जिम्नॅस्टिक्स हादेखील रोम युरोप मधील एक प्राचीन खेळ आहे. तो इनडोअर खेळ म्हणून ओळखला जातो. दोन्हीसाठी शारीरिक कौशल्य आवश्यक आहे. मुली लवचिकतेमुळे रिथॉमिक जिमनॅटिक्समध्ये अधिक भाग घेतात.

आसन हे योगाचे एक रूप आहे. योग हा आपला सर्वात लोकप्रिय आणि प्राचीन व्यायाम प्रकार आहे, जो भारतीय परंपरा, जीवनशैली आणि संस्कृतीशी ओळखला जातो. हजारो वर्षांपूर्वी प्राचीन भारतात ऋषी-मुनींनी केलेला हा व्यायाम आता जगभरातील अनेक देशांमध्ये केला जातो. थोडक्यात, भारत या खेळाचे जन्मस्थान आहे. क्रीडा आणि दैनंदिन जीवनात आसनांचे (योगाचे) अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा केवळ व्यायामाचा एक प्रकार नाही तर शरीर, मन आणि आत्मा संतुलित करण्याची प्रक्रिया देखील आहे. योगाचे अनेक प्रकार आहेत, जसे की हठयोग, राजयोग, कर्मयोग, भक्तीयोग, ज्ञानयोग, तंत्रयोग, बिक्रमयोग आणि अष्टांगयोग. ही आठ अंगांची योग प्रणाली आहे, ज्यामध्ये यम (नैतिक शिस्त), नियम (आध्यात्मिक शिस्त), आसन (शरीराची स्थिती), प्राणायाम (श्वास नियंत्रण), प्रत्याहार (इंद्रियांचे नियंत्रण), धारणा (ध्यानाची तयारी), ध्यान (खोल एकाग्रता) आणि समाधी (पूर्ण आत्मज्ञान) यांचा समावेश आहे. आपल्या देशात, आसन हा ॲथलेटिक्स आणि जिम्नॅस्टिक्सचा पहिला टप्पा किंवा मूलभूत खेळ मानला जातो. त्यात अनेक टप्पे देखील आहेत, ज्याद्वारे प्राणायाम ते समाधी पर्यंतची स्थिती अनुभवता येते. आयुर्वेदात 'स्थिरम् सुखम् आसनम्!'चा देखील उल्लेख आहे. श्री अय्यंगार यांच्या

पुस्तकात आठशेहून अधिक आसनांची माहिती दिली आहे. योगऋषी पतंजली यांचे आसनांबद्दलचे ज्ञान व्यापक आणि प्राचीन आहे. आज, देशात आणि परदेशात अनेक संस्था आणि गुरू योगाचा प्रचार करत आहेत आणि मी प्राचीन भारतातील आमची संस्कृती आणि वारसा वाढवत आहोत. आसने आणि जिम्नॅस्टिक्समध्ये खोलवर संबंध आहे. ते पूरक खेळ आहेत. पवनपुत्र व्यायाम मंदिर येथे सुरुवातीपासूनच आसनांचे प्रशिक्षण दिले जात आहे, कारण आमचा असा विश्वास आहे की आसनांच्या यशस्वी सरावानंतर जिम्नॅस्टिक्स आणि ॲथलेटिक्ससारखे खेळ सोपे होतात. माझ्या मते, आसन हे सर्व खेळांचा पाया आहेत, म्हणून प्रत्येक खेळाडूने प्रथम आसनांचा (योगाचा) गांभीर्याने आणि क्रमाक्रमाने सराव करावा. त्यात प्रभुत्व मिळवल्यानंतर, सर्व प्रकारचे खेळ सहज शक्य होतात. हा प्राचीन भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. आज, याला जागतिक मान्यता मिळाली आहे आणि ११ डिसेंबर २०१४ रोजी, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला. आज, जगभरातील लाखो लोक दरवर्षी एकत्रितपणे योग दिन साजरा करतात. योग ही एक प्राचीन भारतीय परंपरा असलेली जीवनशैली आहे आणि ती जगाने स्वीकारली आहे. भारत हे त्याचे जन्मस्थान आहे. त्याची उत्पत्ती सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी भारतात झाली.

जिम्नॅस्टिक्स उपकरणे बांबू (वाकलेली) पासून देखील बनवता येतात. जिम्नॅस्टिक्स उपकरणे आयात करावी लागतात, ही धारणा दूर करणे आवश्यक आहे. अशी उपकरणे आता आपल्या देशात अनेक ठिकाणी तयार केली जातात. या ठिकाणांबद्दल योग्य माहिती नसल्यामुळे, लोक असे गृहीत धरतात की परदेशातील उपकरणे श्रेष्ठ आहेत. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की बांबू (वाकलेली) पासून जिम्नॅस्टिक्स उपकरणे बनवणे शक्य आहे. बांबूच्या मदतीने कमी खर्चात चांगली आणि टिकाऊ उपकरणे बनवता येतात. बांबू हा एक नैसर्गिक स्रोत आहे, जो आपल्या देशात मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. त्याचा वापर बागकामासाठी देखील करता येतो. जर लोकांना बांबूपासून उपकरणे बनवण्याचे तंत्र शिकवले किंवा योग्यरित्या प्रशिक्षित केले तर अनेकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील.

आपल्या सर्वांना माहीत आहे की उच्चभ्रू घरांमध्ये बांबूचे झुले टांगलेले दिसतात. वाकलेल्या लाकडापासून बनवलेले झुलेदेखील उच्चभ्रू घरांमध्ये दिसतात. बांबूवर विशेष पद्धतीने प्रक्रिया करून ते आवश्यक फर्निचर आणि झुले बनवले जाते. आसामसारख्या भागात हा एक लोकप्रिय उद्योग आहे. आसाममधील काही मंदिरांमध्ये अगदी कोवळ्या बांबूपासून मिठाई बनवल्या जातात, जो मी प्रसाद म्हणून खायचो. त्याचप्रमाणे, जिम्नॅस्टिक्सची उपकरणे देखील अशाच प्रकारे बनवता येतील, जी परवडणारी, टिकाऊ आणि स्थानिक ब्रँडची असतील. जर हा प्रयोग यशस्वी झाला तर मोठ्या प्रमाणात निर्यात व्यापार देखील विकसित करता येईल.

आपल्यापैकी अनेकांनी मुंबईच्या रस्त्यांवर तीन किंवा चार बांबूच्या खांबांवर तोल साधून, मध्यभागी दोरीने बांधून चालणाऱ्या डोंबाऱ्यांना पाहिले आहे. हा खेळ काय आहे? हा जिम्नॅस्टिक्सचा एक प्रकार नाही का? त्याचप्रमाणे, भविष्यात, बायो-डिजिटल उपकरणांच्या निर्मितीसाठी देशाला मोठ्या प्रमाणात बांबूची आवश्यकता असेल. हे लक्षात घेऊन, मोठ्या प्रमाणात बांबूची लागवड उद्योजकीय आणि शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते. वाकलेल्या बांबूपासून बनवलेले जिम्नॅस्टिक्स उपकरणे HB/UB (लवचिकता) निकष पूर्ण करतात याची खात्री करण्यासाठी IIT तज्ञांकडून त्यांची चाचणी घेतली जाऊ शकते. PB, RR रिंग्ज, PH हँडल्स आणि बॅलन्सिंग बीम लांबी (लवचिकता आणि कडकपणा) वर प्लाय वापरून, कमी-उंचीच्या प्रशिक्षणासाठी विविध बीम (निश्चित उंची) कमी खर्चात तयार करता येतात. यासाठी तज्ञांची मदत उपलब्ध आहे. मला माझ्या बालपणीच्या आठवणी आठवतात, जेव्हा माझे वडील परस्पर सहाय्यक संघ व्यायाम मंदिर चालवत असत. आम्ही वाकलेल्या काठ्यांचा वापर करून लाठी-काठी तंत्र शिकलो, ज्याने लवचिकता दर्शविली. बांबूपासून जिम्नॅस्टिक्स उपकरणे बनवण्याच्या प्रक्रियेची माहिती, त्याचा आकार इत्यादी माहिती गुगल आणि युट्यूबवर उपलब्ध आहे. मुद्दा असा आहे की परदेशी उपकरणांवर अवलंबून राहण्याऐवजी, आपण स्वदेशी उपकरणे निर्मिती प्रक्रियेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. क्रिकेटसाठी बॅट आणि पॅड कसे बनवले जातात? यावरून, स्वदेशी जिम्नॅस्टिक्सची उपकरणे बनवणे अगदी सहज साध्य होऊ शकते.

■

९. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये माझा सहभाग

माझे प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर, मी १९५५ ते १९५८ पर्यंत चेंबूर हायस्कूलमध्ये, जुन्या एसएससी स्तरापर्यंत शिक्षण घेतले. या काळात, मी शाळेच्या शैक्षणिक उपक्रमांसोबत खेळांमध्येही सहभागी राहिलो. मला खेळांमध्ये खूप रस होता. त्यावेळी भगवंत माधव पंत (विशाल गडकर) हे तेथे एक शिस्तबद्ध शिक्षक होते. पंत सर, आजगावकर आणि मंडलेचा सर आठवीपासूनच्या विद्यार्थ्यांना बास्केटबॉल, ॲथलेटिक्स, व्हॉलीबॉल, खो-खो आणि कबड्डीसारखे खेळ शिकवत असत. मी त्या विद्यार्थ्यांपैकी एक होतो. मल्लखांब आणि आसन व्यतिरिक्त, मला बास्केटबॉल आणि ॲथलेटिक्समध्येदेखील रस होता. पंत सरांच्या मार्गदर्शनाखाली, मी बास्केटबॉल आणि व्हॉलीबॉल शिकलो, त्यांचा सराव केला. यामुळे मला विद्यार्थी म्हणून शाळेच्या संघात समाविष्ट करण्यात आले. श्री पवनपुत्र स्थापन केल्यानंतर, माझ्या वडिलांनी विद्यार्थ्यांना मल्लखांब आणि आसन (योग) शिकवले. त्यांना भारतीय खेळांची खूप आवड होती. त्यांनी विद्यार्थ्यांना असेही आवाहन केले की जर भारतीय खेळांमध्ये पाया विकसीत झाला तर परदेशी खेळ सहजपणे शिकता येतील. मला खेळांसाठी घरून पूर्ण पाठिंबा मिळाला. मी पोहण्यासाठी दादर (गांधी टँक) सायकलने जायचो. उन्हाळ्याच्या

आणि दिवाळीच्या सुट्टीत मी जोमाने खेळांचा सराव करायचो. माझ्या व्यायामशाळेच्या काळात मला 'नाना' म्हटले जायचे...!

डी एस हायस्कूलमध्ये असताना स्काउट्स आणि कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर मी एनसीसीमध्येही सामील झालो. मी बास्केटबॉल, शॉट पुट, डिस्कस थ्रो, ट्रिपल जंप, पोहणे इत्यादी आंतरशालेय आणि आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये भाग घेतला. खेळांसोबतच मला चित्रकलेचीही आवड होती. जर्मन लेखक कुन्झले यांची जिमनॅस्टिक्स संबंधित चेंबूर हायस्कूल मधील वाचनालयातील पुस्तके वाचल्यानंतर मी १९६७ नंतर जिम्नॅस्टिक्सकडे वळलो.

एक कुशल खेळाडू म्हणून, मला जिल्हा व राज्य स्तरावरील स्पर्धांमध्ये भाग घेण्याच्या संधी मिळू लागल्या, ज्यामुळे माझे मनोबल वाढले. खेळांसोबतच मी माझा पुढील अभ्यास सुरू ठेवला. पंत सरांनी चेंबूर हायस्कूलच्या ग्रंथालयात ऑलिंपिक, जिम्नॅस्टिक्स, एफएक्स, एचबी, पीबी आणि पीएच या विषयांवरील देशी आणि परदेशी चांगली पुस्तके संदर्भासाठी ठेवण्यासाठी व्यवस्था केली होती. ती वाचल्याने मला आणि इतर अनेक विद्यार्थ्यांना ज्ञानाचा खजिना मिळाला. ही पुस्तके आमच्यासाठी अनेक प्रकारे मार्गदर्शक ठरली. क्रीडा क्षेत्रातील पंत सरांच्या मौल्यवान योगदानाची दखल घेत महाराष्ट्र सरकारने त्यांना एक कुशल प्रशासक म्हणून शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित केले, जो आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.

मी तुम्हाला सांगतो की मी मूळ बी.एससी.चा विद्यार्थी होतो. भौतिकशास्त्राचा एक विषय हीट इंजिन होता, जो मला कधीच समजला नाही. माझ्या सर्वोत्तम प्रयत्नांनंतरही, मी माझे बी.एससी. अंतिम वर्ष पूर्ण करू शकलो नाही. माझ्या कॉलेजचे प्रोफेसर जोशी सर, चेंबूर हायस्कूलचे तेव्हाचे मुख्याध्यापक माझे बी.एससी. लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आग्रह करत होते. त्यांनीही हीट इंजिन हा एक कोरडा विषय (कॉलेजचे मत) (Dry Subject) आहे असे सांगितले. शेवटी, खूप मेहनत केल्यानंतर मी १९६४ मध्ये माझे बी.एससी. ज्युनियर लेव्हल पूर्ण केले. पण मी माझे अंतिम वर्ष पूर्ण न केल्यामुळे, माझी पदवी अपूर्ण राहिली. मला असेही वाटले की मी कशीतरी पदवी पूर्ण करू शकेन, परंतु ते माझ्या नशिबात नव्हते.

दरम्यान, मी माझ्या सातारा गावातील रहिवासी आणि चेंबूर हायस्कूलमध्ये शारीरिक शिक्षण आणि हिंदीचे शिक्षक सदाशिव जाधव यांना भेटलो. ते खूप प्रामाणिक आणि मेहनती होते. त्याची पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झालेले नव्हते. म्हणून आम्ही दोघांनी ठरवले की आपण ते पूर्ण करणे आवश्यक आहे.

मी पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करणार होतो म्हणून मला माझे बी.एस्सी.चे शिक्षण अर्ध्यावरच सोडावे लागले. कला शाखेची पदवी घेण्याचे ठरवले. त्यानंतर मी १९७२ मध्ये पुणे विद्यापीठातून बी. ए. उत्तीर्ण झालो. त्यानंतर मी माझे बी.एड. देखील पूर्ण केले. बी.एड या आधारावर १९७३ मध्ये माझी चेंबूर हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून नियुक्ती झाली. अशा प्रकारे, मी अध्यापन व्यवसायात प्रवेश केला. हायस्कूलमध्ये मला गणित आणि विज्ञान शिकवण्याची जबाबदारी देण्यात आली. विज्ञान हा माझा आवडीचा विषय होता त्यामुळेच मी ही जबाबदारी उत्तमरित्या पार पाडू शकलो. नोकरी मिळाल्यामुळे मी आता स्वतःच्या पायावर उभा होतो. त्या काळात मुंबईसारख्या शहरात नोकरी मिळवणे सोपे नव्हते. त्या काळीसुद्धा मुंबई स्वप्नांचे शहर म्हणून ओळखली जात होती आणि आजही ती तशीच आहे! या शहरात धडपडणे आणि सावरणे सदैव चालूच असते. आपण निवडलेला मार्ग आपण निवडलेल्या मार्गावर अवलंबून असतो. देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक त्यांचे नशीब आजमावण्यासाठी मुंबईत येतात. यश आणि अपयश हे कठोर परिश्रम, समर्पण आणि चिकाटीने ठरवले जाते. जर तुमच्याकडे प्रतिभा असेल तर उपजीविकेच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. येथे हजारो उदाहरणे सापडतील. जी माणसे इथे नेसत्या कपड्यानिशी आले आणि त्यांच्या कौशल्याने, कठोर परिश्रमाने आणि नशिबाने, आदर्श बनले आणि त्यांना नशिबाचे विजेते म्हटले गेले. जीवनाच्या लढाईत, एखाद्याला कृष्ण आणि अर्जुन अशा दोन्ही भूमिका निभावाव्या लागतात. एखाद्याला स्वतःच स्वतःचे सारथी बनावे लागते आणि दररोज जीवनातील महाभारताला तोंड द्यावे लागते!

जेव्हा जेव्हा मला खेळांबद्दल काही विशिष्ट माहिती मिळत असे, तेव्हा मी ती माझ्या डायरीत नोंदवायचो. या नोंदी किती महत्त्वाच्या होता

हे आज जाणवतंय.

एक सामान्य माणूस वैयक्तिक पातळीवर आणखी काय करू शकतो? आपला देश इतर देशांच्या तुलनेत क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत इतका मागे का राहिला आहे? याचे सविस्तर विश्लेषण आवश्यक आहे, परंतु या विषयाला काही मर्यादा आहेत, म्हणून हा विषय बाजूला ठेवून पुढे जाऊया. मी आयुष्यात अनेक गोष्टींचा त्याग केला कारण माझे पूर्ण लक्ष खेळाकडेच केंद्रित केले खेळ हाच माझा छंद होता, हाच माझा आनंद होता.

तथापि, १९६४ मध्ये मी मल्लखांब आणि कुस्ती, लाठी काठी आणि मार्शल आर्ट्स सारख्या भारतीय व्यायाम प्रकारांचे प्रगत प्रशिक्षण घेण्यासाठी अमरावतीला गेलो. तिथे एक महिनाभर मी उन्हाळी व्यायाम अभ्यासक्रम पूर्ण केला. १९६९ मध्ये मी हजारा सिंग आणि गुरुदयाळ बावा सरांच्या मार्गदर्शनाखाली पटियाला येथे ४० दिवसांच्या सेवा-अभिमुखता अभ्यासक्रमाला गेलो. १९६७ मध्ये, मी मिरज (अंबाबाई तालीम संघ), सोशल सर्विस लीग (परळ) आणि आगरताळा येथे प्रशिक्षक म्हणून गेलो. मी योगासाठी मुंबईतील कैवल्य धाम (लोणावळा शाखा) (मरीन ड्राइव्हला) देखील शिकलो. माझा प्रसार राष्ट्रीय स्तरावरही वाढला. खेळ हा माझ्या आध्यात्मिक समाधानाचा अविभाज्य भाग बनला होता, म्हणून मी त्याच्याशी संबंधित कोणत्याही ऍक्टिव्हिटीमध्ये नेहमीच सहभागी होत असे. खेळामुळे मी निरोगी राहिलो. माझा मानसिक आणि सामाजिक विकासही होत होता. मी मानसिक ताणतणावापासूनही मुक्त होतो आणि आजही आहे. मी तुम्हा वाचकांनाही आवाहन करतो की तुम्ही स्वतःला किंवा तुमच्या मुलांना काही कोणत्याही क्रीडा प्रकारामध्ये सहभागी होऊ द्या आणि ते तुमच्या जीवनाचा एक भाग बनवा. कोणी यशस्वी खेळाडू बनो किंवा न बनो परंतु माझ्या मते, प्रत्येक व्यक्तीने आयुष्यात लहान वयात कधी ना कधी खेळात रममाण झाले पाहिजे. जीवनात खेळाला महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे. त्याचे अनेक फायदेच आहेत.

■

१०. गुलाब इंजीनिअरिंग वर्क्स

गुलाब रामनाथ पाठारे हे माझ्या आईचे नाव होते. आमचा धाकटा भाऊ तिच्या नावाने जिम्नॅस्टिक्स उपकरणे बनवण्याचा व्यवसाय करेल, अशी आम्ही कधीच कल्पना केली नव्हती. माझा धाकटा भाऊ अनिल माझ्यासोबत होता. माझ्यासारखा त्याला व्यायाम, आसने किंवा पवनपुत्र संस्थेच्या सामाजिक उपक्रमांमध्ये विशेष रस नव्हता. पण मला संस्थेच्या कामासाठी त्याची गरज होती. त्याला स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत करणे ही माझी नैतिक जबाबदारी होती. आम्हाला सर्वांना त्याच्या उदरनिर्वाहाची काळजी होती, म्हणून आम्ही सर्वजण त्याला स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास उद्युक्त करत होतो. आम्हाला व्यायामशाळेसाठी आवश्यक असणारी उपकरणे बाहेरून खरेदी करावी लागत होती. खूप वर्षांनंतर, त्याने रे रोडवर मोटारच्या सुटे भागांसाठी स्टड्स तयार करण्यास सुरुवात केली. त्यावेळी, जहाज तोडण्याचे काम मोठ्या प्रमाणात रे रोडवर केले जात असे. १९९० च्या दशकात, जहाज तोडण्याचे काम गुजरातमधील अलंग येथे हलवले गेले. जोपर्यंत रे रोड (दारुखाना) येथे जहाज तोडण्याचे काम सुरू होते, तोपर्यंत कारखान्यासाठी आवश्यक असलेला कच्चा माल सहज उपलब्ध होता. अनिलने सर्वप्रथम रे रोड येथे प्रयोग म्हणून जिम्नॅस्टिक्स उपकरणे

तयार करण्यास सुरुवात केली आणि त्यांच्या युनिटचे नाव गुलाब इंजिनिअरिंग वर्क्स ठेवले.

रे रोड येथील या युनिटमध्ये सुरुवातीचे काम सुरू झाले. त्याच्या यशानंतर, अनिलने नंतर अंधेरी येथे नटबोल्ट आणि बोल्ट उत्पादन करण्याची जबाबदारी पेलली. आम्ही उपकरणे निर्मितीचा व्यवसाय सुरू केला. आमच्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळत असताना, अनिलला मदत करण्यासाठी मी काही काळ त्याच्यासोबत काम केले. बाहेरून आवश्यक क्रीडा उपकरणे मिळवण्यात आम्हाला खूप अडचणी आल्या. म्हणूनच अनिलने क्रीडा उपकरणे बनवण्यास सुरुवात केली. त्याच्या यशानंतर काही वर्षांनी, अनिलने ठाण्यात एक युनिटदेखील उघडले. तरुणांनी काम करण्याऐवजी स्वतःचे व्यवसाय सुरू करावेत, असा आग्रह आमचे वडील आणि एकंदरीतच वडीलधारी त्या काळात धरत होते. कारण ती काळाची गरजही होती. परिणामी, अनिलने स्वतःचा स्वयंरोजगार व्यवसाय सुरू केला. त्यावेळी तरुणांच्या उपकरणांना प्रोत्साहन देणे हे आमचे प्राधान्य होते, म्हणून आम्ही अनेक ठिकाणी लहान मुलांच्या उपकरणांचे प्रदर्शन आयोजित केले. आमचे प्राथमिक उद्दिष्ट इतर राज्यांमधून किंवा परदेशातून अशी क्रीडा उपकरणे आयात करण्याऐवजी आपल्याच देशात ती तयार करणे आवश्यक होते. आम्ही दिल्ली, चंदीगड आणि काही दक्षिणेकडील राज्यांमध्ये या प्रकारचा व्यवसाय सुरू केला. आम्ही त्याचा सखोल अभ्यास केला आणि मुंबई आणि इतर राज्यांमध्ये त्याचे यशस्वी प्रयोग करून दाखवले.

राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धांच्या यशानंतर आम्हाला आता आंतरराष्ट्रीय स्पर्धांकडे लक्ष पुरवणे गरजेचे वाटत होते. तथापि, आपल्या देशात आंतरराष्ट्रीय स्तरावरील उपकरणे उपलब्ध नव्हती, हे दुर्दैवी होते. आम्ही हताश झालो होतो, पण निराश झालो नाही. म्हणून, आम्ही आंतरराष्ट्रीय स्पर्धांची तयारी सुरू केली. मी पुस्तकांमधून लवचिकतेबद्दल (elasticity) बरीच माहिती गोळा केली. आवश्यक कच्चा माल शोधण्यासाठी आम्ही इतर अनेक राज्यांमध्ये संशोधन सुरू केले. या प्रक्रियेत, आम्हाला वारंवार सरकारी संस्था आणि इतर संस्थांना भेट द्यावी लागली होती. आमचे एकमेव उद्दिष्ट हे होते की खेळांसाठी आवश्यक असलेली आधुनिक क्रीडा उपकरणे आपल्या

देशात तयार केली जावीत. शेवटी लवचिकतेसाठी (For elasticity), आम्ही अमेरिकन पाइनवुड वापरून समांतर बार (Parrallel Bar) आणि असमान बार (Uneven Bar) बनवण्याचा निर्णय घेतला जे येथे उपलब्ध होते. आम्ही या दिशेने प्रयत्न सुरू केले आणि योग्य प्रमाणात यश मिळवले. आर्थिक क्षमतेअभावी, आम्ही हा उपक्रम पुढे नेऊ शकलो नाही. त्यामुळे याविषयी आणखी काही मी सांगू शकत नाही परंतु मला अभिमानाने सांगायचे आहे की आमच्या संस्थेच्या माध्यमातून आम्ही क्रीडा आणि खेळाडूंच्या प्रगतीसाठी निश्चितपणे प्रयत्नशील राहिलो आहोत.

■

११. आईवडिलांचे निधन

अशा प्रकारे माझे जीवन अनेक चढउतारांमधून जात होते. आम्ही आईवडिलांच्या आरोग्यदायी आयुष्यासाठी खूप प्रयत्न करत होतो. दरम्यान वृद्धापकाळामुळे माझी आई आजारी पडली. आम्ही सर्व तिच्या आरोग्याची काळजी घेत होतो. प्रामाणिकपणा ही तिच्या जगण्याची गुरुकिल्ली होती. त्याच शिकवणुकीच्या पायवाटेवरून चालत राहिल्यामुळे माझ्या जीवनात कोणत्याही समस्येमध्ये मी अडकलो नाही. शेवटी, आई ही आईच असते! शिक्षक म्हणून अनेक विद्यार्थ्यांचे आईविषयक निबंध वाचनात आले, त्यांची आई या विषयावरची भाषणे ऐकली की आज या जगात आई नसली तरी मला कोणाच्याही आई विषयीच्या भावना माझ्यासारख्या असतात, हे प्रकर्षाने जाणवते. कोणाच्याही आईमध्ये मला माझी आई दिसते! 'God cannot be eveywrhere so he created Mother!' हे एक अत्यंत सुंदर वाक्य आहे जे मला आईसाठी मुद्दाम उद्धृत करावेसे वाटतेय कारण माझी आई अत्यंत श्रद्धाळू होती. सर्व साधू -संत -महात्मे यांनी आईची महती सांगितलेली आहे. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये लिहिले आहे की या जगात आई असणे खरोखरच फारच महत्त्वाचे आहे! आई गेल्यामुळे मला हे आठवत आहे. १९९२ मध्ये माझी आई गेली. माझ्या वडिलांना अनेक

वर्षे अर्धांगवायूचा त्रास सहन करावा लागला होता. अनेक ठिकाणी, अनेक प्रकारचे उपचार करण्यात आले परंतु त्याचा फारसा फायदा झाला नाही. आईच्या माघारी फक्त सहा महिन्यांत ३ जानेवारी १९९३ रोजी माझे वडीलही हे जग सोडून गेले. आमच्या कुटुंबासाठी हा आणखी एक धक्का होता. आता मात्र मी सर्वार्थाने पोरका झालो. माझ्या वडिलांच्या निधनाची बातमी कळताच चेंबूर आणि आजूबाजूचा परिसर शोकाकुल झाला. ते स्वातंत्र्य सैनिक होते त्यामुळे त्यांच्या पार्थिव शरीरावर तिरंगा ठेवण्यात आला तेव्हा सर्वांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. पण तो क्षण आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा आणि सन्मानाचा होता. समर्थ रामदास यांनी म्हटलेच आहे की मरावे परी कीर्तीरूपे उरावे! आजही वडील अनेक स्वरूपात आमच्या सोबत आहेत. मृत्यू अटळ आहे परंतु त्यांच्या कार्याची कीर्ती अमर आहे, हेच जीवनाचे सत्य आहे. जिथे जन्म आहे तिथेच मृत्यू आहे, हा निसर्गाचा नियम आहे. आजही जनमानसात वडिलांच्या कार्याची महती टिकून आहे आणि त्यांच्या स्मृतीला आदरांजली वाहिली जाते ही आम्हा सर्वांसाठीच अभिमानाची गोष्ट आहे. आयुष्यभर समाजसेवेचे व्रत घेतलेले माझे वडील आज अस्तित्वात नाही परंतु अनेकांच्याच्या हृदयात त्यांच्यासाठी एक खास स्नेहाचा प्रेमाचा कप्पा होता तो मात्र तसाच राहील! त्यांच्यातील माणुसकीची गाथा रचण्याची क्षमता माझ्यात नाही परंतु एका स्तोत्रातील काही ओळींचा भावार्थ या क्षणी उद्धृत करतो.-

''तो माणूस आपल्यासोबत काय घेऊन आला?
तो काय घेऊन जाईल?
आयुष्य दोन दिवसांसाठी आहे.
जत्रा दोन दिवसांसाठी आहे.''

''त्यांच्या आजारपणात, रेवती मावशी जिला धाकटी संबोधले जायचे तिने शेवटपर्यंत त्यांची मनापासून काळजी घेतली. अगदी त्यांना आंघोळ घालण्यापासून ते मानसिक आधार देण्यापर्यंत अमूल्य योगदान दिले. या प्रक्रियेदरम्यान मी नेहमीच तिच्यासोबत असे. हे करताना मला अनेकदा शाळेत जाण्यास उशीर व्हायचा. यामुळे शाळेच्या पर्यवेक्षकांकडून अनेकदा फटकारले जात असे. काहीही असो, दिवस जात राहिले आणि आम्हाला

मिळालेल्या अनुभवांनी आम्ही श्रीमंत होत गेलो. मी फक्त मातीचा गोळा होतो. माझ्या आईवडिलांनी त्या मातीचे शिल्पात रूपांतर केले, असे मला माझ्याबद्दल वाटते. म्हणून मी त्यांचे ऋण अनेक जन्मातही कधीही फेडू शकणार नाही. मला त्यांच्या घरात जन्म घेता आला परंतु माझ्या वडिलांनी मला एकट्यालाच घडवले नाही तर माझ्यासारख्या अनेकांना घडवले याचा मला अभिमान वाटतो! जेव्हा मला महाराष्ट्र सरकारचा शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त झाला, तेव्हा माझे मातृपितृछत्र हरवून गेलेले होते. त्यांच्या आशीर्वादाने मी या स्थानापर्यंत पोहचू शकलो! स्वर्गातून तो पृथ्वीवरील पुरस्काराचा भव्य सोहळा पाहताना त्यांचा उर नक्कीच भरून आला असेल आणि त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रु घरंगळले असणार, यावर माझा तरी विश्वास आहे!

■

१२. रेवती नारायण महंत यांचे योगदान

रेवती महंत म्हणजे माझी मावशी. पवनपुत्राच्या विकास आणि देखभालीतील तिचे योगदान विसरता येणार नाही. पवनपुत्रातील मुलींसाठी ती प्रेरणास्थान तसेच आधारस्तंभ होती, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. माझ्या वडिलांनी सुरुवातीला कपाळावर दिवे धरून विविध आसने करण्याचे प्रशिक्षण दिलेल्या तीन मुलींपैकी रेवती मावशी ही एक होती. उत्सवाच्या मिरवणुकींमध्ये या मुलींच्या संतुलनाच्या आसनांमुळे त्यांना पाहणारी माणसे आश्चर्यचकित व्हायचे! मुलींसाठी आसने करणे किंवा व्यायामशाळेत जाणे हे सामाजिकदृष्ट्या कठीण काम होते. तिला पाहून अनेक मुलींना पवनपुत्रात प्रवेश मिळाला. रेवती मावशीने संपूर्ण जबाबदारी आनंदाने उचलली. तिने शिकणाऱ्या मुलींना प्रोत्साहन दिले. त्या काळात आजच्याइतक्या मुली स्मार्ट नव्हत्या. त्यांच्याकडे फारशी दूरदृष्टीही नसायची. त्यांचे क्षितिज शाळा आणि महाविद्यालयातील निव्वळ शिक्षणापुरते मर्यादित होते. व्यायामशाळेत व्यायाम करण्यासाठी किंवा योग शिकण्यासाठी वेळ देणे ही तर दूरची गोष्ट होती. जिम्नॅस्टिक्समध्ये मुलींना हाफ पॅन्ट घालावी लागायची जेणेकरून त्यांच्या खेळात सहजता यायची. ज्या मुलींना आणि त्यांच्या पालकांना हाफ-पँटमध्ये जिम्नॅस्टिक्स करायला लागते, हे सांगणेदेखील एक कठीण

काम होते. अशा काळात रेवती मावशी पुढे आली. तिने मुलींना आणि त्यांच्या पालकांना हाफ पॅन्टचे महत्त्व समजावून सांगितले. मुलींना प्रोत्साहन दिले. १९६८ मध्ये, रेवती मावशी महाराष्ट्रातील मुलींच्या संघाची व्यवस्थापक म्हणून दिल्लीपर्यंत पोहोचली होती. १९५४ पर्यंत चेंबूरमध्ये मराठी माध्यमांच्या शाळा नव्हत्या, म्हणून रेवतीने तिचे शिक्षण दादरमधील छबिलदास हायस्कूलमध्ये पूर्ण केले होते. तिने मॅट्रिकमध्ये प्रथम श्रेणी मिळवली होती. ती उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाली ही आमच्यासाठी आश्चर्याची आणि आनंदाची गोष्ट होती. संस्कृतमध्ये आम्हाला येणाऱ्या अडचणी ती सहजपणे सोडवायची. तिला तर्खडकरांची तीन भाषांतर पाठमालेची पुस्तके तोंडपाठ होती. तिने काही महिने रेशनिंग ऑफिसमध्येही काम केले होते. त्यावेळी महिलांनी काम करणे अजिबात चांगले मानले जात नव्हते म्हणून तिने ती नोकरी सोडली. त्यानंतर तिने पवनपुत्र व्यायामशाळेचे काम पूर्णपणे साभाळले. पवनपुत्रच्या विद्यार्थ्यांचे फीचे जमा केलेले पैसे बँकेत भरणे, विद्यार्थ्यांची काळजी घेणे, त्यांच्या समस्या सोडवणे म्हणजेच पवनपुत्र व्यायाम मंदिरच्या खात्याची आर्थिक जबाबदारी तिने मन लावून सांभाळली. मुख्यत्वे रेवतीमावशीने मुलींना व्यायामशाळेकडे वळवण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्या समस्या सोडवल्या. त्यांच्याकडून आसने करून घेण्याची जबाबदारी स्वतःहून उचलली. २ मे २०११ रोजी पनवेल येथे वृद्धापकाळामुळे तिचे निधन झाले. ती अविवाहित होती. तिच्या जाण्याने खरे तर पवनपुत्र व्यायामशाळेचे मोठे नुकसान झाल्यासारखे वाटले. या माझ्या पुस्तकाच्या निमित्ताने मी तिची मनोमन आठवण करून तिला मनापासून आदरांजली वाहतो.

■

१३. विविध क्रीडा संघटनांमधील पदाधिकार

जिल्ह्यापासून ते राज्य आणि राष्ट्रीय पातळीपर्यंत पवनपुत्रचे खेळाडू आकाशाला गवसणी घालत होते. यामुळे पवनपुत्रची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत गेली. खेळाडूंचे यश पाहून आम्हाला आनंद होणे स्वाभाविकच होते कारण आमच्या अथक प्रयत्नांना यश आल्यासारखे वाटत होते. अनेक ठिकाणी प्रवास केल्याने आणि विविध संघटनांसोबत काम केल्याने माझा जनसंपर्क वाढत गेला. माझी अनेक माणसांशी छान ओळख झाली. यामुळे विविध क्रीडा संघटनांमध्ये विविध पदांवर काम करण्याच्या संधी आपोआप मिळाल्या. हे भविष्यासाठी आणि पवनपुत्रसाठी आवश्यक होते. म्हणूनच श्री पवनपुत्रच्या जबाबदाऱ्या सांभाळताना, मी महाराष्ट्र राज्य जिम्नॅस्टिक्स असोसिएशन (MAGA) चे सह-सचिव (चार वर्षांची दोन टर्म) म्हणून काम केले, त्यानंतर वर्षे कोषाध्यक्ष (चार वर्षांची दोन टर्म) म्हणून काम केले. मी १९८४ ते २००४ पर्यंत कार्याध्यक्ष म्हणूनही काम केले. मी काही वर्षे राज्य आणि राष्ट्रीय मल्लखांब संघटनेचे तांत्रिक समितीचे अध्यक्ष (चार वर्षांची दोन टर्म) म्हणूनही काम केले. १९७० पासून मी विविध स्पर्धांमध्ये पंच (Judge) म्हणून काम केले आहे. २०१० मध्ये दिल्लीत झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेपर्यंत हे सर्व व्यवस्थित चालू राहिले.

चेंबूर हायस्कूलमध्ये मला पंत सरांच्या मार्गदर्शनाखाली बास्केटबॉल आणि ॲथलेटिक्सचे सखोल प्रशिक्षण मिळाले. मल्लखांब व जिम्नॅस्टिक्स या खेळाचे ज्ञान म्हणजे जणू काही सर्व खेळ मोजण्याची (Judging) मला दैवी देणगीच मिळाली होती. याचा मला राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच (Judge) म्हणून काम करण्यासाठी फायदा झाला. १९६९ मध्ये पटियाला येथे, सेवाकाळात (In Servibe) चाळीस दिवसांचे जिम्नॅस्टिक्सचे प्रशिक्षण घेऊन मुंबईला परतल्यानंतर, मी असोसिएशनच्या माध्यमातून मुंबईतील संस्थांमध्ये अशाच पद्धती राबवण्याचा प्रयत्न केला. श्री. पंत यांनी माझ्यासोबत राष्ट्रीय क्रीडा संस्था म्हणजेच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स (NIS) मध्ये पोहण्याचे प्रशिक्षण पूर्ण केले होते हे मला आवर्जून सांगायला आवडेल. यामुळेही आमच्यात जवळचे नाते निर्माण झाले. आम्ही आमच्या मोकळ्या वेळेत या संघटनाबद्दल, त्याच्या प्रगतीबद्दल मोकळ्या गप्पा मारायचो.

१९६० च्या दशकात महाराष्ट्रात जिम्नॅस्टिक्स फक्त पोलिस खात्यापुरते मर्यादित होते. पोलिस विभागात नोकरीसाठी ते अनिवार्य होते. त्यांचे मुख्यालय नायगाव (परळ), मुंबई येथे होते. १९६३ च्या सुमारास श्री. कल्याणपूरकर यांनी सेंट झेवियर्स कॉलेज स्टेडियम येथे राष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा आयोजित केली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माझ्या सततच्या प्रयत्नांमुळे, आम्ही १९६७ मध्ये बृहन्मुंबई जिल्हा जिम्नॅस्टिक्सच्या असोसिएशनची स्थापना केली. मुंबई हा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा बनला जिथे जिम्नॅस्टिक्सच्या संबंधित कार्यासाठी गती मिळाली. मल्लखांबच्या खेळांचेदेखील अनेक ठिकाणी समांतरपणे कार्य चालू होते. १९७६ च्या (झांशी स्पर्धा) सुमारास, जिम्नॅस्टिक्स आणि मल्लखांब हे वेगवेगळ्या संघटनांमध्ये विभागले गेले. त्यावेळी मी महाराष्ट्र राज्य जिम्नॅस्टिक्स असोसिएशन (MAGA) चे सहकार्यवाह म्हणून काम केले. त्याकाळी एका पदावर चार वर्ष सहभागी होता येत असे याशिवाय एकाच पदावर दोन टर्म काम करण्याची परवानगी नियमानुसार मिळत असे. यामुळे २००४ पर्यंत कार्याध्यक्ष म्हणून काम करताना मी संघटनेला नवीन उंचीवर नेण्याचे प्रयत्न केले. त्या संदर्भात अनेक नवीन योजना राबवल्या. मी राज्य मल्लखांब असोसिएशनचे कार्याध्यक्ष म्हणूनही काम केले, तेथेही नवीन योजना राबवल्या. १९७० नंतर मी

अनेक वर्षे क्रीडा स्पर्धांमध्ये पंच (Judge) म्हणून सक्रिय राहिलो होतो. या सर्व कार्यामुळे मी हळूहळू अनुभवसमृद्ध होत होतो. खेळाडूंच्या यशामुळे पदाधिकारी होता आले.

१४ नोव्हेंबर १९६३ ला श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराची स्थापना झाली. या संस्थेचे सचिव आणि संस्था सदस्य म्हणून काम मी करत होतो. १९७६ नंतर महामुंबई विभाग मल्लखांब संघटनेची स्थापना झाली आणि मला त्याचे संस्थापक होण्याचे सौभाग्य मिळाले! श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरातील अनेक खेळाडूंना राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कार मिळाला. जिम्नॅस्टिक्स (Artistic) मधले खेळाडू, जिम्नॅस्टिक्स (Rhythemics) मधले खेळाडू, मल्लखांब (Boys) मधले खेळाडूंचा समावेश होता. संजीवन भास्करन यांना १९९२ मध्ये पॉवरलिफ्टिंगमध्ये राष्ट्रीय अर्जुन पुरस्कार मिळाला. ही आपल्या सर्वांसाठी आणि महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट होती. माझ्यासह श्री पवनपुत्र संघटनेतील अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पंच (Judge) म्हणून काम केले आहे. यात मीनल अरविंद म्हात्रे, महेंद्र अनंत चेंबूरकर, चंद्रशेखर पाटील, मंजुश्री चिवटे आणि मंदार दत्तात्रय म्हात्रे (आंतरराष्ट्रीय पंच) यांचा समावेश आहे.

१९७४ ते २०१४ पर्यंत श्री पवनपुत्र व्यायामशाळेने या कालखंडात १४ वेळा द्वैवार्षिक, त्रैवार्षिक स्पर्धा, निमंत्रित राज्य स्पर्धा, राज्य जिम्नॅस्टिक्स आणि मल्लखांब स्पर्धा आयोजित केल्या. आम्हाला चेंबूरमधील क्रीडाप्रेमी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, रोटरी क्लब, लायन्स क्लब आणि असंख्य देणगीदारांकडून पाठिंबा मिळाला होता. त्यानंतर आम्ही चेंबूर महिला समाज जिथे केवळ तसेच मुलींसाठी कामगार नगर, कुर्ला येथे मुलामुलींसाठी (Boys and Girls) पवनपुत्र व्यायाम मंदिराच्या नवीन शाखा उघडल्या. इथे जिम्नॅस्टिक्सचे प्रशिक्षण दिले जात आहे. ॲडव्होकेट शरद भोसले, देवदत्त म्हात्रे, डॉ. सुनील हरुळकर डॉ. सौ. सुषमा आणि तारळकर यांसारख्या रोटेरियन आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले आहे ज्याची आठवण करणे फार महत्त्वाचे आहे. ॲडव्होकेट शरद भोसले आजही पवनपुत्र व्यायाम मंदिराशी जोडलेले आहेत आणि आजही 'जिम्नॅस्टिक्स' या खेळासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत!

२०१० मध्ये दिल्लीमध्ये जेव्हा कॉमनवेल्थ गेम्स (Commonwealth Games) झाले तेव्हा मी माझ्या टीमसोबत उत्साहाने सहभागी झालो होतो. माझे वडील शारीरिकदृष्ट्या आमच्यासोबत नव्हते, परंतु त्यांच्या आशीर्वादाने आम्ही पवनपुत्रच्या उपक्रमांना पुढे नेत राहिलो. त्यांनी लावलेले रोपटे, ज्याला श्री पवनपुत्र म्हणतात, त्याचे आता वटवृक्षात रूपांतर झालेले आहे जे पाहायला ते नाहीत याविषयीचे कधी कधी दुःख वाटतेच. इथे मला एक कोट (Quote) उद्धृत करायला आवडेल जे क्लेरेन्स बडिंग्टन केलँड यांचे आहे.

"My Father didn't tell me how to live. He lived and let me watch him do it."

उन्हाळा-हिवाळा-पावसाळा सहनशीलतेने सहन केला आहे. आज वडीलकीच्या नात्याने मी तुम्हाला एक मौलिक संदेश देणार आहे जो तुमच्या आयुष्यात तुम्हाला खूप महत्त्वाचा ठरणार आहे आणि तो संदेश म्हणजे आयुष्यातील कोणताही क्षण वाया घालवू नका. जीवन पूर्णत्वाने जगण्यासाठी, प्रत्येकाने एक छंद (Hobby) निश्चितपणे जोपासली पाहिजे. मी माझ्या खेळाला आयुष्याचा अविभाज्य भाग कधी आणि कसा बनवला, हे मला कधीच कळले नाही. त्यामुळेच आजही माझे आयुष्य निरोगी आहे, ही आनंददायी गोष्ट आहे!

■

१४. देशासाठीचे समर्पण

मी माझ्या देशासाठी काय केले आहे? हा विचार प्रत्येकानेच करण्याची गरज आहे कधी कधी हा विचार माझ्याही मनात येतो. १९५७ च्या सुमारास जेव्हा मी चेंबूर हायस्कूलमध्ये दहावीत शिकत होतो, तेव्हा माझ्या मनात एक विचार आला: देश स्वतंत्र झाला आहे, पण आपण स्वतंत्र भारतासाठी कोणते योगदान दिले आहे आणि भविष्यात आपण नेमकेपणे काय करू शकतो? स्वतंत्र भारतात आपली भूमिका काय असावी? आपण आपल्या देशासाठी वेगळे आणि महत्त्वाचे असे काही करू शकतो का? परंतु माझे संपूर्ण आयुष्य मी खेळासाठी समर्पित केले होते त्यामुळे खेळाच्या अनुषंगाने देशासाठी काय करू शकतो याचा विचार मी सुरू केला. मी हजारो विद्यार्थ्यांना खेळासाठी प्रोत्साहन देत गेलो आणि देशासाठी सुदृढ नागरिक घडवत गेलो. एक क्रीडा कार्यकर्ता या नात्याने माझे संपूर्ण आयुष्य खेळासाठी समर्पित केले होते त्याचा उपयोग अनेकांना झाला. एक नाही तर कमीत कमी चार-पाच पिढ्या मी ते घडवू शकलो आणि घडवत आहे. मुलांना जिम्नॅस्टिक्स शिकवणे हा माझा व्यवसाय कधीच नव्हता परंतु छंद मात्र नक्कीच होता. पैसे कमवण्याऐवजी आम्ही विद्यार्थ्यी कमवले! त्यांना क्रीडाकौशल्ये शिकवली आणि त्यांना खेळात तज्ज्ञ बनवले. आम्ही देशाला

प्रसिद्ध खेळाडू दिलेत आणि हजारो विद्यार्थ्यांना खेळायला नेहमीच प्रेरित करीत राहिलो. पन्नासच्या दशकातील जब खेलेगा इंडिया तभी तो बढेगा इंडिया! हे घोषवाक्य आम्ही केवळ घोषणा देण्यासाठी वापरले नाही तर ते पूर्णपणे साकारले. माझ्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून, मी देखील आयुष्यभर माझे सामाजिक कर्तव्य पार पाडले याचा आज आनंद आहे. मी आर्थिकदृष्ट्या श्रीमंत नव्हतो परंतु मी माझ्या कृतीतून श्रीमंत झालो! म्हणूनच आजही मला माझ्या आयुष्यात कधीही कोणत्याही गोष्टीचा पश्चात्ताप झाला नाही आणि भविष्यातही होणार नाही याची मला खात्री वाटते. माझ्या संपूर्ण आयुष्यात, मी माझ्या क्षमतेनुसार क्रीडा मोहिमेला चालना देत राहिलो आहे. मी जवळजवळ वीस हजार (क्रीडा) खेळाडू दिले. हे काम म्हणजे मी राष्ट्रसेवा केली असे मला तरी माझ्या पातळीवर वाटते!

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शेकडो खेळाडू आणि प्रशिक्षकांना आम्ही प्रशिक्षण दिले आहे ज्यांनी स्वतःचे आणि देशाचे नाव उंचावले आहे. अजूनही त्यांचे हे कार्य चालूच आहे. एका साध्या शिक्षकाकडे यापेक्षा मोठी संपत्ती कोणती असू शकते? मला कधीही काळजी वाटली नाही की मला त्या बदल्यात काही प्राप्त झाले की नाही. विद्यार्थ्यांनी त्यांच्या उपक्रमांद्वारे मला इतका अपार आदर दिला आहे की हीच मी माझी संपत्ती समजतो. माझ्या आयुष्याच्या या टप्प्यावर मी पूर्णपणे समाधानी आहे. पैशाच्या लोभाने मला कधीही भरकटवले नाही. मला कधीही कोणत्याही प्रकारच्या व्यसनाचा स्पर्श झालेला नाही. या सर्व उपक्रमांची विजया साक्षीदार होती. आता तुमच्यासमोर प्रश्न निर्माण झाला असेल की ही 'विजया' कोण?

■

१५. अर्धांगिनी : विजया

माझ्या प्रत्येक अंतर्मनापर्यंत खेळ आणि फक्त खेळच खोलवर रुजलेला होता. मी नेहमीच माझ्या हृदयात आणि मनात खेळाचेच स्वप्न पाहिले होते. इतक्या दीर्घ आयुष्यात, इतक्या घटना आणि आठवणी माझ्या मनात साठल्या आहेत की त्या तपशीलवार सांगणे मला या वयात तरी अशक्य वाटते. तरीही त्या सर्वांचा मला जसा आठव आहे तसा मी उल्लेख करणे क्रमप्राप्त समजतो. मी सुरुवातीलाच नमूद केले होते की मी लेखक नाही तर एक खेळाडू आहे. माझ्या आयुष्यातील पहिले प्रेम खेळ होते जे आजही आहे! खेळात रमणे, खेळाविषयी विचार करणे यापलीकडे माझे आयुष्य नव्हते. म्हणूनच जेव्हा जेव्हा मला इच्छा होईल तेव्हा त्याच मधुर आठवणींना पुन्हा उजाळा देण्याचा हा माझा प्रयत्न आहे.

माझ्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनेकडे तुम्हाला सरळ घेऊन जातो. मला का कुणास ठाऊक पण या क्षणी माझ्या साखरपुडाच्या आणि लग्नाच्या आठवणी दाटून येत आहेत.

मागच्या प्रकरणात मी विजयाबद्दल लिहिले परंतु तुम्हाला प्रश्न पडू शकतो की ही विजया कोण आहे? विजया म्हणजेच माझी अर्धांगिनी जिला माझी जीवनसाथीही म्हणता येईल! विजया ही मूळची दादरची रहिवासी

होती आणि आमच्या घराण्याचा विजयाच्या घराण्याशी नातेवाईक म्हणून पूर्वपरिचय होता. त्यामुळेच आमचा विवाह परस्परांच्या संमतीने तसेच आमच्या कुटुंबांच्या संमतीने झाला होता. आमचा विवाह ठरला तेव्हा ती तिचे एलएलएम (LLM) करत होती. बॉम्बे पोर्ट ट्रस्ट (BPT) मध्ये तिची नोकरीही चालू होती. आमच्या लग्नाविषयीची एक मजेदार गोष्ट मी तुम्हाला सांगतो. माझ्या नोकरीव्यतिरिक्त मी चेंबूर हायस्कूल माजी विद्यार्थी संघटना, श्री पवनपुत्र व्यायामशाळा, जिम्नॅस्टिक्स असोसिएशन आणि प्रशिक्षक अशा अनेक जबाबदाऱ्या एकाच वेळेस पूर्ण क्षमतेने सांभाळत होतो. हे सगळे एक हाती सांभाळताना मी लग्नाची नवीन जबाबदारी सांभाळू शकेल का? याबाबत ते थोडे साशंक होते परंतु लग्न हे माझ्या आयुष्यातील महत्त्वाचे पर्व होते.

त्या पर्वाचा प्रवेश माझ्या आयुष्यात कसा झाला? याविषयीचा किस्सा सांगतो. डिसेंबर-जानेवारी १९७६-७७ चे होते. चेंबूर हायस्कूलमध्ये शालेय वार्षिक क्रीडा महोत्सव आयोजित केला जात होता. त्यासाठी मार्गिका (Track) बनवण्याचे काम सुरू होते. विद्यार्थ्यांशिवाय मला मदत करणारे कोणीही नव्हते. ते काम कठीण असल्यामुळे सहसा त्यापासून इतर माणसे दूर पळण्याच्या प्रयत्नातच होती. मला अशा कामांची सवय झालेली होती आणि कामाच्या वेळेस आसपासच्या माणसांच्या मानसिकतेचीही! एके दिवशी मी क्रीडा महोत्सवाची तयारी करण्यासाठी मैदानावर चुन्याने ट्रॅक आखत होतो २०० मीटरचा ट्रॅक आखायचा होता आणि उशीर होत होता. मला जेवणासाठी घरी जावे लागणार होते. त्याच संध्याकाळी स्पर्धा होणार होत्या. गावठाणमधल्या पंडित सरांना माझे असे इतक्या दूर घरी जाणे पटले नाही. त्यांचे घर निश्चितपणे माझ्या घरापेक्षा जवळ होते. त्यामुळे त्यांनी मला जेवणासाठी घरी नेले. संध्याकाळी उशिरा स्पर्धा संपल्या तेव्हा मी घरी परतलो. घरात पोहोचल्यावर मला कळले की एक माणूस दिवसभर माझी वाट पाहत होता!

माझ्या घरापासून अगदी थोड्या अंतरावर एका विहिरीजवळ सुबोधचे आजोळ होते. दादरहून आलेले सुबोधचे वडील सकाळपासून माझी वाट पाहत होते. मला भेटल्यानंतरही माझे वडील आणि ते बराच वेळ गप्पा मारत होते. मे महिन्यात शाळेच्या सुट्ट्या सुरू होतात हे माहीत असल्यामुळे

त्या दोघांनी माझा आणि विजयाचा साखरपुड्याचा आणि त्यानंतर सुट्ट्यांच्या काळात लग्नाचा निर्णय घेतला.

लग्नाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या माझ्या क्षमतेबद्दल माझ्या वडिलांना शंका होतीच! तरीही घरात घणाघाती चर्चा होऊन शेवटी माझ्या लग्नाच्या मुहूर्तावर शिक्कामोर्तब झाले. जानेवारी १९७७ मध्ये माझा विजयाशी साखरपुडा झाला आणि आम्ही मे १९७७ आमच्या दोघांचे दोनाचे चार हात झाले. देव्हारे कुटुंब दिवंगत भाऊराव चेंबूरकर यांचे नातेवाईक होते. आंब्रेबाई ही त्यांची बहीण जी एक सामाजिक कार्यकर्ती होती. त्यावेळी लग्न बहुतेकदा नातलगांमध्येच होत असत. लग्नाच्या बाबतीत मी स्वतःही थोडासा साशंक होतोच. लग्नाविषयी मनात उकळ्या फुटत होत्या परंतु आपण दुसऱ्या घरातून आलेल्या या मुलीला आपल्या व्यस्त कामातून वेळ देऊ शकू का? न्याय देऊ शकू का? याच विचारात होतो. माझ्या आणि माझ्या वडिलांच्या मनातील शंकाकुशंकांना मार्गी लावत शेवटी माझ्या लग्नाची सुपारी फुटली आणि १ मे १९७७ रोजी माझे लग्न एकदाचे पार पडले.

चेंबूर येथील आमच्या श्री मल्हार निवासस्थानी लक्ष्मीच्या पावलांनी तांदूळ भरले माप ओलांडत विजयाचा माझ्या जीवनात आणि आमच्या घरात प्रवेश झाला. माझे जीवन नव्याने सुरू झाले. माझ्या जीवनाची 'नाव' जी क्रीडाक्षेत्रातील महासागरात डुगडुगत होती ती आता स्थिर झाली होती. तिला दिशा मिळाली होती. खरंतर, मला माझ्या जीवनाचा एक उद्देश गवसला होता. खरे सांगायचे तर विजयाने माझ्या आयुष्यातील गुंतागुंत समजून घेऊन मला त्यातून अलगद सोडवले. माझ्या सामाजिक जबाबदाऱ्याचे ओझे सहजपणे आपल्या खांद्यावर पेलून मला मोकळे केले. लग्नानंतर दोनाचे चार हात होणे म्हणजे काय?, याचा खऱ्या अर्थाने प्रत्यय आला.

लग्नानंतर सर्वसामान्य जोडप्यांप्रमाणे विजया आणि माझे एक नवीन सहजीवन सुरू झाले. तिला माझ्या खेळाच्या आवडीबद्दल आधीच माहिती होती. माझे वडीलदेखील एक क्रीडा गुरू होते आणि माझ्या आईला त्याची सवय झालेली होती, त्याचप्रमाणे विजयालाही याची सवय झाली. एकंदरीत, असे म्हणता येईल की कुटुंबातील प्रत्येकजण खेळातच अंतर्बाह्य रममाण होऊन गेलेला होता. विजया घर, कुटुंब आणि नोकरीच्या जबाबदाऱ्या

सांभाळताना, माझ्यासोबत क्रीडा उपक्रमांमध्येही रस घेऊ लागली. ती जवळजवळ प्रत्येक कार्यक्रमात माझ्यासोबत असायची. इतकेच नाही तर राष्ट्रीय स्पर्धांना आम्ही जेव्हा जायचो तेव्हा अगदी रेल्वेची तिकिटे मिळवण्यासाठी ती तासनतास अनेक वेळा आनंदाने रांगेत उभी राहिली. तिचा हा उत्साह वाखाणण्याजोगा होता. हे सगळे आठवल्यावर आजही मला तिचा अभिमान वाटतोय. आम्ही दोघांनीही पवनपुत्र आणि इतर जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी खांद्याला खांदा लावून काम केले. कालांतराने आमचे नाते, पती-पत्नी इतके मर्यादित न राहता मित्रमैत्रिणींइतके निखळ आणि व्यापक झाले होते. खरा जीवनसाथी तोच असतो ज्याच्याशी तन-मन-धन या पलीकडे जाऊन एकमेकांच्या आत्म्याचे मिलन होते. एकमेकांच्या नजरेत आमच्यातील दोष जणू लुप्त झाल्यासारखे होते. त्यामुळेच आमच्यातील नात्याचे आकाश अगदी निरभ्र होते.

त्या दिवसाच्या आठवणी अजूनही ताज्या आहेत ज्या लख्खपणे डोळ्यासमोर सरकतात. में महिन्याच्या सुट्टीतला जिम्नॅस्टिक्स कॅम्प सुरू झाला होता. आमच्या लग्नाला फक्त दोन दिवस झाले होते. आमच्या लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी माझा शिष्य किरण वेसावकर, त्याच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे मला सकाळी लवकर उठवायला आला यावर विजया मनापासून हसली. हळूहळू तिला या सगळ्या गोष्टींची सवय झाली आणि तिने माझ्या आयुष्यातील सर्व गोष्टी जशा आहेत तशा स्वीकारल्या!

ती माझ्या जीवनात आली आणि अशी काही समरस झाली की तिला स्वतःचे वेगळे अस्तित्व उरलेच नाही! माझी खेळाची आवड बघून तिलाही हळूहळू खेळाबाबत रुची निर्माण झाली. याचा आम्हा दोघांनाही खूप फायदा झाला कारण माझ्या व्यायामशाळेतील खेळाच्या बाबतीतील वेगवेगळ्या आणि महत्त्वाच्या जबाबदाऱ्या तिने स्वीकारायला सुरुवात केली. मी नसलो तरी तिने कधीही कोणत्याही गोष्टीची कोणालाही कमतरता जाणवू दिली नाही त्यामुळे अत्यंत मोकळेपणाने मी माझे बाहेरचे काही व्याप उत्तमरीत्या सांभाळू शकलो! एकत्र आव्हानांना सामोरे गेलो आणि यश-अपयश एकत्रितपणे समजून घेऊन त्यावर तोडगे काढत राहिलो. पती-पत्नीच्या नात्यामध्ये दोघांनीही एकमेकांना सहकार्य करणे जितके जरूरी

असते तितकेच एकमेकांसाठी काही तत्त्वांवरही तडजोड करणेही आवश्यक असते. हे पुस्तकातले ज्ञान आम्ही आमच्या संसारात पाळत राहिलो आणि त्यामुळेच आमचे नाते आमच्या दृष्टीने तरी आदर्शवत होते, असे आमच्या दीर्घ सहवासानंतर निश्चितपणे अधोरेखित करू शकतो!

■

नानांचे आजोबा
हरिराम पांडुरंग पाठारे



नानांच्या गुरुस्थानी
असणारे पंत सर

रामनाथ हरिराम पाठारे व सौ. गुलाब रामनाथ पाठारे
(नानांचे आईवडील)

नानांचे मित्रवर्य
व्यंगचित्रकार सुरेश लोटलीकर

नानांचे वर्गमित्र
लेखक गोविंद कुलकर्णी

ॲड. भोसले, प्रकाश रेवाळे व शिवा शिंदे (प्रशिक्षक)

आत्मचरित्र शब्दांकन करणारी नानांची विद्यार्थिनी
लेखिका प्रा. प्रतिभा सराफ

नानांचे शिक्षण झाले ते खालसा महाविद्यालय मैदान – तरुण टीमसोबत



नाना आणि
पै सरांचा विद्यार्थी
मनोज मोरे
(शिवछत्रपती
पुरस्कारासोबत)

श्री पवनपुत्र (चेंबूर, गावठाण)



नानांचा विद्यार्थी महेंद्र चेंबूरकर पोमेल हॉर्सवर

सुहास लोहार
(मल्लखांब राष्ट्रीय सुवर्ण पदक विजेता)

एक पिरॅमिड (मल्लखांबासह)
चेंबूर महिला समाज प्रांगण



विदेशयात्रा (अमेरिका)
सुहास पाठारे आणि विजया सुहास पाठारे

पूर्ण चांदीच्या ढाली – निमंत्रित राज्य स्पर्धा (मल्लखांब/जिम्नॅस्टिक्ससाठी)

नानांची विद्यार्थिनी
राजेश्वरी पिल्लई–नायर

श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराच्या विद्यार्थ्यांना
मार्गदर्शन करताना नाना



शिवछत्रपती पुरस्कार विजेती
नानांची विद्यार्थिनी
मंजुश्री चिवटे

एका निवांत क्षणी सुहास पाठारे आणि विजया पाठारे

नानांचा
राज्यपालांतर्फे सत्कार
(चेंबूर हायस्कूल)

चेंबूर हायस्कूल
शिक्षकगण

अर्जुन ॲवॉर्ड स्वीकारताना (१९९२)
संजीवन भास्करन

नेहरू नगर ज्येष्ठ नागरिक मंडळ, कुर्ला (पूर्व)











स्वातंत्र्यसैनिक
रामनाथ हरिराम पाठारे
यांना मिळालेला ताम्रपट

स्वातंत्र्यसैनिक
रामनाथ हरिराम पाठारे

ब्रिटिशकाळात
स्वातंत्र्यसैनिक
रामनाथ हरिराम पाठारे यांना
विसापूर जिल्हा खुले कारागृहात
ठेवण्यात आले होते
त्या ठिकाणी नानांनी
अलिकडेच भेट दिली.



वांद्रे मैदान

शिशुवत शाळा

गोलकिपर कोच

घाटकोपर फुटबॉल मैदान



नाशिक फुटबॉल मैदान

एकता कल्चरल अकादमीमध्ये
नानांचा सत्कार

एक पिरॅमिड



नानांचा मित्रपरिवार आणि विद्यार्थी

१६. कुर्ला, तुर्भे, माहुल, मानखुर्द आणि चेंबूर क्षेत्र, डोंबिवली, विलेपारले

कुर्ला ते मानखुर्द हा परिसर तेव्हा ग्रामीण भाग मानला जायचा. तेव्हा आमच्या चेंबूरची गणनाही एका छोट्या गावातच व्हायची. माझे जन्मगाव आणि माझे कार्यक्षेत्र म्हणून मला या परिसराबद्दल तसेच या परिसराच्या विकासाबद्दल सांगताना माझा अभिमानाने उर भरून येत आहे!

मुख्य मुंबईच्या पूर्वेला असलेले चेंबूर जिथे वस्ती असते, तिथे गाव असते या तत्त्वावर वसलेले होते. चेंबूरभोवती पूर्वी अनेक खाड्या होत्या. वस्तीच्या सभोवताली खाड्या होत्या. खाडीत भरपूर प्रमाणात मासे मिळायचे त्यामुळे मासेमारी हा त्यांचा व्यवसाय असे. हळूहळू चेंबूरची लोकसंख्या वाढत गेली. वाढत्या लोकसंख्येमुळे जागेची अडचण भासू लागली आणि माणसांनी खाड्या बुजवून तिथे वस्ती करायला सुरुवात केली. चेंबूर येथील जुने रहिवासी या भागाच्या कधी कधी आठवणी सांगतात की खाडीत चिंबोरी नावाचे खेकडे मुबलक प्रमाणात मिळत होते. 'चिंबोरी' हा शब्द अपभ्रंश झाला आणि कालांतराने या भागाचे 'चेंबूर' झाले. सुरुवातीला या भागात प्रामुख्याने पाचकळशी, आगरी-कोळी, सुतार आणि क्षत्रिय समुदाय छोट्या छोट्या वस्ती करून राहत होते. चेंबूर घनदाट जंगलांनी व्यापलेले होते. जसजसा दिवस मावळायचा तसतसे कोल्हेकुई अगदी जवळून ऐकू

यायची. त्यामुळे कोल्हे वस्तीपर्यंत पोहोचण्याआधीच गावकरी मावळत्या सूर्याच्या साक्षीनेच निद्राधीन व्हायचे. जिथे आगरी समुदाय एकेकाळी भाताची लागवड करत असे, तिथे आता एक गोल्फ क्लब उभारण्यात आले आहे. ब्रिटीशांनी तो भाग बॉम्बे प्रेसिडेन्सी गोल्फ क्लब म्हणून विकसित केलाय. हा गोल्फ क्लब चेंबूरचे वैभव आहे. इथे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गोल्फ सामने आजही खेळले जातात. चेंबूर नाक्याच्या पलीकडे चरई नावाचा एक भाग होता, जो आजही त्याच नावाने ओळखला जातो. चरई या भागात मुबलक गवत फोफावलेले असल्यामुळे गावकरी तेथे त्यांची गुरे चरण्यासाठी घेऊन जायचे. म्हणून चरई हे आपोआपच त्या भागाचे नाव पडले होते. इतक्या मोठ्या प्रमाणात या भागात गवत वाढलेले असल्यामुळे काही गावकरी गवताचा व्यापारही करत होते.

चेंबूर एक उत्तर कोकणातील टुमदार गाव होते. चेंबूरच्या आजूबाजूच्या वस्त्यातील घरे उत्तर कोकणातील घरांसारखी कौलारू होती. अगदी शेणामातीने सारवलेली ही घरे म्हणजे छोटे छोटे वाडेच होते. म्हणूनच आजही चेंबूरमधील जुन्या घरांसमोर कोरड्या विहिरी आणि तुळशी वृंदावन दिसतात. याच काय त्या जुन्या काळच्या तुटपुंज्या आठवणी. चेंबूरच्या आसपासच्या इतर भागात वाडवली, मारवली, माहुल गाव, घाटला, तुर्भे, चेंबूर कॅम्प, अमर महाल, टिळक नगर, सहकार नगर, वाशी नाका, घाटकोपर, गोवंडी, मानखुर्द आणि गव्हाणपाडा यांचा समावेश आहे. आता टिळकनगर म्हणून ओळखला जाणारा परिसर पूर्वी एक खाडी होती. तुर्भे येथून या खाड्यांमधून जहाजे जायची, हे कोणाला सांगूनही खरे वाटणार नाही पण आम्ही ती प्रत्यक्ष पाहिली आहेत! मीठ काढणे आणि मासेमारी करणे हा एक सामान्य व्यवसाय होता. त्याचप्रमाणे खाडीत चक्क मिठागरे होती. मीठ काढणे हा देखील व्यवसाय इथे चालायचा. तिथून बैलगाड्यांमधून मीठ (सगन) आणले जात असे. काही लोक दिवाळीच्या दिवशी पहाटे तिथूनच विकत घ्यायचे.

मुंबईच्या तुलनेत कुर्ला ते मानखुर्द हा परिसर तसा ग्रामीण भाग होता. इथे माणसांना सहसा राहायला आवडायचे नाही. हा भाग मागासलेला समजला जायचा. त्यातही मानखुर्दमध्ये एक मोठे डंपिंग ग्राउंड होते, जिथे संपूर्ण शहराचा कचरा टाकला जायचा, जे आजही अस्तित्वात आहे.

त्यामुळे तेव्हाही या प्रदूषणयुक्त भागात राहण्यासाठी माणसे नाक मुरडायची. त्यावेळी या भागातून वाहतूकतीची पुरेशी साधने नव्हती. मध्य रेल्वे बोरीबंदर (सी.एस.एम.टी.) ते कुर्ल्यापर्यंत नियमितपणे धावत असे. तथापि, १९२५-२६ मध्ये कुर्ला ते मानखुर्द ही दोन डब्यांची ट्रेन दिवसातून फक्त दोनदाच धावत असे, तेवढाच काय तो चेंबूरकरांना दिलासा होता. आता, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेल पर्यंत बारा डब्यांची लोकल ट्रेन दिवसभर सतत धावत असते, याचा आनंद आहे. त्यावेळी कुर्ला स्टेशननंतर चेंबूर स्टेशन होते, त्यानंतर गोवंडी आणि मानखुर्द. शेवटची ट्रेन चुकली तर लोक कुर्ला ते चेंबूर रेल्वे रुळांवरून चालत प्रवास करायचे. कुर्ला ते मानखुर्द रेल्वे रुळांच्या दोन्ही बाजूला झोपडपट्ट्यांचे जाळे वाढत होते. झोपडपट्टीतील माणसे आपल्या दारासमोरच्या रेल्वेरुळाच्या आसपास पालेभाज्यांची लागवड करायचे.

डॉ. एच.डी. पाटील नावाचे एक प्रसिद्ध डॉक्टर चेंबूर सांडूवाडीजवळ राहयचे, ते दिवसातून अठरा तास काम करायचे. गरिबांची सेवा करायचे. असे म्हटले जाते की लोकांचे आजार त्यांच्या हाताच्या स्पर्शाने बरे व्हायचे हा त्यांचा हातगुण प्रसिद्ध होता. चेंबूरवासीयांनी त्यांना देवत्व प्रदान केले होते. आज ते नाहीत परंतु त्यांची मुलगी डॉ. अमिता पाटील यांनी आपल्या वडिलांचा वसा पुढे चालू ठेवला आहे. आजही या दवाखान्यात जाताना रुग्ण पाटील डॉक्टरांकडे जातोय, असेच म्हणतात! १९२९ मध्ये एका श्रीमंत माणसाने चेंबूर नाक्याजवळ शेठ द्वारकादास त्रिभुवनदास धर्मादाय दवाखाना बांधला होता. गरिबांना त्याचा मोठा आधार वाटायचा.

भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी, चेंबूरमधील मराठी माध्यमाची मुले कुर्ला, सायन आणि दादर भागात शाळेत जायची. त्यावेळी चेंबूरमध्ये विविध प्रकारची झाडे, फळबागा आणि मुख्य म्हणजे मोठ्या प्रमाणात फुलांच्या बागा होत्या. मुलांना अगदी घराजवळच्या बागेतून खालीपर्यंत लटकणारे आंबे स्वतः तोडून आरामात खाता यायचे! आताच्या चेंबूर पोस्ट ऑफिसजवळ सांडू गार्डन होते, जे आजही आहे. सांडू कुटुंबाचा तिथे आयुर्वेदिक औषधाचा कारखाना होता. १९५२ मध्ये, एक सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती शांताबाई आंब्रे यांच्या प्रयत्नातून, बागेत किंवा रस्त्यावर शिक्षण घेणाऱ्या गरीब

मुलांसाठी मराठी माध्यमाची बाल विकास प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आली. गणेश उत्सवादरम्यान, चेंबूरमधील प्रत्येक रस्ता आणि परिसर उत्सवाने आणि उत्साहाने गजबजलेला असायचा. चेंबूर हायस्कूल आणि इतर ठिकाणी विविध प्रकारच्या फुलांचे प्रदर्शन भरवले जात होते. चेंबूरमधील हे फुलांचे प्रदर्शन पाहण्यासाठी मुंबईच्या विविध भागातील माणसे नेटाने चेंबूरमध्ये आवर्जून यायची. भाऊ फाटक यांनी अनेक वर्षांपासून चेंबूर हायस्कूलमध्ये फ्लॉवर फेस्टिव्हल आयोजित करण्यात आघाडीची भूमिका बजावली, ही परंपरा मला अजूनही आठवते. फुलांच्या रांगोळ्या पाहण्यासाठी दूरदूरून माणसे यायची. देवनारमध्येही अनेक मुले फुलांच्या रांगोळ्या काढायचे, ज्याचे आकर्षण साऱ्या मुंबईकरांनाच होते. हे फुलांचे उत्सव आणि रांगोळी प्रदर्शने निशुल्क असायची. त्यांचे कला, कौशल्य आणि कठोर परिश्रम खरोखरी वाखाण्याजागे होते या सर्वांचा मी साक्षी आहे. दुर्दैवाने, आज त्या फुलांच्या बागा नाहीशा झाल्या आहेत आणि तिथे दाट वस्त्या झाल्या आहेत. आता स्थानिकांनाही चेंबूरबाहेर जाऊन फुले खरेदी करावी लागतात. शहरीकरण आणि फ्लॅट संस्कृतीमुळे सण, उत्सव, मिरवणुका, शोभायात्रा, विविध प्रदर्शने इत्यादी हळूहळू कमी होत गेले. चेंबूर, माहुल आणि देवनार येथील एकेकाळचे वैभव नष्ट झाले हिरवाईनी नटलेली जंगले नाहीशी झाली. एकेकाळी नजरेच्या टप्प्यापर्यंत हिरवेगार असलेले चेंबूर आमच्या डोळ्यांसमोर एका प्रदूषित उपनगरात रूपांतरित झाले, ज्याचा कधी विचारही मनात आला नव्हता. एकेकाळी हा परिसर गवताळ प्रदेश होता. या भागात देवदार वृक्ष, नारळ-पोफळी, वड-पिंपळ, चिंचा- बोरं-करवंदाच्या फळांची समृद्धी होती हे कोणाला सांगूनही पटणार नाही!

हिरवाईने नटलेले चेंबूर हे चिमण्या, कबूतर, कोकिळा, पोपट आणि कावळे यांसारख्या पक्ष्यांचे माहेरघर होते. हळूहळू चेंबूरच्या आसपासची वस्ती वाढू लागली आणि चेंबूरलगत असलेल्या गोवंडी परिसरात मोठ्या प्रमाणात माणसे वस्ती करून राहू लागली.

त्या काळात मोठ्या प्रमाणात गरिबी असल्यामुळे मुंबईत भिकाऱ्यांची संख्या जास्त होती. १९४५ मध्ये ब्रिटिशांनी चेंबूरमध्ये ३६ एकर जमीन खास तुरुंगासाठी राखीव ठेवली होती, जिथे भिक्षेकरी गृह (Beggar'r Home)

बांधण्यात आले होते. या संस्थेचा प्राथमिक उद्देश भिकाऱ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून देणे, हा होता. त्यांना सुतार काम, लोहार काम, शिवणकाम याबरोबर शेती कामही शिकवले जायचे. इथे पीठ गिरण्याही होत्या. या भिकाऱ्यांना ज्या व्यवसायात रुची आहे ते शिकवले जायचे जेणेकरून ते बाहेर गेल्यावर स्वतःच्या पायावर उभे राहून पैसा कमवू शकतील आणि त्यांचे भीक मागणे कायमस्वरूपी बंद होईल, असा सरकारचा विचार होता. या संकुलात वेश्याव्यवसायात गुंतलेल्या महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी स्थापन केलेले नवजीवन महिला वसतिगृह होते. सरकारी अखत्यारीत या संस्थांचे कारभार चालायचे. कालांतराने या सर्व संस्था बंद पडल्या आहेत परंतु त्यांच्या खुणा आजही दिसतात.

चेंबूर हळूहळू विकसित होत होते. म्हणूनच बदलत्या काळाची गरज ओळखून, सहाय्यक पोलिस आयुक्त प्रभाकर मोकाशी यांच्या प्रयत्नांनी, चेंबूर महिला समाज या चेंबूरमध्ये स्थापन झालेल्या संस्थेने चेंबूर स्टेशनजवळच काम करणाऱ्या महिलांसाठी पहिले वसतिगृह (Working Woman'r Hostel) स्थापन केले. मला हे सांगायला आवडेल की आजही ते चालू आहे. गाव खेड्यातून मुंबईत नोकरी निमित्त आलेल्या महिला इथे सुरक्षितपणे राहू शकतात. नीला करकरे यांच्या प्रयत्नांनी टिळकनगर स्टेशनजवळ आणखी एक महिला वसतिगृह बांधण्यात आले.

या विकासाचाच एक भाग म्हणून चेंबूरमध्ये HPCL, BPCL नावाच्या तेल कंपन्या स्थापन करण्यात आल्या. राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझरची (RCF) स्थापना झाली. आजही या कंपन्या चेंबूरमध्ये आहेत. या विकासानंतर चेंबूरला गॅस चेंबर (Gas Chamber) म्हणून ओळखले जाऊ लागले. प्रदूषणाचा स्तर उंचावला जात होता. उच्चभ्रू वर्गातील माणसे येथे राहण्यास कचरत होते. येथे एक टेकडी होती, ज्याची माती लाल होती, म्हणून त्या भागाला लाल डोंगर असे म्हटले जायचे. हा परिसर अजूनही अस्तित्वात आहे, परंतु ती टेकडी मात्र अस्तित्वात नाही. दाटीवाटीने असलेल्या झोपड्यांमुळे एका रात्री ही टेकडी कोसळली. त्याखाली असंख्य माणसे गाढली गेली. चेंबूरच्या या लाल डोंगराला छोटी मलबार टेकडी (Little Malbar Hill) असे गमतीने म्हणायचे.

चेंबूरमध्ये सरकार लोकवस्तीसाठी मोहीम राबवत होते. जुन्या रीतिरिवाजांनुसार गाव वसवण्यापूर्वी मंदिरे किंवा इतर धार्मिक स्थळे बांधली जायची. चेंबूरमध्येही सर्व जातीधर्मांसाठीची प्रार्थनास्थळे आहेत. आणिक गावात शंकर मंदिर आहे. चेंबूर नाका येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर आणि चेंबूर स्टेशनजवळ भुलिंगेश्वर मंदिर (देऊळवाडी) अशी काही हिंदूंची पार्थनास्थळेही आहेत. लोकसंख्या वाढवण्यासाठी ब्रिटिशांनी मारवली चर्च बांधले आणि त्याभोवती मोठ्या संख्येने ख्रिश्चन स्थायिक झाले. पेस्तमसागर आणि छेडानगर परिसर विकसित होत असताना, मोठ्या संख्येने दक्षिण भारतीय तेथे राहायला आले. परिणामी कार्तिकेय मंदिर, अहोबिला मठ आणि शृंगेरी मठ बांधले गेले. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा अजूनही स्टेशनजवळील आंबेडकर पार्कमध्ये आहे, ज्याच्यासमोर बुद्ध विहार आहे. चेंबूरमध्ये मुस्लिम समाजाच्या बांधवांसाठी बांधलेले जामा मशीद तसेच जैन समाजाच्या बांधवांसाठी बांधलेले जैन मंदिरदेखील आहे. दुसऱ्या महायुद्धात सैनिकांसाठी बांधलेल्या बॅरेक्स कालांतराने जीर्ण झाल्या. फाळणीनंतर, पाकिस्तानातून आलेल्या सिंधी निर्वासितांसाठी चेंबूर कॅम्प म्हणून ओळखली जाणारी सिंधी वसाहत विकसित करण्यात आली. चिता कॅम्प ही तेव्हा आणि आजही गरिबांसाठीची वस्ती म्हणूनच ओळखली जाते.

चेंबूर आणि गोवंडी दरम्यान असलेले घाटला गाव मुंबईची बाग (Garden of Bombay) म्हणून ओळखले जायचे. त्या भागातील बागेतील फुले मुंबईच्या विविध भागात मोठ्या प्रमाणात निर्यात केली जायची. माहुल आणि तुर्भेच्या दरम्यान सुमारे सहा मैलांच्या परिसरात फुलांची लागवड केली जात होती.

या भागातील जमीन सुपीक असल्याने गावकरी फळे, फुले आणि भाज्यांची मोठ्या प्रमाणात लागवड करायचे. चेंबूर हे आजूबाजूच्या बारा गावांमधील मध्यवर्ती क्षेत्र होते. तुर्भे बेट (Island) हे त्यावेळी मुंबईचे एक अविकसित उपनगर होते. मुख्य मुंबई शहराची सीमा सायन पर्यंत निश्चित करण्यात आली होती जी आजही अस्तित्वात आहे. त्या पलीकडे कुर्ला, चुनाभट्टी आणि चेंबूर होते. पश्चिमेला, ही सीमा माहीम-वांद्रेपर्यंत पसरली

होती, जी आजही अस्तित्वात आहे. सायन रस्त्यामार्गे चेंबूर नाक्याला जोडलेले होते. चेंबूर नाक्यापासून पूर्व आणि दक्षिणेकडे जाणारे दोन रस्ते होते. पूर्वेला गोवंडी, मानखुर्द आणि तुर्भे होते. मानखुर्दमध्ये नौदलाचा तळ स्थापन करण्यात आला. दक्षिणेला माहुल आणि माहुलचा डोंगराळ प्रदेश होता, जो जंगलांनी वेढलेला होता. येथील छोटेमोठे डोंगर आणि जंगले एकेकाळी कोल्हे, वाघ आणि बिबट्या यांसारख्या नरभक्षक प्राण्यांचा आधिवास होते, जिथे आता तेल शुद्धीकरण कारखाना आहे. त्याभोवती रिफायनरी आणि आरसीएफ कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या वसाहती दिसून येतात. थोडक्यात, त्यावेळचे चेंबूर आणि आजचे चेंबूर याच्यात जमीन आसमानाचा फरक दिसून येतो. १९७० च्या दशकापर्यंत चेंबूर पूर्णपणे विकसित झाले होते.

जयंत गायकवाड नावाचा विद्यार्थी आणि त्याचे मित्र जवाहर विद्याभवन शाळेपर्यंत चालत यायचे, हे व्यवस्थित आठवतेय. त्यांना वाटेत बागा लागायच्या. सहाजिकच शाळेतून येता जाता आंबे तोडणे असो किंवा वडाच्या झाडाच्या पारंब्यावर लटकत वेगवेगळे स्टंट करत ते शाळेत येता जातानाही मजा करायचे. त्यांच्या या रोजच्या कृतीमुळे म्हणजे झाडांच्या पारंब्यावर लटकत तीन-चार किमी चालण्यामुळे एक वेगळ्या प्रकारचे साहस करण्याची कला त्यांनी अवगत केली होती. हाच जयंत गायकवाड आर्टिस्टिकमध्ये इतका पारंगत होता की तो त्याच्या वर्गातील अनेक मुलांना झाडांवर लटकत सॉमरसॉल्ट आणि बॅक सॉमरसॉल्ट सारखे ॲक्रोबॅटिक्स शिकवत असे. तो असले साहस अगदी सहजतेने करत असे. ही मुले कोणत्याही उपकरणाशिवाय रस्त्यावर जिम्नॅस्टिक्सचा सराव करायचे. याच जयंत गायकवाडने शिवछत्रपती पुरस्कार मिळवला, ज्याची आम्ही कधी कल्पनाही केली नव्हती!

एकेकाळी गाव असलेले चेंबूर आता मुंबईचे पूर्णपणे विकसित उपनगर बनले आहे. जॉय हॉस्पिटल, झेन हॉस्पिटल, इनलॅक्स हॉस्पिटल आणि सुराणा-सेठिया हॉस्पिटल तसेच अनेक नर्सिंग होम्स, चोवीस तास सेवा देणारी औषधाची दुकाने, गरिबांसाठी लायन्स क्लब क्लिनिक, रुग्णवाहिका सेवा आणि अगदी पशुवैद्यकीय रुग्णालये यासह अनेक आधुनिक रुग्णालये

आजच्या चेंबूरमध्ये अस्तित्वात आहेत. १९६० आणि १९७० च्या दशकात बांधलेल्या म्हाडा (MHADA) म्हणजेच महाराष्ट्र गृहनिर्माण विकास मंडळ वसाहतींमुळे येथे हळूहळू मध्यमवर्गीय कामगारांची संख्या वाढत गेली. या वाढत्या लोकसंख्येमुळे चेंबूर एक उच्च दर्जाचे उपनगर बनले आहे. १९६२ मध्ये विवेकानंद एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. सामाजिक कार्यकर्ते आणि तत्कालीन महाराष्ट्र राज्यमंत्री हशु अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली हे शक्य झाले. या उपक्रमाद्वारे असंख्य शाळा, महाविद्यालये आणि इतर संस्थांची भरभराट झाली. अणुशक्तीनगर, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, आचार्य-मराठे महाविद्यालय, शाह आणि ॲकर महाविद्यालय, मराठी विज्ञान परिषद, डायमंड गार्डन आणि राज कपूर यांचे आरके स्टुडिओ अशा जवळपासच्या भागांची स्थापना झाल्यामुळे चेंबूरचे महत्त्व हळूहळू वाढत गेले. त्यानंतर अनेक प्रसिद्ध कलाकार, राजकारणी, डॉक्टर आणि अभियंते यांचे जन्मस्थान आणि स्वाभाविकपणे कार्यक्षेत्रही बनत गेले, ही आम्हा चेंबूरकरांसाठी अभिमानाची गोष्ट आहे!

हशू अडवाणी, रामकृष्ण चेंबूरकर, नारायणराव आचार्य, व्ही.एन. पुरव, गुरुदास कामत आणि पार्वती परिहार यांसारख्या असंख्य सामाजिक कार्यकर्त्यांव्यतिरिक्त कला, साहित्य आणि संस्कृतीशी निगडित लेखक, पत्रकार आणि कलाकारांनी चेंबूरच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्या सर्वांची यादी येथे देणे अशक्य आहे, परंतु त्यांचे योगदान अमूल्य होते, हे मात्र इथे नमूद करणे आवश्यक आहे.

■

१७. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील आमचे खेळाडू

श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरने १९८२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धा दिल्ली, २०१० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांपर्यंत (Commonwealth Games) प्रामुख्याने रिदमिक (Rhythemic) जिम्नॅस्टिक्स, आर्टिस्टिक (Artistic) जिम्नॅस्टिक्स या खेळांमध्ये राष्ट्रीय ओळख मिळवली. खेळाडूंनीही असाधारण कामगिरी केली. विविध संघटनांनी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय स्पर्धांमध्येही आमच्या खेळाडूंनी स्वतःचे वेगळेपण दाखवले. संगणकीकरणाचे युग सुरू झाले होते. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान जाणून घेऊन तिथेही आपली उत्कृष्ट कामगिरी बजावली. मुंबईतील अनेक वडीलधाऱ्यांनी तसेच मुंबई महानगर-पालिका आणि शिक्षण विभागाने याला निश्चितच पाठिंबा दिला. आमच्या प्रशिक्षकांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले, ज्यामुळे हे सर्व शक्य झाले; अन्यथा, ते माझ्या स्वतःच्या बळावर शक्य झाले नसते, हे मला प्रामाणिकपणे नमूद करायचे आहे!

श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराला नंतर चार प्रकारचे अनुदान मिळत असे यामध्ये शिक्षण विभाग (बीएमसी), जिल्हा क्रीडा अधिकारी (कांदिवली) आणि महाराष्ट्र क्रीडा संचयालय (पुणे) यांचा समावेश होता. सरकारी निधीमुळे आमचे मनोबल वाढले. या आर्थिक मदतीमुळे व्यायामशाळेच्या इमारतीचे

छप्पर नव्याने उभारण्यात आले ताडपत्रीऐवजी सिमेंट शीटचे स्ट्रक्चर बसवता आले. माझा धाकटा भाऊ अनिल याच्या मदतीने जिम्नॅस्टिक्स आणि व्यायामशाळेसाठी नवीन आधुनिक उपकरणे पुली, मशीन्स नव्याने घडवण्यात आली, ज्याचा विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात उपयोग झाला. राष्ट्रीय स्पर्धांसाठी आधुनिक उपकरणे अत्यंत महत्त्वाची होती. उपकरणे खरेदी करणे, हा एक काळाची पावले ओळखून आम्ही तो प्रयत्न केलेला होता जो सफल झाला. प्रत्येक पालक आपापल्या मुलांच्या विकासाचे स्वप्न पाहतात. एक क्रीडा शिक्षक म्हणून, मी त्यांच्या मुलांची स्वप्ने सत्यात उतरवली. आम्ही पालकांना आणि त्यांच्या मुलांनाही एकत्रितपणे आनंद दिला आणि त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून तेवढाच आनंद आम्हालाही मिळाला. हे सगळे आनंदाने लिहीत असताना माझ्या डोळ्यासमोर काही अपयशसुद्धा भिरभिरत आहेत, परंतु त्याची वाच्यता मी टाळतो. जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याचा दृष्टिकोन माझ्या आई-वडिलांनी मला दिला तोच मी तुम्हापुढे मांडू पाहतो आहे. पवनपुत्राच्या विद्यार्थ्यांनी आणि खेळाडूंनी संस्थेला ज्या उंचीवर नेले आहे ते सगळे क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय आहेत. म्हणूनच माझ्यासमोर यशाच्या पटलाचा एक दीर्घ आलेख आहे जो मी या पुस्तकातून जगापुढे मांडू इच्छित आहे. कोणत्याही समस्या पुस्तकी ज्ञानातून सोडवता येतीलच असे नाही परंतु आपण स्वानुभवातून स्वबळावर सोडवलेल्या समस्या कदाचित हे पुस्तक वाचणाऱ्यांना निश्चितपणे त्यांच्या आयुष्यात आलेल्या समस्या सोडवायला मार्गदर्शक ठरतील, अशी अपेक्षा आहे!

१९८२ मध्ये, मी महाराष्ट्र ॲमॅच्युअर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन (Ammature Gymnastics Association) संघटनेच्या जिम्नॉस्टिक फेडरेशन ऑफ इंडिया (GFI) च्या वतीने MAGA तर्फे दिल्ली येथे झालेल्या जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत महाराष्ट्रीयन संघ स्पर्धेत सहभागी झाला. भारताच्या वतीने एम. डी. गुर्जरांच्या पाच मुलींनी जिम्नॅस्टिक्समध्ये भाग घेतला. पुण्यातील संजीवनी करंदीकर तेव्हा भारतीय संघाच्या कर्णधार होत्या. या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय क्रीडाप्रकारांचा अनुभव देण्यासाठी, त्यांना स्पर्धा पूर्व काळ पाकिस्तान आणि इतर आशियाई देशांमध्ये तसेच रशियाला पाठवण्यात आले होते. तिथे, त्यांनी त्या देशांतील ऑलिंपिक खेळाडूंचे जवळून आणि अभ्यासपूर्ण निरीक्षण

केले होते आणि त्यासंबंधीचा भरपूर अनुभव मिळवला, त्याचे परिणाम दिसू लागले होते. महाराष्ट्र प्रगतीपथावर होता. १९८२ च्या या एशियाडमध्ये श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरच्या खेळाडू मंजुश्री चिवटे आणि महेंद्र चेंबूरकर यांचा समावेश होता. एशियाड स्पर्धेसाठी या स्पर्धेच्या सुमारे दोन वर्ष आधीच त्यांना रशिया आणि इतर देशांमध्ये प्रशिक्षण शिबिरांसाठी पाठवण्यात आले होते, ज्याचा मोठा फायदा त्यांना एशियाड स्पर्धेत झाला. जिम्नॅस्टिक्स या खेळासोबतच मंजुश्री एक अत्यंत हुशार विद्यार्थिनी होती त्यामुळे तिने पदव्युत्तर शिक्षणानंतर पीएचडी (Phd) पूर्ण केली होती. तिने पूर्ण केलेली डॉक्टरेट ही आम्हा समस्त चेंबूरकरांसाठी अभिमानाची गोष्ट होती परंतु ती पदवी तिला तिच्या डोळ्यांनी पाहता आली नाही. १९९२ मध्ये एका रस्त्यावरील अपघातात तिचे दुर्दैवी निधन झाले, जी सगळ्यांसाठीच दुःखद घटना ठरली. तिच्या या मृत्युने चेंबूरवर शोककळा पसरली. तिच्या मृत्यूमुळे जिम्नॅस्टिक्स या खेळाचाही मोठ्या प्रमाणात हानी झाली.

महेंद्र चेंबूरकर हा सुद्धा एक हुशार विद्यार्थी होता. जिम्नॅस्टिक्स या खेळातील प्रगतीबरोबर त्याने आपले पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. मल्लखांबच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत त्याने सुवर्णपदके पटकावली. शिवछत्रपती पुरस्कारही त्याला प्राप्त झाला. त्याच्या या खेळातील गुणांमुळे त्याला रेल्वेत नोकरी लागली. त्यानंतरची त्याची नोकरी कस्टममध्ये होती.

आशियाई खेळांपूर्वी महेंद्रने जिम्नॅस्टिक्समध्ये सातपैकी सहा सुवर्णपदके जिंकून एक विक्रम प्रस्थापित केला. जर्मन प्रशिक्षक स्ट्रुक्स (Strucks) त्याला आंतरराष्ट्रीय खेळाडू म्हणून संघात समाविष्ट करू इच्छित होते, परंतु काही तांत्रिक कारणांमुळे तो संघाचा भाग होऊ शकला नव्हता. जेव्हा आयोजकांना याबद्दल विचारण्यात आले तेव्हा भारतीय आयोजकांनी उत्तर दिले की स्ट्रुक्स त्यांना संघ निवडण्याचा आणि खेळाडूंची अंतिम निवड करण्याचा अधिकार नाही. जेव्हा याबद्दल प्रश्न उपस्थित केले गेले तेव्हा मी स्वतः प्रशिक्षक म्हणून उपस्थित होतो. प.पू. पंत सर, गुर्जर, रामदास कल्याणपूरकर आणि डॉ. सुरेश देशपांडे (अमरावती) हेदेखील त्याप्रसंगी उपस्थित होते. ही आमच्यासाठी एक दुर्दैवी घटना होती. १९६९ मध्ये ओरिएंटेशनचा (प्राथमिक - एनआयएस) अभ्यासक्रम पूर्ण केला. मी अनेक

वेळा खेळाडूंवरील असे अन्याय पाहिले आहेत आणि निमुटपणे सहन केले आहेत, कारण व्यवस्थेसमोर आपण असहाय्य ठरतो! या मुद्द्यांवर वर्तमानपत्रे आणि मराठी मासिकांमध्ये असंख्य लेख प्रकाशित झाले होते, परंतु त्यातून काहीही निष्पन्न होऊ शकले नाही. आज ही एक दुःखद वस्तुस्थिती मांडतानाही मला दुःख होत आहे.

भारतातील बलवान पुरुष (Strong Man of India) मनोज मोरे यासारख्या अनेक विद्यार्थ्यांनी पॉवरलिफ्टिंगमध्ये नाव कमावले. अशोक कदम आणि इतर अनेकांनी परदेशात दुबई इ. दौरे केले. लयबद्ध (Rhythemic) जिम्नॅस्टिक्समध्ये पल्लवी चेंबूरकर, कोमल पाटील, भाग्यश्री राणे आणि जस्मिता म्हात्रे यांनी राष्ट्रीय स्तरावर प्रत्येकी चार सुवर्णपदके जिंकली. ही विजयाची मालिका २००५ पर्यंत चालू राहिली. जिम्नॅस्टिक्समुळे पवनपुत्रमध्ये मल्लखांबची लोकप्रियता कमी होत चालली होती. त्यावेळी मल्लखांबाला राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळत नव्हती. त्यामुळे बहुतांश खेळाडू जिम्नॅस्टिक्सकडे अधिकाधिक आकर्षित होत होते. सागर सावंतने जिम्नॅस्टिक्स आणि मल्लखांब शिकत असताना पॉवरलिफ्टिंगमध्येही करिअर केले. अनिल थोरात यांनी मल्लखांब आणि पॉवरलिफ्टिंगमध्ये स्वतःचे नाव कमावले. चेंबूर आणि छोट्या मोठ्या गावातून आलेले विद्यार्थी आणि बेगर्स होममधील स्टाफच्या विद्यार्थ्यांनाही या खेळांमध्ये रस निर्माण झाला. यानिमित्ताने मला सांगायला आवडेल की बेगर्स होम स्टाफ कॉटर्समध्ये राहणारी, या पुस्तकाची लेखिका प्रतिभा ही अगदी पाचवीत शिकत असल्यापासून पवनपुत्र व्यायाम शाळेत नियमित यायची. अनिल थोरात यांनी बेगर्स होममधील विद्यार्थ्यांशी संपर्क साधला आणि त्यांना क्रीडा उपक्रमांमध्ये सहभागी करून घेतले.

जिम्नॅस्टिक्स हा शब्द ज्यांच्या कानावर पडलेला नव्हता अशा पूर्व ज्ञान नसलेल्या मुलांनाही आम्ही प्रशिक्षण दिले. याचे कारण भविष्यातही चांगले प्रगती करू शकतील असा आम्हाला विश्वास होता. आम्ही प्रोत्साहन दिलेली बरीच मुले खूप चांगल्या प्रकारे यशस्वीही झाल्याचे आमच्या लक्षात आहे.

संदीप जोगळेकर हा मुलगाही मला स्पष्ट आठवतोय. अनेकदा रोमन

रिंगवर तो सराव करायचा. कुठूनतरी काहीतरी पाहून तो रिंगवर डबल बॅक करू लागला. त्यावेळी तो सातवी- आठवीत असावा. त्याच्या धोकादायक कामगिरीने आमच्या अंगावर अक्षरशः भीतीचा काटा उभा राहिला. आम्ही त्याला बोलावले आणि पुन्हा कधीही असे करण्याचा प्रयत्न न करण्याची त्याच्याकडून शपथ वदवून घेतली. ज्याचे कारण आम्हाला माहीत होते परंतु त्याला माहीत नव्हते त्यावेळेस पटियाला राष्ट्रीय खेळांमध्ये अशीच एक डबल बॅकमुळे घटना घडली होती. पंजाब-हरियाणातील एक मुलगा स्पर्धेदरम्यान डबल बॅक करताना पाठीवर पडला आणि त्याला मेनिंजायटीसचा झटका आला. स्पर्धेनंतर दोन दिवसांतच त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याच्या पालकांनी प्रशिक्षकावर खटला दाखल केला. त्याचा परिणाम असा झाला की राज्याच्या संघाला दोन वर्षांपर्यंत कोणी शिक्षक मिळू शकला नव्हता. आमचा प्रयत्न संदीपला अशा भयानक दुखापतीपासून परावृत्त करण्याचा होता.

या काळात, जवाहर विद्या भवनच्या जयंत गायकवाड या विद्यार्थ्याने घवघवीत यश मिळवले आणि शिवछत्रपती पुरस्काराचा तो मानकरी ठरला. या दैदिप्यमान कामगिरीची आम्ही अजिबातच कल्पना केली नव्हती. त्याने त्याच्या खेळाच्या आधारे नोकरीदेखील मिळवली. केवळ नोकरीतच नाही तर शैक्षणिक क्षेत्रातही खेळांवर आधारित विशेष कोटा निश्चित करण्यात आला आहे, ज्याचा फायदा अनेक विद्यार्थी-खेळाडूंना झाला. ही सुविधा आजही सुरू आहे. अनेक खेळाडूंचे शैक्षणिक स्तर मध्यम असले तरी इतर अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या खेळांवर आधारित सरकारी नोकऱ्या मिळवल्या. साने गुरुजी विद्यालय, सांताक्रूझचा एक विद्यार्थी कल्पेश जाधव हा असाच एक सामान्य विद्यार्थी होता जो महानगरपालिकेच्या शाळेत शिकला होता आणि पुढे शिवछत्रपती पुरस्कार विजेताही बनला. नंतर त्यांनी भारतात आणि परदेशात मल्लखांब प्रात्यक्षिक सादर करून स्वतःचे नाव कमावले. आज हा खेळ त्यांच्या उपजीविकेचे साधन बनले आहे हे खरोखरी कौतुकास्पद आहे. म्हणजे हे देवाघरचे देणे या धर्तीवर हे खेळाघरचे देणे म्हणायला काहीच हरकत नाही!

कालांतराने जिम्नॅस्टिक्सची मुळे हळूहळू महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये

पसरली. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये महाराष्ट्र आघाडीवर होता आणि अजूनही आहे, ही खरोखरीच गौरवास्पद गोष्ट आहे! औरंगाबाद, मुंबई आणि सांगली येथे महेंद्र चेंबूरकर, डॉ. मकरंद जोशी (औरंगाबाद) आणि वर्षा उपाध्ये यांनी एरोबिक्स, ॲक्रोबॅटिक्स आणि रिदमिक जिम्नॅस्टिक्सचा प्रचार केला. श्री. पाटील यांनी यशवंत व्यायामशाळा, नाशिक येथे मल्लखांब प्रशिक्षण केंद्र सुरू केले. तेथील मुलांनी या उपक्रमाचे जोरदार स्वागत केले. पवनपुत्रकडे काही तज्ज्ञ आणि हुशार खेळाडू होते ज्यांना एसएससी परीक्षेमुळे एका वर्षासाठी माघार घ्यावी लागली त्यामुळे ते राज्य तसेच राष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकले नाहीत. मला अजूनही याबद्दल वाईट वाटते आहे. आशुतोष पोतनीस आणि महेंद्र चेंबूरकर, चारुता आठल्ये (श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर), श्रावणी वैद्य आणि अनस शेख या नावांचा मी खास उल्लेख करेन जे स्पर्धांदरम्यान जायबंदी झाले. खेळ असो का जीवन, नशिबापुढे कोणाचे काय चालणार? खेळादरम्यान एक खेळाडू अपंग झाली, ज्यामुळे या गरीब खेळाडूचे मोठे नुकसान झाले. तो खेळाडू आणि अक्षय बोरकर आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू बनू शकले असते; एवढी प्रचंड या दोघांकडे क्षमता होती. आजही हे आठवते आणि वाईट वाटते.

परदेशात मुलींना एकाच ठिकाणी नऊ बीम उपलब्ध असतात. हे लक्षात घेता, आपल्याला आपल्या कमतरता जाणवतात. त्या दूर करण्याचे मार्ग आपण शोधले पाहिजेत. ज्याप्रमाणे शाळेच्या वर्गात चाळीस ते साठ विद्यार्थी एकत्र अभ्यास करतात, त्याचप्रमाणे खेळांसाठीही अशीच व्यवस्था आवश्यक आहे. शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातही याचा प्रचार केला पाहिजे. ग्रामीण भागातील विद्यार्थी अधिक उत्साही, शारीरिकदृष्ट्या सक्षम आणि बलवान असतात. दुर्दैवाने त्यांना शहरातील विद्यार्थ्यांसारख्या सर्व सुविधा उपलब्ध नसतात. शहरात आले तर त्यांची प्रगती नक्की होऊ शकते परंतु या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात येणे, खाणे-पिणे-राहणे या गोष्टी आर्थिक आणि सामाजिक स्तरावरून शक्य होत नाहीत. त्यामुळेच ही ग्रामीण मुले इच्छा असूनही प्रगती करू शकत नाहीत. श्री. एस.सी. व्यास यांनी मला रशियन मुलींच्या जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षणावर एक पुस्तक दिले होते ज्याचा आम्ही सदुपयोग केला आणि त्यामुळे मुलींना प्रशिक्षण देताना

मला त्याचा विशेष फायदा झाला.

आम्ही असा प्रयत्न केला की मुलांनाही बुद्धी असते त्यामुळे त्यांनी त्याचा वापर करून खेळ प्रक्रिया आत्मसात करावी!

श्री. मोदीजी (PM) म्हणतात की आम्ही एकशे चाळीस कोटींचा म्हणजे विचारकरत्यांचा देश आहोत! याचा मागोवा घेणे अपेक्षित आहे ते पवनपुत्रने १९८२ पूर्वीपासून अंगीकारले आहे.

या पुस्तकाचा सखोल अभ्यास करून आणि त्यातील महत्त्वाचे घटक आत्मसात करून मंजुश्री चिवटेने फ्लोअर एक्सरसाइजमध्ये (FX) अनेक वर्ष सातत्याने राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदके जिंकली होती. नंतर तिला शिवछत्रपती पुरस्कारदेखील मिळाला. हा खऱ्या अर्थाने तिच्या बुद्धिमत्तेचा आणि समर्पणाचा विजय होता.

चेंबूर हायस्कूलमध्ये हिंदी आणि संगीत शिकवणाऱ्या सुनंदा पंडित नावाच्या शिक्षिका होत्या. फ्लोअर एक्सरसाइज (FX) साठी संगीत आवश्यक बाब आहे. पंडित बाईंच्या घराण्यात संगीताचे क्लासेस घेतले जात असत. व्हायोलिनवर वडील व भावाने मंजुश्रीला सुवर्णपदक मिळविण्याच्या कार्यात खूप मदत केली.

या निमित्ताने मंजुश्री आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सर्व खेळाडूंना सलाम करतो!

महेंद्र चेंबूरकरने १९७९ मध्ये आरसीएएफ (RCF) चेंबूर येथे झालेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत विजय मिळवला होता. कोलकाता येथे झालेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत जिम्नॅस्टिक्समध्ये सातपैकी सहा सुवर्णपदके जिंकून त्याने एक विक्रम प्रस्थापित केला. याआधी तो १९७६ पासून मल्लखांबमधल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होता. त्याला महाराष्ट्र राज्य सरकारचा शिवछत्रपती पुरस्कारही मिळाला होता. इतका अनुभवी खेळाडू असूनही, त्याची फिटनेस पातळी ९०% पेक्षा जास्त असतानाही, त्याला १९८२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी अपात्र (Unfit) घोषित करण्यात आले. जेव्हा मी त्यांना यासंबंधी प्रश्न केला की इतर खेळाडूंनी अशी पूर्ण तयारी होती का? तर त्याचे आम्हाला कोणतेही ठोस उत्तर मिळू शकले नाही. मंजुश्रीबाबतही असेच काहीसे घडले होते. ती राष्ट्रीय खेळाडू होती. इयत्ता

तिसरीपासून पवनपुत्राची विद्यार्थिनी होती. खेदजनक अशा इतरही घटना आहेत, ज्या आजही आठवल्या तरी अस्वस्थ करतात.

थोडासा वेगळ्या विषयाकडे वळतो.

मुलींसाठीची नवीन पद्धती आम्ही अवलंबली, ज्यामध्ये त्यांना प्रत्यक्ष स्पर्श न करता प्रशिक्षण दिले जावे! असे होते. हे खरोखरी आवश्यक होते याची जाणीव ठेवून आम्ही ते त्वरित लागू केले. हे आव्हान कठीण होते तरीसुद्धा आम्ही त्याला स्वीकारले आणि त्या दिशेने काम करू लागलो! कोणत्याही गोष्टीबाबतची सकारात्मकता मला मनापासून आवडते. नीलाक्षी पुरव, मंजुषा सांडू आणि संगीता देसाई यासारख्या मुली आमच्या संस्थेत प्रशिक्षण घेत होत्या. या सर्व मुली नंतर राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू बनल्या. चेंबूरचे नाही तर महाराष्ट्राचे नाव त्यांनी राष्ट्रीय स्तरावर पोहोचवले. महाराष्ट्राला त्यांच्यामुळे मिळालेला गौरव त्यांच्यासाठी आणि एकंदरीतच महाराष्ट्रासाठी अभिनंदनीय बाब आहे.

१९७९ ला आरसीएफ (RCF), चेंबूर येथे भरविलेल्या राष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन जवाहर विद्या भवन, चेंबूर आणि आरसीएफ, चेंबूर तसेच चेंबूर एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने केले होते. जवाहर विद्याभवनचे मुख्याध्यापक भगवंत माधव पंत सरांनी एक हाती जबाबदारी स्वीकारत ते पार पाडले होते. यामुळे सोशल सर्विस लीग, परळ आणि व्यायाम शाळा, परळचे रामदास कल्याणपूरकर नाराज झाले. सर्वांनी एकत्र काम करावे अशी त्यांची इच्छा होती. पंत सरांच्या वागण्याने काही मंडळी नाराज झाली. १९८२ ला आशियाई खेळ दिल्लीत होणार होते आणि त्यासाठी तयारी करावी लागणार होती. तथापि, कल्याणपूरकर यांनी संघटनेच्या सचिवपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर व्यास, लाळे, धोत्रे आणि इतरांनी सोशल सर्व्हिस लीग, परळच्या पाठिंब्याने अमरावती येथील हनुमान प्रसारक मंडळाचे डॉ. सुरेश देशपांडे यांना सचिव आणि मला कोषाध्यक्ष म्हणून नियुक्त केले. काही लोक या निर्णयाशी असहमत होते. पंतसरांना या संस्थेचे अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले. सार्वजनिक संस्थांमध्ये अशा गोष्टी घडतात. त्याला फारसे महत्त्व न देता, आम्ही पुढे जात राहिलो. जे होते ते चांगल्यासाठीच अशा भावनेने काम करत राहिलो. आयुष्यात आलेल्या

बऱ्या वाईट प्रसंगांना हिमतीने जे तोंड देत राहिलो. नकारात्मकतेच्या वादळांना आमच्या पद्धतीने म्हणजेच सकारात्मकतेने थोपावण्याचे काम करत राहिलो. थांबला तो संपला, हे लक्षात घेऊन कुठेही न थांबता पुढे वाटचाल करत राहिलो!

गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धांमध्ये मिळालेल्या यशामुळे, पवनपुत्रला व्यापक प्रसिद्धी मिळाली होती याचा महत्त्वाचा असा फायदा झाला की पवनपुत्रकडे विद्यार्थ्यांचा ओघ सुरू झाला. नवीन विद्यार्थ्यांची वार्षिक संख्या जवळजवळ नऊशेपर्यंत पोहोचली. काहीही असो, चेंबूरमध्ये पवनपुत्रच्या तुलनेत मुंबई उपनगरात इतर कोणतीही इतकी अनुभवी आणि मोठी व्यायामशाळा नव्हती. दरमहा दीडशे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचल्यानंतर, आम्हाला प्रवेश बंद करावे लागायचे. पवनपुत्रची जागा ३० X ४० फूट होती. इतक्या लहान जागेत फ्लोअर एक्सरसाइज (FX) देखील बसवता येत नव्हता. तेव्हा १९८० ते १९८४ या काळात सरकारी मदतीने व्यायामशाळेसाठी एक टिन शेड (Tin Shed) बांधण्यात आली होती.

त्यावेळी आमची संस्था आर्थिक अडचणीतून जात होती. तरीही आम्हाला पूर्ण ताकदीने सहभागी व्हायचे होते म्हणून पवनपुत्रने आवश्यक खर्चाचा मोठा भार उचलला. पालकांच्या आणि सामाजिक संस्थांच्या मदतीने, अनेक वेळा मुलांच्या महागड्या किट आणि इतर उपकरणांचा खर्च केला. राज्य सरकारी अनुदानातून मोठे खर्च भागवता येणे शक्य नव्हते. संघटनेच्या वाढीबरोबरच आमच्याही जबाबदाऱ्या वाढत होत्या. संघटनेचे काम स्वतःचेच काम समजून, या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी दिवसरात्र अथक मेहनत घेतली. त्यांचे परिश्रम अजिबातच वाया गेले नाही तर स्पर्धांमधील निकाल हे आशादायी चित्र दर्शवित होते. यामुळे एक उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले. या प्रक्रियेत आमच्या खेळाडूंना मौलिक अनुभव मिळाले. कोणत्याही गोष्टीचा फायदा होतो त्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावरील जिम्नॅस्टिक्स अधिक सक्षमतेने समजून घेण्यात त्यांना यश मिळाले. हे आमच्या संपूर्ण टीमवर्क आणि कठोर परिश्रमाचे फलित होते.

१९८२ च्या आशियाई खेळांनंतर, १९९२ मध्ये दिल्ली येथे ज्युनियर आशियाई जिम्नॅस्टिक्स व अन्य ऑलिंपिक खेळांच्या स्पर्धा आयोजित

करण्यात आल्या होत्या, ज्यामध्ये आशुतोष पोतनीस आणि इतर खेळाडू सहभागी झाले. सौ. मिनल देशपांडे-म्हात्रे आणि मंजुश्री चिवटे या पंच (Judge) म्हणून उपस्थित होत्या. पटियालामध्ये आशुतोषने कॅम्पमध्ये मुलांसाठी फ्लोअर एक्सरसाइज सेटची (FX Set) व्यवस्था केली होती. तो एका वेळी चारशे सिट-अप्स करायचा. डबल बॅक लावताना त्याच्या पायांमध्ये लवचिकता राखणे त्याला सोपे होते तरीही सातत्याने आणि परिश्रमपूर्ण केलेल्या सरावामुळे तो सर्वकाही करू शकत होता. दरम्यान आशुतोषला चार खेळाडूंच्या संघात राखीव खेळाडू म्हणून ठेवण्यात आले होते. खरेतर त्याला संघात समाविष्ट करणे आवश्यक होते.

मंजुश्रीचा परदेशात जाणाऱ्या भारतीय संघात त्याचा म्हणण्यानुसार सहभाग असायला हवा होता पण तसेही घडले नाही. मंजुश्रीने यासाठी प्रयत्न केले कारण ती योग्य व्यक्ती होती तरीही सरकारी निवड समितीने तिची निवड केली नाही. तिचे निराश होणे स्वाभाविक होते. तिच्यावर झालेला अन्याय तिने तिच्या अधिकृत प्रशिक्षकांकडे आणि माझ्याकडे व्यक्त केला.

प्रकाश रेवाळे यांच्यासोबतही असेच घडले. नंतर त्यांची नौदलाचे खेळाडू म्हणून निवड झाली. खेळाडूंवरच्या अशा अन्यायाच्या अनेक घटनांचा मी मूक साक्षीदार आहे परंतु सरकारी अधिकाऱ्यांसमोर भल्याभल्यांची डाळ शिजत नाही ही खरंतर वाईट गोष्ट आहे. १९९२ मध्ये आशुतोषच्या प्रशिक्षकाचे म्हणजे मंजुश्री चिवटे हिचे रस्त्यावरील एका अपघातात निधन झाले. ती दुर्दैवी घटना आजही मला आठवत आहे.

या बातमीने आशुतोषला खूप धक्का बसला आणि तो विद्यापीठाच्या परीक्षेला बसू शकला नाही. नंतर त्याने जिम्नॅस्टिक्सही सोडले. आता तो एका आंतरराष्ट्रीय शाळेत फुटबॉल प्रशिक्षक म्हणून नोकरी करत आहे. तो शालेय संघासोबत फुटबॉल (football) स्पर्धेसाठी अनेक वेळा परदेश दौऱ्यावर गेला होता. मंदार म्हात्रे यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पंच (Judge) म्हणून अनेकदा जबाबदारी निभावलेली आहे. आशुतोषसारख्या अनेक खेळाडूंना क्रीडा क्षेत्रातील यशाने मोहरून गेलेले आणि काही कारणास्तव अपयश पचवताना ढासळून गेलेले मी पाहिले आहे.

१९९५ मध्ये माननीय शरद पवार यांच्या हस्ते शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मला लाभला. मला तेव्हा आणि आजही आतून वाटते आहे की हे सर्व माझ्या वडिलांच्या आणि शिक्षकांच्या आशीर्वादाने शक्य झाले आहे. आमच्या अनेक खेळाडूंना क्रीडा कोट्यातून सरकारी नोकऱ्या मिळाल्या आहेत. काहींनी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये क्रीडा शिक्षक म्हणून प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. काही परदेशात गेले आणि तिथेच स्थायिक झाले. काहींनी वैयक्तिकरित्या प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. काहींनी स्वतःचे व्यावसायिक जिम उघडले. काही खेळाडू असेदेखील होते की जे खेळण्यासाठी व्यायामशाळेत आले आणि काही स्पर्धांदरम्यान परस्परांच्या प्रेमात पडले आणि त्यांनी लग्न केली. या क्षणी ज्यांची नावे मनात येत आहेत ती नावे म्हणजे हरेश राणे, प्राची नायगावकर, प्रशांत, कोमल इ. त्यांच्या खेळाचा आलेख जसा मला आनंद देणारा होता तसाच त्यांच्या आनंदी जीवनाचा चढता आलेखही मला आनंद देत आहे. आज जेव्हा मी या सगळ्या प्रसंगांकडे वळून पाहतो तेव्हा हेच अनुभव माझ्या आनंदात भर घालतात त्यामुळे मी समाधानी वृत्तीने जगत आहे.

सर्व दृष्टीने पात्र खेळाडूंना योग्य वेळी, संधी मिळाव्यात, यासाठी आमच्या संस्थेने नेहमीच प्रयत्न केले परंतु प्रत्येक वेळेस आम्हाला यश मिळाले नाही याचे अनुभव मी अनेकदा व्यक्त केले आहे. तरीही खेळाबद्दलची आवड ही एकमेव अशी गोष्ट आहे की त्याला वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहताना दुसरी गोष्ट आहे, असा भास होतो. प्रसिद्धी आणि आर्थिक लाभाच्या दृष्टिकोनातून खेळाडूंकडे पाहणे ही परत वेगळी गोष्ट आहे. श्री पवनपुत्रच्या अनेक खेळाडूंना या संघर्षाचा सामना करावा लागला आहे. परंतु एक संस्था म्हणून आम्ही नेहमीच तटस्थ दृष्टिकोन राखला होता आजही राखला आहे. फेडरेशन इंटरनॅशनल जिम्नॅस्टिक्सनुसार (FIG) मुलींचे जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षण वयाच्या आठ आणि मुलांचे बारा वर्षांनी पूर्ण झाले पाहिजे, हा शिक्षणाला लागणारा कालावधी असे म्हणूनच नवीन खेळाडूंचे तसेच त्यांच्या क्षमतांचे मूल्यांकन करण्यासाठी सातत्याने व बारकाईने निरीक्षण करावे लागते. अशा तऱ्हेने आम्ही लक्ष ठेवल्यामुळेच श्री पवनपुत्र खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्कार लाभलेला आहे. लवचिकता (Flexibility) आणि शक्ती

(Strength) कशा तऱ्हेने वाढवता येईल हे लक्षात घेऊन खेळाडूंना त्यांच्या शारीरिक क्षमतांशी जुळणारे खेळ म्हणजेच जिम्नॅस्टिक्स त्यांना शिकवतो.

एकदा का जिम्नॅस्टिक्सचा पाया पक्का झाला की मग आम्ही मुले आणि मुली दोघांनाही वेटलिफ्टिंग आणि पॉवरलिफ्टिंग यांचे पूरक शिक्षण देतो. मल्लखांब आणि जिम्नॅस्टिक्समधील ताकद आणि सादरीकरणाचे समान असे स्वरूप लक्षात घेऊन, मुले आणि मुलींना या विषयांमध्ये आळीपाळीने प्रशिक्षण देण्यात येते. उदाहरणार्थ, आसने हा पाया नंतर रोप मल्लखांब हा भारतीय खेळ आणि त्यानंतर रिदमिक हा ऑलिंपिक जिम्नॅस्टिक्सचा मुलींसाठीचा नृत्यप्रकार या त्यांना सहभागी करून घेतले जाते.

राजेश्वरी पिल्लई हे याचे जिवंत उदाहरण आहे. आसनांमधील फ्लेक्सिबिलिटीमुळे रोप मल्लखांबाची राजश्री ही खेळाडू असून सुद्धा राष्ट्रीय स्पर्धेत रिदमिक या प्रकारात कास्य (Bronze) पदकाची विजेती ठरली.

राजेश्वरीने रोप मल्लखांबमधील राष्ट्रीय स्पर्धेत आठ वर्ष सुवर्णपदके जिंकली आहेत. कोणतीही सरकारी संस्था हे कौशल्य साध्य करू शकली नव्हती, पण आमच्यासारखी आसनांना आणि जिम्नॅस्टिक्सला पूर्णत्वाने समर्पित संस्था हे करू शकली, हे अनेकदा आम्ही दाखवून दिलेले आहे, ज्याचा आम्हाला अभिमान आहे.

अनुदानासाठी तसेच वन गेम फेडरेशनसाठी खेळांचे विलगीकरण असते परंतु शारीरिक क्षमतेसाठी हे विलगीकरण अपेक्षित नाही यासाठी आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा (परदेशी) अभ्यास आवश्यक आहे.

सरकारी संस्था स्वतःचे नियम, पुरस्कार, शिफारसी, आर्थिक लाभ इ. अनेक बंधनांत अडकलेल्या असतात. त्यांचे अधिकारी केवळ सत्ता, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा, परदेशी दौरे इत्यादींवर मुख्यत्वे लक्ष केंद्रित करतात. स्पर्धा भरवणे, खेळाडूंच्या कामगिरीद्वारे सिद्ध करणे असे कधी कधी दिसून येते. अशा परिस्थितीत मुलांच्या शारीरिक क्षमतांचे, गुणांचे मूल्यांकन करण्यात या सरकारी संस्था कितपत सक्षम आहेत, हा एक महत्त्वाचा प्रश्न उरतोच!

वेताचा मल्लखांब वापरून खेळला जाणारा मल्लखांब नंतर मुलींसाठी सुधारित करण्यात आला. त्यानुसार, क्रीडा महासंघाकडून मुलींना दोरीने मल्लखांब सादर करावा असा परिपाठ झाला. पूर्वी वेताच्या लवचिक काठीवर

सहज खेळणाऱ्या खेळाडूंना दोरीने खेळणे थोडेसे सोपे गेले. वेताची उपलब्धता कमी होती शिवाय त्या क्रीडा उपकरणावर (Sports Equipment) खेळताना अंगावर वळ उठत असत. खेळाच्या या बदलत्या स्वरूपामुळे अनेक खेळाडूंची सोय झाली. त्यांना सुरुवातीपासूनच दोरीचे अधिकचे प्रशिक्षण घ्यावे लागले.

वीणा माने आणि अदिती कुलकर्णीसारख्या खेळाडूंना दहावीची महत्त्वाची परीक्षा असल्यामुळे, त्यांच्या पालकांच्या आग्रहामुळे त्यांना स्पर्धांमधे भाग घेता आला नाही त्यामुळे शिवछत्रपती पुरस्कारातून त्या वगळल्या गेल्या. या समस्येमुळे आम्ही त्यांना काही वर्षे दोरीच्या मल्लखांबाचे प्रशिक्षण दिले. त्यांनी त्यांचा नियमित सराव चालू ठेवला, ज्यामुळे त्यांना सुवर्णपदके मिळाली. दोन्ही मुली शैक्षणिकदृष्ट्याही हुशार होत्या. आदिती कुलकर्णीला मुंबई विद्यापीठातून संगणक शास्त्रात (Computer Science) सुवर्णपदक मिळाले. आम्ही श्री पवनपुत्र येथील आणखी एक प्रतिभावान खेळाडू सुनील गंगावणेवर कठोर परिश्रम घेतले. त्याला रशियाला जाणाऱ्या संघात कसेबसे करून समाविष्ट करण्यात आले परंतु तिथेही शरीराचा रंग आणि जातीय भेद यामुळे त्याला भारतीय मुलांच्या नाराजीचा सामना करावा लागला.

एका इंग्रजी वृत्तपत्राने २००६ मध्ये सहा महिन्यांच्या मुलाच्या जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षणाची स्थिती यावर एक सविस्तर लेख प्रकाशित केला. हा लेख अनाहिता काशिनाथ यांच्या प्रयत्नातून प्रकाशित झाला, ज्या स्वतः दक्षिण मुंबई इंग्रजी माध्यम शाळेच्या जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षक आहेत. याचा परिणाम असा झाला की २००९, २०११ आणि २०१४ मध्ये निमंत्रित राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये या विषयावर गांभीर्याने तीन वेळा चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. परिणामी मुंबईतील काही ठिकाणी शिशूंसाठी आणि लहान मुलांसाठी उपकरणे आली. त्यांचे प्रशिक्षणही सुरू झाले. न्यूझीलंड, ऑस्ट्रेलियामधील उपलब्ध शिक्षण पद्धतीनुसार प्रगत खेळाडूंसाठी खास असे संगणक प्रोग्रामिंग तयार करण्यात आले. परंतु हे सगळे फक्त श्रीमंत मुलांसाठी मर्यादित होते. विविध कारणांमुळे गरजू विद्यार्थ्यांना ते उपलब्ध होऊ शकले नाही. आम्ही सुमारे पंधरा वर्षांपूर्वी श्री पवनपुत्र येथे हे यशस्वीरित्या प्रायोगिक तत्त्वावर सुरू केले होते. त्यानंतर आम्ही अंधेरी क्रीडा संकुलातदेखील याचा प्रयोग करून पाहिला. परंतु या स्पर्धा आर्थिक

कारणास्तव बंद झाल्या. एखादा प्रकल्प मोठ्या अडचणीने सुरू केला जातो आणि तो काही काळातच अशा रीतीने बंद होणे हे खूप वेदनादायक होते. ज्याचे जळे, त्यास कळे! अशी आमची स्थिती झाली होती.

२०१० च्या राष्ट्रकुल स्पर्धेत (Commonwealth Games) भारतीय जिम्नॅस्टिक्स संघाचे प्रशिक्षक म्हणून संजोग ढोले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. इथे प्रमुख प्रशिक्षक हे विदेशी कोचेस होते पण तरीही त्यांनी अनेक खेळाडूंना प्रशिक्षण देण्यासाठी सहाय्यकाची भूमिका उत्तम प्रकारे बजावली. ते खरोखरी कुशल प्रशिक्षक होते. त्यांच्या मते, प्रत्येक खेळाची स्वतःची शिस्त आणि तंत्र वेगळे असते. उदाहरणार्थ क्रिकेटची लोकप्रियता इतर खेळांपेक्षा खूप जास्त असते. लोकप्रियतेच्या आधारावर कोणत्याही खेळाचे महत्त्व कमी लेखता येत नाही! जेव्हा जबाबदारीच्या पदांवर कार्यरत असलेल्यांना याचा विसर पडतो तेव्हा असंबद्ध प्रश्नांना निष्कारण उत्तरे द्यावी लागतात, याचा त्रास होतो. माझ्या हृदयात अशा अनेक गोष्टी आणि असंख्य घटना मी कुलूपबंद करून ठेवलेल्या आहेत. आमचे एकमेव ध्येय परिस्थितीशी सुधारणे असेच तेव्हाही होते आणि आजही आहे! या पुस्तकाद्वारे मी तुमच्यापर्यंत हे पोहोचवत आहे कारण जे मला साध्य करता आले नाही ते तुम्हाला तरी करता यावे की त्या मागची भावना आहे!

आमच्या पवनपुत्र व्यायामशाळेत अनेक खेळाडूंना आम्ही प्रोत्साहन दिले आहे, त्यांच्यावर परिश्रम घेतले आहे, त्यांना योग्य प्रशिक्षण दिलेले आहे, त्यांची स्पर्धांसाठी तयारी करून घेतली आहे, त्यांनीही या सगळ्या गोष्टीला योग्य फायदा घेत पारितोषिके मिळवलीत याशिवाय या खेळाच्या जोरावर त्यांना चांगल्या नोकऱ्या मिळाल्यात, याचा मला आनंद आहे. पण पवनपुत्रने आपल्याला खूप काही दिले आहे, याची आज किती जणांनी जाण ठेवली आहे? आपण जसे मातेला आणि मातृभूमीला मानतो त्याप्रमाणे त्यांचे आयुष्य घडवणारी पवनपुत्रला ते असे कसे सहजी विसरू शकतात?

प्रशिक्षण आणि स्पर्धेदरम्यान बरेच जण जोडलेले असतात, परंतु पाच-दहा वर्षांनंतर, स्पर्धात्मकतेतील राजकारण यामुळे कायमस्वरूपी दुरावतात. हे कदाचित नैसर्गिक असावे परंतु मला असे वाटते की या सर्वांनी पवनपुत्र सारख्या शारीरिक मानसिक आणि काही प्रमाणात आर्थिकसुद्धा क्षमतांना

विकसित करणाऱ्या या शैक्षणिक संस्थेशी असलेले संबंध जोपासले पाहिजेत. हे मी माझ्यासाठी म्हणत नाही परंतु आपल्या अनुभवाचा निश्चितपणे पुढच्या पिढीला त्याचा फायदा मिळेल! मी स्वत: वयाच्या श्याऐंशीव्या वर्षी सुद्धा अजूनही आपल्या गुरूंना म्हणजेच पंत सर, खोपकर सर आणि फाटक सर यांची रोज कृतज्ञापूर्वक आठवण करतो. आपण आपल्याला घडवणाऱ्या गुरूंना आठवतो, यालाच भारतीय संस्कृती म्हणता येईल! आमच्या व्यायामशाळेत असे काही प्रसंग घडले आहेत जिथे मुली मुलांना (Boys) प्रशिक्षण देत असत. मला अजूनही आठवतेय मंजुश्री चिवटे मुलांचा (Boys) सराव घेत असे. मुलींना अशा तऱ्हेने मुलांना (Boys) प्रशिक्षण देताना पाहून आसपासची माणसे टोमणे मारायची किंवा तिला छेडायची ज्यामुळे काही मुलांनी सरळ जिममध्ये येण्यास बंद केले. याला पुरुषी अहंकार (Male Ego) म्हणता येईल. या घटनेच्या निमित्ताने पल्लवी चेंबूरकर, जस्मिता म्हात्रे, कोमल पाटील, हरप्रीत कौर, ललिता मेहता, प्रशांत पाटील, चंद्रशेखर पाटील इ. अनेक मुलांची आठवण येत आहे ज्यांनी माझ्याकडे प्रशिक्षण घेतले त्यातले काही जण संस्थेत राहिलेत, तर काही जण कायमचे निघून गेलेत.

एका खेळाडूला प्राथमिक शिक्षण देण्यापासून त्याचा पूर्ण विकास करण्यासाठी किती वर्ष खर्च होतात याची तुम्ही कल्पना करू शकता! यामुळे अशा तऱ्हेने त्यांचे अर्ध्यातून सोडून जाणे आमच्यासाठी नेहमीच दुःखदायक असते! या वयातही या समस्यांना मी अजूनही तोंड देत आहे. चेंबूर गावातील आमचा दोनशे वर्षे जुना वाडा, जिथे एकेकाळी आमचे एकत्र कुटुंब प्रेमाने आणि एकजुटीने राहत होते तो आता एक निर्जन, निर्मनुष्य आणि ओसाड वाडा झालेला आहे. याच वाड्याचा एक भाग असलेल्या पवनपुत्र व्यायाम शाळेची परिस्थिती काही वेगळी नाही. श्याऐंशीच्या वयात, मी कोणाला मैदानात उतरून प्रशिक्षण देऊ शकत नाही परंतु निश्चितपणे एका चांगल्या मार्गदर्शकाचे काम करू शकतो आणि हे काम माझ्याकडून सातत्याने होत राहो, अशी मी प्रार्थना करू शकतो!

सध्या श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरचे व्यवस्थापन रोटेरियन (Rotarian) ॲड. शरद भोसले आणि देवदत्त म्हात्रे करतात. प्रकाश रेवाळे हे मुख्य

शिक्षक आमच्या सोबत आहेत. वर्षानुवर्षापूर्वी लावलेले श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराचे इवलेसे रोपटे आज वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. त्याद्वारे ते समाज आणि राष्ट्राचीही सेवा करताहेत. माझ्यासाठी यापेक्षा मोठा आनंद कोणता असू शकतो? भविष्यासाठी माझ्या शुभेच्छा आहेत की तरुण खेळाडू आणि कार्यकर्ते नव्या उत्साहाने उदयास येवोत आणि श्री पवनपुत्रांचे हे सामाजिक ध्येय असेच पुढे नेत राहोत! आमेही जे काही खेळासाठी करत आलो आहे तो खेळ मात्र माझ्या माघारीही चालू राहिला पाहिजे, त्या खेळाद्वारे नवीन सशक्त तंदुरुस्त पिढी उदयास आली पाहिजे!

■

१८. वयोमानाधारीत शिक्षणासाठी मुलांची क्रीडा उपकरणे

खेळाडूंची स्पर्धांसाठी तयारी करण्यासाठी श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरने विविध नाविन्यपूर्ण तंत्रांचा प्रयोग केला आहे. २००९ च्या निमंत्रितांच्या राज्यस्पर्धेत, आम्ही या संकल्पनेचा प्रचार करण्यासाठी मुलांच्या उपकरणांची (Toddler equipment) जाहिरात करणारे बॅनर झळकवले होते. परदेशात ही संकल्पना बरीच लोकप्रिय असली तरी, आपल्या देशात ही एक नवीन संकल्पना होती. काही लोकांनी या संकल्पनेचे मनापासून स्वागत केले. आमचे विद्यार्थी ऋषिकेश म्हात्रे आणि अपर्णा शिंदे यांनी याचा मोठ्या प्रमाणात प्रचार केला. यामुळे शहरी पालकांमध्ये त्याविषयीची उत्सुकता निर्माण झाली, जे त्यांच्या मुलांना नवीन पद्धतीने जिम्नॅस्टिक्स शिकवू इच्छित होते. भारतातील सुमारे दहा शहरांमध्ये मुलांच्या उपकरणांची संकल्पना त्यांनी घेऊन गेल्याचा आम्हाला अभिमान आहे. व्यायामशाळा आणि जिम्नॅस्टिक्सची उत्पत्ती शोधण्याचे आमचे प्रयत्न यशस्वी होत होते. बदलत्या काळाला अनुसरून आधुनिकतेकडे वळणे जरुरी होते. खेळांमध्ये संगणक आणि तंत्रज्ञानाचा वापरदेखील वाढला होता. मुलांच्या उपकरणांबद्दल (Toddler Equipment) माहितीसाठी अनेक माणसे गुगलवर माहिती शोधत होती. या जाहिरातींचे काही प्रिंटआउट जिममध्येही वितरित केले गेले.

ऋषिकेश आणि अपर्णा यांनी लहान मुलांसाठी परदेशी पुस्तके आणली. त्यांना यासाठी सुमारे वीस हजार रुपये एवढा प्रचंड खर्च त्यावेळी करावा लागला. त्यांनी अगदी दहा महिन्याच्या शिशुपासून आठ वर्षाच्या मुलांसाठी व्यायाम शाळा (Toddlerr/Kids Jim) उघडले. असा प्रयोग मुंबईतील विदेशी सधन संस्थेकडून इतरांनी केला. त्यानंतर ऋषिकेश आणि अपर्णा यांनी तो घाटकोपर आणि माटुंगा येथेही राबवला. ही संकल्पना संपूर्ण भारताभर जाहिरातीद्वारे हळूहळू परंतु व्यवस्थित पसरली. पवनपुत्रच्या विद्यार्थ्यांनी दिल्लीपासून चेन्नईपर्यंत सुमारे दहा शहरांमध्ये याचा व्यवस्थित प्रचार आणि प्रसार केला. ऋषिकेश आणि अपर्णा यांनी या नवीन प्रकल्पासह त्यांचे नवीन काम सुरू केले. ही सरकारी योजना नव्हती किंवा ते कोणत्याही विशिष्ट संघटनेच्या कार्यक्रमातंर्गत येत नव्हते नव्हते. जगात खेळांबाबत होत असलेले बदल पाहता, या खेळांकडे एका नवीन दृष्टिकोनातून पाहण्याचा तो निश्चितपणे चांगला प्रयत्न होता. त्याला बुद्धिमत्तेच्या विकासाद्वारे जगाशी जोडण्याचा एक नवीन मार्ग असेही म्हणता येईल. मुलांना कोणत्या वयात कोणत्या खेळात समाविष्ट करता येईल याबद्दल जनजागृती करण्याचा हा एक अर्थपूर्ण प्रयत्न होता. पालकांची ओढ असल्यामुळे जनतेच्या पाठिंबातून ही योजना राबविण्याचा सतत्याने प्रयत्न करत आहोत. ती यशस्वी झाली की नाही हा दुय्यम मुद्दा आहे परंतु आम्ही आमचे प्रयत्न उत्साहाने सुरू ठेवले आहेत. आजही हाच आमचा एक संकल्प आहे. काळ झपाट्याने बदलतो आहे. उगवत्या सूर्याला नमन करणे, हेच क्रीडा कार्यकर्त्यांचे सामाजिक ध्येय आहे, हे ओळखून वाटचाल सुरू आहे. आपण खेळाच्या पटलावर असू वा नसू खेळाच्या सोंगट्या हलत राहिल्या पाहिजे, पुढे सरकत राहिल्या पाहिजे, जिंकत राहिल्या पाहिजेत!

■

१९. बाभळीच्या झाडाला आंबे कसे लागतील?

अनेकदा घेतलेला अनुभवाच्या जोरावर मी निश्चितपणे सांगू शकतो की सरकारी पातळीवरून खेळाकडे पाहण्याची दृष्टी कालानुरूप नव्हती. इतक्या वर्षांनंतरही परिस्थिती जैसे थेच आहे. खेळांशी संबंधित सरकारी संस्था कामाच्या बाबतीत योग्य मार्गदर्शन करीत नाहीत, हा माझा आजवरचा अनुभव आहे. राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवर एखादी मोठी स्पर्धा किंवा क्रीडा महोत्सव आयोजित केला जातो तेव्हाच सरकार संस्था सक्रिय होतात. त्या आयोजनाच्या कार्यक्रमाच्या वेळेस फक्त त्यांच्यात वेगळाच उत्साह संचारतो. बाकी त्या इतर वेळेस संपूर्णतः निष्क्रिय असतात. त्यांना दिलेल्या कामामध्ये समर्पणाचा अभाव आढळतो. आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडू निवडीच्या वेळेस तर खेळाचे वातावरण तयार झालेले नसते. क्रीडा महोत्सवांदरम्यानची भ्रष्टाचाराची प्रकरणे समाज माध्यमांनी वारंवार उघड केली आहेत, ज्याची दखल आपणही घेतली असणारच!

अनेक राज्यांमध्ये क्रीडा स्टेडियम बांधली गेली आहेत, क्रीडा उपकरणे बसवली गेली आहेत आणि प्रशिक्षण सुविधा उपलब्ध केल्या आहेत, परंतु आज इतर राष्ट्रांच्या तुलनेत आपली काय स्थिती आहे? कर्तुत्ववान आणि सक्षम खेळाडू विकसित करण्यात सरकारी यंत्रणा कितीशा रस घेतात, हे

मोठे प्रश्नचिन्हच आहे. सरकारी यंत्रणांविषयी असे धडधडीत विचारावेसे वाटते की खेळाप्रती आपण किती गंभीर आहात? आपल्याला नेमून दिलेल्या उद्दिष्टाच्या (Target) पूर्तीकडे किती गांभीर्याने पाहता? आपण वर्षानुवर्ष चांगल्या गोष्टींकडे दुर्लक्ष केले आहे, पण त्यालाही काही मर्यादा जनतेकडून अपेक्षित आहेत. ग्रामीण पातळीवर खेळांना आणि त्या अनुषंगाने खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आपण नेमक्या कोणत्या जाणीवेने काम पाहत आहात?

जर पवनपुत्रसारखी एखादी खाजगी संस्था त्यांच्या अपेक्षेने खारीचा वाटा खूप मोठ्या प्रमाणावर उचलू शकतात, तर सरकार का करू शकत नाही? मोठ्या स्पर्धांदरम्यान खेळाडूंच्या निवडीमध्ये होणाऱ्या भेदभावाची जाणीव तरी होत असते काय? हे दुर्दैवाने मला सांगावे लागत आहे कारण मी ते अनेक वेळा प्रत्यक्ष अनुभवलेले आहे.

या सरकारी संस्थांच्या संदर्भात मला संत कबीर दास यांचे एक दोहा उद्धृत करावासा वाटतोय.-

करता था सो क्यों किया
अब करी क्यों पछताय
बोया पेड़ बबुल का,
तो आम कहां से खाय?

म्हणजेच या दोह्याचा मतितार्थ असा आहे की झाड तर बाभळीचे लावले आहे मग आंबा खायला मिळेल, अशी कल्पना करू शकतो काय?

एकंदरीत काय तर खेळांच्या बाबतीत खाजगी संस्थांचे योगदान खूप मोठे आणि महत्त्वाचे आहे. त्यामुळे खेळ आणि खेळाडूंच्या विकास प्रक्रियेत खाजगी संस्थांना टिकवून ठेवण्यासाठी सरकारने गंभीरपणे विचार केला पाहिजे. जर या संस्था टिकल्या तर खेळाच्या बाबतीत अनेक सकारात्मक चांगले बदल दिसून येतील असा मला माझ्या पातळीवर निश्चितपणे विश्वास वाटतो.

जोपर्यंत राज्य आणि राष्ट्रीय क्रीडा संघटना आणि सरकारी यंत्रणा गांभीर्याने आणि समन्वयाने काम करत नाहीत तोपर्यंत आपल्याला सकारात्मक परिणाम दिसणार नाहीत. अशा परिस्थितीत वरून आपण आपल्या आपल्या खेळाडूंची तुलना परदेशी खेळाडूंशी करणे कितपत योग्य आहे? क्रीडा संघटना

किंवा सरकारी यंत्रणांनी या मुद्द्यांवर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. इथे आमचा कोणताही वैयक्तिक स्वार्थ नसून खेळाच्या प्रगतीसाठी संबंधित लोकांनी या बाबींकडे आतातरी लक्ष द्यावे म्हणून आम्ही हे फक्त निदर्शनास आणून देण्याचे काम करत आहोत.

श्री पवनपुत्र व्यायाम शाळेद्वारे आम्ही जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब, पॉवर लिफ्टिंग, वेट लिफ्टिंग आणि आसनांमध्ये आतापर्यंत केलेल्या कामाचे परिणाम सर्वांना दिसत आहेत. सरकारी पातळीवर अगदीच काहीही केले जात नाही, असे मला मुळीच म्हणायचे नाही परंतु कोणतेतरी चांगले काम सुरू होते आणि तेव्हाच नेमकेपणी संबंधित मंत्री किंवा अधिकारी यांची बदली होते आणि परिस्थिती पुन्हा जैसे थे अशी होते.

सरकारी संघटनांच्या कार्यशैलीवर शेवटी किती नकारात्मकता? आपण सुज्ञ आहात. याबाबत थोडा वेगळा विचार करता येईल.

एकंदरीत काय तर देशाच्या भौगोलिक मर्यादा आणि अमर्याद वाढती लोकसंख्या पाहता, स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षांनंतरही अजूनही बरेच काही करायचे आहे. जेव्हा आपण बी पेरतो तेव्हा आपल्याला निश्चितच सशक्त फळांची अपेक्षा असते. तथापि, त्या रोपाची वाढ होण्यासाठी त्या रोपांना वेळेवर खत-पाणी दिले गेले पाहिजे. पुरेशा सूर्यप्रकाश त्यावर पडतोय का हे पाहिले पाहिजे शिवाय एका जाणकार माळ्याची नेमणूकही तिथे आवश्यक आहे तरच भविष्यात इच्छित, सुयोग्य फळ प्राप्त होईल!

याच धर्तीवर क्रीडा क्षेत्रामध्ये आपण मुलांना नियोजनबद्ध पद्धतीने सर्व साधन- सुविधा तसेच प्रशिक्षक उपलब्ध करून दिले तर निश्चितपणे चांगले खेळाडू तयार होतीलच जे या देशाचे भविष्य घडवतील!

पालक, व्यवस्था आणि संबंधित संस्थांनी त्यांच्या जबाबदाऱ्यांबद्दल जागरूकपणे सतर्क राहून क्रीडा क्षेत्रातील मुलांच्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. विकसित देशांमध्ये ज्या पद्धतीने खेळांना प्रोत्साहन दिले जाते आणि इतर सुविधा दिल्या जातात, त्याचप्रमाणे आपल्या देशातही दिल्या गेल्या पाहिजेत, तरच अपेक्षित निकाल मिळतील!

सध्या भारतात २०३६ साली संपन्न होणाऱ्या आगामी ऑलिंपिककडे क्रीडाप्रेमींचे लक्ष आहे. इतके मोठे आव्हान पेलण्यासाठी आपण समर्थ

आहोत का? जर समर्थ नसू तर क्रीडा क्षेत्रातील माणसांकडून, त्यांच्या अनुभवातून ऑलिंपिकसाठी नेमकी कोणती तयारी करण्याची आवश्यकता आहे हे जाणून घेण्याची गरज आहे. आपल्याच मातीत हे ऑलिंपिक असल्यामुळे आपले खेळाडू कितपत तयारीनिशी स्पर्धांमध्ये उतरतात आणि यश मिळवतात, हे सुद्धा पाहणे आणि त्या दृष्टीने तयारी करण्याची गरज आहे. विकसित देशांमधील क्रीडा संस्थांच्या कार्यशैली, प्रशिक्षण प्रणाली, पौष्टिक पोषण आणि वातावरणाचा अभ्यास केल्यास आपल्या देशात अशा पातळीच्या पायाभूत सुविधांचा पूर्ण अभाव असल्याचे दिसून येत आहे. आपण हे स्वीकारले पाहिजे. त्यात बदल घडवून आणण्याकडे आपण वाटचाल केली पाहिजे. आपल्या देशातील क्रीडा-संबंधित उपक्रमांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रत्येक राज्यातील क्रीडा संघटना आणि शैक्षणिक संस्थांच्या पातळीवर या सगळ्याचा व्यापक विस्तार आणि प्रचार केला पाहिजे. मुंबईसारख्या महानगरात, तुम्हाला शेकडो शाळा आणि महाविद्यालये आढळतील जिथे खेळाचे मैदानसुद्धा नाही. अशा कित्येक संस्थांमध्ये शिकणारे विद्यार्थ्यी खेळापासून वंचित आहेत. त्यांच्या सुदृढ वाढीसाठी आणि खेळातील प्रगतीसाठी नेमके काय करता येईल? याचा आत्तापासूनच विचार करायला हवा.

ग्रामीण पातळीवर क्रीडा-संबंधित पायाभूत सुविधांच्या अभावासाठी उपाय शोधले पाहिजेत, हे निश्चितपणे शोधून काढण्याची आवश्यकता आहे. मुलांना खेळांपासून वंचित ठेवणे आपल्या मागासलेपणाचे लक्षण आहे. त्यांचे भविष्य घडवणे हे प्रत्येक सुजाण नागरिकापासून ते देशातील पदाधिकाऱ्यांपर्यंतचे कर्तव्य नाही का? या ग्रामीण भागातील मुलांच्या नशिबाचा भाग म्हणून आपण आपल्या जबाबदाऱ्यातून मुक्त होणे उचित आहे का?

देशातील काही राज्यांमध्ये चांगल्या क्रीडा संस्था आहेत, परंतु जनतेला त्यांच्याबद्दल कोणतीही व्यवस्थित माहिती नाही हे एक कटू वास्तव आहे. प्रत्येक भागातील क्रीडा संस्थांची माहिती आसपासच्या परिसरातील माणसांपर्यंत पोहोचवणे ही सुद्धा मोठी जबाबदारी आहे. ही माहिती जरी योग्य रीतीने योग्य माणसांपर्यंत आणि त्याद्वारे खेळाडूंपर्यंत पोहोचली तर छोट्या छोट्या गावात शहरात जिल्ह्यात राज्यात हजारो राष्ट्रीय स्तरावरील

खेळाडू निर्माण होतील!

आपल्या भारतात क्रीडाप्रेमी, खेळाडू आणि खेळासाठी मेहनत करणाऱ्यांची कमतरता नाही. क्रिकेटसाठी जे प्रयत्न आणि योजना प्रयत्नपूर्वक आखल्या गेल्या आणि त्या व्यवस्थित राबवल्या गेल्या तेच प्रयत्न इतर खेळांसाठीही केले गेले पाहिजे होते. दुर्दैवाने ते झाले नाही. परंतु आता खेलो इंडिया २०१७ पासून ही सुरुवात केली आहे. तरी ऑलिंपियाडपर्यंत नक्कीच उत्कृष्ट खेळाडू निर्माण होऊ शकतील अशी मला आशा वाटते!

■

२०. शहाजी राजे भोसले क्रीडा संकुल (अंधेरी क्रीडा संकुल)

शहाजी राजे भोसले क्रीडा संकुल, ज्याला 'अंधेरी क्रीडा संकुल' असेही म्हणतात हे ठिकाण म्हणजे माझ्या आयुष्यातील एक मैलाचा दगड ठरले आहे. या संकुलाबद्दल मी खूप आशावादी होतो.

महानगरपालिकेने सुरू केलेल्या या क्रीडा संकुलाद्वारे आमच्यासारख्या खेळाडूंनी आणि क्रीडाप्रेमींनी, क्रीडा उपक्रमांसाठीचे उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पाहिले होते. मी आणि इतर काही सहकाऱ्यांनी या संकुलातील जिम्नॅस्टिक्स सेंटरची स्थापना करण्यासाठी अथक प्रयत्न केले आणि अंमलबजावणी करण्यासाठी आमचा मौल्यवान वेळ दिला. क्रीडा संकुलाच्या स्थापनेनंतर, पंत सर आणि मी, बृहन्मुंबई जिल्हा जिम्नॅस्टिक्स असोसिएशनच्या वतीने, १९९२ मध्ये अंधेरी क्रीडा संकुलाच्या ललित कला भवन आणि क्रीडा प्रतिष्ठान येथे जिम्नॅस्टिक्स सुरू करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. १९९४ मध्ये आम्हाला प्रतिसाद मिळाला. असंख्य अडचणी आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर, १९९८ मध्ये अखेर या केंद्रात जिम्नॅस्टिक्स सुरू झाले. करार प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, बृहन्मुंबई जिम्नॅस्टिक्स असोसिएशनला सुरुवातीला एक छोटी जागा देण्यात आली होती, परंतु काही वर्षांनी ती मागे घेण्यात आली. याची कारणमीमांसा मी नंतर करतो.

१९९७ मध्ये परवानगी मिळाल्यानंतर, आमची जिल्हा संघटना, महाराष्ट्र जिम्नॅस्टिक्स असोसिएशन, श्री पवनपुत्र आणि जवाहर विद्या भवन यांच्याकडे उपलब्ध असलेले अतिरिक्त क्रीडा साहित्य अंधेरी क्रीडा संकुलाच्या तळमजल्यावरील टेबल टेनिस हॉलमध्ये हलवले. कागदपत्रतेच्या पूर्ततेसाठी तसेच सरकारने जिम्नॅस्टिक्ससाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात याच्या मागणीसाठी आम्ही तत्कालीन नगरपालिका नगरसेवक जयवंत परब आणि शिक्षण कार्यकर्ते श्रीराम मंत्री यांच्याशी सतत संपर्कात होतो. दरम्यान, आम्ही विद्यार्थी आणि खेळाडूंमध्ये याचा प्रचार करण्यास सुरुवात केली.

१९८२ च्या दिल्ली आशियाई क्रीडा स्पर्धेनंतर, मुंबई महानगरपालिकेने मुंबई उपनगरात दोन मोठे क्रीडा स्टेडियम बांधले. मुलुंडमधील कालिदास क्रीडा संकुल आणि अंधेरीमधील शहाजी राजे भोसले क्रीडा संकुल (अंधेरी क्रीडा संकुल). आमच्यासारखे क्रीडाप्रेमी आणि खेळाडू अनेक वर्षांपासून मुंबईत भव्य क्रीडा स्टेडियमसाठी प्रयत्नशील होते. मी १९७४ पासून मुंबई महानगरपालिकेच्या जिल्हा संघटनेशी सतत संपर्कात आणि पत्रव्यवहारात होतो. अखेर, १९९२ मध्ये हे स्वप्न प्रत्यक्षात उतरले. अंधेरी क्रीडा संकुल सुरू होण्याच्या काही दिवस आधी मी माझ्या अध्यापनाच्या नोकरीतून निवृत्त झालो होतो. त्यामुळे मी अतिशय उत्साहाने या नवीन जबाबदारीकडे पाहत होतो. आता माझ्याकडे अधिकचा वेळ उपलब्ध झाला होता. अंधेरी क्रीडा संकुलाचे योग्य कामकाज सुनिश्चित करण्यासाठी, आम्ही संबंधित फाइल्ससह सकाळी ९ वाजण्यापूर्वी दादरमधील महापौर बंगल्यावर पोहोचायचो. खरं तर, अंधेरी क्रीडा संकुलाचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी आम्हाला सरकारी अधिकाऱ्यांनी आमंत्रित केले होते, परंतु ते सुरू होण्यास अनेक वर्षे लागली. अंधेरी क्रीडा संकुलाच्या स्टेडियममध्ये जिम्नॅस्टिक्स सेंटरचे काम १९९७ मध्ये सुरू झाले आणि २००४ मध्ये व्यवस्थित चालू लागले होते. जिल्हा केंद्रातर्फे विद्यार्थी (खेळाडू) शिक्षणास सुरुवात झाली मात्र ही जबाबदारी २००४ मला सोडावी लागली. आधीच अस्तित्वात असलेल्या स्टेडियममध्ये जिम्नॅस्टिक्स उपक्रम सुरू करण्यासाठी इतका वेळ कसा काय लागला, असा प्रश्न तुमच्या मनात उद्भवणे स्वाभाविक आहे. असे असूनही महानगरपालिकेने घेतलेल्या या उपक्रमाचे सर्वांनी मनापासून

कौतुक केले. मुंबईत अशा राज्यस्तरीय क्रीडा संकुलाची अनेक वर्षांपासून गरज जाणवत होती आणि अंधेरी क्रीडा संकुलाने ती पूर्ण केली. आमच्या संस्थेला इतर खेळांसह जिम्नॅस्टिक्सला प्रोत्साहन देण्यासाठी तेथे जागा देण्यात आली याचा आम्हाला खूप आनंद झाला.

अंधेरी क्रीडा संकुलात जिम्नॅस्टिक्स सुरू करण्यासाठी आम्ही महाराष्ट्राच्या क्रीडा संचालनाकडून उपलब्ध झालेली MAGA आणि BDGA राष्ट्रीय स्पर्धेतील प्राविण्यामुळे उत्पन्न झालेला क्रीडा साहित्य निधी आमच्या पवनपुत्र केंद्रातील अतिरिक्त क्रीडा उपकरणे अंधेरी येथे घेऊन गेलो. याव्यतिरिक्त या प्रतिष्ठित केंद्राचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी महाराष्ट्र हौशी व्यायामशाळा संघटना (MAGA) जवाहर विद्या भवन (RCF) आणि श्रीपवनपुत्र यांच्याकडून मिळालेल्या अनुदानाचा वापर करण्यात आला. आमच्या संस्थेला पवनपुत्रसह सहभागी संघटना म्हणून प्रकल्प राबविण्याची जबाबदारी देण्यात आली. महाराष्ट्राचे माजी क्रीडा संचालक, पांडुरंग ज्ञानोबा भुरे यांनी बृहन्मुंबई जिल्हा संघटनेला जिम्नॅस्टिक्सचे प्रशिक्षण देण्यासाठी आमंत्रित केले. जिल्हा संघटनेचे अध्यक्ष भगवंत माधव पंत सर आणि भुरे हे मित्र माझ्यासोबत होतेच त्यामुळे प्रशिक्षण कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला. सुरुवातीला केंद्राला अनेक महिने विद्यार्थी सापडले नाहीत. या प्रतीक्षेत सहा महिने गेले. यामुळे कोणत्याही सरकारी कारवाईची वाट न पाहता, आम्हीच जवळच्या शाळा आणि संस्थांना भेट देण्याची योजना आखली. या योजनेनुसार गांभीर्याने हा प्रश्न सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

इतक्या मोठ्या आणि प्रतिष्ठित क्रीडा संकुलात उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची कमतरता ही सर्वांसाठीच चिंतेची बाब होती. या परिस्थितीत, चेंबूरमधील एका कंपनीत काम करणाऱ्या श्री. छत्रे यांची मुलगी अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये जिम्नॅस्टिक्सचे शिक्षण घेण्यासाठी आलेली पहिली विद्यार्थिनी. विद्यार्थ्यांना क्रीडा संकुल आणि जिम्नॅस्टिक्स सेंटरबद्दल माहिती देण्यासाठी स्वतःची कार वापरून दोन दिवस अंधेरीतील दोन डझनहून अधिक शाळांना भेट दिली. अखंड प्रचार केला. विजया आणि शाळेच्या मुख्याध्यापकांसह विद्यानिधी स्कूलचे प्राचार्य श्रीराम मंत्री यांनी या प्रयत्नात

माझ्यासोबत राहून पूर्ण सहकार्य केले. आम्ही विलेपार्ले येथील लोकमान्य सेवासंघापासून ते प्रबोधनकार ठाकरे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सपर्यंत शाळा, महाविद्यालये आणि क्रीडा संघटनांना भेटी देत राहिलो. आमच्या काही विद्यार्थ्यांनी शालेय विद्यार्थ्यांमध्ये जिम्नॅस्टिक्सबद्दलची उत्सुकता आणि आकर्षण निर्माण करण्यासाठी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकेही केली. या अथक प्रयत्नामुळे अखेर काही विद्यार्थी मिळाले आणि कसेतरी या केंद्राच्या जिम्नॅस्टिक्स शाखेची सुरुवात झाली.

श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराच्या सुहास लोहार आणि जगदीश शिर्के या सरकारी प्रशिक्षकांनीही या उपक्रमाला पाठिंबा दिला. नंतर हरीश परबदेखील या कामात सामील झाले.

खरं तर जेव्हा आम्हाला अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि बृहन्मुंबई जिल्हा जिम्नॅस्टिक्स असोसिएशनसोबत काम करण्याचा प्रस्ताव मिळाला होता, तेव्हा आम्ही त्यांना पूर्वीच्या अनुभवांवर आधारित लिखित स्वरूपात कागदोपत्री करार करण्याची विनंती केली. पहिला करार १९९७ मध्ये झाला होता. सरकारी आवश्यकतेनुसार या कराराचे दर दोन वर्षांनी नूतनीकरण करणे आवश्यक होते. आम्हाला तत्कालीन महापौर श्री. मनोहर जोशी यांचे पूर्ण सहकार्य मिळाले आणि त्यानंतरच कागदपत्रांची पूर्तता झाली. अशाप्रकारे दोन्ही संघटनांमधील करार तीन वेळा करावा लागला होता. तथापि नवीन अधिकारी आणि नवीन महापौर कराराला विलंब करू लागले. वारंवार पाठपुरावा केल्यानंतर, त्यांनी आपला विरोध व्यक्त करत म्हटले, ''तुम्ही असे काही मागे लागला आहात की जणू ऑलिंपिकमध्ये पदकंच जिंकणार आहात?'' असे कुत्सित टोमणे आम्हाला सहन करावे लागले. सरकारी विभागाकडून अशा निराशाजनक वागणुकीमुळे आमचे मनोबल खचत होते. याव्यतिरिक्त, आम्हाला क्रीडा संकुलातील अधिकाऱ्यांनी बोलावलेल्या बैठकीसाठी चेंबूरहून अंधेरीला प्रवास करावा लागायचा. मला तेथील बैठकांचे इतिवृत्तदेखील लिहावे लागायचे. एकंदरीत काय तर आम्हाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागायचे. एकदा तर आम्ही शुल्क वाढीबाबत अधिकाऱ्यांसमोर प्रस्ताव ठेवला. त्यांनी स्वीकारला नाही. एक प्रकारे आम्हाला अपमानास्पद परिस्थितीचा सामना करावा लागत होता. असे असूनही आम्ही

क्रीडा क्षेत्राच्या प्रगतीसाठी हे सर्व सहन करत राहिलो. सरकारने कोणताही निधी जारी केला नव्हता त्यामुळे पहिल्या तीन वर्षांसाठी, तेथील प्रशिक्षकांचे पगार (वेतन) श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरच्या खात्यातून धनादेशाद्वारे दिले जात होते.

BDGA आणि सरकारी योजनेनुसार अंधेरी क्रीडा संकुलात परदेशी क्रीडा साहित्याचा समावेश करावा, अशा सूचना पालकांकडून येऊ लागल्या. त्यासाठीच तर स्टेडियमची स्थापना झाली होती.

१९९२ पासून GFI सोबत या संदर्भात पत्रव्यवहार केला जात होता. याचा अर्थ असा की पत्रव्यवहार आणि केंद्राचे व्यवस्थापन इत्यादी कामे आता नव्याने आमच्यावर येऊन पडली होती. भारत सरकारच्या २५:७५ योजनेनुसार, त्यावेळी आम्हाला बारा लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता होती. त्यासाठी अनेक खासदारांकडून खासदार निधी मिळवण्याचा प्रयत्नही केला, मात्र त्याला यश मिळाले नाही. तेव्हा मा. उमा भारती या केंद्रीय क्रीडा मंत्री होत्या. आम्ही श्री. प्रमोद महाजन यांची भेट घेतली आणि आमच्या व्यथा मांडल्या. यानंतर श्री. राम मंत्री यांच्यामार्फत, आम्ही श्री. वेदप्रकाश गोयल यांच्याशी संपर्क साधला आणि तासाभरात त्यांनी राज्य जिम्नॅस्टिक्स संघटनेच्या नावाने बारा लाख रुपयांचा खासदार निधी मंजूर केला, ज्याची आम्ही कल्पनाही केली नव्हती! २००३ मध्ये दिल्लीतून मिळालेल्या या निधीचा अंधेरी येथील केंद्रासाठी विनियोग करण्यात येणे अपेक्षित होते.

१९९२ एशियाड (दिल्ली) क्रीडा महोत्सवादरम्यान आमची श्री. राम मंत्री यांच्याशी ओळख झाली. श्री. वेदप्रकाश गोयल या राष्ट्रीय मंत्री महोदयांचे खूप सहकार्य मिळाले, जे आम्ही कधीही विसरू शकत नाही. निधी आला होता मात्र अंधेरी क्रीडा संकुलातील प्रशासकांच्या दुर्लक्षामुळे क्रीडा साहित्य अद्याप आले हाती मिळाले नव्हते, ही दुर्दैवी बाब होती. आता एका वेगळ्या प्रकारची काळजी आम्हाला सतावू लागली होती. पण या केंद्रातून अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेणारे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार होत असल्याचे समाधान आहे. हळूहळू जिल्हा संघटनेच्या प्रयत्नांना बगल देत ललित कला प्रतिष्ठानतर्फे हे केंद्र संचलित केले जाऊ लागले.

सर्व समस्या आणि अपमानास्पद परिस्थिती असूनही, श्री. राम मंत्री आणि श्री. वेदप्रकाश गोयल यांच्याकडून मिळालेले सहकार्य आणि पाठिंबा आम्ही आजपर्यंतच्या आयुष्यात विसरू शकलो नाही.

दरम्यान २००१ मध्ये चेंबूरच्या गांधी मैदानावर श्री पवनपुत्र च्या द्वैवार्षिक मल्लखांब आणि जिम्नॅस्टिक्सच्या निमंत्रित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यांची यशस्वी सांगता झाली जी मनाला समाधान देऊन गेली.

तितक्याच मोठ्या उत्साहाने पार पडलेल्या या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी आम्हाला अमेरिकेत राहणाऱ्या, श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराच्या माजी खेळाडू डॉ. संजय जोशी यांच्याकडून एक लाख रुपयांचे देणगी स्वरूपात सहाय्य मिळाले, त्यापैकी पुढील तीन वर्षात ऐंशी हजार रुपये अंधेरी क्रीडा संकुलावर खर्च झाले. पण २००४ नंतर सत्तेत आलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आम्हाला अंधेरी क्रीडा केंद्राचा चक्क बाहेरचा दरवाजा दाखवला. आम्ही श्री. मनोहर जोशी यांची भेट घेतली आणि आमची समस्या त्यांच्यापुढे मांडली. पण तेही प्रकरण वर्षानुवर्षे पुढे सरकत राहिले त्यावर कोणताही ठोस निर्णय झाला नाही. दरम्यान, श्री. पंत यांनी आम्हाला सांगितले की अंधेरी केंद्रातील कोणीही पैशांबाबत आमचे काहीच ऐकून घेणार नाही. शेवटी तसेच झाले. अक्षरशः आम्हाला अंधेरी केंद्रातून काढता पाय घ्यावा लागला. हे असे ठिकाण होते ज्याच्या स्थापनेसाठी आम्ही अथक प्रयत्न केले होते. प्रचंड पैसा ओतला होता. ते केंद्र नव्याने सुरू झाले परंतु आमच्या पदरी एक प्रकारची निराशा पडली. केंद्राचे कामकाज आमच्या माजी खेळाडूंवर सोपवून आम्हाला आमच्या रिकाम्या हाताने परतावे लागले. ही आमच्यासाठी खूप दुःखद घटना होती.

तथापि हरीश परब आणि सुहास लोहार यांच्यात मतभेद निर्माण झाले आणि नंतर पवनपुत्र येथील माजी मल्लखांब खेळाडू सुहास लोहार यांनी या केंद्राचे व्यवस्थापन हाती घेतले. अंधेरी केंद्रात तिथे नेऊन उभारण्यात आलेली जिम्नॅस्टिक्स चेंबूरच्या पवनपुत्रची उपकरणे तशीच राहिली. श्री पवनपुत्र आणि जिल्हा संघटनेची नावे अंधेरी क्रीडा केंद्रातून पूर्णपणे काढून टाकण्यात आली होती. आम्ही क्रीडा क्षेत्रातील प्रेमासाठी अनेक दुःखे सहन केली

त्यापैकी हाही एक दुःखद अनुभव मनावर कायमचा कोरला गेला.

आता दरवर्षी उत्तर कोकणात असलेल्या लोखंडवाला कॉम्प्लेक्स येथे तीनशे पन्नासहून अधिक खेळाडू अंधेरी क्रीडा संकुलात प्रशिक्षण घेतात, याचा मात्र आजही अभिमान वाटतो! आमचे प्रयत्न वाया गेले नाहीत याचा आनंद आहे. या केंद्राची देखरेख हरीश परब यांच्यासह सुहास लोहार, प्रकाश रेवाळे करायचे.

प्रबोधन क्रीडा केंद्र, अंधेरी यांनी कठोर परिश्रम घेतले. खेळाडू घडवले. २०१० नंतर या केंद्रातील अनेक मुलींना शिवछत्रपती पुरस्कारही मिळाला, जी आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट होती. नंतर या केंद्राच्या नीलम बाबर देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रबोधनकार ठाकरे केंद्रात क्रीडा उपक्रमदेखील सुरू झाले. वसुंधरा भोसले यांनी नवीन खेळाडूंना प्रशिक्षण देण्यासाठी शिक्षकांना तयार करण्याचे काम केले. यापैकी काही शिक्षकांनी नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण केली आणि शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षक म्हणून काम केले. आम्हाला असेही कळले की या केंद्राशी संबंधित अनेक मुले, लहानपणी स्पर्धांमध्ये सहभागी झाली होती. संगणकीकरणाद्वारे मुलांची क्षमता चाचणी (Ability Test) ही ऑस्ट्रेलियन पद्धत वापरून करण्याची सुविधा चंद्रशेखर पाटील यांनी उपलब्ध करून दिली जे न्यूझीलंड येथे राहतात. प्रफुल्ल ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लोकमान्य सेवा संघात जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षणदेखील सुरू करण्यात आले. असे उपक्रम विविध ठिकाणी सुरू आहेत, जे माझ्यासारख्या क्रीडा कार्यकर्त्यासाठी एक आनंददायी अनुभव होता. अशा उपक्रमांना क्रीडा प्रतिनिधी आणि क्रीडा प्रशिक्षकांनी सतत पाठिंबा दिला आहे.

वरील गोष्टींचा उल्लेख करण्याचा उद्देश फक्त एवढाच आहे की मुंबईतील अंधेरी येथील लोखंडवाला कॉम्प्लेक्स एक उच्चभ्रू क्षेत्र होते आणि अजूनही आहे. परदेशाहून परतलेल्यांचे पालक अनेक वर्षांपासून चांगल्या सुसज्ज क्रीडा केंद्राची मागणी करत होते. त्यांचे स्वप्न सत्यात उतरले आहे. हे केंद्र पाहून अनेक भारतीय आणि परदेशी क्रिकेटपटूंनी त्याचे कौतुक केले, परंतु त्यांनी आणखी सुयोग्य आधुनिकीकरणाचा सल्लाही दिला, जो सरकारी धोरणे आणि दुर्लक्षामुळे अपूर्ण राहिला आहे. ही आमच्यासाठी उपेक्षेची बाब

आहे. जर आमच्या खेळाडूंसाठी पुरेशा सुविधा नसतील तर ते आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये कसे चांगले प्रदर्शन करतील? अशा परिस्थितीत आमचे खेळाडू विकसित देशांतील खेळाडूंशी स्पर्धा करू शकणार नाहीत.

खेळाडूंची तुलना करणे किती प्रमाणात योग्य आहे? फोम पिट्स किंवा सेफ्टी बेल्टचा अभाव ही अनेक वर्षांपासून एक समस्या आहे आणि जिल्हा संघटना १९९२ पासून त्यांची मागणी करत आहे. संघटनेने खासदार निधी मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत, परंतु तेव्हा त्यांना यश मिळालेले नाही. यामुळे तेथील क्रीडा उपक्रमांना आवश्यक गती मिळण्यास अडथळा निर्माण झाला आहे आणि आजही ही बाब खेदजनक आहे.

२००० ते २०२५ पर्यंत, आपण २५ वर्षांनंतरही तिथेच आहोत. जिम्नॅस्टिक्सच्या बॅनरवर ''जिम्नॅस्टिक्स ही सर्व खेळांची जननी आहे'' असे कॅप्शन दिसते, पण ते इतर कोणत्याही क्रीडा बॅनरवर का दिसत नाही? माझ्यासाठी ही वैचारिक त्रास देणारी बाब आहे. कोणताही नवीन उपक्रम सुरू करताना अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. अंधेरी केंद्राबाबतही असेच घडले. प्रशिक्षकांची कमतरता वारंवार एक समस्या बनली. मुले आणि त्यांचे पालक नवीन शिक्षकांशी जुळवून घेऊ शकले नाहीत. म्हणून, जिम्नॅस्टिक्सऐवजी, त्यांनी टेबल टेनिस आणि बॅडमिंटनसारख्या तेथे उपलब्ध असलेल्या इतर क्रीडा सुविधांचा फायदा घेतला. हे एका प्रकारे योग्य होते. आम्ही अनेक वेळा सुचवले आहे की नेट-सेट परीक्षेसाठी सध्या असलेल्या प्रमाणेच क्रीडा प्रशिक्षकांसाठीही अशीच एक प्रणाली लागू करावी, परंतु अद्याप कोणताही अर्थपूर्ण निष्कर्ष निघालेला नाही. नेट-सेट परीक्षेतून पात्र ठरलेल्या क्रीडा पार्श्वपिठीका असणाऱ्या खेळाडूंना दिले जाईल आणि यामुळे अनेक लोकांना प्रशिक्षक किंवा प्रशिक्षका म्हणून नोकऱ्या मिळतील. अशा प्रकारे, खेळांच्या माध्यमातून नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील. ही एक मोठी प्रगती असू शकते.

■

२१. कालाय तस्मै नमः

२००५ नंतर, अंधेरी क्रीडा संकुलात मी व्यस्त राहिल्यामुळे श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराकडे योग्य लक्ष देऊ शकलो नाही. म्हणून २००९ मध्ये, आम्ही चेंबूरमध्ये राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या, ज्यामुळे विद्यार्थी आणि खेळाडूंना नवीन उत्साहाने पुन्हा जोमाने प्रोत्साहन मिळेल. म्हणून मी पुन्हा एकदा स्वतःला समर्पित केले आणि पवनपुत्रावर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले. भाऊ जांबवलीकर त्यावेळी श्री पवनपुत्राचे अध्यक्ष होते. खूप मेहनत घेऊन या स्पर्धा यशस्वीरित्या पार पडल्या. खेळाडूंना खूप प्रोत्साहन मिळाले. डॉ. सुनील हरुळकर देखील पवनपुत्र संघटनेत सामील झाले होते, ज्यामुळे आमचा भार काहीसा हलका झाला. २००८ मध्ये मी त्यांच्यासोबत जिम्नॅस्टिक्स आणि इतर कामांसाठी आठ वेळा झाशी (पंडोखर सरकार) येथे गेलो. त्यांनी आमचे घर, श्री मल्हार निवास येथेदेखील भेट दिली. स्वामी महाराजांच्या आशीर्वादाने, शेट्टी यांनी स्पर्धेसाठी २.२५ लाखांची देणगी दिली. मैदानावरील पेव्हर ब्लॉकच्या कामासाठी प्रादेशिक आमदार चंद्रकांत हंडोरे यांच्या आमदार निधीतून १.५ दशलक्ष अनुदान मंजुर झाले. या आर्थिक मदतीमुळे आमचे मनोबल पुन्हा एकदा वाढले.

मी वर उल्लेख केला आहे की अंधेरी क्रीडा संकुलाच्या व्यवस्थेचे

व्यवस्थापन करणे खूप त्रासदायक होते. जिल्हा संघटनाही त्यांच्या कामासाठी योग्य वेळ देऊ शकली नाही. माझ्या अनुपस्थितीत तेथील काम अनियमित झाले होते, हे माझ्या लक्षात आले. काही दिवसांनी महापौर चषक स्पर्धेची घोषणा झाली आणि मला त्याची जबाबदारी सोपवण्यात आली. थोडक्यात, अनेक क्रीडा संघटनांच्या जबाबदाऱ्या सांभाळताना, मी पवनपुत्रांकडे योग्य लक्ष देऊ शकलो नाही. शिवाय, आमच्या MAGA च्या वार्षिक सभांच्या वेळी पवनपुत्रच्या विद्यार्थ्यांनी MAGA च्या काही धोरणांना विरोध करण्यास सुरुवात केली होती. त्यांना औरंगाबाद आणि ठाणे जिल्हा संघटनांचा पाठिंबा होता. कानसिंग राठोड (राजस्थान) देखील त्यांना पाठिंबा देत असावेत अशी शक्यता आहे. एका रात्री, सुधीर जोशी औरंगाबादवरून अचानक चेंबूरला आले आणि कार्याध्यक्षपदाचा राजीनामा दिला. श्री. पंत सर देखील शारीरिकदृष्ट्या थकले होते आणि त्यांची तब्येत बिघडत होती. असे असूनही, त्यांना जवाहर विद्या भवनचे उपक्रम सुरू ठेवायचे होते. दरम्यान, आमचे स्टार खेळाडू जयंत गायकवाड यांचे किरकोळ आजाराने निधन झाले, जी आमच्यासाठी खूप दुःखद घटना होती. गटबाजीमुळे सुनील गंगावणे आणि आशिष सावंत (प्रशिक्षक) यांनीही श्री. पवनपुत्रचे काम सोडले. याचा अर्थ असा की एकाच वेळी इतक्या प्रतिकूल परिस्थिती उद्भवल्या की मला लगेच त्यांचा सामना करणे कठीण झाले. परिस्थिती अशी आली की पवनपुत्र व्यायाम मंदिर अनेक महिने प्रशिक्षकाशिवाय कार्यरत राहिले. शेवटी, मी पुन्हा माझ्या खांद्यावर पॉवर लिफ्टिंगची जबाबदारी घेतली आणि काम चालू ठेवले. श्री पै सर माझ्यासोबत होते, कोणत्याही पगाराशिवाय काम करत होते. यावरून त्यांची खेळाबद्दलची आवड दिसून येते. संकटाच्या त्या वेळी ते माझ्यासोबत होते. आज मला याचा अभिमान वाटतो. ते खेळाडूंना वेटलिफ्टिंगचे/पॉवर लिफ्टिंगचे प्रशिक्षण देत असत.

मला एक प्रसंग आठवतो – सुमारे २० वर्षांपूर्वी, गुर्जर, ढोले, अतुल कर्णिक अंधेरी आणि मी पुण्यातील महाराष्ट्र मंडळात मुलांच्या प्रशिक्षणाविषयी चर्चा करत होतो. गुर्जर सरांनी असे म्हटले होते की महापालिकेने सार्वजनिक बागांमध्ये बसवलेले क्रीडा साहित्यही ही जिम्नॅस्टिक्सची क्रीडा साधने आहेत. आम्ही त्यांचा येथे चांगला वापर करत नाही. त्यावेळी मी त्यांच्याशी पूर्णपणे

सहमत नव्हतो. काही काळानंतर, जेव्हा मी कुर्ला आणि नेहरू नगरमध्ये तीन-चार बागा पाहिल्या तेव्हा गुर्जरच्या बोलण्याने मला धीर मिळाला. काही वर्षांपूर्वी मी शेगाव येथील संत श्री गजानन महाराजांच्या आनंदवनातही अशीच बाग उपकरणे पाहिली होती. आजकाल अनेक बागांमध्ये हिरवीगार हिरवळदेखील लावली जाते. पण आपल्यापैकी किती जणांना याची उपयुक्तता माहीत आहे की ही जिम्नॅस्टिक्सची उपकरणे आहेत? माझ्यासारख्या प्रशिक्षकालाही हे खूप नंतर कळले. तरीही, मी असेही सुचवतो की लहान उंचीचे मल्लखांब देखील बागेतील उपकरणे म्हणून बसवावेत.

जेव्हा एखादा प्रकल्प खंडित होतो तेव्हा तो पुन्हा सुरू करणे खूप आव्हानात्मक असू शकते. मी हे अनुभवले आहे, परंतु दृढनिश्चय आणि उच्च मनोबलाने, अपूर्ण काम पुन्हा सुरू करता येते. अशी अनेक उदाहरणे आपल्याला आपल्या आजूबाजूला सापडतील. मी माझ्या आयुष्यात अशा अनेक आव्हानांना तोंड दिले आहे आणि पूर्ण आत्मविश्वासाने मी पुन्हा कामाकडे वळलो. आपल्याकडे ''पुनश्च हरी ओम'' म्हणण्याची परंपरा आहे. कोणत्याही परिस्थितीत, सर्वकाही आपल्या इच्छेनुसार करता येत नाही! तरीही, तडजोड करत पुढे जाणे हे लवचिकतेचे लक्षण आहे. आपण परिस्थितीवर मात करून पुढे जात राहिले पाहिजे. सरकारी यंत्रणेकडून आपल्या अपेक्षा अपूर्ण राहिल्या आहेत हे दुःखद असले तरी, आपण कधीही आपल्या ध्येयापासून विचलित झालो नाही. आजही, भारतात खेळांसाठी किमान सुविधांचाही अभाव आहे. काही ठिकाणी, त्या योग्यरित्या अंमलात आणल्या जात नाहीत.

या तंत्रज्ञानाच्या युगात, गुगल आणि युट्यूब कोणत्याही विषयाची माहिती देऊ शकतात, परंतु ते परिपूर्ण प्रशिक्षण देत नाहीत. मी असे काही प्रशिक्षक पाहिले आहेत ज्यांना खेळाडू म्हणून कोणतेही यश मिळाले नाही, परंतु ते गुगल आणि युट्यूबवरून ज्ञान मिळवून प्रशिक्षक बनले आहेत. अशा अर्धवट काम करणाऱ्या व्यक्तींनी अनेक आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपले नाव कमावले आहे यामुळे मोठे नुकसान झाले आहे. याला मुलांच्या भविष्याशी छेडछाड म्हणता येईल. ही चिंतेची बाब आहे. भाषाशास्त्राचे शिक्षण घेण्यापूर्वी, शाळांमध्ये मुलांना प्रथम अक्षरे, नंतर शब्दसंग्रह, नंतर वाक्य रचना, परिच्छेद लेखन आणि शेवटी कथा किंवा निबंध लेखन

शिकवले जाते. शिक्षणाचा हा क्रम आहे. खेळांमध्येही असाच क्रम पाळला जातो, त्याच प्रकारच्या पायऱ्यांसह. पण या पायऱ्यांना मागे टाकून काही लोक थेट तज्ञ खेळाडू तयार करण्याचा आणि प्रशिक्षण देण्याचा दावा करतात. हे किती न्याय्य आहे? अशा खेळाडूंचे भविष्य काय असेल? आज माझ्यासमोर हे एक मोठे प्रश्नचिन्ह आहे. करावके गाऊन कोणी महान गायक बनू शकतो का? म्हणजे, प्रत्येक कलेचे स्वतःचे शास्त्र असते आणि त्यामागे तपश्चर्या असते. यशासाठी खूप सराव (रियाज) आणि सातत्य आवश्यक असते. जे सातत्याने सराव करतात तेच यशाच्या शिखरावर पोहोचतात. कोणत्याही क्षेत्रात प्रभुत्व मिळविण्यासाठी, एखाद्याला तपश्चर्येच्या काळातून जावे लागते. शॉर्टकट तात्पुरते यश मिळवू शकतात, परंतु त्या कलेत तज्ज्ञ होऊ शकत नाही.

मी येथे या गोष्टींचा उल्लेख फक्त एवढ्यासाठी करतो की तो काळ असा होता जेव्हा महाराष्ट्रात जिम्नॅस्टिक्स पूर्णपणे रुजले नव्हते. काही जिल्ह्यांमध्ये काम सुरू होते, परंतु त्यांनाही प्रशिक्षकांची कमतरता भासत होती. श्री पवनपुत्र व्यायामशाळा ही एक जुनी संस्था होती आणि तिचे वरिष्ठ विद्यार्थी माझ्या अनुपस्थितीत काम करत होते. पवनपुत्रांचा आसन, मल्लखांब आणि जिम्नॅस्टिक्समध्ये मजबूत पाया होता. तरीही, एक वेळ अशी आली जेव्हा पवनपुत्रांनाही प्रशिक्षकाशिवाय काम करावे लागले. वयानुसार, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेण्याचा माझा उत्साह आणि नवोपक्रमाची माझी इच्छा हळूहळू कमी होत गेली. परिणामी, मी माझ्या खांद्यावरून जबाबदारीचे ओझे हलके करू लागलो आणि ती माझ्या माजी विद्यार्थ्यांवर सोपवू लागलो. काही वर्षांनंतर, मला कळले की हे विद्यार्थी त्यांच्या नोकऱ्या सोडून आता स्वतःच्या खाजगी संस्था उघडत आहेत! स्वामित्व हे कोणालाही आवडणारी गोष्ट आहे यात काहीही चुकीचे नाही. भक्ती, त्याग आणि पूर्ण ज्ञानाचा अभाव असूनही संस्था स्थापन करणे आणि त्यायोगे विद्यार्थ्यांना चुकीचे प्रशिक्षण देणे म्हणजे कोणत्याही शिक्षणाचे व्यापारीकरणच नाही का? या वयात असे सर्व पाहायला मिळत आहे. ही परिस्थिती निश्चितपणे समाधानकारक नाही. कालाय तस्मै नमः

■

२२. डी-८० चेंबूर गावठाण अर्थात श्री मल्हार निवास

बदलत्या काळानुसार मुंबई महानगर आणि त्याच्या उपनगरांमध्ये विकासाचे काम वेगाने सुरू होते. तरीही मला आठवतेय की विकासाच्या या वेगवान प्रवाहात चेंबूर गाव मात्र जणू काही दोनशे वर्षांपूर्वीच्या स्थितीतच आहे. मुंबईचा झपाट्याने विकास होत होता तरीही मुंबईमधील अनेक गावे, कोळीवाडे आणि जीर्ण जुन्या चाळी विकासाच्या मुख्य प्रवाहापासून अजूनही खूप दूर आहेत. गावठाणमध्ये शिरल्यावर एखाद्या गावात शिरल्याचा निश्चितपणे भास होतो. आजही गावठाणात इथली जुनी घरे, वाडे, देवळे, विहिरी शंभर वर्षांहूनही जुन्या स्थितीतच आहेत. शेवटी शंभर-दीडशे वर्षांची जुनी घरे किती काळ टिकू शकतील? जुन्या चाळी कशा काय तग धरू शकतील? त्यांनाही एक कालमर्यादा आहेच! सांडपाणी व्यवस्था, गटार वाहिन्या, पाणीपुरवठा आणि शौचालये यांची अवस्था दिवसेंदिवस वाईट होत चालली होती. एकीकडे मुंबईभर गगनचुंबी इमारती उभ्या राहत होत्या आणि दुसरीकडून अगदी त्यांना टेकूनच असंख्य झोपडपट्ट्या कशातरी तग धरून उभ्या आहेत. याच चेंबूर गावठाण संकुलात, 'श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर' आहे तेही हळूहळू मोडकळीस येत आहे हे आम्हाला जाणवत होते. थोडक्यात एकविसाव्या शतकातही, या वस्त्यांमध्ये राहणाऱ्यांचे जीवन अगदी

गावातल्यासारखेच आहे, असे म्हणायला हरकत नाही. या वस्त्यांच्या विकास साधण्यासाठी असंख्य प्रयत्न केले गेले परंतु सामाजिक आणि भौगोलिक अडचणी अडथळा ठरत होत्या आणि आजही तीच परिस्थिती आहे. मुंबईसारख्या महानगरासाठी ही एक मोठी समस्या आहे. मला वाटते की सरकारने अर्थपूर्ण योजनेअंतर्गत त्यांचा पुनर्विकास करण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. आवश्यक असल्यास, कठोर निर्देशदेखील जारी केले पाहिजेत! विकासाच्या दृष्टीने विचारपूर्वक प्रयत्न केले तर नक्कीच तोडगा निघेल. अजूनतरी आम्ही प्रतीक्षेतच आहोत!

माझे बालपण याच चेंबूर भागातील गावठाण या भागात गेले. इथेच माझा जन्म झाला आणि इथेच मी लहानाचा मोठा झालो त्यामुळे स्वाभाविकपणे या जमिनीशी माझे अतूट जुळलेले नाते आहे. या भागावर माझे प्रचंड प्रेम आहे. माझ्या घराची वास्तू आणि वास्तूचाच एक भाग असलेले श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर आणि गावठाणावर माझे पहिले प्रेम आहे. माझी मातृभूमी माझी कर्मभूमी आहे. माझ्या वडिलांनी आणि त्या काळातील सामाजिक कार्यकर्त्यांनी त्याचा पुनर्विकास करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले होते, ते अयशस्वी ठरले.

१९८२ च्या आशियाई खेळांच्या काही दिवस आधी, काही झोपडपट्टीवासीयांनी श्री पवनपुत्र व्यायामशाळा असलेल्या डी-८० गावठाण येथील मोकळ्या जागेवर बेकायदेशीरपणे कब्जा केला होता. त्यांच्याविरुद्ध न्यायालयीन खटला अनेक वर्षे चालला होता. माझ्या वडिलांनी सामाजिक दृष्टिकोनातून काही गरीब, निराधार आणि मजुरांना व्यायामशाळेच्या आवारात राहण्याची परवानगी दिली होती. त्यांनी कल्पनाही केली नव्हती की हे लोक नंतर झोपडपट्ट्या बांधून जागा व्यापतील. ते जिवंत असताना त्यांचे वर्चस्व होते, परंतु परिस्थितीने वेगळेच वळण घेतले आणि आम्हाला न्यायासाठी न्यायालय गाठावे लागले. शेवटी न्यायालयाने या झोपडपट्ट्यांबाबत एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला जो आमच्या नशिबाने आमच्या बाजूने लागला, त्या अंतर्गत झोपडपट्ट्या हटवण्यात आल्या. ही एक महत्त्वाची घटना होती. कायदेशीर कारवाईत माझी पत्नी विजया हिचा मोठा पाठिंबा होता. तिने जिद्दीने या सगळ्याचा पाठपुरावा केला होता. तिने कायम माझ्या पाठीशी

उभे राहून पत्नीधर्म निभावला. न्यायालयीन नोटीस (Bailiff) मिळवण्यापासून ते पोलिसांची मदत घेणे आणि आवश्यक कागदपत्रे मिळवणे ती योग्य प्रकारे लावून त्याच्या फाईल्स तयार करणे इत्यादी सर्व कामांमध्ये तिने माझ्या इतकाच सहभाग नोंदवला होता. व्यवसायाने सीए (C.A.) असलेले आमचे मित्र श्री. आनंद सांडू, यांनी आमच्या डी-८० च्या जमीन मालमत्ता विभागणीबद्दल सविस्तर मार्गदर्शन तर केलेच परंतु शेवटपर्यंत आम्हाला पाठिंबा आणि दिलासा दिला.

१९८०च्या सुमारास आमची विद्यार्थिनी मीनल देशपांडे हिला आंतरराष्ट्रीय स्तरावर पहिली भारतीय महिला पंच (Judge) होण्याचा मान मिळाला. ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. तिचे पती अरविंद म्हात्रे यांनी डी-८० गावठाण साठी एक नवीन योजना तयार केली आणि ती आम्हाला समजावून सांगितली ज्यामध्ये ही जागा ०.५ एफएसआय (FSI) क्षेत्रांमध्ये कशी विभागली जाऊ शकते, याची तपशीलवार माहिती दिली. दत्ताराम, रामकृष्ण, रामनाथ यांच्याबरोबर तसेच मी कुटुंबातील इतर सदस्यांबरोबर श्री मल्हार निवासाच्या पुनर्विकासाबाबत अनेक वेळा चर्चा केली पण ती निष्फळ ठरली. प्रत्येकजण आपापल्या स्वार्थापायी अडथळे निर्माण करत होता. ही परिस्थिती फक्त आमच्या कुटुंबातच नव्हती, तर गावातील बहुतेक कुटुंबांमध्ये होती. माझे मोठे काका दत्ताराम यांचे १९८० मध्ये निधन झाले आणि १९८४ मध्ये माझ्या वडिलांना अर्धांगवायू झाला. जवळजवळ आठ वर्षे आम्ही त्याच्या उपचारासाठी जसलोक आणि केईएम रुग्णालयात फेऱ्या मारत होतो. उपचारासाठी खूप मोठा खर्च झाला पण यश आले नाही. विजया आणि माझी धाकटी मावशी रेवती महंत यांनी त्यांची काळजी घेण्यात कोणतीही कसर सोडली नाही. सदानंद (भाऊ) जांबवलीकर यांनीही अधूनमधून मदत केली. माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर कुटुंबातील तणाव वाढला. इतर कुटुंबांप्रमाणेच अनिशा आणि विजया यांच्यातील घरगुती तणाव वाढला. शेवटी कंटाळून माझ्या आईच्या इच्छेविरुद्धच एकाच घरात दोन वेगळ्या चुली पेटवाव्या लागल्या. शिवाय वडिलोपार्जित घर, श्रीमल्हार निवासदेखील विभागले गेले. दोन भागात फक्त माणसे नाही तर माणसांची मनंसुद्धा विभागली गेली. कौटुंबिक मतभेद सोडवणे आवश्यक होते, जे

विभाजनाशिवाय अशक्य होते. कोणत्याही कुटुंबाचे विभाजन कधीच आनंददायी नसते तसे आमचेही नव्हते.

चेंबूर गावठाण येथील आमचे वडिलोपार्जित घर, श्री मल्हार निवास सुमारे तेरा गुंठे जमिनीवर व्यापलेले आहे. जिथे बावीस खोल्या आहेत. परंतु तिथे आता फक्त पाच जण राहतात. काही खोल्या रिकाम्याच आहेत जिथे तो भूतबंगला समजून कदाचित आमच्या कुटुंबातील मृत माणसे राहात असावेत! कारण मला धरून घरातल्या सगळ्यांनाच तो बंगला प्रिय आहे. माझी जन्मभूमी आणि कर्मभूमी, चेंबूर गावठाण सोडून मला जवळजवळ आठ वर्षे झाली आहेत. व्यायामशाळेची सर्व कागदपत्रे, महत्त्वाचे संग्रह आणि असंख्य छायाचित्रे अजूनही त्याच श्रीमल्हार निवासात आहेत. श्री मल्हार निवास जीर्ण होत चालले आहे. त्याची अवस्था वाईट आहे. एकीकडे मुंबईचा जलद विकास होताना आपण सर्व पाहत आहोत आणि दुसरीकडे माझे प्राणप्रिय डी-८० गावठाणची जीर्ण अवस्था पाहून मी रोज अस्वस्थ होत आहे.

मुंबईच्या विकासाबरोबर आता चेंबूरमध्ये गगनचुंबी टॉवर्स निर्माण होत आहेत. एक नवीन संस्कृती विकसित होत आहे. रस्ता रुंदीकरण, नवनवीन उड्डाणपूल, मॉल्स आणि टॉवर्स वाढतायेत. तरीही मुंबईतील काही भागात, वारसा स्थळे (Heritage sites) असे गोंडस नाव देऊन काही माणसांचा विकास थोपवून धरला आहे आणि त्यांना मोडकळीस आलेल्या घरांमध्ये राहण्यासाठी भाग पाडले जात आहे. त्यांना मुंबईचे मूळ रहिवासी असे नाव दिले आहे. चेंबूरमधील गावठाण, कोळीवाडा, घाटला आणि काही निवडक चाळी सरकारच्या या वारसा स्थळे प्रकल्पात अडकून गेलेल्या आहेत. ही फक्त चेंबूरकरांचीच व्यथा नाही तर मुंबईतल्या असंख्य छोट्या गावसदृश भागातील गावकऱ्यांची व्यथा आहे. सरकारी नियमांनुसार, पूर्वी ०.५ ते आता १.५ किंवा २ चा एफएसआय (FSI) वाढवायचा असेल तर किमान १८ फूट रुंदीचा रस्ता असणे आवश्यक आहे. सध्याच्या परिस्थितीत यावर कोणताही उपाय नाही. चेंबूरमधील अशा भागातील स्थानिक रहिवाशी एकीकडे स्वार्थासाठी विकास नाकारत आहेत तर दुसरीकडे आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेल्यांना पुनर्विकास नको आहे. आमचे चेंबूर गावठाण पुण्यातील

जुन्या घरांप्रमाणे डिझाइन केलेले आहे. आज पुण्यातील जुन्या वस्त्यांचीही अशीच परिस्थिती आहे. हीच परिस्थिती केवळ मुंबईपुण्याचीच नसून देशातील सर्व जुन्या शहरांची असल्यामुळे ही एक राष्ट्रीय समस्या आहे, ज्याच्यावर कोणताच उपाय नाही.

अशा तऱ्हेने जेव्हा चेंबूर गावठाण पुनर्विकास प्रकरण काही वर्षे न्यायालयात प्रलंबित राहिले, परंतु त्यावर कोणताही तोडगा निघाला नाही. या पार्श्वभूमीवर वर्तमानपत्रे- मासिकांनी या प्रकल्पाबद्दल लेख आणि बातम्या प्रकाशित केल्या. सातत्याने याचे चर्वण केले जाते परंतु समस्या जैसे थी तशीच आहे. मुंबईच्या अर्ध्याहून अधिक भागाला ग्रासणाऱ्या या समस्येमुळे कुटुंबाचा विस्तार होत आहे मात्र नवीन पिढीसाठी त्याच छोट्याशा आणि अडचणीच्या जागेत राहणे दिवसेंदिवस आव्हान ठरत आहे. एकीकडे मुंबईतील झोपडपट्ट्यांचाही कासवांच्या गतीने का होईना हळूहळू पुनर्विकास होत आहे परंतु आमच्या घराच्या समस्येकडे सरकार कानाडोळा करत आहे. स्पष्ट शब्दात सांगायचे तर सरकारला आमची ही समस्या कधीच सोडवायची नाही असे दिसते आहे. यामागे एक खोल राजकीय अजेंडा आहे. दक्षिण मध्य मुंबईत एकेकाळी वीसहून अधिक कापड गिरण्या होत्या. मैलोनमैल पसरलेली या गिरण्यांची विस्तृत जमीन होती. कामगारांच्या संपानंतर जेव्हा या गिरण्या बंद पडल्या तेव्हा सरकारने हस्तक्षेप केला आणि त्यावर उपाय शोधला. आज याच गिरण्यांच्या जमिनीवर आलिशान इमारती, मॉल्स आणि व्यावसायिक केंद्रे दिमाखात उभे आहेत म्हणजे सरकारने विकास केला की विकासाचेही खोलवर राजकारण केले गेले आहे? असा विचार मनात येतो. हे सामान्य माणसाच्या समजण्याच्या क्षमतेपलीकडचे आहे. तेव्हा सरकारने गिरणी कामगारांसाठी घरांची घोषणा केली होती जेणेकरून हे सर्व कामगार घरांची वाट पाहत होते परंतु त्यांच्या पदरी निराशा आली. हक्काची नोकरी गेली आणि शिवाय ते बेघर झाले. ही एक प्रकारची शोकांतिका आहे. या शोकांतिकेला घेऊन साहित्यिकांनी कविता- कथा - दीर्घ कादंबऱ्या लिहिल्या. अनेकांनी त्याच्यावर नाटके बसवली. सिनेमांची निर्मिती केली. या सगळ्यांची भरभराट झाली परंतु कामगार मात्र न्यायाच्या अपेक्षेत वयपरत्वे हे जग सोडून गेले. त्यांच्या भावी पिढ्या मात्र अजूनही न्यायाची याचना करत

आहेत, हे किती दुर्दैवी आहे. राज्य सरकारच्या पूर्वीच्या क्रीडा महोत्सवाच्या आणि मल्लखांब जिम्नॅस्टिक्सच्या राज्य व राष्ट्रीय असोसिएशन व फेडरेशनच्या स्पर्धांच्या निमित्ताने मी संपूर्ण महाराष्ट्रसहित भारतही पिंजून काढला आहे त्यामुळे अनेक भागाशी माझा जवळकिचा संबंध आहे. दक्षिण मुंबई आणि दक्षिण मध्य मुंबईतील भायखळा परिसर, दादर, करी रोड या भागातील शेकडो चाळी आणि इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न हा आमच्यासारखाच अजूनही प्रलंबित आहे. या भागात मोठ्या संख्येने आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेले गिरणी कामगार किंवा त्यांची कुटुंबे राहतात. या भागात माझे येणे व्हायचे कारण येथे कबड्डी, खो-खो, शरीरसौष्ठव, जिम्नॅस्टिक्स, लेझीम, लोककला महोत्सव आणि कुस्तीसारख्या कार्यक्रमांचे केंद्र होते. लग्नकार्य आणि इतर उत्सवांच्या निमित्ताने लेझीम पथके, बँड पथके, शारीरिक कौशल्य, लोकनाट्य, शाहिरी-पोवाडा गायन, नाटके, दिंड्या, मिरवणुका आणि इतर तत्सम उपक्रम मोठ्या उत्साहात आयोजित केले जायचे. अतिशय मोकळेढोकळे वातावरण असायचे. प्रेमबंधुत्वाची प्रचिती यायची. श्रावण महिन्यात महिलांचे पारंपारिक सामूहिक खेळ, गाणी आणि नृत्य पाहण्यासाठी दूरवरून लोक यायचे. या नवीन युगात, आपण शिक्षणाद्वारे निश्चितपणे आधुनिक झालो असू शकतो, परंतु आपण आपल्या जुने सणवार, उत्सव, संस्कृती आणि चालीरीती विसरलो आहोत. मुख्य म्हणजे हे साजरे करण्याचे काय महत्त्व होते याचाच आपल्याला विसर पडला आहे. या उत्सवाच्या निमित्ताने माणसे एकत्र यायची. त्यांच्यात सुसंवाद व्हायचा. याशिवाय सामाजिकता आणि परंपरा जपली जायची. आज मोठ्या इमारतींमधील मर्यादित जागेत छोट्याशा अपार्टमेंटमध्ये आपण बंदिस्त झालो आहोत. अनेक पिढ्यांपासून पूर्वापार चालत आलेली आपली संस्कृती, परंपरा, नातेसंबंध आणि त्याची जपणूक आपण विसरत चाललो आहोत. आपल्या शेजारच्या घरात कोण राहते हेच आपल्याला माहीत नसते तर पुढे अडल्यानडल्या प्रसंगात आपण एकमेकांची मदत कशी घेणार? लोकांना पारंपारिक खेळांपेक्षा परदेशी खेळांमध्ये अधिक रुची निर्माण झाली आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्येही, शारीरिक शिक्षणाचा (P.T.) अभ्यासक्रमात तास दाखवलेला असतो परंतु तो केवळ नावापुरता उरला आहे! मुंबईतून मैदाने लुप्त होत आहेत. जुन्या व्यायामशाळा

आणि आखाडा संस्कृती व्यावसायिक वातानुकूलित व्यायामशाळांमध्ये रूपांतरित झाली आहेत. मुंबईचे मूळ रहिवासी आणि सामान्य जनता मुख्य शहरापासून दूर असलेल्या भागांमध्ये स्थायिक होण्यास स्थलांतरित होत आहेत. खरंतर त्यांना पैशाच्या लोभाने आपले जन्मस्थान सोडून जाण्यास भाग पाडले जात आहे. मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येमुळे, नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने माणसांना लोकल ट्रेनने रोज दूरचा प्रवास करावा लागतोय. एका नरकमय जीवनप्रवास चालू आहे. नवीन कॉर्पोरेट जग अवतरत आहे. या कार्पोरेट जगात मुंबईतील चित्रपट उद्योग, हॉटेल्स, पब, बार इ. वाढत आहेत हे चांगले किंवा वाईट याबद्दल मला कोणतेही मत व्यक्त करायचे नाही परंतु एक क्रीडा प्रशिक्षक म्हणून मी जेव्हा याकडे पाहतो तेव्हा लक्षात येते की या धावपळीच्या जगात माणसांना व्यायाम करायला वेळ नाही. पुरेशी झोप घ्यायलाही वेळ नाही. एक काळ असा होता जेव्हा सर्वसाधारणपणे माणसे दिवसाला सहा ते आठ तास काम करायची, सहा ते आठ तास निवांत झोपायची आणि दिवसभरातून तासभर तरी कोणता न कोणता व्यायाम करायची किंवा त्यांच्या दैनंदिन व्यवहारात त्यांना आपोआप थोडा तरी व्यायाम घडायचा. परंतु आता परिस्थिती बदलली आहे म्हणावं की बिघडली आहे, कळत नाही. कारण माणसे कमीत कमी दिवसाला दहा ते बारा तास काम करतात. चार ते पाच तास कसेतरी झोपतात. बाकीचा वेळ त्यांचा प्रवासात वाया जातो. परिणामी जिम, जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब, पारंपारिक उत्सव आणि खेळांसाठी कोणाहीकडे वेळच उरत नाही.

एकेकाळी फिटनेसचे साधन असलेले खेळ आता मनोरंजन आणि व्यावसायिक कार्यक्रम बनले आहेत. या विषयावर कितीही भाष्य केले तरी ते न संपणारे आहे याची मला जाणीव आहे. या विषयावर प्रत्येकाची मतंही वेगवेगळी असू शकतात, याचीही मला कल्पना आहे.

या सगळ्यामध्ये कधीतरी छोटे छोटे आनंद प्राप्त होतात. आमचा एक विद्यार्थी, तुषार चौधरी अबू धाबीला जाण्यासाठी खूप उत्सुक होता. परंतु काही कारणास्तव ते साध्य होत नव्हते. मला त्याची तळमळ जाणवत होती. लायन्स क्लब ने मदतीचा हात पुढे केला त्यामुळे तो अबू धाबीपर्यंत पोहोचू शकला. आता हे कोणतेही माझे कौतुक म्हणून सांगतोय असा

विचार करू नका. जेव्हा मला अनेक गोष्टींची गरज होती तेव्हा प्रतिकूल परिस्थितीत जगत असताना अनेक मदतीचे हात आमच्यापुढे आले. या सगळ्यांच्या मदतीमुळे खेळाडू त्यांची प्रगती साधू शकले. जेव्हा जे हवे तेथे मिळत गेले याची सुज्ञ जाणीव ठेवून आज ज्यांच्यासाठी जे काही करता येते ते करण्याचा प्रयत्न करतो इतकेच आणि यातूनच असेही सांगायचे आहे की आपली परिस्थिती उत्तम असेल तर शक्य असल्यास ज्या प्रकारची मदत ज्या माणसांना हवी ती परिस्थितीच देत असते! मात्र त्यासाठी आपल्याला अनेक वेळा खूप त्रास सहन करावा लागतो. श्री पवनपुत्र आणि क्रीडा जगताबद्दल माझी अनेक स्वप्ने होती. त्यातील काही मी निश्चितपणे पूर्ण करू शकलो परंतु कितीतरी स्वप्ने अजूनही अपुरी राहिलेली आहेत. माझी ओंजळ भरलेली आहे की रिकामी हे मी कसा ठरवणार? समाजाच्या विकासासाठी असलेली माझी स्वप्न माझ्यामाघारी कोणीतरी निश्चितपणे पूर्ण करतील याची मला खात्री वाटते. हा माझा आशावाद आहे!

■

२३. आपल्या स्वतःच्या घराचे स्वप्न साकार

चेंबूर गावठाणमधील श्रीमल्हार निवासस्थाना विषयी मी आधीच खूप काही भरभरून लिहिले आहे. कुटुंबाचा विस्तार आणि मोडकळीस आलेले निवासस्थान सोडणे भाग आहे हे जेव्हा लक्षात आले तेव्हा खरे तर खूप वाईट वाटले. तसेही चेंबूरच्या आसपासच्या भागातच एखादा छोटासा फ्लॅट घेऊन राहण्याचे स्वप्न मी आणि विजयाने अनेक वर्षांपासून मनाशी बाळगलेले होते. मुंबईत स्वतःचा फ्लॅट घेणे हे माझ्यासारख्या सामान्य माणसासाठी तेव्हाही सोपे नव्हते आणि आजही सोपे नाही. आता चेंबूर काही गाव राहिलेले नव्हते ते एक मुंबईतील मध्यवर्ती शहर झालेले होते. चेंबूरमधे घर घेणे माझ्या अवाक्याबाहेरचे होते. एकेकाळी हिरवाईने नटलेले चेंबूर आणि त्यानंतर प्रदूषणाचे चेंबर असलेले चेंबूर, हा बदल मी डोळ्यांनी पाहिला आहे. चेंबूरमध्ये वाढत असलेल्या तेल कंपन्या, रिफायनरीज, राष्ट्रीय रासायनिक खतांच्या कंपन्या यामुळे चेंबूरमध्ये नोकरीच्या संधी वाढत गेल्या. परंतु मुंबईच्या इतर भागातून चेंबूरमध्ये राहायला येण्यासाठी माणसे कचरायची. चेंबूरचे प्रदूषण त्यांना मानवायचे नाही. त्यामुळे चेंबूरबाहेर राहून ते केवळ काही तासांसाठी नोकरीपुरता या कंपन्यांमध्ये यायचे. परंतु हळूहळू कंपनीतल्या या कामगारांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या राहण्यासाठी इथे घरे बांधण्यात आली.

मोठ्या मोठ्या वस्त्या स्थापन झाल्या. आरसीएफ कॉलनी, इंडियन ऑइल कॉलनी, रिझर्व्ह बँक कॉलनी, टाटा कॉलनी इ. प्रदूषणाला न घाबरता त्यांनी केवळ सोयीचे ठिकाण म्हणून इथेच राहण्यास सुरुवात केली. चेंबूरची लोकसंख्या वाढत गेली. आज या सगळ्या कॉलन्यांबरोबर गांधी मैदान, सांडू गार्डन, आंबेडकर उद्यान, डायमंड गार्डन, आर.के. स्टुडिओ, थिएटर्स, मंदिरे, गोल्फ क्लब मैदान, महाविद्यालये, सार्वजनिक आणि खाजगी बँका, रुग्णालये, फाईन आर्ट्स, हॉटेल्स, मुंबईच्या सर्व भागांना जोडणारे अनेक पूल शिवाय उत्तम रेल्वे आणि रस्ते कनेक्टिव्हिटीसह चेंबूर एक आधुनिक कॉस्मोपॉलिटन उपनगर बनले आहे. अनेक सेलिब्रिटी, उद्योगपती आणि उच्चभ्रू आता येथे राहतात. विकासाच्या या प्रवाहात, आमचे गावठाण वर्षानुवर्षे जसे होते तसेच आजही आहे. त्याच्या विकासाची स्वप्ने कधी सत्यात उतरतील, माहीत नाही.

माझ्या बालपणीचा एक प्रसंग मला आठवतोय तेव्हा मी सातवीत शिकत होतो. माझी आई आजारी होती. तिला हवाबदल झाला तर बरे वाटेल, या डॉक्टराच्या सल्ल्यामुळे माझे वडील तिला घेऊन लोणावळ्याला गेले होते. खूप उत्साहाने आणि आनंदाने आम्ही सर्वजण तिची काळजी घेत होतो. तिला थोडे बरे वाटू लागले होते. ती आणखी थोडी बरी झाल्यावर आम्ही घरी परतलो. त्यानंतर बऱ्याच काळ गेला. तिची प्रकृती परत बिघडली. हा साधारण १९६९ चा काळ होता. माझ्या आईला पुण्यातील मोरारजी गोकुळदास सेनेटोरियममध्ये सहा महिन्यांसाठी दाखल करण्यात आले. मुंबईहून पुण्याला पोहोचण्यासाठी त्याकाळी सहा ते आठ तास लागायचे! म्हणून शेवटी १९८०च्या नंतर आम्ही पुण्यातच एक फ्लॅट खरेदी करण्याचा निर्णय घेतला. यासाठी विजया आणि मी मुंबई-पुण्यादरम्यान वारंवार प्रवास करायचो. पुण्यात गेल्यावर आम्हाला लॉजमध्ये राहावे लागे. तिथे आम्ही माझे मित्र गुर्जर आणि संजोग ढोले यांच्यासोबत महाराष्ट्र मंडळ आणि जिम्नॅस्टिक्सबद्दल चर्चा करायचो. महाराष्ट्र मंडळाचे सचिव दामले साहेबांनाही आम्ही अधूनमधून भेटायचो. दरम्यान, एके दिवशी मला बातमी मिळाली की कुर्ल्यातील भावे नगर येथे दोनशे पंचवीस चौरस फुटांचा फ्लॅट म्हाडाकडून शाळेतील शिक्षकांना मिळणार आहे. म्हणून आवश्यक ती कागदपत्रे पूर्ण

करून मी अर्ज भरला. काही महिन्यांनंतर, इतर शिक्षकांसह, १९९५ ला शिक्षक कोट्याअंतर्गत मला कुर्ल्यात एक छोटा फ्लॅट मिळाला, ज्यामुळे एक अपूर्ण स्वप्न पूर्ण झाले. १९९५ च्या सुमारास, आम्ही आमची मारुती कार खरेदी केली. मी आणि विजया दोघेही नोकरी करत होतो म्हणून हे शक्य झाले. त्यानंतर काही वर्षातच विजयाच्या एका दूरच्या नातेवाईकाच्या प्रयत्नांमुळे, एफएसआय विस्ताराद्वारे कुर्ल्यात टेरेस्ड फ्लॅटचे स्वप्नदेखील पूर्ण झाले. शेवटी दुःखी अंतःकरणाने आम्ही चेंबूर सोडले. २०१८ साली कुर्ल्याला राहायला गेलो. आपल्या स्वतःच्या हक्काच्या घरात प्रवेश केल्याचा आनंद साजरा केला. चेंबूर सोडल्यानंतर आमच्या परिवारातील नातेसंबंधांचे काय होईल? एकमेकांचे सुख-दुःख वाटून घेणे शक्य होईल का, असे अनेक विचार मनात दाटून आले. श्री पवनपुत्र व्यायामशाळेच्या व्यवस्थापनाचे पुढे काय होईल? असे नाना प्रश्न या नानाच्या मनात घर करू लागले. पण काळाच्या ओघात प्रश्न आणि त्यांची सर्व उत्तरेही वाहून गेलीत.

आम्ही काही काळ म्हणजे १९९५ ते २००४ पुण्यातही राहिलो होतो. दुर्दैवाने तोपर्यंत माझ्या आईवडिलांनी जगाचा निरोप घेतला होता. मुंबईतील क्रीडा क्षेत्रातील माणसांचे पुण्यातील क्रीडा उपक्रमांसाठी जेव्हा येणे व्हायचे तेव्हा ती माणसे आमची आवर्जून भेट घ्यायची. शेजारपाजारचे, ओळखीचे आणि नातेवाईकही पुण्यात आल्यावर आमच्या घराला भेट द्यायचे. औरंगाबाद येथील सुधीर जोशी आमच्या घरी अनेकदा यायचे. पंत सरही दोनदा पुण्याला आले होते तेव्हा आमच्या घरीच त्यांचे वास्तव्य होते. त्यानिमित्ताने घरात माणसांचा वावर असायचा. माझा धाकटा भाऊ म्हणजे अनिल सपत्नीक आम्हाला भेटायला खास पुण्यात आला होता ती आठवण अजूनही ताजी आहे. विजयाच्याही कुटुंबातील किंवा मित्रपरिवारातील माणसे अधूनमधून पुण्यात आल्यावर भेटीगाठीचा कार्यक्रम व्हायचा. एकंदरीत काय तर आम्ही पुण्यात एकटे पडलोय, असे कधी वाटले नाही. पुण्यातील आमचे घर भारतीय विद्यापीठाजवळील धनकवडी येथील राघवनगर येथे होते. या काळात MAGA ने पुण्यात क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या होत्या. हिवाळ्याचे दिवस असल्यामुळे बऱ्यापैकी थंडी होती. पवनपुत्रातील काही विद्यार्थी त्यांच्या पालकांसह पुण्यातील स्पर्धेत भाग घेण्यासाठी आले होते

तेव्हा ते सर्वच स्पर्धा संपेपर्यंत आमच्या घरी राहिले होते. मी हा आनंद शब्दात व्यक्त करू शकत नाही. मला अस्पष्टपणे आठवतेय की त्याच काळात महाराष्ट्रातील किल्लारी येथे एक भयानक भूकंप झाला होता, जिथे मोठ्या प्रमाणात जीवित आणि मालमत्तेचे नुकसान झाले होते.

संपूर्ण आयुष्य मुंबईत घालवलेला मी आणि त्यातही माझ्या अनुपस्थितीमुळे पवनपुत्र व्यायामशाळा आणि श्रीमल्हार निवास या आमच्या घराचे काम मंदावले होते त्यामुळे मला पुण्यात राहणे कठीण वाटू लागले. सुमारे १९९७ या वर्षापासून २०१८ पर्यंत कशी तरी चालढकल चालू होती. पवनपुत्र येथील विद्यार्थी शिस्तबद्ध होते, म्हणून माझ्या अनुपस्थितीत ते एकमेकांच्या मदतीने सराव करायचे. घरापेक्षा पवनपुत्रची मला जास्त काळजी वाटत होती. जसे आमचे पुण्यात घर होते तसे कुर्ल्यालाही एक घर होतेच! इथे गेलो तर तिथली काळजी वाटायची तिथे गेलो तर इथली! घराला जरी आपण निर्जीव समजतो तरीसुद्धा घराची काळजी ही एखाद्या माणसासारखीच घ्यावी लागते! मुंबईला येणे अत्यावश्यक होते त्यामुळे अखेर आम्ही पुणे सोडले. वयानुसार पुण्याची वास्तू सोडतानाही माझे मन अस्वस्थ झाले होते. मुंबईत परतल्यावर मी नियमितपणे श्री पवनपुत्रच्या दाराशी बसून गीतेतील एक एक अध्याय वाचत असे. कोणताही अध्याय वाचताना मला त्यातून कोणतातरी गर्भित अर्थ निश्चितपणे जाणवत असे. त्यातीलच नववा अध्याय :

श्रीभगवानुवाच इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ।
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्? ।। ९-१ ।।

अर्थ : श्रीभगवान म्हणाले की दोषदृष्टीरहित अशा भक्ताला अतिशय गोपनीय विज्ञानासहित ज्ञान पुन्हा नीटपणे सांगतो, ते तू पूर्णपणे समजून घेतलेस तर दुःखरूपी संसारापासून मुक्त होशील!

■

२४. देशविदेशातील प्रवास

देशविदेशातील प्रवास पर्यटनाचे आपले स्वतःचे असे वेगळे वैशिष्ट्य आहे. आपण जितका प्रवास करतो तितके प्रगल्भ होत जातो. आम्हा दोघांच्या प्रवासाबद्दल बोलायचे म्हणजे विजयाला आणि तिच्यासोबतीने मलाही देशविदेशात फिरण्याची आवड होतीच. परदेशातील पर्यटन स्थळांना भेट देण्यापेक्षा मला क्रीडा उपक्रम आणि तेथील उपलब्ध सुविधांबद्दल जाणून घेण्यात जास्त रस होता तर विजयाला पर्यटन स्थळ पाहण्याची जास्त आवड होती. जिम्नॅस्टिक्स स्पर्धांमध्ये भाग घेण्याव्यतिरिक्त आम्हाला पटियाला, आसाम, मणिपूर, झाशी इ. भारतातील अनेक राज्यांत आणि छोट्या छोट्या प्रदेशांमध्ये प्रवास करण्याची संधी मिळाली. काही धार्मिक स्थळांनाही आम्ही आवर्जून भेटी दिल्या. २००९ मध्ये आम्ही मंदार ट्रॅव्हल्सद्वारे पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीरला भेट दिली. तसे १९७७ साली हनिमूनसाठी काश्मीरला गेलो होतो त्याची आठवण ताजी झाली. नोव्हेंबर २०१७ मध्ये आम्ही भाग्यश्री ट्रॅव्हल्सद्वारे पीठापूरचे दर्शन घेतले. २०१८ साली आम्ही पाली, भिलार, वाई आणि तापोळाला भेट दिली तेव्हा आमच्यासोबत साताराचे सुजित शेडगे होते. जानेवारी २०१८ ला आम्ही जगप्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या गोव्याला गेलो. आम्ही

गोव्यात रीटाच्या घरी राहिलो. फेब्रुवारी २०१८ मध्ये, आम्ही अमित रावतेसोबत जेजुरी या धार्मिक स्थळाला भेट दिली. ऑगस्ट २०१८ साली आम्ही शिवथरघळला भेट दिली, जे त्याच्या नैसर्गिक सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे आणि तिथे रामदास स्वामी यांचा सुंदर मठ आहे. महाडपासून चौतीस किमी अंतरावर असलेल्या बारसगावमध्ये एक प्रसिद्ध ऐतिहासिक गुहादेखील आहे. श्री समर्थ रामदास स्वामी या ठिकाणी जवळजवळ बावीस वर्षे राहिले. येथेच छत्रपती शिवाजी महाराज आणि श्री समर्थ रामदास स्वामी यांची पहिली भेट झाली. हे ठिकाण हिरव्यागर्द डोंगरांनी वेढलेले असते. पावसाळ्यात तर हे डोंगर जेव्हा नवीन हिरवागर्द साज चढवतात आणि डोंगरावरून वाट काढत पांढरे शुभ्र धबधबे कोसळतात ते पाहण्यासाठी अलोट गर्दी लोटते. आम्हीसुद्धा मुद्दामून पावसाळ्यातच इथे गेलो होतो त्यावेळी हा परिसर पर्यटकांनी गजबजून गेलेला होता. तेव्हा अनुभवलेले नयनरम्य दृश्य आजही जसेच्या तसे आठवत आहे. डिसेंबर २०१८ मध्ये मी भीमाशंकर ट्रेकचा प्रारंभ बिंदू असलेल्या खांडसला भेट दिली. ट्रेकर्सचे हे विशेष आवडीचे ठिकाण आहे. पावसाळ्याच्या काळात इथे निसर्गरम्य परिसरामुळे पर्यटकांची गर्दी असते. डिसेंबरमध्ये जेव्हा आम्ही गेलो होतो तेव्हा तिथे विशेषत: ट्रेकर्स आलेले दिसत होते. आम्ही ५ जून २०१० रोजी सचिन ट्रॅव्हल्ससोबत युरोपला गेलो. हा आमचा पहिला परदेश दौरा होता. आम्ही या ट्रॅव्हल्ससोबत साधारण तीन आठवडे युरोपातील प्रेक्षणीय स्थळांचा, तिकडच्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. परंतु सोबतीच्या पर्यटकांसोबत आम्ही परतलो नाही. लंडनमध्ये स्थायिक झालेले आमचे विद्यार्थी, हरेश राणे आणि प्राची नायगावकर-राणे यांच्यासोबत त्यांच्या घरी दहा दिवस मुक्काम केला. भारतात अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर हरेश नोकरीच्या निमित्ताने लंडनला गेला आणि तिथेच स्थायिक झाला. माझ्यातील क्रीडा शिक्षकाला या सर्व पर्यटन स्थळांपेक्षा तिकडच्या क्रीडाजगताशी जवळीक साधायची होती. आपल्यापेक्षा तिथे काय वेगळे आहे हे जाणून घ्यायची उत्सुकता होती. मला तिथल्या जिम्नॅस्टिक्स सेंटर्सना भेट देऊन ज्ञान मिळवायचे होते. सुंदर प्राचीन इमारती, शॉपिंग मॉल्स आणि संग्रहालये पाहण्यासाठीच तर पर्यटक एवढा खर्च करून युरोपसारख्या

ठिकाणी जातात. पण मी थोडासा वेगळा विचाराचा माणूस आहे. सहज आठवले म्हणून सांगतो की आम्ही एकदा राजस्थानला गेलो होतो तेव्हा तिकडे अनेक राजवाडे, किल्ले, तलाव, संग्रहालये इ. वैभव पाहिले. पण आता ते सर्व विस्मृतीत गेले आहे. तसेच तीन आठवडे पाहिलेला युरोपसुद्धा माझ्या विस्मृतीत जाणार आहे, हे तेव्हाही जाणवले. मी हरेशला स्थानिक संस्कृती आणि क्रीडा उपक्रमांबद्दल मला जाणून घ्यायचे आहे, असे जेव्हा सांगितले तेव्हा तो खरच खुश झाला इतकेच नव्हे तर मला जी स्थळं पाहण्याची उत्सुकता होती ती दाखवली. हरेश हा आमच्या पवनपुत्र व्यायाम शाळेचा विद्यार्थी होता त्यामुळे आमच्यात तसा मोकळेपणा होताच! सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्राचीची आणि त्याची भेट ही पवनपुत्रमध्येच झालेली होती आणि त्यानंतर ते एकमेकांचे जीवनसाथी बनलेले होते त्यामुळे हरेश आणि प्राचीला पवनपुत्र व्यायाम शाळेचे सर्वेसर्वा या नात्याने माझ्याबद्दल आदर होता आणि मला या दोघांचे खूप कौतुक! या दहा दिवसाच्या काळात त्यांच्याशी खूप गप्पा झाल्या. हरेशबद्दलची एक आठवण मला तुम्हाला सांगावीशी वाटत आहे. हरेश हा चेंबूरच्या आचार्य आणि मराठे महाविद्यालयात शिकत होता परंतु तिथून त्याचा दाखला काढून चंद्रशेखर पाटीलने त्याला रुईया महाविद्यालयात प्रवेश घेण्यास सांगितले. त्याने ते ऐकलेही! अशा तऱ्हेने पवनपुत्र विद्यार्थ्यांसहित आमचे एक विस्तारित कुटुंब तयार झाले होते. हरेशची खेळातली प्रगती वाखाणण्याजोगी होती त्याचप्रमाणे शैक्षणिक अभ्यासक्रमातही त्याला गती होती. प्राचीचे शिक्षण पूर्ण केल्यावर तिला बँकेत नोकरी मिळाली. बँकेने तिला पुढील प्रशिक्षणासाठी युरोपला पाठवले. युरोपमध्ये हरेश आणि प्राची यांची पुन्हा भेट झाली. हा केवळ योगायोग होता. त्यानंतर काही काळातच त्यांचा विवाह झाला आणि ते लंडनमध्येच स्थायिक झाले. माझ्या या दोन विद्यार्थ्यांचे सहजीवन पाहून मला आनंद होणे स्वाभाविकच आहे. कुठेही गेल्यावर मला पवनपुत्रची आठवण होतेच याचे कारण मला भेटणारे पवनपुत्रचे विद्यार्थी! पवनपुत्रच्या अंगणात भेटलेल्या हरेश- प्राचीसहित अनेकांचे सहजीवन देशाविदेशात मला पाहण्याची संधी मिळते!

लंडनमध्ये असताना प्राची -हरेशनी आमच्यासाठी खूप वेळ दिला.

हरेशने मला त्याच्या स्कूटरवरून तिथले जुने कालवे दाखवले. कालव्यामधून बोटीतून फिरून आपला व्यवसाय करणारेही दाखवले. आम्हीसुद्धा अशाच एका बोटीतून प्रवास केला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हरेशने प्रबळ इच्छाशक्ती आणि व्यावसायिक कौशल्याने तिथे वीस ब्लॉक्स खरेदी केले आहेत. तो म्हणाला की त्याला ही संख्या दोनशेपर्यंत वाढवायची आहे. मी त्याला गमतीत म्हटले, ''इंग्रजांनी इतकी वर्षे आमच्यावर राज्य केले, आता तुम्ही त्यांच्यावर राज्य करा!'' तो हसला आणि त्याने त्या क्षणी मला मनापासून नमस्कार केला.

प्रसिद्ध लेखक शेक्सपियरचे युरोपमधील निवासस्थान हरेशमुळेच पाहण्याचा योग आला, जे त्याच्या घरापासून सुमारे सहाशे किलोमीटर अंतरावर आहे. लंडनमध्ये गेल्यावर हे पाहण्याची माझी मनापासून इच्छा होती. एकंदरीतच लंडनच्या माणसांची जीवनशैली आणि अभिरुचीने मी खूप प्रभावित झालो. संपूर्ण युरोप, विशेषतः लंडन अप्रतिम आहे. धारावी, चेंबूर याशिवाय छोट्या गावांमध्ये झोपडपट्ट्या आणि गरीबी असूनही, इंग्रजांनी इतकी वर्षे आमच्यावर राज्य केले इतकेच नव्हे तर चातुर्याने व्यवसाय वाढवला. त्यांच्या दूरदृष्टी आणि व्यावसायिक हितसंबंधांमुळे इंग्रजांनी आमच्या देशात रेल्वे, रस्ते, बंदरे, पोस्ट ऑफिस, बँका, विमानतळ, शाळा आणि महाविद्यालये यासारख्या सुविधा आणल्या. त्यानंतर, या सुविधा जगभर पसरवल्या आणि विस्तारल्याही! एका दृष्टिकोनातून, याच सुविधांनी जगाच्या आणि आपल्या विकासात योगदान दिले. मी तिथल्या लोकांच्या वर्तनावरून त्यांचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न करत होतो. युरोप कितीही आकर्षक असला तरी मला माझ्या स्वतःच्या देशाचा, भारताचा अभिमान आहेच! खरंतर मलाच नाही तर नोकरी व्यवसायानिमित्त भारताबाहेर राहणाऱ्या प्रत्येकाला स्वतःचा देशाभिमान असतोच! ११ फेब्रुवारी २०१० रोजी आम्ही हरेशसोबत लंडनमधील एका जिम्नॅस्टिक्स सेंटरला भेट दिली, तो माझ्यासाठी आनंदक्षण होता. तिथे अनेक शिक्षक होते. प्रत्येकाला सकाळी आणि संध्याकाळी चार तासांची शिफ्ट देण्यात आली होती. केंद्रात एक हजाराहून अधिक मुले प्रशिक्षण घेत होती. तिथे वेगवेगळ्या व्यायाम प्रकारांसाठी अनेक उपकरणे उपलब्ध होती, प्रत्येकी चार -पाच विद्यार्थ्यांचा गट सराव

करत होता. प्रत्येक प्रशिक्षक सुमारे वीस मिनिटे प्रशिक्षण घ्यायचा. प्रशिक्षणानंतर त्यांचे पालक बाहेर वाट पाहताना दिसले होते. मला आठवते की मी चंद्रशेखर पाटील यांच्यासोबत न्युझीलँड येथील एका जिम्नॅस्टिक्स सेंटरला भेट दिली होती. आत दहा-पंधरा मुले आणि मुली त्यांच्या प्रशिक्षकासह ट्रॅम्पोलिन बेडवर स्वतंत्रपणे फ्लोअर एक्सरसाइजचा (FX) चा सराव करत होते. अशाप्रकारे, जेव्हा जेव्हा मला परदेशात प्रवास करण्याची संधी मिळाली तेव्हा मी तिथल्या जिम्नॅस्टिक्स सेंटरला भेट देण्याचा आणि प्रशिक्षण प्रक्रियेची आणि उपकरणांची माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला होता. युरोपनंतर आम्ही सिंगापूरला गेलो. आम्ही ट्रॅव्हल कंपनीमार्फतही ही ट्रिप केली होती. या ट्रिपदरम्यान आम्ही आशिष प्रधान या आमच्या आणखी एका विद्यार्थ्याला भेटलो, ज्याने सिंगापूरमध्ये आमचे स्वागत केले. तो चेंबूर हायस्कूलमधील माझ्या सहशिक्षिका प्रधान मॅडमचा मुलगा होता. अत्यंत जवळिकीच्या नात्याने त्याने आमचे प्रेमपूर्वक स्वागत केले. या प्रवासादरम्यान आम्हाला कोणत्याही अडचणी आल्या नाहीत, त्यामुळे हा परदेश प्रवास चांगला होता. या सर्वच प्रवासामध्ये मी विजयासोबत होतो.

आम्ही २०१० मध्ये परदेश प्रवासाला सुरुवात केली. २०१७ मध्ये आम्ही वीणा वर्ल्ड ट्रॅव्हल कंपनीच्या माध्यमातून अमेरिकेला प्रवास केला. २०१९ मध्ये वीणा वर्ल्ड ट्रॅव्हलच्या माध्यमातून आम्ही नेपाळची एक आनंददायी सहल केली. २०१७ मध्ये आम्ही अतुल प्रधानसोबत अंदमान आणि निकोबारलाही पाहिला. काही वर्षांनी आम्ही अबू धाबीलाही भेट दिली. या सहलीत विनीत देव्हारे आमच्यासोबत होते.

१४ नोव्हेंबर २०१० रोजी पवनपुत्र व्यायामशाळेत आयोजित केलेला कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्यावर, आम्ही सचिन ट्रॅव्हल्सद्वारे ऑस्ट्रेलियाला आणि नंतर न्यूझीलंडला गेलो. ऑस्ट्रेलियामध्ये, आम्ही स्थानिक ग्रामस्थांनी सादर केलेल्या लोकनृत्याच्या कार्यक्रम पाहिला. आपल्याकडे जे कातकरी नृत्य आपण पाहतो तसेच काहीसे ते होते, अशी आठवण आहे. माझ्या ऐकीव माहितीनुसार युरोपियन लोकांनी त्यांना दुर्लक्षित केले, म्हणून हे ऑस्ट्रेलियन ग्रामस्थ किनाऱ्यावर स्थायिक झालेत. त्यांची परिस्थिती फारशी चांगली नाही, ज्याचे मला दुःख वाटते. ऑस्ट्रेलियाचे

क्षेत्रफळ भारतापेक्षा अडीच पट मोठे आहे, तरीही त्याची लोकसंख्या मुंबईइतकीच आहे. असे असूनही युरोपियन लोकांनी जगावर राज्य केले याचे राहून राहून आश्चर्य वाटते! म्हणूनच अमेरिका आणि इतर काही देश आजही युरोपियन लोकांशी जोडलेले आहेत. परदेशातील प्रसिद्ध पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी जरी आम्ही गेलो असलो तरी माझ्या मनात त्या भागातील क्रीडा संस्था पाहण्यामध्ये, त्यांचे कार्य जाणून घेण्यामध्ये जास्त रूची होती. आम्ही काही तासांसाठी का होईना प्रत्येक देशात क्रीडा संस्थांनाही भेटी दिल्या. हे सगळे पाहिल्यावर स्वाभाविकपणे माझ्या मनात विचार आला की आपल्या देशातही अशी उपकरणे, संसाधने असती आणि त्यांच्यासारख्या सुखसुविधा उपलब्ध असत्या तर ...! विदेशातून परतल्यानंतर, मी तेथील चांगल्या आणि उपयोगी कल्पना माझ्या पद्धतीने इथल्या खेळांसाठी राबवण्याचा प्रयत्न केला. मला आठवतेय की न्यूझीलंडची राजधानी ऑकलंड, हे नवीन युगाशी सुसंगत तसेच पूर्णपणे आधुनिक आणि आकर्षक आहे. आम्ही तिथे चंद्रशेखरच्या घरी गेलो होतो. त्याचे स्वतःचे घर लाकडाचे बनलेले होते. तेथे मजूर सहज उपलब्ध नसल्यामुळे आणि जरी असले तरी ते खूप महाग किंवा परवडण्यापलीकडचे असल्यामुळे त्याने त्याचे घर स्वतःच्या हाताने आणि कष्टाने बांधले होते. त्याच्यासोबत या कामासाठी त्याची पत्नी स्मितासुद्धा होतीच. मला आश्चर्यकारक आनंदाचा धक्का बसला कारण तिथे गेल्यावर चंद्रशेखरची आईसुद्धा भेटली. मॉडर्न कपड्यात असलेली चंद्रशेखरची आई जेव्हा समोर आली तेव्हा खरे तर मी तिला ओळखलेच नाही. चंद्रशेखरच्या आईने आम्हाला तिथल्या काही बागा आणि पर्यटन स्थळे दाखवली. तिकडची थंडी सहन करण्याच्या पलीकडची होती आणि म्हणून चंद्रशेखरच्या आईने विजयाला साडीऐवजी तिच्यासारखेच पॅन्ट, शर्ट, हातमोजे इत्यादी वापरण्याची विनंती केली. तसे त्या काळातही लग्नापूर्वी दादरच्या मुली पॅन्ट- शर्ट घालत होत्या अगदी आमच्या मोठ्या वहिनीसुद्धा, त्याप्रमाणे विजयीही घालत होती. परंतु लग्नानंतर प्रथमच विजयाने त्यांचे ऐकून मॉडर्न वेश परिधान केला. त्या भागाची ती होती. तिथून आम्ही अंटार्क्टिकाच्या दक्षिणेकडील टोकावर असलेल्या एका ठिकाणच्या सहलीला गेलो. खरंतर तिथे जाणे खूप खर्चिक होते परंतु चंद्रशेखरने त्या ट्रिपचा खर्च

उचलला आणि म्हणाला, ''जर माझे वडील आले असते तर मी त्यांचासाठी नसता का केला खर्च? तुम्ही मला माझ्या वडिलांच्या जागी आहात.'' आम्ही दोघेही त्याच्या या विचाराने भारावून गेलो आणि माझ्या मनात त्याच्याविषयीचा आदर दुणावला.

आम्ही तिथे असताना आमचा बोटीचा प्रवास सुरू ठेवला. या काळात, आम्हाला समुद्रात तरंगणारे हिमखंड दिसले, जे आमच्यासाठी एक अवर्णनीय दृश्य होते. लंडनच्या उत्तरेकडील टोकापासून दक्षिणेकडील टोकापर्यंतचा हा प्रवास खरोखरच मनमोहक होता. परदेशातही मी दररोज सकाळी गीतेचे अध्याय म्हणायचो. माझ्या नियमित दिनचर्येने चंद्रशेखर प्रभावित झाला. चंद्रशेखरची आई दररोज सकाळी ब्लोअरने घर, अंगण आणि परिसर स्वच्छ करायची. त्यांना तेथील नागरिकत्वदेखील मिळाले होते, त्यामुळे त्यांच्या औषधांची आणि डॉक्टरांची जबाबदारी सरकारची होती. मला ही व्यवस्था खूप आवडली. स्मिता आणि शेखर दोघेही काम करत होते, त्यामुळे घरी रोज स्वयंपाक करणे त्यांना शक्य नव्हते. त्यामुळे आम्हाला गव्हाच्या पिठाची बिस्किटे, जाम -ब्रेड आणि सॉस-ब्रेड अशा विविध प्रकारच्या ब्रेडनेच पोट भरावे लागे. तेथील वास्तव्यात आम्हाला लक्षात आले की तिथेच स्थायिक झालेले बरेच भारतीय हॉटेलमध्ये स्वयंपाकी म्हणून काम करतात. तिथे सर्वसाधारणपणे घरातील सर्व कामे स्वतःच करावी लागतात. मोलकरीण, स्वयंपाकीण, मेकॅनिक, प्लंबर, इलेक्ट्रिशियन इत्यादी माणसे तिथे मुश्किलीने मिळतात म्हणजे काही प्रमाणात ही माणसे उपलब्ध आहेत परंतु सर्वसामान्य माणसांच्या आवाक्याबाहेर त्यांची फी आहे. म्हणूनच तेथील स्थानिक सर्व प्रकारची कामे स्वतःच शिकतात आणि करतात ज्याची भारतीयांना सवय नसते!

चंद्रशेखरचा मुलगा मिहीर पोहायला शिकत असल्याचे पाहून मला खूप आनंद झाला. इथेही आम्हाला काही जिम्नॅस्टिक्स सेंटर्सना भेट देण्याची संधी मिळाली. त्या सेंटर्समध्ये उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक उपकरणे पाहून मी अचंबित झालो. युरोपियन देश ॲथलेटिक्स आणि जिम्नॅस्टिक्स स्पर्धांमध्ये इतके पुरस्कार का जिंकतात याचे उत्तर मला सापडले होते. तिथे राहत असताना आम्हाला शाळा आणि महाविद्यालयांनाही भेट देता आली.

फुटबॉल मैदानाशेजारीच लहान मुलांसाठी जिम्नॅस्टिक्सची उपकरणे बसवण्यात आली होती. प्रशिक्षकांशिवाय मुले स्वतःहून सराव करताना दिसली. स्वतःचा शारीरिक विकास साधतांना कुठेतरी ते मनाचाही विकास साधत होती. त्यांचा स्वतःहून शिकण्याचा दृष्टिकोन मला खरोखरी प्रेरणादायी वाटला. शाळा सुटल्यानंतर आणि सुट्टीच्या वेळी, मी मुलांना विविध खेळांच्या उपकरणांवर व्यायाम करताना पाहिले होते. या मुलांच्या शाळा तशा घरापासून खूपच दूर असतात त्यामुळे त्यांना कार किंवा बसने प्रवास करावा लागतो. एकंदरीतच इथल्या माणसांना व्यायामाची खूप आवड आहे. आपण रस्त्यावरून चालत जातो तेव्हा शॉर्ट्स घालून जॉगिंग करताना असंख्य माणसे दृष्टीस पडतात. तेथील वातावरण दुपारी वेगळे असते म्हणजे भर दुपारी दोन वाजताही तिथे सूर्यप्रकाश नसतो याचा फायदा घेत त्यावेळेसही काही माणसे जॉगिंग करताना किंवा सायकल चालवत व्यायाम करताना दिसली. हे दृश्य आश्चर्यकारक तसेच आनंददायी होते.

एके दिवशी, चंद्रशेखरच्या घरातील हीटर बिघडला आणि मला कडाक्याच्या थंडीत गार पाण्यानेच अंघोळ करावी लागली. त्या संध्याकाळी ऑफिसमधून परतल्यानंतर चंद्रशेखरने स्वतः हीटर दुरुस्त केला. आता आपल्याकडे अनेक सुविधा उपलब्ध आहेत परंतु जेव्हा आम्ही गेलो होतो त्या काळात वॉशिंग मशीन आणि आणि स्टीम वापरून कपडे सुकवण्याची प्रक्रिया पाहून मला आश्चर्य वाटले होते. तिथे तसाही फारसा सूर्यप्रकाश नसतो, त्यामुळे कपडे धुण्याची व्यवस्था आणि हीटर या अत्यंत आवश्यक असलेली गरजेची उपकरणे आहेत. चंद्रशेखरची पत्नी स्मिता लहान मुलांसोबत खेळताना पाहून मला खूप आनंद झाला. ती स्वतः एक उत्कृष्ट राष्ट्रीय जिम्नॅस्ट होती, म्हणून ती झाडाच्या फांद्यावर लटकून मुलांना व्यायाम शिकवत होती. खरेतर स्वतःच्या मुलांबरोबर बालपण अनुभवत होती!

ऑस्ट्रेलियाच्या आमच्या सहलीदरम्यान पहिले दोन-तीन दिवस आम्ही खूपच अस्वस्थ होतो. आम्ही गेलो त्या काळात शाळांना सुट्टी लागलेली होती. सहसा दहावीच्या परीक्षेनंतर, शाळेतील मुलांना दोन दिवस घराबाहेर म्हणजे कुठेतरी पिकनिकला नेले जाते. ते या सुट्ट्यांची आतुरतेने वाट पाहत असतात. खूपदा शिक्षकसुद्धा आपल्या विद्यार्थ्यांना घेऊन पिकनिकला जातात.

अशाच एका सहलीला आलेल्या मुलांना आम्ही दुरून पाहत होतो. तिथल्या मुलांचे बेताल वर्तन आम्हाला सहन होत नव्हते. मुले आणि मुली उघडपणे एकमेकांना मिठी मारत होती, एकमेकांचे चुंबन घेत होती. हे सर्व असे पाहण्याची आम्हाला सवय नसल्यामुळे ते त्रासदायक वाटत होते. याच्यावर तिकडच्या समाजाचा असा विचार आहे की मुले मोठी झाल्यावर त्यांना स्वतःचे चांगले आणि वाईट समजू शकते. त्यांच्यावर बंधने लादणे योग्य नाही. हे ऐकून आम्ही अवाक झालो होतो. आता याचा दोष तिकडच्या समाजाला द्यायचा की त्या शाळकरी विद्यार्थ्यांना? तीच मोकळेपणाची हवा आता आपल्या देशातही वाहू लागली आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत प्रेमापेक्षा स्वैराचार वाढलेला दिसतोय, असे मला वाटते. असे सगळे पाहिल्यावर मला स्वाभाविकपणे आमचे शालेय जीवन आठवले. वाचून किंवा सिनेमातून प्रेम ही संकल्पना मनात उमलत होती पण कधी प्रत्यक्षात आणता आली नव्हती. असो! माझे शालेय जीवन म्हणजे मी साधारण पंच्याहत्तर-ऐशी वर्षांपूर्वीच्या गोष्टी तुम्हाला सांगत आहे!

मी युनिव्हर्सिटीमध्ये ज्युनिअर बीएससी केलेले आहे. त्यामुळे भौतिकशास्त्राचे प्राथमिक ज्ञान आहेच! माझ्या लक्षात आले की तिथे विज्ञानाच्या अकरावीच्या वर्गात प्रामुख्याने रेषीय गती (Linear Motion) आणि वर्तुळाकार गती (Circular Motion) शिकवली जाते. मी विज्ञानाचा शिक्षक असल्यामुळे तिकडचा अभ्यासक्रम मुद्दामून पाहात होतो. परदेशी प्रशिक्षक भारतातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी बोलवले जातात तेव्हा प्रशिक्षणादरम्यान, त्यांचे म्हणजे त्यांच्या देशातील विद्यार्थ्यांचे जागतिक वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी भारतातील विद्यार्थ्यांना केवळ ८०% ज्ञान देतात, उर्वरित २०% ज्ञान राखून ठेवतात, असे आम्हाला आढळून आले आहे.

एके दिवशी न्युझीलँडमध्ये असताना विजयाला अचानक असह्य पोटदुखी झाली, ज्यामुळे ती अस्वस्थ झाली. चंद्रशेखरच्या आईने तिच्या पोटावर गरम पाण्याची पिशवी ठेवली. गरम पाण्याने तिला निश्चितपणे थोडा आराम मिळाला, पण वेदना परत उफाळून आल्या. यामुळे आम्हा सर्वांना काळजी वाटली. कारण परतीचा दीर्घ विमान प्रवास सिंगापूरमार्गे होता. हा

प्रवास आणखीनच लांबला कारण सिंगापूरला आठ तास थांबावे लागले! प्रवासादरम्यान विजयाला दोनदा पोटदुखीचा त्रास झाला. तिच्यासोबत मीही अस्वस्थ झालो. भारतात परतल्यानंतरही, तिचे दुखणे सुरूच राहिले. म्हणून तिच्या माहेरच्यांनी तिला प्रथम हिंदुजा रुग्णालयात दाखल केले, जिथे तिला पंधरा दिवस ठेवण्यात आले. डॉक्टरांनी निदान केले की तिचे मोठे आतडे पिरगळले आहे, ज्यामुळे ती अन्न पचवू शकत नाही. ती फक्त पाणी आणि रसाहार घेऊ शकत होती. काखेत कळसा आणि गावाला वळसा अशी खरंतर आमची गत झाली. घाईघाईने आम्ही विजयाला हिंदुज्या रुग्णालयात घेऊन गेलो होतो परंतु विजयाला जो आजार झाला होता त्याचे तज्ज्ञ म्हणजेच मुंबईतील सुप्रसिद्ध डॉक्टर, पवनपुत्रचे माजी विद्यार्थी डॉ. जॉय पाटणकर यांचे जॉय हॉस्पिटल चेंबूरमधील आमच्या घराजवळ होते. उशिरा का होईना लक्षात आल्यावर मात्र आम्ही विजयाला जॉय हॉस्पिटलमध्ये हलवले. येथे तिच्या मोठ्या आतड्याचा सुमारे बारा इंच भाग कापून काढून टाकण्यात आला. काही दिवसांनी ती थोडी बरी झाली.

परंतु साधारण त्याआधी पाच-सात वर्षांपूर्वी विजयाच्या जीवनात आणखी एक घटना घडली होती. बँकेत जाण्याचे निमित्त झाले आणि गाडीतून उतरताना तिचा पाय पेव्हर्स ब्लॉकवरून घसरला. ताबडतोब डॉक्टरांकडे घेऊन गेलो. तिथे कळले की तिचा पाय फ्रॅक्चर झाला आहे. चेंबूरचे डॉ. विनोद करकरे यांनी ताबडतोब शस्त्रक्रिया केली. विजयाला ठीक होण्यात बराच काळ लागणार होता म्हणून डॉक्टरांनी तिला जास्त चालणे आणि धावणे टाळण्याचा सल्ला दिला. मी तिला काम करू नकोस, मी सांभाळून घेईन, असा प्रेमळ सल्ला दिला होता. पण ती डॉक्टरांचे काय कुणाचेच ऐकणाऱ्यातली नव्हती! तिला नेहमीच तिच्या प्रकृतीपेक्षा माझ्या प्रकृतीची जास्त काळजी वाटायची. त्यामुळे माझ्या भरवशावर स्वयंपाकघर देण्यापेक्षा एवढ्या आजारपणात पण स्वतःच पुन्हा एकदा स्वयंपाकघराचा ताबा घेतला. अंगात पुरेशी ताकद नसतानाही घरगुती कामामध्ये लक्ष एकवटले. नाही म्हटले तरी त्याचाही तिला खूप त्रास झाला.

माझ्या काळजीपोटी माझे खाणे पिणे व्यवस्थित सांभाळताना तिने स्वतःच्या प्रकृतीची मात्र हेळसांड केली. याचा परिणाम म्हणजे तिला नंतर

हर्निया आणि पित्ताशयाचा त्रास होऊ लागला. वेगवेगळ्या आजारांना तोंड देताना तिचे पाणी पिणे कमी झाले होते असे डॉक्टरांनी उपचारादरम्यान आम्हाला सांगितले. वेळ निघून गेलेली होती त्यामुळे तिच्यावर चार लहान-मोठ्या शस्त्रक्रिया आणि वेगवेगळे उपचार करावे लागले. या सर्वातून जाताना तिचे शरीर खंगत चालले होते. हॉस्पिटलचे मोठी बिलं भरून आमची आर्थिक परिस्थितीही खालावत चालली होती. शारीरिक, मानसिक आणि आर्थिक ताण वाढत चालला होता. वाढत्या वयात सगळ्या गोष्टी अनुभवाने आणि समजूतीने आपण सहन करतो परंतु मानसिक ताणतणाव सहन करणे कोणालाही कोणत्याही वयात कठीण जाते तसे मलाही कठीण जात होते. अतिशय सकारात्मकतेने जीवनाकडे पाहणारा मी विजयासाठी आणि विजयाच्या विजयासाठी अजूनही आशावादी होतो.

विजयाला निसर्गभ्रमंती खूप आवडायची म्हणून ती अनेकदा पवनपुत्र व्यायाम शाळेच्या खेळाडू मुलींची मॅनेजर या नात्याने, माझ्यासोबत विविध राज्यांमधील राष्ट्रीय स्पर्धांमध्ये आवडीने सहभागी व्हायची. १९९२ मध्ये, प्रथम माझी आई आणि नंतर माझे वडील एकामागून एक गेले. या दुःखाला कसेतरी सहन करत असतानाच १९९४ मध्ये, मंजुश्री चिवटे -भांड ही पवनपुत्रला अभिमानास्पद असणारी आमची लाडकी विद्यार्थिनी एका अपघाताला (Road Accident) बळी पडून हे जग सोडून गेली. मंजुश्रीच्या निधनानंतर पवनपुत्रच्या आत पाऊल टाकणेही जड होऊ लागले. तिथे गेले गेल्यावर मंजुश्रीच्या आठवणीने इतर विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करणे, आता कठीणच आहे, हे आतून जाणवले. खूप विचारांती मी सार्वजनिक जीवनातून माघार घेण्याचा निर्णय घेतला. त्याच सुमारास मला माझे गुरू म्हणजेच निर्गुणाची उपासना करणारे श्री श्री आनंद मूर्ती यांच्या निधनाची बातमी मिळाली. खरं तर ते गेले त्या दिवशी जमिनीवर चटईवर झोपून त्यांनी आपल्या शिष्यांचा निरोप घेतला आणि फक्त पुरे झाले, इतकंच ते शेवटचं बोलले. एका मागून एक वाईट घटनांनी मी तुटत चाललो होतो. कसंतरी पृथ्वीवर पाय रोवून उभा होतो. मी व्यायामशाळेतील माझ्या जबाबदाऱ्या कमी केल्या होत्या. १९९७ मध्ये निवृत्तीनंतर, मी माझ्या स्वतःच्या कारने जितके फिरून घेता येईल तितका घेण्याचा निर्णय घेतला होता. दुसऱ्यांच्या

जीवनात आनंद फुलवता फुलवता, स्वतःच्या आनंदाच्या व्याख्या विसरून गेलो होतो, तो माझ्या जीवनातला खरा आनंद आता या भटकंतीत घेत होतो. शांतचित्ताने जगणे आणि कोणतेही काम न करता जगणे हे माझ्या रक्तातच नव्हते, असे लक्षात आले. म्हणूनच मी अंधेरी क्रीडा कॉम्प्लेक्सच्या कामात सहभागी झालो. अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससाठी तेथील शाळांमध्ये भ्रमंती केली. १९७४ पासूनच मुंबईसाठी काम करणे अपेक्षित होते. जानेवारी १९९२ मध्ये, जेव्हा बीपीटीने आठशे कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छानिवृत्तीची घोषणा केली, तेव्हा विजयाने स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. घरातील जबाबदाऱ्या सांभाळण्यास ती सक्षम होती म्हणून बाहेरच्या जबाबदाऱ्या मी माझ्या खांद्यावर घेत होतो. नोकरी करणाऱ्या माणसाला तसे घरात बसायला जमणे जरा कठीणच होते त्यामुळे काही काळ अर्धवेळ (Half day) नोकरी करण्याचाही तिने प्रयत्न केला होता.

■

२५. कोविड-१९ ची दहशत

२०१९ मध्ये, कोविड-१९ नावाच्या जागतिक आपत्तीने अनेकांचे जीवन विस्कळीत केले त्याचा माझ्या आयुष्यावरही परिणाम झाला. कोविड-१९ ने आम्हाला दोन वृद्धाश्रमांची ओळख करून दिली. आमच्या घरात मदत करण्यासाठी आणि वृद्धापकाळात आमची देखभाल करणारे कोणी नव्हते. घरातली सर्व कामे सांभाळून स्वतःला सांभाळणे आम्हाला अशक्य होऊ लागले. कोविड-१९ च्या काळात, आम्हाला वृद्धाश्रमात जाण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता. गर्दी टाळणे हे सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे होते, जे आमच्या स्वतःच्या घरात राहून शक्य नव्हते. देश काय तर संपूर्ण जगच स्टॅच्यू! केल्यासारखे जागच्या जागी स्थिर झाले होते. माणसांचे प्रत्यक्ष भेटणे थांबले होते तसा दूरध्वनीवरचाही संवाद कमी झाला होता कारण बोलण्यासाठी कोविड सोडून कोणताच विषय उरला नव्हता! बाहेर जाणे सुरक्षित नव्हते. स्वतःला घरात कोंडून ठेवणे ही एक सक्ती आमच्यासारख्या भटकंती करणाऱ्याला घरात स्वस्थ बसू देत नव्हती. मुंबईचे वर्दळीचे रस्ते चिडीचीप झाले होते. रोजंदारीवर काम करणारे आणि गरीब कामगार मुंबईहून त्यांच्या गावी स्थलांतरित होत होते. कोविड-१९ चा आताही कोणाच्या बोलण्यात उल्लेख झाला तरी अंगावर काटा उभा राहतो.

डोळ्यासमोर चलचित्रासारखी टीव्हीवर पाहिलेली सगळी भयावह दृश्य सरकतात. या सर्व परिस्थितीचा सामना करण्यासाठी आमचे स्वतःचे हक्काचे घर असूनही आम्ही बेघर झाल्यासारखे वृद्धाश्रमात (Old Age Home) जाऊन पडलो. परिस्थितीने आम्हास असे स्थलांतर करण्यास भाग पाडले होते. सुरुवातीला, आम्ही पनवेलमधील हिरानंदानी कॉम्प्लेक्समधील वृद्धाश्रमात गेलो. हा एक नवीन प्रकल्प होता. त्यामुळे आम्हाला हव्या तशा सोयी तिथे उपलब्ध नव्हत्या म्हणून काही दिवसातच आम्ही पनवेलमधील कानसळ येथील स्नेहबंधन वृद्धाश्रमात दाखल झालो.

वृद्धाश्रमात राहणे इतके सोपे नाही. स्वतःच्या घरात नसल्यामुळे अनेक गरजेच्या वस्तूंची कमतरता जाणवत होती. त्यात गरजेच्या वस्तूंची दुकाने आणि मेडिकल स्टोअर्स बंद होते. आम्हाला चहा, नाश्ता आणि जेवण तिथे व्यवस्थित आणि वेळेवर मिळत होते. कोविड काळात सर्व गिरण्यांची धुरांड बंद झाली होती. वाहनांची वर्दळ थांबलेली होती अशा वातावरणात निसर्ग आनंदी झाला होता. झाडे -पशुपक्षी- प्राणी खुश होते. अशा वातावरणात वृद्धाश्रमाच्या परिसरात चालण्याफिरण्याचा आनंद आम्ही दोघे घेत होतो. इथल्या वाचनालयात पुराण आणि अध्यात्मावरील पुस्तकेदेखील होती. काही इतरही पुस्तके उपलब्ध होती, ज्यांचा आम्हाला खरोखरी फायदा झाला. मात्र परिस्थिती बिघडत चालली तसे काही दिवसांत कडक क्वॉरंटाइनचा सामना आम्हाला करावा लागला. म्हणजेच आमच्या सकाळ-संध्याकाळच्या परिसरात चालण्यावरही बंदी घालण्यात आली. जेव्हा कोविड-१९ ची भीती कमी झाली तेव्हा आमचे दोनदा लसीकरण करण्यात आले. परिस्थिती हळूहळू सामान्य होत होती. दरम्यान मी तेथेच वाचले की एका डॉक्टरने वयाच्या ऐशी-नव्वदीत लिहायला सुरुवात केली. त्यांनी अतिशय उत्तम धार्मिक पुस्तकांची निर्मिती केली. हे वाचल्यावर माझ्यातही लेखनाचे स्फुल्लिंग जागृत झाले. मीही लिहिण्याचा प्रयत्न सुरू केला. या काळात मला अनेक गोष्टी आठवत गेल्या. जशा आठवल्या तशा लिहीत गेलो. मी, माझे कुटुंब, माझे नातेवाईक, विद्यार्थी, जिम्नॅस्टिक्स, व्यायाम, मल्लखांब, सामाजिक कार्य इत्यादीसंबंधित अनुभव कागदावर उतरवत गेलो. विजया माझ्यासोबत होती, त्यामुळे मला वृद्धाश्रमात एकटेपणा जाणवला नाही.

कोविड-१९ साथीचा आजार कमी झाल्यानंतर आम्ही आमच्या घरी सुखरूप परतलो. समाजमाध्यमातून मृत्यूचे थैमान पाहिले होते त्यामुळे घरी सुखरूप परतण्याचा आनंद वेगळाच होता!

संसाररूपी रथ दोन चाकांवर चालत असतो. विजया आजारी असल्यामुळे रथ थोडासा डुगडुगत होता पण तरीही तो हळूहळू पुढेच चालत होता. विजया पूर्णपणे बरी नसली तरी, ती घरगुती कामे निगुतीने करायची. थोडाफार स्वयंपाक सांभाळून ती स्वतःही व्यवस्थित राहायची. आम्ही दररोज संध्याकाळी फिरायला जायचो. प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर विजयाने शारीरिक दुर्बलतेवर मात केली होती. आम्ही आता आमच्या आयुष्याच्या अमृत महोत्सवात प्रवेश केला होता. या वयात शारीरिक आजार आसपास फिरकणे नैसर्गिकच होते. खेळामुळे माझे शारीरिक आरोग्य उत्तम होते. विजयाच्या सोबतीने मी फिरू शकतो, ही गोष्ट उत्साहजनक होती.

आम्ही कुर्ल्याला राहायला गेल्यावर तेथील कामगार नगरमध्ये पंधरा-वीस विद्यार्थ्यांसाठी तारळकर डॉ. हरुळकर यांच्या सहाय्याने व्यायाम केंद्र चालवले. कोविडमुळे ते काही काळ ते बंद होते. कोविड-१९ नंतर ते पुन्हा सुरू झाले आणि आता चाळीसहून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. या केंद्राचा विस्तार करण्याच्या योजना गेल्या काही वर्षांपासून मनात आहेत, परंतु अनेक अडचणी आहेत. त्यातून मार्ग काढण्यासाठी प्रयत्न मात्र सुरूच आहेत.

■

२६. अध्यात्माकडे वाटचाल

२००८ मध्ये, डॉ हरूळकर यांच्या सांगण्यावरून आम्ही झाशीतील पंडोखर सरकार नावाच्या अध्यात्मिक गुरूंकडे गेलो होतो. तसे १९७० पूर्वी नवनाथ संप्रदायाचे जाधव सर, पुढे १९९२ पूर्णवादाचे औरंगाबाद येथील सुधीर जोशी असा अध्यात्मिक प्रवास सुरू झालेला होता. तेव्हा मी विचारही केला नाही की हा प्रवास मला महाब्रह्मर्षी जगतगुरू कुमार स्वामींकडे घेऊन जाईल!

जगतगुरू कुमार स्वामी यांचे जगभरातील एकशे साठ देशांमध्ये सहाशे दशलक्षाहून अधिक अनुयायी आहेत. माझ्या पंजाब भेटीदरम्यान, मी अंबाला येथील शक्तीपीठ आश्रमात त्यांची भेट घेतली. याआधी मी १९७० मध्ये श्री श्री आनंद मूर्तींना भेटलो होतो. त्यांच्या आध्यात्मिक शक्तीचा माझ्यावर खोलवर परिणाम झाला. २०१३ मध्ये औरंगाबादजवळील डोंगराळ भागात असलेल्या आश्रमात दुसऱ्या प्रमुख संन्यासी असलेल्या टांके महाराजांनी त्यांची रुद्राक्ष माळ माझ्या गळ्यात घातली तेव्हा मला आध्यात्मिक शांती लाभली! याचा मला प्रचंड आधार वाटला आणि मानसिक शांतीही मिळाली. अध्यात्म हा निश्चितच माझा आवडता विषय बनला आहे परंतु मी कधीही कोणत्याही बाबा किंवा स्वामींना स्वाधीन झालो नाही. मी माझ्या आयुष्यात

अनेक चांगल्या विचारवंतांना आणि आध्यात्मिक गुरूंना भेटलो आहे पण कधीही कोणाचाही आंधळा भक्त झालो नाही. मी नेहमीच धार्मिक पुस्तके, शास्त्रे आणि धर्मग्रंथ वाचली आहेत. माझा हा वाचन प्रवास आजही सुरू आहे. मी अजूनही नियमितपणे आदि गुरू महाराजांची पुस्तके वाचतो. मल्लखांब, जिम्नॅस्टिक्स, आसने किंवा व्यायाम सुरू करण्यापूर्वी नेहमीच देवदेवतांचे आणि माझ्या गुरूंचे स्मरण करत आलो आहे. १९७० पासून चुनाभट्टी-कुर्ला येथील चेंबूर हायस्कूल मधील शिक्षक (नवनाथ संप्रदाय) अवधूत पीठाच्या जाधव बाबांचे पाठबळ मला मिळत आहे. बालपणापासून माणसाने अध्यात्माकडे वळावे, असे मला वाटते!

जीवनात अध्यात्माचे आचरण केले की वाईट शक्ती आणि नकारात्मक विचारांपासून आपले संरक्षण होते. अंतरंगात सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो. जीवनाच्या या टप्प्यावर अध्यात्माची आवड जपणाऱ्या सहकाऱ्यांबरोबर लहान-मोठ्या अध्यात्मिक यात्रा करण्याचा प्रयत्न करत राहतो. अलिकडेच मे २०२५ मध्ये, मी उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा पूर्ण केली. प्रा प्रमोद सावंतांसोबत केलेला तो संपूर्ण प्रवास आरामदायी आणि मानसिक शांती देणारा होता.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे जग एका Global Village मध्ये रूपांतरित होत आहे. याचाच अर्थ राष्ट्र, देश आणि जगाचा अनेक दृष्टिकोनातून वेगाने विकास होत आहे. दुर्दैवाने, विकासाच्या या वेगवान गतीमध्ये मानवता संपुष्टात येत आहे. एकमेकांच्या भेटीगाठीसाठी गप्पागोष्टींसाठी कोणाकडेही वेळ नाही. इंदूरचे पूर्णवादाचार्य रामचंद्र बुवा पारनेरकर यांनी पुस्तकात लिहिले आहे की अंतर्मुखी माणूस अजूनही तोच जुना माणूस आहे, परंतु त्याची जीवनशैली आणि गरजा बदलल्या आहेत. तो जाणूनबुजून किंवा नकळत, एका अंध शर्यतीला बळी पडत आहे, ज्यामुळे जीवनात विविध प्रकारचे ताणतणाव वाढत आहेत. परिणामी माणसे अनेक नवीन आजारांना बळी पडत आहेत.

हे मान्य आहे की, पैसा आयुष्यात अनेक गोष्टी घडवून आणू शकतो, पण पैसा म्हणजे सर्वस्व नव्हे. पैसा चेहऱ्यावर हास्य फुलवू शकतो पण आनंद नाही. पैसा पलंग देऊ शकतो, पण झोप नाही. पैसा पुस्तके देऊ

शकतो, पण ज्ञान नाही. पैसा घड्याळ देऊ शकतो, पण वेळ नाही. पैसा सोबती देऊ शकतो, पण जीवनसाथी नाही. पैसा अन्न आणि औषध देऊ शकतो, पण प्रार्थना नाही. म्हणूनच प्रत्येकाने पैशाला किती महत्त्व द्यायचे याचा विचार करावा अशी माझी धारणा आहे.

जीवनाच्या या खेळात, खेळाडूंना बदलता येत नाही आणि पुन्हा खेळता येत नाही. म्हणून नियतीने आपल्याला दिलेली भूमिका आपण निष्ठेने पार पाडावी असे मला वाटते. अध्यात्म आपल्याला हेच शिकवते. म्हणूनच अध्यात्माच्या पायऱ्या चढून मौल्यवान जीवनात काहीतरी अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे!

खरेतर हा न संपणारा विषय आहे!

■

२७. शरीर, मन आणि जीवनसंवाद

शरीर, मन आणि जीवनाचा जवळचा संबंध आहे. शरीर आणि मन ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे आपण जाणतो म्हणजे शारीरिक व्याधीमुळे मन अस्थिर होते तर मानसिक व्याधींमुळे शरीर कमजोर होते. दोघांपैंकी एकाचा जरी समतोल बिघडला तरी जीवनात असंतुलन येते. त्यामुळे जीवनात जर समतोल साधायचा असेल तर शरीर आणि मन दोघांचाही एकत्रित विचार करावा लागतो. निरोगी शरीर आणि शांत मन जीवनाला समृद्ध आणि आनंदी बनवते. त्यामुळे मला जाणीव झाली की मी जीवनाच्या अशा टप्प्यावर आहे जिथे संपत्तीपेक्षा आनंद शोधणे हे माझे महत्त्वाचे काम आहे. शरीर, मन आणि जीवन यांच्यात कसा सुसंवाद घडवून आणता येईल याचा मी विचार करू लागलो आहे. शरीराच्या पुढे जाऊन मी मनाचा आत शिरून अंतर्मनापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करू लागलो, तेव्हा मला जीवनाचा गूढ अर्थ उलगडू लागला आहे.

माझ्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून लहानपणापासूनच खेळ आणि सामाजिक कार्यात मी सहभागी व्हायचो. माझ्या शैक्षणिक कार्यासोबतच मी अनेक क्रीडा स्पर्धांमध्येही भाग घेतला. यामुळे मला आनंद मिळाला. मी आता घरातील कौटुंबिक जबाबदाऱ्यांपासून मुक्त झालो

आहे. तथापि, विजया माझ्या आयुष्यात आली तेव्हा मला कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे ओझे जाणवू लागले होते, याची आठवण आहेच. ती माझ्यासोबत क्रीडा उपक्रमांमध्येही सहभागी झाली होती. मला सामाजिक जबाबदाऱ्या आणि पवनपुत्र व्यायाम शाळेच्या मुलांची जास्त काळजी होती. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळताना, विजयाने माझ्या सामाजिक जबाबदाऱ्यांचा भार माझ्यासोबत खांद्याला खांदा भिडवून पिळून धरला होता कदाचित माझ्यापेक्षाही जास्त. तिला त्यात निश्चितपणे आनंद मिळायचा. कोणत्याही वयात कोणत्याही माणसांसाठी सामाजिक कार्य सोपे नाही. त्यासाठी सर्वप्रथम प्रचंड संयम आवश्यक आहे. सामाजिक व्यवहाराच्या बाबतीत नेहमीच सावध आणि जागरूक राहावे लागते. दररोज वेगवेगळ्या विचारसरणीच्या माणसांशी व्यवहार करावा लागतो. काही माणसे वैयक्तिक स्वार्थाने प्रेरित होऊन समाजसेवेच्या क्षेत्रात प्रवेश करतात. सामाजिक कार्याचा वरवर दिखावा करत ते यशाच्या पायऱ्या चढू पाहतात. त्यांना मोठी मोठी पदे, पैसा, प्रसिद्धी हवी असते. त्यांना हे सर्व मिळाले की सामाजिक कार्याचाही विसर पडतो ज्याने त्यांना या पदापर्यंत पोहोचलेले असते! अशा राजकारणी माणसांना मी अत्यंत जवळून पाहिलेले आहे. पण सगळीच माणसे स्वार्थी नसतात. माझ्या वडिलांनी मला सामाजिक कार्याकडे वळवले ती सामाजिक कार्याची जाणीव मी आयुष्यभर बाळगली. सहज शक्य असूनही मी कोणत्याही मोहाला कधीच बळी पडलो नाही. सत्ता मिळवायचा प्रयत्न केला नाही. त्याग आणि समर्पण ही माझ्या पालकांकडून आणि गुरुजनांकडून मिळालेली शिकवण मी कधीच विसरलो नाही. म्हणूनच शक्य असूनही मी उच्चपदस्थ आणि श्रीमंत नाही. सर्वसामान्य माणसांसारखे जीवन जगत आहे आणि त्याचा मला अभिमान वाटतो.

आता या वयात, माझे ध्येय खेळांना प्रोत्साहन देणे आणि नवीन पिढीला माझ्या अनुभवाचे ज्ञानामृत पाजणे, हे आहे. माझ्या खेळातील ज्ञानाच्या अनुभवाचा शक्य तितक्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपयोग व्हावा असे मला मनोमन वाटते. मुलांना खेळाची गोडी लावून खेळाकडे वळवणे, योग्य प्रशिक्षण देऊन उत्तम खेळाडू बनवणे हे माझे कर्तव्य आहे असे मी समजतो पण त्यासाठी आता मला खेळाच्या मैदानात उतरून

प्रशिक्षण देता येत नाही ही जाणीव आहे परंतु तरीही माझ्या पातळीवर मुलांना किंवा खेळाचे प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांना मी मार्गदर्शन करू इच्छितो. मागे वळून पाहताना मला एक गोष्ट जाणवते ती ही की या शरीराने आयुष्यभर खेळासाठी खूप कष्ट घेतलेत. त्यामुळे माझे मन प्रफुल्लित राहिले. जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन असल्यामुळे आजही माझे शरीर सुदृढ आहे आणि मनात खेळासाठी खूप काही करण्याची इच्छाही आहे.

मनाविषयी बोलायचे झाले तर शाळेत असताना पाठ केलेले समर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक आठवतात.

देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी
मना सज्जना हेचि क्रीया धरावी।।
मना चंदनाचे परी त्वां झिजावे
परी अंतरीं सज्जना नीववावे।।

माझे हे शरीर नश्वर आहे. ते आज ना उद्या मातीत विलीन होणार आहे परंतु त्यातून सृजनाची निर्मिती निश्चितपणे होऊन माझे कार्य पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरणार आहे, याची मला खात्री आहे!

जसजसे वय वाढते आपली शारीरिक क्षमता व ताकद हळूहळू क्षीण होत जाते. हे अगदी नैसर्गिक आहे. तुम्ही पाहातच असाल की आपल्या आजूबाजूला, बरेच जण वय वाढल्यानंतर थोडे विषण्ण होतात किंवा त्यांना कायम असुरक्षित वाटत राहते. त्यांच्या चेहऱ्यावर दुःख आणि क्लेशच सतत झळकते. जसजसे वय वाढते ते अधिकच दुःखी होतात. पण खरा भक्त तसा नसतो. जो खरा भक्त असतो तो मात्र जसजसे वय वाढत जाते तसतसे अधिकच आनंदी होत जातो. अधिक उल्हासित दिसतो. अधिक हसरा होतो आणि कायमच आनंदी राहतो. त्याला माहीत असते, 'मी हे सारे पहिले आहे आणि मला समजले आहे आणि उमजले आहे. म्हणून मी अंतःकरणातून आनंदी आणि तृप्त आहे. मला खात्री आहे, देव गरजा पूर्ण करण्यासाठी कायमच माझ्या पाठीशी असेल! आपणही सर्वांनी हे लक्षात ठेवले पाहिजे. मला हा वरील उतारा माझ्या विचारांशी आणि जगण्याशी खूप जवळचा वाटला म्हणून मी तो उद्धृत केला. हा उतारा आहे श्री श्री रविशंकरजी यांच्या प्रवचनातील आहे.

■

२८. इच्छापत्र

चेंबूरमध्ये माझ्या घराजवळच आनंद सांडू राहतात. ते माझे जुने मित्र आहेत. अलीकडे आनंदच्या भाच्याने म्हणजे अजित सांडूने मला एका व्हाट्सअप ग्रुपवर जोडले. या ग्रुपवर मला नवनवीन माहिती मिळते. काही सकारात्मक संदेश वाचायला मिळतात. एके दिवशी या ग्रुपवर इच्छापत्र (Will) तयार करून ठेवण्याच्या गरजेबद्दल चर्चा सुरू झाली. मी लगेच माझी पत्नी विजया हिच्यासोबत त्यावर चर्चा केली. ती इच्छापत्र तयार करून ठेवण्यास सहमत झाली. त्याची आवश्यकता तिला पटली. मलाही ते लवकर पूर्ण करायचे होते पण मी दैनंदिन कामात अडकलो आणि त्याबद्दल विचार करायला वेळ मिळाला नाही. हे महत्त्वाचे काम पुढे ढकलले जात राहिले. विजया रुग्णालयात दाखल झाली तेव्हा तिने इच्छापत्राशी संबंधित मुद्दे एका कागदावर लिहून ठेवले, त्यावर स्वाक्षरी केली आणि ते मला दिले. मी वरवर ते चाळले आणि बाजूला ठेवून दिले. बऱ्याच वर्षांनी जेव्हा मला हे आठवले, तेव्हा मी कागदपत्रांचा गठ्ठा पुन्हा वाचला आणि पाहिले की तिने शक्य तितके सर्व मुद्दे कव्हर केले आहेत. यामुळे मला खूप दिलासा मिळाला. आता समस्या अशी होती की ते सरकारकडे नोंदणीकृत नव्हते. जेव्हा मी काही लोकांशी यावर चर्चा केली तेव्हा मला कळले की

तशी नोंदणी अनिवार्य नाही. यामुळे थोडा दिलासा मिळाला आणि सुटकेचा नि:श्वास टाकला. प्रत्येक गोष्टीसाठी या वयात इतरांवर अवलंबून राहावे लागत आहे. या विजयाच्या इच्छापत्राद्वारे जाणवले की महिला पुरुषांपेक्षा त्यांच्या कुटुंबाप्रती अधिक संवेदनशील आणि जबाबदार असतात! माणसावर कधी कोणती वेळ येईल सांगता येत नाही आणि म्हणूनच मी घेतलेल्या अनुभवानुसार मी तुम्हाला सांगू इच्छितो की प्रत्येक माणसाने आपल्या आयुष्यात जितक्या लवकर करता येईल तितक्या लवकर आपले इच्छापत्र (Will) करून ठेवले पाहिजे. वयाच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला ते सहजपणे बदलताही येते.

■

२९. बदल...

२०२३ सालची गोष्ट. विजया घरी एकटीच होती. वयाची ऐंशी तिने ओलांडलेली होती. त्या रात्री साधारण तीनच्या सुमारास ती पलंगावरून पडली आणि उठू शकली नाही. तिला उठवायला कोणी नव्हते. मलाही त्या रात्री कशी कुणास ठाऊक गाढ झोप लागली होती. कदाचित औषधांचा परिणाम असावा. ती पहाटे तीन ते सकाळी सहा वाजेपर्यंत जमिनीवर अशीच पडून होती. ती सर्वपित्री अमावस्येची रात्र होती. मला सवयीप्रमाणे सकाळी जाग आली तेव्हा मी तिला असे जमिनीवर पडलेले पाहिले. इतकी शांत झोप लागल्याबद्दल मी मलाच कोसले. मी ताबडतोब शेजारपाजाऱ्यांना आणि नातेवाईकांना मेसेज केले. त्यांच्या मदतीने तिला रुग्णालयात दाखल केले. या कठीण काळात, विजयाच्या बहिणीचा मुलगा कुलदीप दाते आणि त्याची पत्नी सिद्धिका या डॉक्टर दांपत्यांनी ताबडतोब मदत केली. त्यानंतर आमची परिस्थिती जाणून विनीत देव्हारे अगदी तन-मन-धनासहित मदत करण्यासाठी पाठीशी उभे ठाकले. मला अजूनही ती काळरात्र आठवते. त्या दिवशी वादळी पाऊस होता. या सर्वांवर मात करत विजयावर वेळेवर उपचार सुरू झाले. काही दिवसांनी ती बरी झाली. १७ जानेवारी २०२३ रोजी, तिचा ऐंशीवा वाढदिवस म्हणजेच सहस्र चंद्रदर्शन सोहळा मोठ्या

थाटामाटात साजरा करण्यात आला. असे मानले जाते की ऐंशीव्या वयापर्यंत, एखाद्या व्यक्तीने त्याच्या आयुष्यात हजार वेळा चंद्र पाहिलेले असतात अशा भाग्यवान माणसांसाठी हा सोहळा साजरा केला जातो. प्रत्येकाला हे सौभाग्य मिळतेच असे नाही. या कार्यक्रमाला आम्हा दोघांचेही मित्रपरिवार आणि कुटुंबीय उपस्थित होते. विजयाच्या ऑफिसमधील काही मित्रमैत्रिणीही शुभेच्छा देण्यासाठी आल्यामुळे विजया खुश होती. या सोहळ्यानंतर तिचा उत्साह दुणावला. आम्ही आयुष्याची नव्याने सुरुवात केली. माझे मन उत्साहित होते, पण शरीराचे काय? विजया दिवसेंदिवस अशक्त होत चालली होती. तिला थकवा जाणवत होता. आम्ही केवळ आला दिवस कसातरी ढकलत होतो. सुरेश भट माझे आवडते गझलकार आहेत. त्यांची मृत्यूविषयक एक गझल मी अनेकदा ऐकली आहेत महेंद्र कपूर यांनी ती गायली आहे तर हृदयनाथ मंगेशकर यांनी त्याला भावपूर्ण संगीत दिलेले आहे.

पूर्तता माझ्या व्यथेची माझिया मृत्यूंत व्हावी
जीवनापासून माझ्या ह्या मला मुक्ति मिळावी

वेदनेला अंत नाही अन कुणाला खंत नाही
गांजणाऱ्या वासनांची बंधनें सारी तुटावी

संपली माझी प्रतीक्षा, गोठलो माझी अपेक्षा
कापलेले पंख माझे... लोचने आता मिटावी!

मृत्यू हे अंतिम सत्य आहे. हा निसर्गाचा नियम आहे. जन्म हे मृत्युचे कारण आहे. जन्माला येणारा प्रत्येकजण मरणारच आहे आणि जो मरतो त्याला पुनर्जन्म घ्यावा लागतो, यावर माझा ठाम विश्वास आहे. म्हणूनच या जगाला मृत्युलोक म्हणतात. शरीर नष्ट होते पण आत्मा अमर राहतो. अनेक व्याधींनी ग्रासलेले शरीर विजयाने त्यागले. १५ फेब्रुवारी २०२४ चा तो दुर्दैवी दिवस होता. तिने या जगाचा निरोप घेतला. वृद्धापकाळात पती-पत्नीचा एकमेकांना आधार असतो. पण माझा आधार हरपला. हे दुःख

शब्दात व्यक्त करता येणे मला तरी शक्य नाही. सुरेश भट यांच्या शब्दात, दुःखी आणि वेदनामयी जीवनापासून तिला मुक्ती मिळाली अशी मी माझ्या मनाची समजूत घातली. माझ्या आयुष्यातला तो एकमेव प्रकाशकिरण लुप्त झाला. बरीच माणसे भेटायला येऊन गेली त्या सर्वांचे खरोखरी अंतःकरणापासून आभार मानतो कारण दुःखाच्या वेळी, कोणाचेतरी सांत्वनपर शब्द आधार वाटतात. काही दिवसांपूर्वीच माझ्या दोन विद्यार्थिनी मंजुषा सांडू-कर्वे आणि नीलाक्षी पुरव- म्हात्रे भेटायला आल्या होत्या. जवळजवळ दोन तास गप्पा झाल्या. त्यांनी माझी विचारपूस केली याचे बरे वाटले. विजयासोबत युरोप, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाचा प्रवास करून मला सात वर्षांहून अधिक काळ लोटला आहे, पण त्या आठवणी, तिच्यासोबत घालवलेले ते सोनेरी दिवस अजूनही मला प्रेरणा देतात. सोबतीस जीवनसाथी असेल तर दीर्घ आयुष्यदेखील लहान वाटते. प्रत्यक्षात आयुष्य लहान नसतेच; लोक उशिरा जगायला सुरुवात करतात! आयुष्याची कलती संध्याकाळ कोणालाही अस्वस्थ करते तशीच मलाही खूप अस्वस्थ करत आहे. तिला विसरायचा प्रयत्न करत आहे, जे कदापि शक्य नाही!

भगवद्गीतेतील श्लोक :

नैनं छिंदन्ति शस्त्राणी नैनं दहति पावकः
न चैनम् क्लेदयान्त्यपो न शोषयति मारुतः

या श्लोकाचा अर्थ : शस्त्रे आत्म्याला कापू शकत नाहीत, अग्नी जाळू शकत नाही, पाणी भिजवू शकत नाही आणि वारा वाळवू शकत नाही. आत्मा फक्त एका शरीरातून दुसऱ्या शरीरात जातो. त्याचे अस्तित्व कधीही संपत नाही.

याच श्लोकाचा मला आता खूप आधार वाटतो. विजयानेही तिचे मानवी शरीर सोडले आहे, तिचा आत्मा मला दिसत नाही परंतु माझ्याभोवती कुठेतरी दुसऱ्या स्वरूपात घुटमळतो आहे, असे मला जाणवते.

आज माझ्याकडे खूप निवांत वेळ आहे. मी गतआयुष्याबद्दल जेव्हा विचार करतो तेव्हा श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर, बृहन्मुंबई जिल्हा जिम्नॅस्टिक्स असोसिएशन, मल्लखांब आणि राज्य जिम्नॅस्टिक्स संघटनेचे तांत्रिक आणि आर्थिक खाते सांभाळणे हे माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या क्षमतेबाहेरचे

होते. तरीही मी ते यशस्वीरित्या करून दाखवले याचे कारणच मुळी माझी पत्नी विजया हिचा नुसताच पाठिंबा नाहीतर पूर्ण साथ होती. माझा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा खूपच सकारात्मक होता त्यामुळे जगभरात खेळाच्या बाबतीत काय चालले आहे त्या नवनवीन कल्पना मी माझ्या क्रीडाक्षेत्रात राबवत होतो. परंतु याच्या पूर्ततेसाठी अनेक विश्वासनीय हातांची मला गरज होती. प्रामुख्याने ती गरज विजयाने भागवली होती. माझ्यात खळाळून वाहणारा उत्साह आहे, नवनवीन कल्पना माझ्या मनावर धडका देताहेत परंतु एकट्याच्या जीवावर मला त्या कल्पना राबवता येत नाहीत. जग झपाट्याने बदलत आहे. माणसे वाट मिळेल तिथे धावत आहेत परंतु धावण्याचा व्यायाम करण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नाही. माणसे यशाच्या अनेक शिड्या चढत आहेत परंतु मल्लखांबांवर चढण्यासाठी त्यांना वेळ नाही. त्यामुळे आज ते कदाचित खुश असतीलही परंतु त्यांना दीर्घकाळ निरोगी राहण्यासाठी थोडा वेळ देण्याची गरज आहे, तीही वेळ निघून जाण्याआधी! हे त्यांना कोण समजावून सांगणार? माणसांचे खेळांकडे दुर्लक्ष होत आहे याचा मला खूप मानसिक त्रास होतो. पण काय करणार?

आलिया भोगासी असावे सादर
मनी असू द्यावे समाधान!

असे श्री संत तुकाराम महाराज यांच्या वचनाचा आधार घेऊन म्हणावेसे वाटते.

■

३०. भारताचे २०३६ चे ऑलिंपिक आयोजन (प्रस्तावित)

२०३६ मध्ये भारत ऑलिंपिक खेळाचे (Olympic Games) आयोजन करणार आहे.

पहिला ऑलिम्पिक स्पर्धा ख्रिस्तपूर्व ७७६ मध्ये आयोजित केला गेल्या होत्या आणि ऑलिम्पियाड (Olympiad) ही संज्ञा त्या खेळांनंतरच्या दर चार वर्षांच्या कालावधीसाठी वापरली जाऊ लागली.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, २०३६ मध्ये ऑलिंपिक खेळ भारतात होणार आहे, त्यासाठी भारताने आधीच तयारी सुरू केली आहे. ऑलिंपिक ही एक प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आहे ज्यामध्ये विविध क्रीडा स्पर्धा होतात. दर चार वर्षांनी एका यजमान देशात याचे आयोजन केले जाते. जगभरातील क्रीडाप्रेमींना या कार्यक्रमाविषयी उत्सुकता असते. ऑलिंपिकच्या नावाचा फक्त उल्लेख होताच माझ्या बाहूंमध्ये शक्ती संचारते आणि माझ्या शरीरात एक अनोखी ऊर्जा उसळते. माझे हृदय उत्साहाने भरून जाते आणि माझे अंतर्मन देशभक्तीने उचंबळून येते. मी कधीही ऑलिंपिकमध्ये सहभागी होऊ शकलो नाही, परंतु माझ्या देशातील अधिकाधिक तरुण खेळाडूंनी ऑलिंपिकच्या आकाशात उंच भरारी घ्यावी आणि स्वतःचा आणि त्यांच्या देशाचा गौरव वाढवावा अशी माझी इच्छा आहे. आज आपला देश प्रत्येक

क्षेत्रात उंच भरारी घेत आहे, मग आपण ऑलिंपिकमध्ये मागे का राहिलो आहे? पदकांच्या यादीत भारताचे नाव वरच्या श्रेणीत का नसते? प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर एखादी व्यक्ती काय साध्य करू शकत नाही? आपल्या देशात उत्तम कामगिरी करू शकतील अशा सशक्त प्रतिभावान खेळाडूंची कमतरता नाही, परंतु आपले दुर्दैव आहे की योग्य वेळी, योग्य खेळाडूला, योग्य संधी मिळत नाहीत. हा कुठेतरी आपल्या व्यवस्थेतील दोष आहे.

२०३६ मध्ये भारत ऑलिंपिकचे आयोजन करणार आहे ही निव्वळ बातमी माझ्यासारख्या अनेक क्रीडाप्रेमींसाठी अभिमानाची आणि सन्मानाची गोष्ट आहे. याबरोबरच या आयोजनासंदर्भात अनेक आव्हाने समोर येऊन उभी ठाकली आहेत.

एक समर्पित क्रीडा कार्यकर्ता म्हणून, या महोत्सवाबद्दल माझ्या मनात खूपच उत्सुकता आहे. आशियाई खेळ आणि राष्ट्रकुल खेळांनंतर, ऑलिंपिक क्रीडा महोत्सव आता भारतात होणार आहे आणि ही एक मोठी आनंदाची पर्वणी आहे. ही आपल्या भारतीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. यामुळे क्रीडा जगतातील प्रत्येकाचे मनोबल उंचावले आहे. या ऑलम्पिक खेळासाठी माझ्या मनामध्ये काही कल्पना आहेत ज्या मी आपल्याबरोबर शेअर करू इच्छितो. यापूर्वीही आपले खेळाडू ऑलिंपिकमध्ये सहभागी झाले आहेत आणि त्यांनी काही पुरस्कारही जिंकले आहेत. याचाच अर्थ असा की हा महोत्सव आपल्यासाठी नवीन नाही. आपली क्षमता असूनही, इतर विकसित देशांच्या तुलनेत आपली कामगिरी फारशी प्रभावी राहिलेली नाही, ही निश्चितच चिंतेची बाब आहे. परंतु अजूनही अनेक संधी आहेत. भविष्यातील संधी लक्षात घेऊन आपण आपली स्थिती सुधारली पाहिजे. म्हणूनच म्हणतात की –

म्हणजे माणसाला जर लांब उडी घ्यायची असेल तर त्याला थोडे मागे जावे लागते आणि पळत पुढे यावे लागते!

आपल्या खेळाडूंकडून झालेल्या चुका, आपल्या खेळातील उणिवा यांचा अभ्यास करण्यासाठी आपल्याकडे पुरेसा वेळ आहे तर खेळाडूंनी आणि त्याचबरोबर त्यांच्या प्रशिक्षकांनी मागे जाऊन याचा अभ्यास करावा. एकदा पूर्ण अभ्यास झाला की जोमदार वाटचाल सुरू करावी, खूप प्रॅक्टिस

करावी. आपल्या सर्व क्षमतांचा उपयोग करून, आपली पूर्ण ताकद लावून पुढे जाण्याचा प्रयत्न करावा तरच आपली उडी लांब पडू शकेल!

आपले हे होमपीच आहे. या मातीशी या वातावरणाशी आपण समरस झालेलो आहोत. टाळ्या वाजवण्यासाठी, आत्मविश्वास वाढवण्यासाठी आपली माणसे समोर आहेत हे लक्षात घेऊन आपण आपले सर्वोत्तम प्रदर्शन केले पाहिजे!

ही एक मोठी संधी आहे शिवाय हातात भरपूर वेळ आहे. भारतीय खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरी आणि जिंकलेल्या पदकांच्या संख्येवरून त्याचे यश ठरवले जाणार आहे. ऑलिंपिकला खूप जुना इतिहास आहे. ते १८९६ पासून आयोजित केला जातेय. प्राचीन ऑलिंपिक खेळ प्रथम १२०० वर्षांपूर्वी योद्धा खेळाडूंसाठी आयोजित केला गेलेला होता. सुरुवातीला या स्पर्धांमध्ये बॉक्सिंग, धावणे, कुस्ती आणि रथ शर्यत यासारख्या खेळांचा समावेश होता. मोठ्या संख्येने लष्करी सैन्यातील जवान सहभागी व्हायचे, कारण खेळांना लष्करी प्रशिक्षण आणि तंदुरुस्तीचा भाग मानले जात होते. प्राचीन काळात युरोपीय देश विशेषतः ग्रीस आणि रोम, सैनिकांना त्यांचे शरीर तंदुरुस्त राहावे यासाठी त्यांना जिम्नॅस्टिक्सचे प्रशिक्षण द्यायचे जेणेकरून युद्धात ते चांगली कामगिरी करू शकतील!

१८९६ मध्ये ग्रीसची राजधानी अथेन्स येथील ऑलिंपिया (Olympia) या ठिकाणी पहिला ऑलिंपिक खेळ आयोजित करण्यात आला होता म्हणूनच या खेळाला ऑलिंपिक (Olympic) हे नाव पडले. ऑलिंपिक खेळांच्या सुरुवातीच्या काळात, देशातील, राज्यातील शहरांमध्ये छोटी मोठी युद्ध चालू असायची तरीही ऑलिंपिक खेळाच्या काळात सगळे देश आपापली भांडणं विसरून गुण्यागोविंदाने एकत्र येऊन ऑलिंपिक खेळाचा आनंद घ्यायचे. यादरम्यान त्यांच्यातला संघर्ष व युद्धजन्य परिस्थिती काही काळासाठी स्थगित केली जायची यावरून ऑलिंपिक या खेळाची लोकप्रियता आपल्या लक्षात येईल! त्यानंतर उन्हाळी महोत्सव, हिवाळी महोत्सव, पॅरालिंपिक खेळ आणि युवा ऑलिंपिक महोत्सव यासारख्या ऋतूंनुसार या स्पर्धा आयोजित केल्या जायच्या. हळूहळू आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑलिंपिकची लोकप्रियता वाढली. प्रत्येक राष्ट्रांसाठी आणि तेथील खेळाडूंसाठीही ऑलिंपिकमधील

सहभाग हा प्रतिष्ठेचा विषय बनला. आताही परिस्थिती अजिबात बदललेली नाही. खेळाडू बक्षीस मिळवण्यासाठी नाही तर केवळ सहभागी होण्यासाठीही आटोकाट प्रयत्न करतात. ऑलिंपिक खेळांचे नियमदेखील वेळोवेळी बदलले गेले आहेत. नवीन धोरणानुसार, दर चार वर्षांनी (Leap Year) वेगवेगळ्या देशांमध्ये ऑलिंपिक स्पर्धा आयोजित केली जाते. जो देश त्याचे आयोजन करतो, त्या देशाला यजमान देश म्हणतात. अत्यंत व्यावसायिक पद्धतीने आयोजित केलेली ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा जगभरातील हजारो खेळाडूंना आकर्षित करत आली आहे. जगभरातील खेळाडूंइतकेच क्रीडाप्रेमींनाही ऑलिंपिकचे वेध लागतात.

१८९६ मध्ये जेव्हा अथेन्समध्ये पहिल्यांदा ऑलिंपिक खेळांचे आयोजन करण्यात आले तेव्हा त्यात फक्त पाच खेळांचा समावेश केला गेला होता. त्यानंतर खेळांची संख्या वाढवली गेली आहे, ती खालीलप्रमाणे आहे-

१. २०१२ मध्ये २६ खेळ
२. २०१६ मध्ये २८ खेळ
३. २०२१ मध्ये ३३ खेळ
४. २०२४ मध्ये ३२ खेळ.

१९१९ मध्ये सरासरी वयोमर्यादा १४ ते १५ वर्षे होती, नंतर १९९७ मध्ये ती १६ वर्ष होती. १९९४ मध्ये, जिम्नॅस्टिक्सचे सरासरी वय १६.४९ होते. २००५ मध्ये सरासरी १८.१० वर्षे होते. २०१६ च्या जलतरण स्पर्धेत, सर्वात तरुण खेळाडू नेपाळची होती आणि ती १३ वर्षांची होती. सर्वात वयस्कर ऑस्ट्रेलियाचा खेळाडू ६१ वर्षांचा होता. २०२० मध्ये वयोमर्यादा १५ वर्षे निश्चित करण्यात आली होती. ऑलिंपिक खेळाडू कसा असावा याची कल्पना देण्यासाठी सरासरी वयोमर्यादा मोजण्यात आली आहे. खेळाडूंच्या सरावाची सरासरी वयोमर्यादा ८ वर्षे निश्चित करण्यात आली आहे, तर कधीकधी सरासरी वय ६.८ ते १० वर्षे आहे. ऑस्ट्रेलियन पद्धतीनुसार त्यांनी वयोमर्यादा ८ वर्षे निश्चित केली आहे. विविध प्रकारची माहिती उपलब्ध आहे. कुठेतरी जिम्नॅस्टिक्ससाठी सरासरी वय ६ ते १८ वर्षे असल्याचे दर्शविले आहे. जिम्नॅस्टिक्स ही जागतिक स्तरावर सर्व खेळांची जननी मानली जाते. तथापि जिम्नॅस्टिक्ससोबतच आसनांनासुद्धा

खेळांचा पाया मानले पाहिजे. २०२० च्या ऑलिंपिक खेळांमध्ये भारताची कामगिरी काय होती याबद्दलची सर्व माहिती गुगलवर उपलब्ध आहे म्हणूनच त्या आकडेवारीबद्दल मी मौन बाळगतो कारण ती तितकीशी चांगली नाही. जे झाले ते झाले ते विसरून आपण निश्चितपणे प्रगतीपथाकडे वाटचाल करू शकतो!

२०२४ च्या पॅरिस ऑलिंपिकमध्ये भारताने फक्त सहा पदके जिंकली आणि पदकतालिकेत भारत एकाहत्तराव्या स्थानावर राहिला. २०२० साली भारताने ऑलिंपिकमध्ये सात पदके जिंकली आणि ४८ व्या स्थानावर राहिला, ही त्याची आतापर्यंतची सर्वोत्तम ऑलिंपिक कामगिरी आहे. आता प्रश्न असा आहे की इतकी मोठी लोकसंख्या असूनही भारत ऑलिंपिक पदकांच्या क्रमवारीत इतका मागे का राहतो आहे? आपल्या देशात प्रतिभावान खेळाडू नाहीत का? की आपण त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाही? या विषयावर आपल्याला विचार करण्याची गरज आहे!

श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरच्या माध्यमातून मी गेल्या अनेक वर्षांपासून ऑलिंपिक खेळांबद्दल विचार करत आहे.

इतर राष्ट्रांपेक्षा आपण नेमके कुठे कमी पडतोय की आपल्याला ऑलिंपिकमध्ये पदकं जिंकता येत नाहीत?

असे घोषवाक्यदेखील तयार केले होते. १९६०-७० च्या दशकात जे खरे होते आणि आजही तेच खरे आहे, याचे दुःख आहे. जेव्हा एखादा खेळाडू ऑलिंपिकमध्ये पदक जिंकतो तेव्हा प्रगत राष्ट्रांमध्ये त्याचा खूप आदर केला जातो. केनियासारख्या देशांतील खेळाडू मॅरेथॉनमध्ये सातत्याने वर्चस्व गाजवतात, पण आपले खेळाडू कुठे मागे पडतात? का मागे पडतात?

मला पोहण्याशी संबंधित एक घटना आठवते. काही वर्षांपूर्वी पुण्यात एक अनोखा प्रयोग करण्यात आला होता. बाळ जन्मल्यानंतर लगेचच पाण्यात सोडले गेले. त्यामागचा विचार असा होता की आईच्या पोटातील बाळ पाण्यातच वाढते. हेच जिम्नॅस्टिक्सच्या बाबतीत सांगायचे तर सहा महिन्यांच्या बाळाचे शरीर लवचिक असते, जसे वळवू तसे वळते. याचाच उपयोग करून, एक प्रयोग म्हणून सहा महिन्याच्या बाळाला जिम्नॅस्टिक्सचे मूलभूत प्रशिक्षण देण्यात आले होते. त्यानंतर दहा महिन्यांच्या बाळावरही

असाच प्रयोग करण्यात आला. कोणत्या वयात मुलांना खेळाचे प्रशिक्षण द्यावे याबद्दल कोणताही विशिष्ट नियम नसला तरी, भारतात असंख्य प्रयोग करण्यात आले आहेत. सामान्यपणे वयाच्या बाबतीतले असे प्रयोग परदेशात नेहमीच केले जातात. आपण अजूनही नैसर्गिक विज्ञान (Natural Science) समजून घेण्याचा प्रयत्न केलेला नाही, परंतु वैज्ञानिक पाश्चात्य लोकांनी सागरी जीवसृष्टीचा अभ्यास करून ही शाखा विकसित केली आहे. अधिक व्यापकपणे सांगायचे तर बुलेट ट्रेन, लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे, अवकाश इत्यादींवर आपण जितके लक्ष केंद्रित करतो त्या तुलनेत खेळांकडे करत नाही. याचा अर्थ असा की विकसित किंवा इतर देशांमध्ये खेळांना जितका दर्जा मिळतो तितका आपल्या देशात मिळत नाही. मानवाच्या शक्ती, बुद्धिमत्ता किंवा क्षमतेवर आधारित विज्ञानाचा अभ्यास करून याचा विकास कसा करता येईल याकडे आता तरी आपल्या देशाला लक्ष पुरवायला हवे. आपला देश, या दिशेने अर्थपूर्ण प्रयत्न करतोय का? असा प्रश्न एक खेळाडू आणि प्रशिक्षक म्हणून माझ्या मनात येत राहतो.

सर्कशीत आपण सर्वांनी घोड्यासोबत धावणारा घोडेस्वार नक्कीच पाहिलेला आहे. तो प्रथम घोड्याच्या पाठीचा लगाम पकडतो आणि नंतर उडी मारून त्याच्यावर बसतो हे आठवून बघा. तो ज्या शिताफीने घोड्यावर चढतो तितक्याच शिताफीने धावणाऱ्या घोड्यावरून सहज खाली उतरतो. अशाप्रकारे तो घोड्यासोबत धावताना विविध प्रकारचे खेळ (Stunt) करतो. यासाठी त्याचे शरीर त्याला लवचिक (Flexible) असावे लागते. या घोडेस्वारासारखे खेळाडूंनी आपले शरीर लवचिक ठेवण्याची आवश्यकता आहे. आमचे आजोबा घोड्यांच्या शर्यतीत घोड्यांचे वजन इ अभ्यास करीत असत. या शर्यतीत घोड्याच्या वजनाइतकेच महत्त्व जॉकीच्या शरीराच्या वजनाचेही असते! आजही मला पक्के आठवत आहे की वेग आणि वजन या दोघांना विचारात घेऊन त्या दृष्टीने प्रशिक्षण घेतल्यास हमखास यश प्राप्त होते!

काही वर्षांपूर्वीपर्यंत, रशियन वाणिज्य दूतावासातून पवनपुत्रमध्ये स्पोर्ट्स इन द यूएसएसआर (Sports in the USSR) हे मासिक नियमितपणे यायचे. एका अंकात असे लिहिले होते की शास्त्रांनुसार, मानवांना मूळतः

माकडांसारख्या शेपट्या होत्या. जेव्हा मानवांनी त्यांच्या शेपट्या वापरणे बंद केले तेव्हा त्या कालांतराने नाहीशा झाल्या. त्याचप्रमाणे जर आपण आपल्या शरीराच्या सर्व अवयवांचा पूर्णपणे वापर केला नाही, तर काही शतकांत आपण आपले हातपायसुद्धा गमावू शकतो. म्हणूनच शरीराच्या सर्व अवयवांचा योग्य वापर केला पाहिजे. आज संगणक, मोबाईल फोन आणि लॅपटॉपसारखी अनेक आधुनिक उपकरणे उपलब्ध झाली आहेत, ज्यामुळे काही अवयवांचा वापर कमी झाला आहे. आणखी प्रगत उपकरणे निर्माण झाली तर काय होईल? आपण आपल्या अवयवांचा वापर आणखी कमी करू. आजच्या काळात, आधुनिक तांत्रिक उपकरणांच्या अति वापरामुळे प्रौढांमध्ये तसेच मुलांमध्ये विविध आजार निर्माण झाले आहेत, जे मानवी जीवनासाठी भविष्यातील धोक्याचे संकेत आहेत. हे सर्व सांगण्याचा माझा मूळ उद्देश हा आहे की मी आपले लक्ष खेळांकडे वळवतो आहे. खेळ हा सर्वांग सुंदर व्यायाम आहे ज्याने आपल्या शरीराचा प्रत्येक अवयव तसेच शक्तीने परिपूर्ण लवचिक बनतो. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या आयुष्यात खेळांना थोडी तरी जागा दिली पाहिजे.

मुंबईत मी कॉलेजमध्ये शिकत असताना, धोबी तलाव येथे मेट्रोला काही चित्रपट पाहिले. त्यापैकी एका चित्रपटात तीन मेंदू एका काचेच्या हंडीखाली लपवलेले दाखवले होते. परंतु ते मेंदू नेटवर्कद्वारे जग नियंत्रित करताहेत असेही दाखवले गेले होते. त्याचप्रमाणे, गलिगन ट्रॅव्हल (Galigan travel) चित्रपटात मानवांना यांत्रिक उपकरणांच्या पूर्णपणे नियंत्रणात गेल्याचे दाखवण्यात आले होते. एका दृश्यात तर वृद्धांना थेट स्वर्गात जाताना दाखवण्यात आले होते, परंतु प्रत्यक्षात त्यांना मारण्यात आले होते.

आणखी एका चित्रपटात माणसांची ओळख त्यांच्या नावांऐवजी त्यांच्या नंबरवरून करून दिली जात होती. ज्याप्रमाणे आजकाल मोबाईल नंबर, आधार कार्ड नंबर आणि पॅन कार्ड हे आपल्या ओळखीचे प्रतीक (Identity) बनले आहे! कदाचित आणखी काही वर्षात एखाद्या व्यक्तीची ओळख कोड नंबरवरून निश्चित केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणजेच, या चित्रपटांमध्ये आपल्या मेंदूच्या बुद्धिमत्तेचा सखोल वापर खूप तपशीलवार असा दाखवण्यात आला होता. अमेरिकेत मेंदूच्या संशोधनावर खूप भर

दिला जात आहे. मानवी मेंदू चार ते पाच या वयोगटापर्यंत वेगाने विकसित होतो. शिवाय, अंतर जाणण्याची क्षमता आठ वर्षांच्या वयापर्यंत पूर्णपणे विकसित झालेली असते. म्हणूनच, वॉल्टिंग हॉर्स (Vaulting Horse) नावाच्या क्रीडा उपकरणाचा आकार त्याच्या मूळ स्वरूपापासून बदलून समोरील भाग अधिक गोलाकार करण्यात आला आहे. विकसित देशांमध्ये खेळाडूंसाठी उच्च दर्जाचे निकष लावले जातात. आपल्या देशात खेळांसाठी असे मानक स्थापित केले जाऊ शकतात का? यावर विचार होण्याची गरज आहे.

ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीचा चेहऱ्याची ठेवण आणि अंगठ्याचे ठसे वेगळे असतात, त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीची विचारसरणी आणि मूल्यांकन करण्याची क्षमतादेखील वेगळी असते. जिम्नॅस्टिक्सच्या कोड ऑफ पॉइंट्समध्ये (Code of Points) सोल (Sole) हा शब्द सादरीकरणासाठी वापरला जातो. त्याचा खोल अर्थ आपण विचारात घेतला पाहिजे. मानवाच्या मेंदूचा विकास आणि बौद्धिक क्षमतेचा अभ्यास हा अमेरितील संशोधकांच्या आधी भारतात काही शतकांपूर्वीच केला गेला होता, जे आपल्या धर्मग्रंथात नमूद केलेले आहे पण आपण नेहमीसारखीच योग्य वेळी याची दखल घेतलेली नाही.

याचा मतितार्थ आपल्याला आपल्याच प्राचीन संस्कृती आणि साधनांचा कसा उपयोग करता येईल यावर सखोल चिंतन करण्याची आता आवश्यकता आहे. आपल्याला हा प्राचीन इतिहास अद्ययावत करून नव्याने तो जगासमोर ठेवण्याची गरज आहे.

■

३१. मुलांचे वय आणि खेळांची ओळख

मुलांना खेळात सहभागी करून घेण्याच्या वयाबद्दल कोणताही विशिष्ट नियम नाही. याविषयीचे नियम बनवण्यासाठी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर असंख्य प्रयोग केले गेले आहेत. साधारणपणे ० ते ३ वयोगटातील मुलांना खेळांमध्ये लहान मुले मानले जाते. दोन वर्षांच्या वयापर्यंत मुले उभे राहण्यास आणि चालण्यास सुरुवात करतात. त्यानंतर चार वर्षांच्या वयापर्यंत मुलांना, मुले म्हणून वर्गीकृत केले जाते. ४ ते ६ (Toddler) किंवा ६ ते १० (Kids) वयोगटातील मुलांसाठी, मुलांच्या उपकरणांचा (Toddler / Kids Equiments) वापर योग्य मानला जातो. या उपकरणांसह विविध प्रकारचे व्यायाम केले जातात. मुलींसाठी गुडघ्याच्या मध्यापर्यंत उंची असलेला बीम, कंबरेपासून वर छातीपर्यंत असलेला (प्रत्यक्षात गळ्यापर्यंत) अनइव्हन बार तर मुलांसाठी हॉरिझॉन्टल बार (HB) रोमन रिंग्स (RR), हॉरिझॉन्टल बार (HB), पॅरलल बार (PB) व्यायामासाठी योग्य मानले जातात. ऑलिंपिक खेळांसाठी स्कोअरिंगसाठी(Scoring) मुलांसाठी सहा आणि मुलींसाठी चार उपकरणे आहेत. यामध्ये शारीरिक व्यायाम करण्यासाठी अद्ययावत केलेली उपकरणे समाविष्ट आहेत. लहानपणी पांगुळगाडा (तीन चाकी लाकडी गाडी) हे मूल उभे राहायला शिकत असता आधारासाठी

वापरण्यात येणारे उपकरण आहे हे आपण समजू शकतो. पांगुळगाड्यामध्ये तीन लाकडी चौकटींना जोडलेली तीन लहान चाके असतात. मूल ते ढकलून हालचाल करण्याचा प्रयत्न करते. आजकाल एक लहान फिरणारी गाडी (सायकल) सुरू झाली आहे, ज्यामध्ये मूल बसते आणि त्यांच्या पायांचा वापर करून गाडी पुढे-मागे सरकते. याचा अर्थ असा की लहान मुले ही गाडी खेळताना अप्रत्यक्षपणे व्यायाम करतात. सुरक्षितता हा सर्वात महत्त्वाचा उद्देश लहान मुलांची खेळणी किंवा खेळ उपकरणे (Toddler or Kids Euipments) बनवताना डोळ्यासमोर ठेवला जातो आणि म्हणूनच त्या उपकरणांना फोम आणि रबरही जोडलेले आपल्याला दिसतात.

मी आणखी एका गोष्टीकडे आपणा सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो : जेव्हा एखादे मूल चालायला लागते तेव्हा त्यांना अनेकदा टॉक टॉक आवाज करणारे किंवा ज्यातून रंगीबेरंगी रंगांची उधळण होईल असे एलईडी दिवे असलेले छोटे बूट वापरायला दिले जातात. बूटांमधून येणाऱ्या आवाजाने किंवा प्रकाशाने ते मूल आनंदाने चालण्याचा प्रयत्न करते. त्याचप्रमाणे पालक त्यांच्या मुलांसाठी फॅशननुसार चांगले कपडे खरेदी करतात. जेव्हा कपडे लहान किंवा घट्ट होतात तेव्हा नवीन खरेदी करतात. अशा प्रकारे नवीन कपडे खरेदीमुळे जितके समाधान आपल्या मुलांना प्राप्त होते तितकेच समाधान त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून आपल्यालाही प्राप्त होते.

एकंदरीत सर्व वयोगटातील मुलांसाठीची उपकरणे आणि त्यांची उपयुक्तता समजून सागण्यासाठी मी ही सर्व उदाहरणे दिली आहेत.

ही संकल्पना अधिक स्पष्ट करण्यासाठी, आणखी काही उदाहरणे पाहूया. जेव्हा मूल तीन ते चार वर्षांचे असते, तेव्हा आपण त्यांना चालवण्यासाठी एक लहान तीन चाकी सायकल घेऊन देतो. ते मूल मोठे झाल्यावर, आपण त्याला एक पुशकार्ट सायकल देतो, ज्यामध्ये दोन चाके असतात आणि जी मुले उभे राहून चालवतात. एक पाय सायकलवर ठेवून आणि दुसरा पाय जमिनीवर ढकलून ती चालवली जातो. दोन्ही हातांनी हँडल धरल्यामुळे या मुलाला सायकल चालवणे अधिक सोपे जाते. मूल आणखी थोडे मोठे झाल्यावर आपण त्यांना दोन चाकी सायकल घेऊन देतो. यावर ते पेडलिंग करून स्वतःसहित सायकलचे संतुलन साधतात.

विविध वयोगटातील मुलांसाठी बाजारात विविध उंचीच्या दोन चाकी सायकली उपलब्ध आहेत, त्यामुळे कोणीही सायकल शिकू शकतो, चालवू शकतो. कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने वा मित्र-मैत्रिणींच्या संगतीने मुले हळूहळू व्यवस्थित सायकल चालवायला शिकतात. थोडक्यात हे सर्व व्यायामाचे प्रकार आहेत. म्हणजे योग्य वयात योग्य खेळांची साधने त्यांच्या हातात दिली तर त्यांची शारीरिक वाढ तसेच त्यांच्या बुद्धीचा विकास तर होतोच परंतु त्यांचा आत्मविश्वासही वाढतो. याचा अर्थ असा की खेळाद्वारे त्यांना व्यायामही आपोआप घडतो!

मुलांमध्ये लपलेल्या सुप्त कलात्मक गुणांना तसेच त्यांच्यातील प्रतिभेला ओळखणे आणि त्यांना योग्य वेळी योग्य संधी मिळवून देणे हे आपल्या पालकांचे आणि शिक्षकांचे आद्य कर्तव्य आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात अशी म्हण आपल्याकडे प्रसिद्ध आहेच! त्यामुळे मुलांच्या आतल्या गुणांना ओळखून योग्य वेळी त्यांची चाचणी घेणे आवश्यक आहे. याचबरोबर मुलांचा कल कोणत्या गोष्टीकडे आहे याचाही आजच्या काळात पालकांनी विचार करण्याची गरज आहे. पवनपुत्र व्यायाम शाळेत जिम्नॅस्टिक्स म्हणून शिकायला आलेल्या विद्यार्थ्यांना मी स्वतः जिम्नॅस्टिक्स आणि मल्लखांबाचे धडे दिलेत. त्यानंतर माझे विद्यार्थी प्रशिक्षक होऊन त्यांनीही धडे दिलेत त्यामुळे आज पवनपुत्रचे हजारो विद्यार्थी आपापल्या क्षेत्रात तेजस्वी ताऱ्यांप्रमाणे चमकत आहेत हे पाहून मला आनंद होतो हे माझ्या गुरूंच्या तसेच विद्यार्थ्यांच्याही कठोर परिश्रमाचे फळ आहे. या शेकडो खेळाडूंनी स्वतःला, त्यांच्या संस्थांना, राज्याला आणि देशाला गौरव मिळवून दिलेला आहे, ही समाधानाची बाब आहे. समर्थ रामदास स्वामींनीही वेळोवेळी बलोपासनाचे महत्व विशद केले आहे, याची फक्त आठवण करून देतो.

मुलांना त्यांच्या वयानुसार आसने, मल्लखांब, ॲथलेटिक्स, ताकद वाढवणारे खेळ, वेटलिफ्टिंग आणि इतर अनेक संबंधित व्यायाम आणि खेळ शिकवले पाहिजेत. काही खेळांचे प्रशिक्षण नर्सरीपासूनच दिले पाहिजे. यासाठी ऑस्ट्रेलियन चार्ट, एफ आय जी चार्ट आणि किड्स चार्टचे संदर्भ घेता येतील. साधारणपणे, सहाव्या- सातव्या वर्षांच्या मुलांचे पालक त्यांच्या बाबतीत पूर्ण निर्णय घेतात त्यामुळे त्यांच्या पालकांनी मुलांच्या आवडीनुसार

विचारपूर्वक निर्णय घेण्याची गरज आहे कारण आपल्या मुलातील क्षमता आणि त्यांचा कल कुठे आहे हे फक्त त्यांच्या शिक्षकांना आणि पालकांनाच माहीत असते. बरेच पालक त्यांच्या मुलांद्वारे त्यांची बालपणीची अपुरी राहिलेली स्वप्ने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. उदाहरणार्थ एखाद्या आईला लहानपणी भरतनाट्यम शिकायचे असते पण तिला शिकता येत नाही तेव्हा ती तिच्या मुलीला भरतनाट्यम शिकायला पाठवते, यात काहीही चूक नाही. परंतु या प्रक्रियेत त्या मुलीची भरतनाट्यमध्ये फारशी प्रगती होत नाही तिचा कल कदाचित गाण्याकडे असू शकतो! त्यामुळे आपल्या मुलांच्या क्षमता, आवडीनिवडी आणि त्यांचा कल याची सांगड घालून पालकांनी त्याच्या हिताकडे विशेष लक्ष पुरवले पाहिजे!

अनेक प्रकारच्या कला आणि क्रीडांचे ज्ञान मुलांकडे आणि त्याचबरोबर त्यांच्या पालकांकडेही नसते म्हणून मला वाटते की मुलांना आणि पालकांना जिम्नॅस्टिक्स आणि इतर खेळांबद्दल विविध माध्यमांद्वारे व्यापक माहिती दिली पाहिजे. हा उपक्रम काही वर्षांपूर्वी श्री पवनपुत्रच्या माजी खेळाडूंनी सुरू केला होता. ऋषिकेश आणि अपर्णा यांनी चेंबूर आणि घाटकोपरमध्ये मुलांच्या क्रीडा उपकरणांचे एक दिवसीय प्रदर्शन आयोजित करण्यासाठी कठोर परिश्रम केले.

ही आमची पवनपुत्र बी टीम होती. त्याच्या यशानंतर, इतरत्र अनेक संस्थांनी अशाच प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले. यामध्ये ट्रेकिंगसह सांघिक खेळ आणि वैयक्तिक कार्यक्रमांचाही त्यात समावेश होता. त्याच्यामध्ये खेळ आणि इतर विषयांवरील माहिती समाविष्ट करण्यात आली. याला पालकांनी खूप सकारात्मक प्रतिसाद दिला.

असे प्रयोग आणि प्रदर्शने अधूनमधून का होईना आयोजित केली पाहिजेत असे माझे मत आहे. दिल्ली ही भारताची राजधानी आहे त्यामुळे दिल्लीपासून अशा प्रदर्शनांना सुरुवात केली तर तिथे धरले गेलेले मूळ भारतभर पसरू शकते असा मला विश्वास वाटतो.

विशिष्ट प्रकारचे व्यायाम किंवा खेळ शिकवण्यापूर्वी मुलाची आवड, संज्ञानात्मक क्षमता आणि शारीरिक क्षमता ओळखणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, शाळेत मुलांना प्रथम वर्णमालेतील अक्षरांची ओळख करून

दिली जाते. नंतर त्यांना शब्द, त्यानंतर वाक्ये इत्यादी बनवायला शिकवली जातात. एकदा मुलांनी प्राथमिक ज्ञान घेतले आणि त्यावर प्रभुत्व मिळवले की त्यानंतर त्यांना विविध विषयांचे मूल्यांकन करण्यासाठी विज्ञान, गणित, भाषा, नागरिकशास्त्र तसेच कला, संगीत आणि वाणिज्य इत्यादी विषय शिकवले जातात. खेळांमध्येही असेच प्रयोग केले जातात. आपण मुलांवर त्यांच्या इच्छेविरुद्ध कोणताही खेळ किंवा व्यायाम लादू नयेत. हे साध्य करण्यासाठी, आपण प्रथम मनोविश्लेषक आणि क्रीडा कार्यकर्त्यांची टीम तयार केली पाहिजे. खेळ ही एक शिस्त आहे आणि म्हणूनच ज्यांनी ज्या खेळाचा सखोल अभ्यास केला आहे स्वतः अनुभव घेतला आहे अशांकडूनच आपल्या मुलांची क्षमता, आवड आणि कल जाणून घेतला पाहिजे.

खेळासारखे विषय शैक्षणिक विभागात समाविष्ट केले गेले पाहिजेत. त्यांच्यासाठी एक व्यापक अभ्यासक्रम विकसित केला पाहिजे. आपल्या सर्वांना माहीत आहे की आरोग्यासाठी खेळ अत्यंत महत्त्वाचा आहे. सुविधा आणि पुरेशी माहिती नसल्यामुळे, बरेच जण खेळ आणि त्याद्वारे मिळणाऱ्या फायद्यांपासून वंचित राहतात. सरकार किंवा क्रीडा-संबंधित संस्था याबद्दल पूर्णपणे जागरूकता निर्माण करू शकत नाहीत किंवा लोकांना शिक्षित करत नाहीत. माध्यमे फक्त क्रिकेटवर लक्ष केंद्रित करतात. क्रिकेटचा जेवढा उदो उदो होतो तेवढा इतर कोणत्याही खेळांचा होत नाही. याचा अर्थ असा की, क्रिकेटशिवाय इतर खेळांविषयी जनजागृती करणे त्या खेळासाठी प्रेरणा देणे अशा गोष्टींचा आपल्या देशात तरी अभाव दिसतो.

■

३२. खेळांबद्दल पालक आणि खेळाडूंची मानसिकता!

खेळाडूचा अर्थ स्वतः खेळणारा आणि दुसऱ्यांना खेळ शिकवणारा. आपल्या देशात खेळाला मनोरंजन किंवा आनंद मानले जाते. आजच्या काळात खेळाला तितके महत्त्व दिले जात नाही परंतु खेळ म्हणजे विज्ञान आणि खेळाशी मिलाफ म्हणजेच शिस्त! कोणत्याही कुशल खेळाडूला प्रसिद्धी मिळण्यासाठी दीर्घ काळ कठोर परिश्रम करावे लागतात. क्रिकेट चाहत्यांची संख्या लाखोंमध्ये असते. मालिका जिंकल्यानंतर, क्रिकेट खेळाडूंचे उत्साहाने आणि आदराने स्वागत केले जाते, जणू काही त्यांनी युद्ध जिंकले आहे! जगातील काही निवडक देशांमध्येच क्रिकेट खेळला जातो. त्या तुलनेत इतर खेळांची स्थिती काय आहे? याचे आपण चिंतन केले असता लक्षात येते की इतर खेळांमध्ये पदक विजेते खेळाडूंना त्या देशातील माणसेतरी ओळखतात का? तर त्याचे उत्तर दुर्दैवाने नाही असे द्यावे लागेल.

आपल्या देशात खेळांबद्दल एकंदरीतच माणसांची मानसिकता आणि सामाजिक जाणीव जागृत होण्यास बराच काळ जाईल. यामागे अनेक कारणे असू शकतात. व्यस्त शहरी जीवन, शिक्षणाचा ताण, रोजच्या उपजीविकेसाठीची धावपळ, उपजीविकेचा संघर्ष आणि इतर संसाधने इ. त्यामुळे माणसांची अशी मनोवृत्ती होत आहे की पैसा म्हणजेच सर्वकाही!

त्यामुळे माणसे खेळ वगैरे खेळण्याच्या भानगडीत न पडता सरळ पैसे मिळवण्याच्या मागे धावतात. जिथून जास्त पैसे मिळू शकतील असेच करिअर ते निवडतात. जीवनातील पैशाचे महत्व मी नाकारत नाही. पैसा महत्त्वाचा आहेच पण पैसा सर्वस्व नाही. आजकाल आधुनिक जिम आणि क्लबचे जाळे सर्वत्र वाढत आहे, कारण आजकाल माणसांना आधुनिक सुविधा हव्या असतात. जिथे त्यांना या सुविधा मिळतात तिथे ते कितीही मोठ्या प्रमाणात पैसे खर्च करायला सहज तयार होतात.

खरंतर पारंपारिक पद्धतीने केलेला व्यायाम हा भारतीय क्रीडा संस्कृतीचा पाया आहे. तरीही जुन्या पद्धतीने चालवलेल्या व्यायामशाळा आणि आखाड्यांची संकल्पना विस्मृतीत जात आहे. ज्यांच्याकडे पैसा आहे ते या आधुनिक सुविधांचा वापर करून घेतात त्याचा त्यांना फायदाही होत आहे परंतु सर्वसामान्य परिस्थितीतील माणसांनी काय करायचे? खेड्यापाड्यातील प्रतिभावान खेळाडूंचे काय करायचे? कुठे जायचे?

दर चार वर्षांनी होणाऱ्या ऑलिंपिक खेळांमध्ये पदके जिंकणाऱ्या खेळाडूंवर कौतुकाचा वर्षाव होतो. प्रगत राष्ट्रांमध्ये युद्ध जिंकलेल्या योद्ध्यांसारखे त्यांचे मोठे स्वागत होते. प्रगत राष्ट्रे आधीच खेळाडूंकडून विविध खेळांची उत्कृष्ट तयारी करून घ्यायला सुरुवात करतात. आपल्या देशात मात्र ती परिस्थिती नाही. योग्य खेळाडू या स्पर्धांपर्यंत पोहोचतच नाहीत. आपण भारतीय शास्त्रज्ञ डॉ.अब्दुल कलाम यांनी सुरू केलेल्या अणुविकासाचा, डॉ. जयंत नारळीकरांनी केलेल्या संशोधनाचा, डॉ. माशेलकर आणि डॉ. गोवारीकरांच्या बुद्धिमत्तेचा आणि विज्ञानाचा तरी योग्य वापर करतोय का? याविषयी मी साशंक आहे.

या विचारवंतांच्या बुद्धिमत्तेचा बलोपासनासाठी कसा उपयोग करून घेता येईल, हे ठरवणे महत्त्वाचे आहे. आज याबद्दल विचार करण्यासाठी कोणाकडेही वेळ नाही, किंवा कदाचित त्याबद्दल विचार करायचाच नाही आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात जिम आणि क्लब हे श्रीमंतांसाठीची स्टेटस सिम्बॉल आणि फॅशन आयकॉन बनत चालली आहेत. हा व्यवसाय उच्चभ्रू भागात भरभराटीला येत आहे. महानगरांपासून ते आता लहान शहरांमध्येही लोकप्रिय होत चालली आहेत, ही चांगली गोष्ट आहे परंतु

याचा परिणाम खेळांच्या गुणवत्तेवर होत आहे. त्यामुळे क्रीडाक्षेत्रात गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे, असे मला क्रीडाप्रेमी म्हणून वाटत राहते.

आपल्या देशातील काही मुले पालकांमुळे वा संगतीतील मुलांमुळे, लहानपणापासूनच खेळांमध्ये रस घेतात. परंतु जसजसे ते मोठे होतात तसतसे ते अभ्यास आणि करिअरमध्ये अभ्यासात आणि नोकरीत व्यस्त होतात. खेळणे सोडून देतात. आपल्या देशात दृढ समजूत आहे की खेळ हे उपजीविकेचे साधन होऊ शकत नाही. तरीही दुसरीकडे, आंधळेपणाने क्रिकेटसारख्या खेळाचा पाठलाग मात्र करताना दिसतात. याला कारण म्हणजे क्रिकेट हा खेळ प्रसिद्धी आणि संपत्ती देण्यास सक्षम आहे असा समज आहे आणि तो खोटा आहे असेही म्हणता येत नाही!

क्रिकेटच्या मॅचसाठी मोठ्या प्रमाणात आयोजक प्रायोजक मिळतात. कितीही मोठ्या रकमांची तिकिटे लावली तरी ती खपतात. त्यामुळे क्रिकेट हर प्रकारे पैसा मिळवून देणारा खेळ आहे. इतकेच नव्हे तर दिवसेंदिवस सोशल मीडिया त्याचा प्रचार आणि प्रसार आणखी जोमाने करत आहे आणि आणखी मोठ्या प्रमाणात या खेळाला रसिक मिळवत आहे.

ॲथलेटिक्स, ॲक्वेटिक्स (पोहणे), जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब, प्रो कबड्डी आणि खो-खो यांच्या बाबतीत असे का घडत नाही? याचे मला तरी वाईट वाटते. हा आपल्या सर्वांसाठी, आपल्या सरकारी व्यवस्थेसाठी चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. सरळ शब्दात सांगायचे तर क्रिकेट खेळणारे खेळाडूच आपली एक विशेष ओळख निर्माण करतात किंवा त्यांची उपजीविका क्रिकेट या क्रीडा प्रगतीपथावर उत्तम चाललेली असते. बाकी क्रीडा प्रकारांना त्यांचे अस्तित्व टिकवणे सुद्धा कठीण झाले आहे. त्यामुळे त्यामुळे इतर खेळांच्या बाबतीत लोकांची मानसिकता बदलवणे गरजेचे आहे. विकसित देशांप्रमाणे सरकारी पातळीवर खेळांना विशेष महत्त्व दिले गेले पाहिजे. हा उपक्रम निश्चितच खेलो इंडिया द्वारे सुरू करण्यात आला आहे, परंतु त्यासाठी शास्त्रीय पद्धतीने स्पर्धात्मकतेसाठी वेगळा आणि सखोल विचार करणे अजूनही बाकी आहे.

ज्याप्रमाणे बेडूक पावसाळ्यात डराव डराव आवाज करत ओरडतात. माणसांचे लक्ष आकर्षित करून घेतात आणि नंतर वर्षभर ते गायब होऊन

जातात त्याचप्रमाणे निवडणुकीच्या काळात पुनरुज्जीवित होणाऱ्या सरकारी योजनादेखील आहेत! म्हणूनच या प्रयत्नात आयआयटी (पवई), टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS), गोवंडी आणि लष्करी शाळांसारख्या काही महत्त्वाच्या संस्थांना सहभागी करून घेतले पाहिजे, असे मला वाटते.

जीवनात खेळांना खूप महत्त्व आहे. खेळ ही जीवनातील आनंददायी गोष्ट आहे. त्यामुळेच प्रत्येक माणसाने जीवनात खेळासाठी थोडासा वेळ काढून ठेवला पाहिजे आपल्या जीवनात त्याला महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे.

आजच्या धकाधकीच्या काळातही सुदृढ शरीर खूपच महत्त्वाचे आहेच! त्यामुळे शारीरिक सुदृढतेसाठी खेळ हा आनंददायी पर्याय निवडला गेला पाहिजे!

तथापि, या प्रक्रियेत दोन प्रमुख घटक आपापल्या भूमिका बजावतात. त्यातील पहिले म्हणजे पालक आणि दुसरे म्हणजे क्रीडा संघटना (Coach, Association and Federation)

खेळाद्वारे आपल्या मुलांचा शारीरिक मानसिक विकास होत आहे हे पालकांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे नसते तर आपल्या मुलांनी कोणती क्रीडा स्पर्धा जिंकली आणि त्यांना कोणती पदके मिळाले यात जास्त रस असतो!, याचे मला फार वाईट वाटते. शिवाय ते त्यांच्या मुलांना आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये संधी मिळावी यावरदेखील घारीसारखे लक्ष ठेवून असतात. आजकालचे प्रशिक्षक आणि क्रीडा संघटनांना प्रामुख्याने कुठून कसा आर्थिक लाभ मिळू शकेल आणि आपल्या संस्थेची बातमी किती माध्यमांद्वारे दूरवर पोहोचू शकेल याकडे बारीक लक्ष ठेवून असतात.

हे सगळे मिळवायचे असेल तर सरकारी अधिकारी, मंत्री आणि राजकारण्यांना खूश करावे लागते याची जाणीव त्यांना असते. या प्रक्रियेत मग सरळ सरळ खेळाशी तडजोड केली जाते. कोणत्याही स्पर्धांसाठी पाठवलेल्या खेळांडूपैकी, खूप कमी यशस्वी खेळाडू म्हणून उदयास येतात. शेवटी काय तर फक्त तीन विजेत्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांनी सन्मानित करण्यात येते. बाकीच्यांचे काय? ज्यांना पदकं मिळाली नाहीत ते खेळाडू नव्हते की त्यांच्या खेळ खालच्या दर्जाचा होता?

स्पर्धांमध्ये यश मिळाले नाही तर खेळाडू निराश होतात आणि खेळांकडे कायमची पाठ फिरवतात. ही खेळाडूंची निराशा टाळण्यासाठी आपल्याकडे कोणत्या प्रणाली आहेत? येथेच खरे तर क्रीडा क्षेत्रातील कार्यकर्त्याची भूमिका सुरू होते. त्यामुळे क्रीडा कार्यकर्ता हा क्रीडा प्रशिक्षकाइतकाच महत्त्वाचा आहे. ज्युडो आणि कराटेमध्ये ब्लॅक बेल्ट गाठण्यासाठी ज्याप्रमाणे अनेक पायऱ्या असतात, त्याचप्रमाणे जिम्नॅस्टिक्समध्येही असेच टप्पे (Level Training) असले पाहिजे जेणेकरून खेळाडू निराश होता कामा नये. (गेली दोन वर्षे लेव्हलच्या जिम्नॅस्टिक्स मध्ये स्पर्धा घेतल्या जातात पण त्या खऱ्या आहेत का? याचे उत्तर कुणी द्यावयाचे?)

माझ्या एका पत्रकार मित्राने मला सांगितले की अमेरिकेत मोठ्या कंपन्या खेळाडूंची जबाबदारी, कर्तव्य भावनेने स्वीकारतात. याचे कारण कदाचित खेळाडू ही देशाची जबाबदारी आहे, अशी त्यांची भावना असते. आपल्या देशातही अशी व्यवस्था व्यापक स्तरावर लागू झाली पाहिजे. खेळाडूंची विविध पातळ्यांवरील सेवा ही एक प्रकारची देशसेवाच मानली गेली पाहिजे, असे मला वाटते.

भारतातील बहुतेक प्रशिक्षक आणि पालकांना अजूनही माहीत नाही की मुलांना कोणत्या वयात ॲथलेटिक्स, जिम्नॅस्टिक्स, आसने आणि मल्लखांब यांचे प्रशिक्षण द्यावे. अभ्यासात कमकुवत असलेल्या किंवा ज्यांना त्यात रस नाही अशा मुलांनी खेळात निश्चितपणे रस घ्यावा. खेळ करिअरची संधी मिळवून देऊ शकतात. आजच्या काळात आजूबाजूला पाहिले तर ॲथलीटसना केवळ त्यांच्या खेळाच्या उत्तम कामगिरीमुळे नोकरी मिळाली आहे, अशी कितीतरी उदाहरणे दिसून येतात. आजकाल सरकारी आणि काही खाजगी क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये खेळाडूंसाठी विशेष क्रीडा कोटादेखील आहे. आधुनिक पालक त्यांच्या मुलांच्या करिअरबद्दल सखोल विचार करतात, हे नवीन पिढीसाठीचे एक चांगले लक्षण आहे परंतु क्रीडाकोटा असतो हे त्यांच्या खिजगणतीतच नसते. चीन, अमेरिका, स्पेन, जपान आणि कोरियासारख्या देशाला, खेळाचे महत्त्व समजल्यामुळे बरेच पालक अगदी सहजपणे आणि आनंदाने त्यांच्या मुलांना क्रीडाक्षेत्राकडे पाठवण्यास उत्सुक दिसतात. दुर्दैवाने, तेथे सर्वार्थाने उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाचा

आणि उपकरणांचा आपल्या देशात पूर्णपणे अभाव आहे. अनेक देशांमध्ये, मुले सामान्यतः वयाच्या तिसऱ्या वर्षीच हात आणि पाय वापरून कार्टव्हील आणि बॅकवॉकसारखे साधे क्रीडा प्रकार शिकतात आणि नंतर स्पर्धांमध्ये भाग घेतात. परंतु आपल्या देशात इतक्या मोठ्या प्रमाणात क्रीडा संस्थाही नाहीत आणि क्रीडा या प्रकाराकडे इतक्या लहान वयाच्या मुलांनी वळावे, ही जाणीव करून देणारे क्रीडा कार्यकर्तेही नाहीत.

सरासरी खेळाडूच्या शारीरिक क्षमतेचा विचार करता, अगदी वयाच्या तिसऱ्या- चौथ्या वर्षापासून त्यांना व्यवस्थित प्रशिक्षण दिले तर वयाच्या सोळाव्या वर्षांपासून ते मोठमोठ्या क्रीडा स्पर्धा सहज जिंकू शकतात!

हॉकी, फुटबॉल, मल्लखांब, कुस्ती, धनुर्विद्या आणि भालाफेक यासारख्या खेळांची उत्पत्ती आपल्या देशात झाली आहे याचा भारतीय म्हणून मला अभिमान आहेच. असे असूनही, आंतरराष्ट्रीय स्तरावर या खेळांमध्ये आज आपले स्थान काय आहे? याची कारणे काय आहेत? ही चिंताजनक बाब आहे. ऑलिंपिक खेळ महोत्सव युरोपीय देशांपासून जगभरात पसरला. त्यामागे अनेक वेगवेगळ्या विचारसरणी होत्या. परंतु त्याची लोकप्रियता आणि प्रसिद्धीदेखील स्पर्धांपुरती मर्यादित आहे!

खेळाडू असतील तेव्हाच स्पर्धा होऊ शकतील ना? तर, जागतिक खेळाडू विकसित करण्यासाठी ऑलिंपिक संघटनेकडे काय योजना आहेत? ते मानवतेच्या हितासाठीच हे करत असावेत का? भारतातील उदयोन्मुख खेळाडूंना प्रशिक्षण देऊन क्रीडा जगातात एक नवीन क्रांती घडवता येणार नाही का? प्रत्येकाने याचा विचार केला पाहिजे. आज जेव्हा संपूर्ण जग एका जागतिक गावात रूपांतरित झाले आहे, तेव्हा हे अजूनही अशक्यप्राय का आहे ? इतके वर्ष क्रीडाक्षेत्राशी संबंधित असूनही माझ्याकडे यातील कोणत्याही प्रश्नाचे उत्तर नाही, याचे आश्चर्य वाटते.

आपण फक्त सरकारी अधिकारी, नेते आणि पालकांच्या मानसिकतेवर आणि भारतातील उपलब्ध पायाभूत सुविधांवर चर्चा करत आहोत. माझ्यासारखा सामान्य माणूस यावर कसा भाष्य करणार? असे मला वाटते. तसे या माणसांवर भाष्य करण्याचा मला अधिकारही नाही, याचीही मला जाणीव आहे.

हे सगळे खरे असले तरी माझे संपूर्ण आयुष्य या क्षेत्रासाठी समर्पित केले आहे, म्हणून अधिकारवाणीने काही सांगण्याचा माझा प्रयत्न आहे. भविष्यात या क्षेत्रात माझ्या दीर्घ अनुभवाच्या जोरावर प्रगतीच्या दृष्टीने सकारात्मकतेने वेगवान पावले टाकण्यासाठी एक जवळचा रस्ता (Short Cut) दाखवणे हे माझे उद्दिष्ट आहे. इतक्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात कोणत्याही स्पर्धेत, आपल्या खेळाडूंना मिळालेली पदके पाहताना वाईट वाटते. आता तरी खेळाचे महत्त्व समजून घेतले पाहिजे! हे अगदी खरे आहे की आपल्या देशातील खेळांची आणि खेळाडूंची परिस्थिती विकसित राष्ट्रांसारखी नाही कारण आपला देश अजूनही विकसनशील देशांमध्येच गणला जातो!

आपल्या देशाची सध्याची परिस्थिती चाळीस-पन्नास वर्षांपूर्वीच्या परिस्थितीपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. परंतु भविष्यातील प्रगतीपथाकडे जाण्यासाठी आपण आपले ध्येय निश्चित करून त्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. यासाठी अगदी तळागाळातील पातळीपासून काम सुरू करण्याची आवश्यकता आहे. फक्त क्रीडा क्षेत्रातच नाही तर कला, साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रातही विकसित राष्ट्रांपेक्षा आपण खूप मागे आहोत. याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. ऑलिंपिक खेळांमध्ये जिंकलेल्या पदकांच्या संख्येवरून विकसित देशाची प्रगती मोजली जाते. अमेरिका, चीन, रशिया, जपान आणि युरोपीय देश क्रीडा क्षेत्रात आघाडीवर आहेत. दुर्दैवाने या सगळ्यांचे घवघवीत यश टळटळीतपणे स्पष्ट दिसते मात्र कोणत्याही स्पर्धेनंतर आपल्याला पदकांच्या यादीत भारताचे नाव शोधावे लागते.

खेळाडू, त्यांचे पालक, प्रशिक्षक आणि क्रीडा संघटना अधूनमधून आवाज उठवतात परंतु तो आवाज जिथे पोहोचायला पाहिजे तिथे पोहोचतच नाही. कोणी ऐको किंवा न ऐको, आम्ही पवनपुत्र व्यायाम मंदिराद्वारे शुल्लक वाटणाऱ्या गोष्टींचासुद्धा विचार करून प्रयत्नपूर्वक जनजागृती करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. अजूनही करत आहोत ज्याद्वारे खेळाडूंनी स्वतः प्रशिक्षण घेतले आणि इतर विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले. माझा असा विश्वास आहे की प्रशिक्षकांना प्रथम योग्यरित्या प्रशिक्षित केले पाहिजे. मी या समस्येबद्दल मुंबईतील मराठी विज्ञान परिषदेला चार ते पाच वेळा भेट

दिली, परंतु त्यांनी त्यांच्या स्वतःच्या व्यस्ततेतून आमच्याशी विचारविनिमय करण्यासाठी वेळ दिला नाही. २०१४ मध्ये, मी टाटा सामाजिक विज्ञान संस्थेला भेट दिली आणि दीड तास या विषयावर चर्चा केली. त्यांचा प्रश्न होता की, खर्च कोण उचलेल? संबंधित मंत्र्यांच्या लक्षात हे मुद्दे आणून देणे हे एक कठीण काम होते. त्यामुळे अगदी तेव्हापासून आजपर्यंत अनेक प्रश्न आजही अनुत्तरीत आहेत. जेव्हा असे प्रश्न माध्यमांद्वारे उपस्थित केले जातात तेव्हा खेळाडू, प्रशिक्षक आणि संबंधित मंत्रालये जागृत होतात, परंतु पुढे त्यांच्याही या गोष्टी विस्मृतीत जातात. शेवटी, सर्वांनाच व्यवस्थेसमोर शरण जावे लागते. आपले खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर अपेक्षेनुसार कामगिरी करण्यात अपयशी ठरतात. यात खेळाडूंचा किती आणि काय दोष आहे?, असा प्रश्न मला पडतो. जिम्नॅस्टिक्स आणि ॲथलेटिक्स शिकणे खूप कठीण आणि महागडे आहे का? हा प्रश्न अनेकांच्या मनात येत असेल. त्याचे उत्तर नाही असे आहे. जर तुमच्याकडे खेळांबद्दल निष्ठा असेल, थोडी बुद्धिमत्ता असेल, समर्पण असेल आणि कठोर परिश्रम करण्याची क्षमता असेल तर गोष्टी सोप्या होतात असे दिसते.

मला इथे ज्येष्ठ गझलकार चंद्रशेखर सानेकर यांचा एक शेर आठवत आहे:

एक मुंगी प्रार्थना करते तिच्या देवाकडे
एक माझ्या हातुनी पर्वत सरकला पाहिजे!

जर एक छोटीशी मुंगी पर्वत सरकवायचा विचार करते तर आपण तर दोन हात, दोन पाय आणि बुद्धी असलेली माणसे आहोत! त्यामुळे फक्त सकारात्मकतेने ठरवले तर नक्कीच क्रीडा तसेच कोणत्याही क्षेत्रात प्रगती करू शकतो!

■

आठवणींच्या झुल्यावर...

१. आदर्श गुरुकुल – श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर



श्री. प्रदीप अनंत चेंबूरकर

श्री. सुहास रामनाथ पाठारे म्हणजेच आमचे गुरू नाना यांचे नाव क्रीडाक्षेत्रात सन्मानाने घेतले जाते. मल्लखांब आणि जिम्नॅस्टिक्सला त्यांनी महत्त्वाचा हातभार लावला आहे. नानांनी सतरा शिवछत्रपती पुरस्कार आणि एक अर्जुन पुरस्कार विजेता घडविला. तसेच अनेक राष्ट्रीय सुवर्ण पदक विजेते नानांच्या हाताखाली तयार झाले.

१९६६ साली चेंबूरकर, वढावकर आणि वेसावकर ही तीन कुटुंबे नानांच्या श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरात दाखल झाली आणि आसने, मल्लखांब आणि जिम्नॅस्टिक्स क्षेत्रात श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराचा स्पर्धात्मक यशस्वी सुवर्ण काळ खऱ्या अर्थाने सुरू झाला.

स्पर्धेत नव्वद सेकंदात मल्लखांब आणि आसने यांचे सादरीकरण पाच परीक्षकांसमोर करण्यात येत असे. वर्षानुवर्षे केलेल्या मेहनतीचा कस या नव्वद सेकंदांमध्ये सिद्ध व्हायचा. स्टॉपवॉच लावून नाना त्या दृष्टीकोनातून आमची तयारी करून घेत असत. तुमची सुरुवात आणि शेवट म्हणजेच मल्लखांबमध्ये माउंट आणि डिसमाऊंट (Mount and Dismount), कौशल्य (Evaluation), कठीणता (Difficulty), लवचिकता, सहजता, सेटमधील सौंदर्य आणि सफाई या सर्व बाबींचा विचार करून पंच दहा पैकी गुण देत असत. स्पर्धा– सदृश्य वातावरण निर्मिती होण्यासाठी नाना आमच्यात अंतर्गत स्पर्धा लावत असत; ज्याला जास्त गुण मिळायचे त्याला एक कॅडबरी बक्षीस म्हणून द्यायचे!

यामुळे आमची स्पर्धेच्या वातावरणाची आपोआप तयारी व्हायची. स्पर्धेत भीती आणि अनावश्यक धड धड नसायची. उच्च सादरीकरण करण्यासाठी ही अतिशय महत्वाची बाब आहे. मल्लखांबाची आमची पहिली राष्ट्रीय स्पर्धा त्रिपुरा राज्याची राजधानी आगरताळा येथे झाली. आमच्याबरोबर महाराष्ट्र ॲमॅच्युअर (Ammature) जिम्नॅस्टिक्स असोसिएशनचे भिकाजी भोसले (मिलिटरी) आणि व्यास सर ज्यांनी टोकिओ ऑलिम्पिकला भारताचे प्रतिनिधित्व केले होते त्यांच्यासोबत कुस्तीगीर व टूपिज हेही प्रवास करीत होते.

आसाम स्पर्धेच्या वेळी थेट ट्रेन नसल्याने स्पर्धेसाठी सहा दिवस जाण्यास व सहा दिवस परत येण्यासाठी असा बारा दिवसांचा प्रवास होता. स्पर्धेच्या ठिकाणी पोहचेपर्यंत शरीर कडक (stiff) होवू नये म्हणून नाना आम्हाला गाडीतच बरेचसे व्यायाम करायला लावायचे. Coaches win the Matches या उक्तीप्रमाणे नानांच्या अचूक मार्गदर्शनामुळे व्यायाम मंदिरमधील स्पर्धकांनी भरघोस यश संपादन केले. स्नायूंची बळकटी वाढविण्याचा व्यायाम सुचवणे, प्रत्येक खेळाडूचे स्ट्राँग आणि विक पॉइंटस शोधणे, योग्य आहाराची माहिती देणे, मानसिक तयारी या सर्व बाबींचा विचार नाना अचूक करायचे.

आमच्या प्रत्येकाचा स्पर्धेत करायचा संच (set) वेगवेगळा असायचा. प्रत्येकाची शरीर रचना वेगळी असते याची जाणीव ठेवून नाना आमची तयारी करून घेत असत.

मल्लखांबासाठी लागणारी ताकद वाढविण्यासाठी आम्ही विद्यार्थी वेट

ट्रेनिंग, लवचिकता टिकविण्यासाठी योगासने व सूर्यनमस्कार, स्टॅमिना अधिक वाढविण्यासाठी स्विमिंग आणि ॲथलेटिक्सचा सराव नियमित करीत असू. चांगला पौष्टिक आहार घेणे यावरदेखील नानांचे लक्ष असायचे. मल्लखांबामधील फ्रंट आणि बॅक समरसॉल्ट हे प्रकार करताना एअर सेन्स महत्वाचा असतो. तो समजण्यासाठी नाना आम्हाला स्विमिंग पुलावर घेवून जात असत. तेथे आम्ही खेळाडू उंचावरचा स्प्रिंगबोर्ड वापरून पाण्यामध्ये लँडिंगचा सराव करायचो. हे करताना कित्येकदा पाण्याचा जबर मार पण खायला मिळायचा! परंतु मल्लखांब करताना त्याचा खूप फायदा झाला. फ्लोअर एक्सरसाईजेस या प्रकारात व्यायाम मंदिरामध्ये पुरेशी जागा नसल्यामुळे नाना आम्हाला डायमंड गार्डनमध्ये सरावासाठी घेवून जायचे. अशा तऱ्हेने मल्लखांबामध्ये प्रावीण्य मिळविण्यासाठी नाना आमच्याकडून शरीराची सर्वांगीण सुधारणा व्हावी आणि स्पर्धेत कोठेही कमी पडू नये याची काळजी घ्यायचे. ऑर्थोपेडिक आणि स्पोर्ट्स मेडीसिन यामधील तज्ज्ञ डॉ. रवी बापट हे त्यावेळी KEM हॉस्पिटलचे डीन होते. नाना डॉ. बापट यांच्याकडे आम्हाला शारीरिक तपासणी, स्पोर्ट्स मेडिसिन आणि योग्य स्पोर्टस डाएट विषयीचा सल्ला घेण्यासाठी घेवून जायचे. नानांच्या दूरदृष्टीचा खेळाडूंना खूपच फायदा झाला.

१९६९ पासून आमचा स्पर्धात्मक प्रवास सुरू झाला. सुरवातीला पवनपुत्रला योगासने स्पर्धेमध्ये मेडल्स मिळण्यास सुरुवात झाली. त्यानंतर लगेचच मल्लखांब, जिम्नॅस्टिक्समध्ये (Artistic and Rhythmic) पवनपुत्र व्यायाम मंदीरचे वर्चस्व स्थापित व्हायला लागले. मुलांच्या बरोबरीने मुलीदेखील जिम्नॅस्टिक्समध्ये अव्वल यायला लागल्या. १९६६ ते १९७४ या कालावधीत पवनपुत्रचे नाव राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर झळकत होते आणि त्यातच मला १९७३-७४ चा मल्लखांबमधील महाराष्ट्र शासनाचा पहिला शिवछत्रपती राज्य पुरस्कार मला प्राप्त झाला. तो श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर आणि नानांनी मिळवून दिला, अशी माझी भावना आहे.

स्वतः श्री सुहास पाठारे यांना महाराष्ट्र शासनातर्फे क्रीडा विभागातील त्यांच्या योगदानाबद्दल १९९५ मध्ये शिवछत्रपती राज्य पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचा सहभाग असायलाच हवा, असा आग्रह आणि प्रयत्न नाना करीत आहेत. ही क्रीडादिंडी भविष्यकाळासाठी पुढेच

जात राहील असा विश्वास आहे. मल्लखांब, वेट ट्रेनिंग, पॉवर लिफ्टिंग, आर्टीस्टीक्स आणि रीदमिक जिम्नॅस्टिक्स, योगासने अशा विविध क्षेत्रात सहजतेने यशस्वी मुशाफिरी करणारी नाना ही एकमेव व्यक्ती असावी. नानांना क्रीडा क्षेत्रातील भीष्माचार्य संबोधल्यास अतिशयोक्ती होणार नाही!

जिम्नॅस्टिक्स हे एक शास्त्र आहे म्हणजे हा मूलभूत क्रीडा प्रकार आहे जो सर्व साध्यांना आणि मसल ग्रुप्संना जोडणारा आहे म्हणून त्याचा विकास करणे, हा नानांचा आग्रह आणि अट्टाहास आहे. सर्व प्रगत देशामध्ये जिम्नॅस्टिक्स हा पायाभूत खेळ म्हणून मानला जातो. आपल्या देशात त्यासाठी जिम्नॅस्टिक्स फाउंडेशन प्रोग्राम प्राथमिक शाळेच्या मुलांपासून सुरू करणे आवश्यक आहे. मल्लखांब, सूर्यनमस्कार आणि आसने यांची पूरक व्यायाम प्रकार म्हणून जिम्नॅस्टिक्सचा जोड देणे अत्यंत महत्त्वाचे आणि उपयुक्त आहे.

S.S.C. बोर्डाच्या धर्तीवर जिम्नॅस्टिक्सविषयी या सर्व बाबींचा समावेश सर्व शाळांमध्ये अभ्यासक्रम/ पाठ्यक्रम स्वरूपात व्हावा, असा नानांचा प्रयत्न आहे. जिम्नॅस्टिक्स साधारण वयाच्या तीन वर्षापासून सुरू होण्यासाठी खास किड्स उपकरणे (kids equipments) नानानी विदेशी पुस्तकावरून तयार करून घेतली. सर्व शाळेतून हजारो मुले जेव्हां जिम्नॅस्टिक्स करायला लागतील तेव्हां त्यांचे मूल्यमापन (evaluation) करून त्यांना ऑलिम्पिक पातळीपर्यंत नेणे शक्य होईल असे नानाना वाटते. त्यासाठी सर्वमान्य स्टँडर्ड (Standard) तज्ज्ञांमार्फत ठरवावे लागतील असे नानांचे मत आहे.

परदेशात म्हणजे ऑस्ट्रेलिया न्यूझीलंड इत्यादी ठिकाणी लेव्हल ट्रेनिंगसंबंधी सर्व बाबींचा विचार ऑलिम्पिक पातळीचे जिम्नॅस्ट्स तयार करण्यासाठी केला जातो. गुणवत्ता आणि गुणवंत खेळाडू आपल्याकडे खूप आहेत. म्हणूनच नानांची प्रबळ इच्छा आणि विश्वास आहे की आपले विद्यार्थीसुद्धा आंतरराष्ट्रीय स्तरावर भरीव कामगिरी करू शकतील.

नानांच्या क्रीडा जीवनाची, त्यांच्या संघर्षाची, यशाची आणि मल्लखांब-जिम्नॅस्टिक्स खेळाच्या प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाची समग्र माहिती नवीन पिढीला नक्कीच प्रेरणादायी ठरत आहे.

– श्री. प्रदीप अनंत चेंबूरकर

महाराष्ट्राचा आणि श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरमधील पहिला शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेता (मल्लखांब) १९७३-७४

२. तस्मै श्री गुरुवे नमः



डॉ. प्रदीप पाटकर

भारतरत्न सचिन तेंडुलकर, त्याच्या शतकी विक्रमाजवळ पोहोचू पाहाणारा विराट कोहली, अनेक दुखापतीतून वाट काढत २२ ग्रँडस्लॅम जिंकणारा राफा नदाल, निवृत्तीतही ग्रेसफूल फेडरर, सर्वांगसुंदर खेळाने डोळ्यांचे पारणे फेडणारा जोकोविच, फुटबॉल सम्राट मेसी, क्रिस्टीन रोनाल्डो अशी कितीतरी उदाहरणे द्यावीत तितकी थोडीच आहेत. या साऱ्यांची शक्तीस्थाने शोधीत असताना त्यात केंद्रस्थानी एक घटक कायम महत्व राखून असतो तो घटक म्हणजे त्या त्या खेळाडूंचे गुरु, क्रीडा-शिक्षक, कोच!

आमच्या चेंबूर येथील शालेय जीवनातील क्रीडाविश्व मुंबई जिल्हा, महाराष्ट्र, मग देशविदेशापर्यंत विस्तारीत करणारे आणि मग आमच्यातील खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण देऊन आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचविणारे, कच्च्या मातीचे पोलादात आणि त्या पोलादाचे सुवर्णात रूपांतर करणारे पारसमणी असे आहेत आमचे नाना! पवनपुत्र व्यायाममंदिर या व्यायामशाळेत खेळाडूंइतकेच किंबहुना त्यांच्यापेक्षा अधिक कष्ट अनेक दशके अविश्रांत करून त्यांना खेळाडू म्हणून घडविणारे नाना!

त्यांनी फक्त क्रीडाविश्व उजळले नाही तर आमचे मनोविश्वही सद्गुणांनी रुजवीत सर्व अर्थाने संपन्न करण्याचा प्रयत्न केला. आम्हा लहानमोठ्या

खेळाडूंच्या मनात आत्मविश्वास रुजविला, जिद्द जागविली, ध्येयाप्रती पोहोचण्यासाठी कष्ट करण्याच्या वृत्तीचे संगोपन केले. अपयश नुसते पचवण्याला शिकविले नाही तर त्या अपयशांचे विश्लेषण करून स्वतःची तयारी अधिक चांगली कशी करावी हेही समजावून दिले. ही तयारी स्वतः व्यायामशाळेत आमच्याबरोबर सतत राहून त्यांनी ती आमच्याकडून करून घेतली.

ज्या काळात चेंबूर हे एक गाव होते आणि उपनगर होण्यासाठी धडपडत होते तेंव्हा चेंबूरचे नाव मल्लखांब, आसने या भारतीय क्रीडाप्रकारांसोबत इतर पाश्चिमात्य क्रीडा प्रकारातही, वेट लिफ्टिंग, मुख्य म्हणजे जिम्नॅस्टिक्स या जागतिक कौशल्यपूर्ण क्रीडा प्रकारातही मुंबई, मग महाराष्ट्र, भारत आणि मग जागतिक स्पर्धातही पवनपुत्र व्यायाम मंदिर आणि चेंबूरचे नाव झपाट्याने प्रकाशात आणले. मुलींना शाळेत पाठविण्यापुरते सीमित न ठेवता चेंबूरच्या नागरिकांनी दादांच्या (कै. रामनाथ पाठारे) व नानांच्या आवाहनास प्रतिसाद देऊन दोरीचा (वेताचा) मल्लखांब, आसने, जिम्नॅस्टिक्स यातील प्रशिक्षणासाठी मोठ्या विश्वासाने पवनपुत्र व्यायाममंदिरात त्या काळात आपापल्या कन्यांना पाठविले आणि ती कन्यारत्ने मग क्रीडाविश्वात पुढील अनेक वर्षे झळकत राहिली. मल्लखांब व आसने या अतुलनीय क्रीडा प्रकारांना भारतीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धाविश्वात स्थान मिळावे यासाठी, त्याशिवाय राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे पंच प्रशिक्षित करण्यासाठीही नानांनी अविश्रांत कष्ट घेतले.

एवढेच नव्हेतर या क्रीडाप्रकारांचा सूक्ष्म अभ्यास करून, लहान मुलांच्या स्नायूंचा विकास साधून शरीर कणखर कसे बनवावे, दुखापती कश्या टाळाव्यात, स्टॅमिना कसा वाढवावा याबाबत अद्ययावत ज्ञानाचा सजग वापर नाना आपल्या मुलामुलींसाठी करीत राहिले. मोठ्यांच्या जगातही पवनपुत्रने मधुकर दरेकर (सोशल सर्विस लीग, परळ) यांच्या शिक्षणामुळे वेटलिफ्टिंगसारख्या क्षेत्रात चमक दाखवून अत्युच्च बक्षिसे पटकावून दाखविली. शिवाय हे सारे अत्याधुनिक साधनांची, सुविधांची वानवा असताना! तीही साधने आपलीआपण

कमीतकमी खर्चात स्थानिक पातळीवर तयार करावी यावर त्यांचा सतत भर राहिला. नानांचे प्रशिक्षण खेळाडूंच्या सुरक्षेला सतत प्राधान्य देत

राहिल्याने अपघातप्रवण कौशल्य प्रकारातही खेळाडू (व त्यांचे पालक) नानांमुळे निश्चिंत होते. ते आपली सर्वप्रकारे काळजी घेऊनच शिकवतील हा आत्मविश्वास आमच्या बालमनातही त्यांनी जागविला होता.

माझ्यासारख्या अनेक सुरवंटांचे फुलपाखरू बनविणारा हा जादुगार आमची मानसिक तयारी करून घेताना आमचे मनोविश्व समृद्ध करीत राहिला, तेही निरिच्छ वृत्तीने! खिलाडूवृत्ती शिकविताना, जय पराजय समतोल वृत्तीने स्वीकारणे शिकवीत, अधिकाधिक प्रगतीसाठी ते आम्हाला प्रेरित करीत राहिले. आम्हाला स्पर्धेत कधी आत्मविश्वास कमी पडला नाही. त्यांनी आमच्या मनात सुस्पष्ट ध्येयवृत्ती जागविली. वर हे सारे घडविले खूप मायेने आणि प्रेमळपणे! नानांना तर रागवता येत होते की नाही हे मला कधी कळले नाही. रागविण्याचा प्रयास करतानाही त्यांच्या चेहेऱ्यावरील स्मितरेषा लपायच्या नाहीत. त्यांच्या विद्यार्थ्यांनीही अधिकाधिक राज्य आणि राष्ट्रीय विजेतेपदे शिवछत्रपती पुरस्कारासहित विजेतेपदे मिळविली. त्यांनी प्रेरीत केल्याने विद्यार्थ्यांनी पंच परीक्षा देत राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धात पंच म्हणून उत्तम उज्ज्वल कामगिरी करून दाखविली.

पुढील जीवनात अनेक अडचणींना तोंड देताना, ताणतणावाशी सामना देत प्रदीर्घ पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेताना व्यक्तिशः मला, नानांनी व किसन कदम सर, दादा धुमक, विजूदादा अशा अनेक क्रीडा शिक्षकांनी घडविलेल्या सशक्त चपळ शरीराचा, खंबीर स्थिर मनाचा, आत्मविश्वासाचा, टिकाऊ खिलाडू वृत्तीचा सतत उपयोग झाला. माझ्याकडे येणाऱ्या त्रस्त, थकलेल्या रुग्णांच्या शरीर मनाला जीवनात पुनः एकदा उमेद देऊन उभे करताना मी त्यांना व्यायामाचे, खेळाचे महत्व पटवून देत असतो. ते मला जमते कारण आम्ही साऱ्यांनी आमच्या आयुष्यात हे महत्व प्रत्यक्ष अनुभवले आहे.

गुरुजनानी झोळीत भरभरून ओतलेले ज्ञान समाजापर्यंत कळकळीने पोहोचविणे ही अशा निरीच्छ गुरुजनांनाही भावेल अशी माझी गुरुदक्षिणा मानून घ्यावी...

– डॉ. प्रदीप पाटकर
मानसोपचारतज्ज्ञ
श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर माजी विद्यार्थी

३. गुरुवर्य श्री. सुहास रामनाथ पाठारे

श्रीमती प्रतिभा चेंबूरकर–पाठारे

चेंबूर हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण घेताना आमच्या शाळेचे भव्य क्रिडांगण आम्हाला नेहमीच खुणावत असे. विविध खेळांमध्ये शाळा अग्रेसर होती त्यामुळे खेळाची आवड आपोआपच निर्माण झाली होती परंतु नेमका कोणता खेळ निवडावा, याबद्दल मनात शंका होती. माझे दोन्ही भाऊ घराच्या जवळच असलेल्या चेंबूर गावठाणमधील श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर येथे मल्लखांब व जिम्नॅस्टिक्स शिकण्यास जात असत. काही वर्षांनी दोघांनाही (प्रदीप व महेंद्र) महाराष्ट्र शासनाचे क्रीडा क्षेत्रातील शिवछत्रपती राज्य पुरस्कार प्राप्त झाले. आईवडिलांच्या प्रोत्साहनामुळे मीपण व्यायाम मंदिरात जिम्नॅस्टिक्स शिकण्यास जाऊ लागले. नाना खूप आवडीने सर्व तांत्रिक बाबी समजावून आम्हाला शिकवीत असल्यामुळे मी या खेळात कधी रमून गेले समजलेच नाही. नानांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनामुळे जिम्नॅस्टिक्स उपकरणावरील अत्यंत कठीण प्रकार व आसने करताना आम्हाला अजिबात भीती वाटायची नाही. यामुळे एक वेगळाच आत्मविश्वास निर्माण झाला. कालांतराने खेळाचे मैदान आणि आयुष्याचे मैदान यात विशेष फरक नाही, याची आम्हा खेळाडूंना जाणीव झाली. खेळामधून येणारी एकाग्रता, धेर्यशीलता, आत्मविश्वास, व्यक्तिगत विकास, संघभावना व चिकाटी या गोष्टींचे महत्व

व्यक्तिगत आयुष्यात देखील तेव्हढेच आहे, याची खात्री पटली. शिकायला येणाऱ्या कुठल्याच विद्यार्थ्याला नाना सक्ती करायचे नाहीत. मात्र जे विद्यार्थी आवडीने शिकण्यास येत होते त्यांना नाना आवडीने शिकवायचे! इतका साधा नियम शिकवण्याबाबत नाना पाळत असत. नानांनी आम्हाला वेळेचे बंधन कधीच घातले नाही. नानांनी आपला स्वतःचा वेळ खर्च करून अनेक राष्ट्रीय खेळाडू निर्माण केले. आसने, मल्लखांब व जिम्नॅस्टिक्स या खेळांचा महाराष्ट्रात प्रचार आणि प्रसार करण्यात नानांचा प्रमुख सहभाग आहे. जास्तीत जास्त मुलांना या खेळाची आवड निर्माण व्हावी म्हणून नाना राज्य जिम्नॅस्टिक्स संघटना MAGA तर्फे दिवाळी आणि मे महिन्यातील सुट्टीमध्ये कोचिंग कॅम्पस ठेवायचे. या कॅम्पमध्ये श्री मोरेश्वर ध. गुर्जर (राज्य सरकारी शिक्षक, पुणे) यासारख्या बाहेरील तज्ज्ञ शिक्षकांना आमंत्रित करण्यात येई. नवीन गोष्टी शिकायची ही आमच्यासाठी मोठी संधी असायची. नानांचा हा उपक्रम सर्व विद्यार्थ्यांना खूप उपयोगी ठरला. महाराष्ट्रातील गुणी खेळाडूंना एकत्रितपणे स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळावी म्हणून श्री पवनपुत्र तर्फे दर दोन वर्षांनी निमंत्रित राज्य स्पर्धा आयोजित करीत असत. नवोदित स्पर्धकांना चांगले खेळाडू व त्यांचा उच्च दर्जा पाहण्याची यानिमित्ताने संधी मिळत असे.

नानांच्या अचूक मार्गदर्शनामुळे मला जिम्नॅस्टिक्स मध्ये तेरा सुवर्ण पदके आणि काही रौप्य पदके मिळाली. नानांच्या प्रसाराच्या कार्यात हातभार लावावा म्हणून मी चेंबूरच्या जनरल एज्युकेशन अकॅडमी या शाळेत आसने आणि जिम्नॅस्टिक्स शिकवीत असे.

आज, १४ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरचे आजी-माजी विद्यार्थी व्यायाम मंदिराचा बासष्टावा वर्धापन दिन साजरा करत असताना प्रत्येकाच्या मनात नानांविषयी कृतज्ञतेची भावना आहे.

नानांना त्यांच्या पुढील आयुष्यात सुख, समाधान आणि आरोग्य लाभो, हीच शुभेच्छा आणि प्रार्थना!

– श्रीमती प्रतिभा चेंबूरकर-पाठारे
राज्य सुवर्णपदक विजेती (जिम्नॅस्टिक्स)
आणि राष्ट्रीय खेळाडू

४. गुरुदक्षिणा



श्री. चंद्रशेखर पाटील

मी नानांना पहिल्यांदा पाहिले तेव्हा मी नऊ वर्षाचा असेन! चौथीची परीक्षा संपून मे महिन्याची सुट्टी लागलेली होती आणि आईने आम्हा सगळ्या भावंडांना पवनपुत्रमध्ये दाखल केले. व्यायामशाळेची फी होती एक रुपया प्रति महिना.

पहिल्या दिवशी पवनपुत्रमध्ये दाखल झाल्यावर दुपारी तीन वाजता व्यायाम शाळेत गेलो आणि तिथेच मी नानांना पहिल्यांदा पाहिले. नाना वेताच्या खुर्चीमध्ये बसायचे आणि आमचा वॉर्म-अप घ्यायचे. आम्ही सगळे त्यानंतर आसनांच्या मॅट्सवर आसने करायचो आणि नाना आम्हाला प्रत्येक आसनामागे वीस आकडे म्हणून आसने करून घ्यायचे.

आम्ही बरेच जण 'चेंबूर हायस्कूल'चे विद्यार्थी होतो. नानांनी त्याच सुमारास चेंबूर हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी मोफत जिम्नॅस्टिक्स, आसनांचे संध्याकाळी प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली होती. नानांनी व्यायाम शाळेमध्ये एक प्रथा घालून दिली होती की व्यायामशाळेतील वरिष्ठ विद्यार्थी नवीन विद्यार्थ्यांना शिक्षण देणार आणि त्यातूनच आम्ही सगळे विद्यार्थी जिम्नॅस्टिक्स, योगासने आणि मल्लखांब शिकत शिकत स्पर्धेत भाग घेऊ लागलो.

त्याकाळी भारतामध्ये जिम्नॅस्टिक्सच्या स्पर्धांना आंतरराष्ट्रीय कोड ऑफ

पॉइंट प्रमाणे गुणांकन केले जायचे. जूनियर्स आणि सीनियर्स प्लेयर्सकरिता एकच कोड ऑफ पॉइंट्स वापरले जायचे त्यामुळे आम्ही जुनियर मुले ''व्हॉल्टींग हॉर्स''सारख्या प्रकारामध्ये आमच्या उंचीमुळे मागे पडायचो. याबाबत माझी आठवण अशी की नानांनी मला व्हॉल्टींग हॉर्सवर हँडस्टँड कार्टव्हील असा एक वॉल्ट शिकवला होता की जो कोड ऑफ पॉईंट्समध्ये जरी नसला तरीही व्हॉल्टींग हॉर्सवरील जी बेसिक मुव्हमेंट होती ती त्या व्हॉल्टमध्ये त्या वयामध्ये सुधारित होण्यासाठी खूप जरूरी होती. स्पर्धांमध्ये मला नेहमी तो व्हॉल्ट केल्यावर शून्य मार्क मिळायचे आणि मीदेखील तेव्हा खूप नाराज व्हायचो परंतु पुढे जाताना मला याच गोष्टीचा वॉल्टिंग हॉर्स प्रकारासाठी खूप फायदा झाला. आज २०२४-२५ मध्ये सगळ्या जगामध्ये लहान मुलांकरिता वेगळ्या तऱ्हेचे कोड ऑफ पॉइंट वापरले जाते. लेव्हल्स ट्रेनिंग हे आता भारतामध्ये देखील स्वीकारले गेलेले आहे. वेगवेगळ्या वयोगटात वेगवेगळे कोड ऑफ पॉइंट्स वापरले जाते. नानांनी हे गुणांकनाचे प्रकार त्याकाळी डेव्हलप केले होते १९८० च्या दशकात!

जसजसे आम्ही राष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेऊ लागलो तसतसे नानांनी आम्हाला जिम्नॅस्टिक्सचे गुणांकन करण्याचे प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली आणि आम्ही राज्यस्तरीय, राष्ट्रीयस्तरीय पंच परीक्षांमध्ये यशस्वी होऊ लागलो. नानांनी जिम्नॅस्टिक्स गुणांकन प्रशिक्षण देऊन आम्हाला स्वतःच्या जिम्नॅस्टिक्समधील चुका कशा ओळखाव्यात याची माहिती करून दिली आणि त्यामुळे आमचे जिम्नॅस्टिक्सदेखील सुधारले.

नानांनी लहानपणीच आम्हाला मल्लखांब जिम्नॅस्टिक्स आणि आसने यांची जी सांगड घालून दिली त्यामुळे आमचे जिम्नॅस्टिक्स खूपच सुधारले.

मी १९७८ पासून २००० पर्यंत रोज संध्याकाळी व्यायामशाळेत न चुकता जात असे त्याचे एकच कारण की जे नानांनी लहानपणीच आम्हाला जी शिकवण दिली की दिवसातील दोन ते तीन तास जरी आपण व्यायाम शाळेमध्ये शारीरिक व्यायाम केल्यास अभ्यासात त्याचा खूप फायदा होतो. अगदी एम. एस. सी. करीत असतानाही मला रोज व्यायाम शाळेत जाण्याचे जे एक वळण लागले होते ते नानांच्या या शिकवणीमुळेच!

नानांच्या या सगळ्या धडपडीमध्ये त्यांना नानांच्या पत्नीचा खूप आधार

होता.

२००० साली मी न्यूझीलंडमध्ये स्थायिक झालो. इथे आल्यानंतरही माझी जिम्नॅस्टिक्सची आवड कमी झाली नाही. नानांनी जे जिम्नॅस्टिक्सचे गुणांकन करण्याचे प्रशिक्षण दिले होते त्यामुळे मी न्यूझीलंडमध्ये राष्ट्रीय स्तरावर पंच (Judge) म्हणून काही वर्षे काम पाहिले.

नोव्हेंबर २०१२ मध्ये नाना आणि भाभी (विजया) न्युझीलँडमध्ये फिरण्याकरता आले आणि त्यावेळेस त्यांचा जो सहवास आम्हाला लाभला तो माझ्या आजही पूर्णपणे स्मरणात आहे.

नानांची जिम्नॅस्टिक्सकडे असलेली ओढ त्यांना न्यूझीलंडमध्येही थांबू शकली नाही. इथे आम्ही न्युझीलँडमधील सर्वोच्च जिम्नॅस्टिक्स केंद्रांमध्ये भेटी दिल्या. न्यूझीलंडचे राष्ट्रीय प्रशिक्षक साशा कुडीनोव्ह यांचीही नानांनी भेट घेतली. या प्रत्येक भेटीत नाना सतत काही ना काही जिम्नॅस्टिक्सच्या बाबतीत अभ्यास करतच होते आणि भारतात परतल्यानंतर याच अभ्यासू वृत्तीमुळे त्यांनी लहान मुलांकरिता योग्य असलेली साधने त्यांचे बंधू श्री अनिल पाठारे यांच्यामार्फत बनवून घेतली.

इंटरनेटमुळे नानांशी मी सतत संपर्क ठेवू शकलो. वेगवेगळ्या विषयांवर नाना आजही चर्चा करीत आलेले आहेत. श्याऐंशीव्या वर्षीही नाना आजही तेवढेच उत्साही आहेत जेवढे मी माझ्या लहानपणी १९७८ साली त्यांना पाहिले होते.

भारतातून विशेषतः पवनपुत्रमधून ऑलिंपिकमध्ये सहभागी होऊ शकतील असे जिम्नॅस्ट तयार करण्याचा नानांचा जो ध्यास आहे तो पूर्ण करण्याची नैतिक जबाबदारी आम्हा सगळ्या माजी विद्यार्थ्यांवर आहे!

नानांनी श्री पवनपुत्र व्यायाम मंदिरामार्फत एक क्रीडा प्रतिष्ठानच उभे केलेले आहे. ते प्रतिष्ठान पुढे चालू ठेवून त्यातून ऑलिंपिक विजेते निर्माण करण्याची त्यांची इच्छा पूर्ण करणे, हीच गुरुदक्षिणा आम्ही सगळे पवनपुत्रमधील विद्यार्थी त्यांना देऊ इच्छितो!

– श्री. चंद्रशेखर पाटील

श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर माजी विद्यार्थी

ऑकलँड

५. आरोग्यदायी संस्काराची गुरुकिल्ली

प्रा. प्रतिभा सराफ

आमचे नाना म्हणजेच मा. सुहास पाठारे सर! मी चेंबूर हायस्कूलमध्ये इयत्ता पाचवीत शिकत असताना, जून महिन्यामध्ये विज्ञान हा विषय शिकवणाऱ्या पाठारे सरांनी आमच्या वर्गामध्ये येऊन जिम्नॅस्टिक्स या खेळाविषयी माहिती सांगितली. त्या दिवशी हा शब्द पहिल्यांदाच ऐकला होता. काहीतरी नवीन शिकायला मिळणार, याचा वेगळाच आनंद होता आणि मग आईच्या परवानगीने दुसऱ्या दिवशी शाळा सुटल्यावर आमच्याच वर्गातल्या काही विद्यार्थ्यांबरोबर संध्याकाळी शाळेच्या मैदानावर उपस्थित राहिले. पाठारे सरांनी आम्हा दहा-पंधरा विद्यार्थ्यांना शिकवायला सुरुवात केली. कार्टव्हील, बॅक वॉकओव्हर, फ्रंट वॉकओव्हर, स्प्लीट असे काही प्रकार शिकण्याचा आनंद वेगळा होता. काहीही शिकले की घरी येऊन आईबाबांना करून दाखवणे आणि बहिणींसमोर रुबाब गाजवणे चालू होते. घरात कोणी पाहुणे आले, नातेवाईक आले की त्यांच्यासमोर कविता म्हण, गाणं म्हण, नाचून दाखव याबरोबर आईबाबासुद्धा चल, कार्टव्हिल मारून दाखव, स्प्लीट करून दाखव. असे सांगू लागले. सगळ्यांकडून कौतुक होतेय, हे पाहून उत्साह वाढत होता. इतक्यात सरांनी चक्क राज्यस्तरीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेसाठी आमच्यातून काहींना निवडले. स्पर्धा मुंबईतल्याच

कोणत्यातरी भागामध्ये होती त्यामुळे मला घरातून परवानगी मिळाली. त्या स्पर्धेत खूप काही शिकायला मिळाले पण बक्षीस काही मिळाले नाही.

त्यानंतर काही दिवसात आम्ही पाठारे सरांच्या पवनपुत्रमध्ये त्यांच्याच सांगण्यावरून दाखल झालो. आमच्या वर्गातील धनंजय चिवटे, चेतन रायकर, अंजली रावते इत्यादी सोबत होतेच. तिथे गेल्यावर धनंजयची लहान बहीण मंजुश्री चिवटे जी तिसरीत होती तिच्याशी ओळख झाली. ज्योती रावते हिच्याशीही ओळख झाली. आम्ही नियमित पवनपुत्र मध्ये जात होतो. आपले दुसरे घर असावे, असे बागडत होतो. अंजलीचे मामा आणि मावशी हे चेंबूरकर कुटुंबीयातील, आमच्यापेक्षा वयाने थोडे मोठे असलेले विद्यार्थी सरांसोबत आम्हाला कधीकधी जिम्नॅस्टिक्स शिकवायचे. इथे आल्यावर आम्ही बीम, हॉर्स इत्यादी शिकू लागलो. मल्लखांबवर चढण्याचा निष्फळ प्रयत्न करू लागलो. फ्लोअर एक्सरसाईजेस हा माझा अत्यंत आवडीचा भाग होता, ज्यात मी उत्तम प्रगती करू शकले!

पाठारे सरांचा उत्साह आम्हा मुलांना लाजवणारा होता. आम्ही थोडी जरी तक्रार केली की पाय दुखतोय, हात दुखतोय की सर म्हणायचे, चला पाय काढून ठेवा, हात काढून ठेवा आणि समोरच्या खुंटीला लटकवून ठेवा.

त्यांच्या या बोलण्यावर आम्ही आळस झटकून आणि देत असलेली कारणे बाजूला ठेवून व्यवस्थित सराव करायचो.

अगदी कमान जरी घालायची असली किंवा शीर्षासन करायचे असले तरी सर बाजूला उभे राहायचे त्यामुळे आम्हाला खूपच आधार वाटायचा आणि आम्ही अधिक आत्मविश्वासाने जिम्नॅस्टिक्सचा सराव करायचो. स्पर्धेसाठी आम्ही उशिरापर्यंत सराव करायला थांबायचो. एकदा सरावावरून घरी जायला थोडासा उशीर झाला. बाबा सरकारी नोकरीनिमित्ताने परगावी राहायचे त्यामुळे आईने सरळ माझे जिम्नॅस्टिक्स बंद करून टाकले. हे कळल्यावर सर घरी आले. आईला भेटले. आईला त्यांनी समजावून सांगितले की जेव्हा केव्हा उशीर होईल तेव्हा मी हिला घरापर्यंत सोडायला येईल. त्यांच्या या बोलल्यावर आईने परत जिम्नॅस्टिक्सला जाण्याची मला परवानगी दिली. काही स्पर्धांमध्ये आम्ही भाग घेतला ज्यामुळे मला खूप आत्मविश्वास मिळाला, नवीन शिकता आले. आम्हालाही थोडेफार यश मिळतच होते.

छोटी- मोठी पारितोषिके आणि सर्टिफिकेट्स यानिमित्ताने घरात येऊ लागली. घरातल्या टेबलावर सजवून ठेवता आली.

उन्हाळी आणि दिवाळीच्या सुट्टीत आमच्या बेगर्स होम स्टाफ कॉर्टर्सच्या सगळ्या मैत्रिणींना जमा करून आमच्या सरकारी बंगल्याच्या बाजूच्या हिरवळीवर मी त्यांना जिम्नॅस्टिक्स शिकवायचे. त्याचा परिणाम असा झाला की त्यातल्या काही मैत्रिणी जिम्नॅस्टिक्सकडे वळल्या.

अशातच केवळ जिम्नास्टिक्सचा युनिफॉर्म म्हणजे त्या काळचा शब्द अर्धी चड्डी किंवा आपण आता ज्याला शॉर्ट म्हणतो, ती घालावी लागे ही गोष्ट माझ्या आईला अजिबात पसंत नव्हती. त्यातच एका राज्यस्तरीय स्पर्धेसाठी माझी निवड झालेली होती आणि मी खूप सरावही केलेला होता परंतु ही स्पर्धा मुंबईबाहेर होती. तीन दिवसासाठी मला जावे लागणार होते अशा वेळेस परत आईने स्पर्धेला जाण्यासाठी परवानगी नाकारली आणि माझे जिम्नॅस्टिक्स जवळजवळ बंदच झाले. तोपर्यंत मी दहावीत पोहचलेले होते आणि बोर्डाची परीक्षा द्यायची म्हणून सगळेच खेळ बंद झाले.

आजही पाठारे सर भेटले की जिवाभावाचे कोणीतरी भेटल्यासारखे वाटते. त्यांनी आम्हाला केवळ जिम्नॅस्टिक्ससारखा एका खेळ शिकवला नाही तर आयुष्यात प्रचंड मोठ्या प्रमाणात आत्मविश्वासाने जगायचे शिकवले. सातत्याने प्रयत्न करत राहा यश नक्की मिळते, हा मंत्र दिला.

एम. एस. सी (फिजिक्स) पर्यंत शिक्षण झाल्यावर आयुष्यात थोडा निवांत वेळ मिळाला तेव्हा सर्वात प्रथम योगक्लास लावला कारण योग हा प्रकार कुठेतरी जिम्नॅस्टिक्सच्या जवळ जाणारा आहे, असे मला वाटले. अगदी त्या दिवसापासून आजपर्यंत मी मनापासून योग करते. पाठारेसरांची आठवण काढते.

राज्यस्तरावर, राष्ट्रीय स्तरावर इतकेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठारेसरांच्या विद्यार्थ्यांनी देशाचे नाव मोठे केले आहे. सरांनाही त्यांच्या या कार्यासाठी खूप सारी पारितोषिके मिळालेली आहेत.

आजही ॲड. शरद भोसले सर, मा. देवदत्त म्हात्रे सर आणि त्यांची टीम, पाठारे सरांची जिम्नॅस्टिक्सची धुरा पुढे नेत आहेत, सुदृढ पिढी घडवत आहेत, ही आनंददायी गोष्ट आहे.

जिम्नॅस्टिक्स हा केवळ एक क्रीडा प्रकार नसून आरोग्यदायी संस्काराची गुरुकिल्ली आहे; ज्यांच्यामुळे मला आणि सरांच्या असंख्य विद्यार्थांना ती प्राप्त झाली त्या सर्वांच्या वतीने मी सरांना म्हणजेच आमच्या नानांना, त्यांच्या आरोग्यदायी दीर्घायुष्यासाठी अंतःकरणापासून शुभेच्छा देते!

- प्रा. प्रतिभा सराफ

श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर माजी विद्यार्थिनी

६. दादा आणि नाना
(जन्मशताब्दी – रा. ह. पाठारेंची)



ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर

बघता बघता रामनाथ हरिराम पाठारे उर्फ दादांची जन्मशताब्दी आली आणि त्यांची उंच धिप्पाड अशी खादीचा लांब हाताचा बुशशर्ट आणि पॅन्ट असालेली मूर्ती नजरेसमोर उभी राहिली. लग्नानंतर मी चेंबूर गावठाण येथे राहायला आलो. दादांचे परमस्नेही व बालपणापासूनचे मित्र नाना उर्फ केशव अनंत करंबेळकर हे माझे सासरे त्यांच्यामुळे माझा आणि दादांचा काही काळ सहवासाचा योग आला. एकदा हातात कागदांचे भेंडोळे धरलेले उन्हातान्हातून घामेजत ताठ मानेन चालणारे दादा येता-जाता भेटायचे. दादा हे व्यवसायाने आर्किटेक्ट होते. मी अनेक वर्षे राहत असलेली जागाही त्यांच्याच आराखड्यातून उभी राहिली. चेंबूर परिवार आणि विशेषतः गावठाण विभागाचे सर्व नकाशे त्यांच्याकडे होते. कुणी किती अतिक्रमण केलेय हे त्यांच्या ध्यानी आले की त्याचा पिच्छा पुरवणारे. त्यामुळे त्यांनी शत्रूही खूप निर्माण केले. पण अस्सल गाधीवादी आणि सत्याची कास धरणारे दादा कधी कुणापुढे नमले नाहीत वा घाबरलेही नाहीत. मनुष्य हा काळाची निगडित असतो पण दादांसारखी माणसे त्या काळाची निर्मिती असतात. त्या काळाला स्वतःची ओळख देतात. राष्ट्रीय काँग्रेसची निर्मिती असलेली अशी

देशभक्त मंडळी गावोगावी निर्माण झाली. नैतिक आचरणाचा धाक निर्माण करणारी अशी माणसे लोप पावली याचे मनस्वी दुःख होते. सार्वजनिक काम करून स्वतःचा खिसा भरणे हे त्यांच्या रक्तात नव्हते. आणि म्हणूनच अशा माणसांच्या जन्मशताब्द्या साजऱ्या होतात. मला गंमत वाटते की अनेकदा त्यांचे आणि आणि नाना करंबळेकरांचे कडाक्याचे भांडण व्हायचे, वाद व्हायचे. पायात चप्पल चढवून उद्यापासून मी तुझे घराची पायरी चढणार नाही केशव!, म्हणणारे दादा दुसऱ्या दिवशी नानांकडे छान गप्पा मारताना दिसत. आपला व्यवसाय सांभाळून त्यांनी व्यायामशाळेचा पाया उभा केला. त्यातल्या अनेकांना राज्यपुरस्कार लाभले. अनेकजण मोठ्या पदावर गेले. पण समाजासाठी अयाचित वृत्तीने काम करणारी ही संस्था आजच्या काळात चालू ठेवणे अतिशय कष्टाचे होत आहे याची खंत वाटते. निःस्वार्थ बुद्धीनं काम करणारे कार्यकर्ते आणि अत्यंत खर्चिक अशी उपकरणे घेण्यासाठी आपला मदतीचा हात पुढे करणारे दाते या जन्मशताब्दीच्या निमित्ताने पुढे यावेत ही सदिच्छा व्यक्त करून दादांना आदरांजली अर्पण करतो.

चेंबूर गावठाण परिसरातच गेली चाळीस-पंचेचाळीस वर्षे राहत असल्याने आणि पवनपुत्र अगदी माझ्या घराच्या पिछाडीलाच असल्याने सुहास पाठारे आणि त्यांचे अद्वितीय योगदान याबद्दल मला विलक्षण आदराची भावना आहे. माझी मुलगी प्राची पवनपुत्र व्यायाम शाळेतूनच अनेक स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी भारतभर फिरून आली आहे. आता दूरदर्शन आणि वाहिन्यांमुळे ऑलिंपिक सर्वत्र पाहिले जाते. पण एक काळ असा होता की अनइव्हन बार, बॅलेंसिंग बीम, हॉर्स असे शब्द कानावर पडले की काही कळायचे नाही. पण पवनपुत्रमुळे या जिम्नॅस्टिक्सची ओळख होत गेली. अनेकदा पाठारे यांनी निमंत्रित महाराष्ट्र पातळीवर स्पर्धा भरवल्या. त्यातील मुलामुलींचे कौशल्य बघताना कॉमनवेल्थ अथवा ऑलिम्पिक स्पर्धा पाहतोय, असा भास व्हायचा! आणि या कसरती करणारी कुणी गाड्याबंगलेवाली मुलेच नव्हती तर अक्षरशः तळागाळातली झोपडपट्टीत राहणारी मुले होती.

कुठलेही आर्थिक ध्येय न ठेवता महाराष्ट्रातील मुले विविध स्पर्धात अग्रभागी असावीत असा ध्यास व व्रत घेतलेली व्यक्ती म्हणून मला सुहास पाठारे यांच्याबद्दल विलक्षण आदर आहे. खरेतर राष्ट्रीय पातळीवर या

प्रसिद्धीपासून दूर असलेल्या क्रीडा गुरूंचा यथोचित सत्कार व्हावा असे मला मनापासून वाटत आले आहे.

जिम्नॅस्टिक्समध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचलेल्या अनेक खेळाडूंच्या वलयामागे पाठारे यांच्या पवनपुत्र व्यायाम मंदिराचे वलय आहे यात सर्व काही आले!

– ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर

ज्येष्ठ साहित्यिक

७. श्री पवनपुत्र : पुढील वाटचाल



ॲड. शरद कृष्णा भोसले

लहानपणापासून मला खेळण्याची खूप आवड होती. परंतु आमची अशी परिस्थिती नव्हती की कोणता क्रीडा प्रकार मला शास्त्रशुद्ध पद्धतीने शिकता येईल, त्यामुळे काही स्वप्नांना मनाच्या कोपऱ्यात लोटून दिले होते.

२००३ पवनपुत्र व्यायाम मंदिराच्या कामानिमित्त श्री. सुहास रामनाथ रामनाथ पाठारे यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर मैत्रीमध्ये झाले. पवनपुत्र व्यायाम मंदिराच्या आवारात मुलांना जिम्नॅस्टिक्स करताना पाहून खूप आनंद व्हायचा. खरंतर मी १९९० पासून रोटरी क्लबचा सदस्य आहे इतकेच नव्हे तर रोटरी इंटरनॅशनलचाही सदस्य म्हणूनही इथे कार्यरत आहे. मुलांनी खेळलं पाहिजे त्याचबरोबर वयस्कर माणसांनीही कमीत कमी चालण्याचा तरी व्यायाम केला पाहिजे या उद्देशाने मी चेंबूर जिमखानाच्या मागचा एक भाग डेव्हलप केला आणि तिथे माणसांना फिरताना, खेळताना, नाचताना पाहून आनंदून गेलो. जणू काही माझ्या जीवनाचे सार्थक झाले असा भास मला झाला.

दरम्यान २०१४ साली पवनपुत्र व्यायाम मंदिराचा पन्नासावा वर्धापन दिन सोहळा होता. त्यानिमित्ताने निमंत्रित राज्य स्पर्धा भरवली गेली होती. या स्पर्धेत जवळजवळ आठशे खेळाडूंनी भाग घेतला होता. या खेळाडूंची

देखभाल आणि कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्याची मोठी आणि महत्त्वाची जबाबदारी श्री. पाठारे यांनी माझ्यावर सोपवली होती. ती मी आनंदाने स्वीकारली आणि व्यवस्थित पार पाडली. आपण खेळणाऱ्या मुलांसाठी काही करू शकलो या आनंदात मला कित्येक रात्री अतिशय शांत झोप लागली.

दरम्यान गावठाणातील श्री पवनपुत्र व्यायाम मंदिराच्या जागेचा प्रश्न निर्माण झाला. काही कारणास्तव इतकी मोठी संस्था बंद तर पडत नाही असा भास अस्वस्थ करून गेला. या संदर्भात मी चेंबूर महिला समाजाच्या त्यावेळेस अध्यक्ष असलेल्या डॉ. त्रिनोदिनी प्रधान यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी महिला समाज च्या आवारात असलेली मोकळी जागा पवनपुत्र व्यायाम मंदिर चालवण्यासाठी दिली. फक्त त्यांची अट एकच होती की इथे फक्त मुलींची व्यायामशाळा चालेल! ती अट आम्हाला मान्य करावी लागली. मुलांसाठी आम्ही चेंबूरमध्ये व्यायाम शाळेसाठी जागा शोधतो आहोत. कधीतरी ती मिळेलच!

श्री पाठारे म्हणजे नानांचे काही विद्यार्थी इथे प्रशिक्षक म्हणून येऊ लागले. नवीन जागेतील श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर मुलींच्या उत्साहाने आणि नियमित येऊन व्यायाम प्रकार करण्याने भरून गेले. इथे बिमची व्यवस्था करण्यात आली आहे. गाद्या टाकण्यात आल्या. इथे २० मुलींनी सुरुवात केली. तो पट वाढून १२० पर्यंत पोहोचला. इथे श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर २०१८ मध्ये सुरू केल्यापासून नाना सातत्याने संपर्कात आहेत. नानांकडून खूप शिकण्यासारखे आहे. त्यांच्याकडून मला नेहमीच ऊर्जा मिळते. ते अलीकडे प्रशिक्षण देत नाहीत पण प्रशिक्षकांचे सल्लागार म्हणून काम पाहतात त्यामुळे जिम्नॅस्टिक्स या खेळात मुलींची प्रगती होत आहे.

बृहन्मुंबई जिम्नॅस्टिक्स असोसिएशनने आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धां-मध्ये तसेच राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये आमच्या मुली नियमित भाग घेतात आणि पारितोषिकेही मिळवतात.

आमच्याकडे राज्य पातळी आणि काही राष्ट्रीय पातळीवरील जिम्नॅस्टिक्समधे तज्ज्ञ असलेले सात कोच आहेत.

नानांनी आपले संपूर्ण जीवन खेळासाठी समर्पित केले आहे. ही खूप

कठीण आणि आगळीवेगळी गोष्ट आहे. त्यामुळे नानांसाठी माझ्या मनात प्रचंड आदर आहे. नाना म्हणजे चेंबूरचे वैभव आहेत. अशा नानांसारख्या विचारांच्या, आपल्या कार्याला समर्पित असलेल्या व्यक्ती खूप कमी आहेत. परंतु या संस्थेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे योग्य मार्गदर्शन मिळत आहे त्यामुळे या विद्यार्थ्यांमधूनच नानांसारखा आपल्या खेळ या कार्याला समर्पित कोणी विद्यार्थी निश्चितपणे निर्माण होऊ शकतो अशी मला खात्री वाटते.

मी नानांसारख्या निष्णात आणि अनुभवी संस्थाचालक यांच्यासोबत आहे, याबद्दल मला स्वतःचाही अभिमान वाटतो. पवनपुत्र व्यायाम मंदिर यासारख्या संस्थांची समाजाला खरोखरी गरज आहे. ही गरज चेंबूरमध्ये ज्या संस्था, शाळा, महाविद्यालय आहेत आणि ज्यांच्याकडे मोकळी मैदाने आहेत त्यांनी समजून घेतली तर पवनपुत्रच्या अनेक शाखा येथे स्थापन होतील! अनेक मुलांचा शारीरिक आणि मानसिक विकास होईल. नानांनी दूरदृष्टी ठेवून निर्माण केलेली ही संस्था आणि संस्थेतील विद्यार्थी आकाशाला गवसणी घालू शकतील!

– ॲड. शरद कृष्णा भोसले

कार्यकर्ता : पवनपुत्र व्यायाम मंदिर

८. नानांचा शेजारी नव्हे सहकारी!



ॲड. प्रा. प्रमोद सावंत

काही दिवस कायमचे मनावर कोरले जातात त्यापैकीच एक शुभदिवस म्हणजे ३ फेब्रुवारी २०२४. हा माझ्यासाठी एक वेगळा दिवस होता कारण या दिवशी मी सुहास पाठारे नावाच्या पंच्याऐशी वर्षाच्या या तरुण माणसाला भेटलो!

तीन दिवस आम्ही आमच्या घराजवळच्या कुर्ला मैदानात फेरफटका मारला त्यानिमित्ताने झालेली ओळख आणखी वाढली कारण आम्ही दोघेही क्रीडाप्रेमी!

१५ फेब्रुवारी २०२४ला नानांच्या आयुष्यात अत्यंत दुर्दैवी घटना घडली. त्यांची सहचारिणी त्यांना सोडून गेली. ती जाणार असल्याची कुणकुण त्यांना लागली होती. त्यांनी, त्यांचे आराध्य दैवत गणपती बाप्पा आणि जगद्गुरू यांच्या चरणी लीन होत त्यांनाच तिची काळजी घेण्याची मनोमन प्रार्थना केली होती. काळाच्या पुढे कोणाचे काय चालणार? या वयात निराधार होणे म्हणजे काय, ते त्यांनी अनुभवले. काळाच्या पुढे कोणाचे काय चालणार?

साधारण तेवीस दिवसानंतरची गोष्ट. मी हात पुढे केला आणि त्यांनी आनंदाने माझ्याबरोबर मैदानात फिरायला नव्याने सुरुवात केली. Life should

go on च्या धर्तीवर पुढे वाटचाल करायला सुरुवात केली.

१८ मे २०२४ ला पहिल्यांदा डॉन बॉस्को या माटुंग्यातील शाळेच्या मैदानात एक स्पर्धा झाली. त्याच्या बक्षीस समारंभास त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून मी घेऊन गेलो. तेव्हा त्यांनी विद्यार्थी दशेत अनुभवलेले सहासष्ट वर्षांपूर्वीचे खालसा कॉलेज पाहिले आणि काही आनंददायी गतस्मृती जागवल्या!

मैदान पाहिले की नानांमध्ये चैतन्य सळसळते, हे माझ्या लक्षात आले. मग आम्ही आसपासच्या नवनवीन मैदानावर भटकंती करण्याचा सपाटा लावला. टिळक नगर मैदान, शिवाजी पार्क, चुनाभट्टी मैदान, कुपरेजा मैदान, चर्चगेट मैदान याचबरोबर आम्ही काही मंदिरांनाही भेटी दिल्या. चालता फिरता अनेक विषयांवर अवांतर बोलणे व्हायचे. यात एक गोष्ट कळली की खानावळीतून आलेल्या जेवणामुळे त्यांच्या पत्नीला त्रास झाला होता. हाच मुद्दा पकडून मी थोडीशी हिंमत केली आणि प्रेमाने म्हटले, ''आमच्या घरचे जेवण मी तुम्हाला उद्यापासून पाठवतो.'' त्यांनीही ते मान्य केले. त्या दिवसापासून आमच्या घरात तीन ताटे वाढली जाऊ लागली; दोन माझ्या दोन मुलांची आणि तिसरे नानांचे!

नाना आमच्याच घरातील एक सदस्य असल्याची भावना घरातल्या प्रत्येकाला सुखावणारी आहे!

दरम्यान एक घटना अशी घडली की नाना घरात चक्कर येऊन पडले. घर आतून लॉक होते. मी तातडीने फायर ब्रिगेडला बोलवून दरवाजा तोडून त्यांना बाहेर काढले. दरम्यान डॉक्टर, ॲम्बुलन्स आणि पोलीस यांनाही फोन करून बोलावले. नानांना ॲडमिट करावे लागले नाही हे बरे झाले. दोन महिन्याच्या काळानंतर ते पूर्णपणे बरे झाले आणि आम्ही पुन्हा फिरतीवर लागलो! पनवेल, तळोजा, ठाणे, नवी मुंबई, लोणावळा, पुणे, चिपळूण, सिंधुदुर्ग नाशिक अशा वेगवेगळ्या ठिकाणी आम्ही वेगवेगळ्या कारणास्तव फिरतोय!

या दरम्यान काही शाळांनाही आम्ही भेटी दिल्या, ज्यात बॉम्बे स्कॉटिश, फादर एग्नेल, शिशुवन, अँथनी डिस्लिव्हा इत्यादी.

समान विचारामुळे एक सशक्त मैत्र जपत महाराष्ट्राच्या बाहेरही आम्ही

भ्रमंती केली. कुमार स्वामी जगद्गुरू यांचे वास्तव्य ज्या ज्या ठिकाणी आहे त्या त्या ठिकाणी म्हणजे अंबाला, दिल्ली, वृंदावन, पानिपत इथे मला नानांना घेऊन जाता आले. अध्यात्म आहे आमच्यातील एक समान दुवा! नानांबरोबर राहून मी अनेक गोष्टी शिकलो. क्रीडा क्षेत्रातील हा माणूस अजूनही फिट आहे फक्त शरीरानेच नाही तर मनानेसुद्धा! अलीकडेच आम्ही बाकी असलेली नर्मदा परिक्रमा सोबतीने पूर्ण करण्याचा प्रयत्न करू. आता परमपूज्य विश्वनिर्मात्याकडे माझी इतकीच मागणी आहे की नानांनी याच शारीरिक आणि मानसिक सुदृढतेने वयाची शंभरी पार करावी!

– ॲड. प्रा. प्रमोद सावंत
शेजारी आणि सहकारी